म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
सं. क्र. : ११३८

REFBK-0009764

REFBK-0009764

अ.क्रमांक 23573 दि: ...
ग्रंथांक 923.5 नों: दि: ...

# प्रास्ताविक

प्रस्तुत संग्रहांतील व्यक्तिचित्रें सतरा वर्षांच्या दीर्घ काळांत, लहर लागली व सवड झाली त्याप्रमाणें लिहिलीं असल्यानें एकंदर संग्रहांत एकसूत्रीपणा दिसून येणार नाहीं. शुद्धलेखनाच्या बाबतींत तर, वाचकांस हें विशेषत्वानें जाणवेल. उदाहरणार्थ कांहीं लेखांत नपुंसकलिंगवाचक क्रियापदांचीं, धातुसाधितांचीं वा विशेषणांचीं रूपें अनुस्वारयुक्त ' ए 'चा उपयोग करून पूर्णपणें लिहिलीं आहेत, तर इतरत्र तींच रूपें बोलण्यांत येतात तशीं ' अं ' नें दर्शविलीं आहेत. लेखांचा संग्रह छापतांना एकाच पद्धतीनें तीं रूपें लिहिणें अशक्य नव्हतें; पण असें वाटलें कीं, मुळांत लेख जसा लिहिला, कधीं कांहींशा औपचारिक रीतीनें तर कधीं अगदीं अनौपचारिक वृत्तीनें, तसाच छापणें अधिक श्रेयस्कर ठरेल. शुद्धलेखन जर एकसांच्याचें केलें असतें तर कदाचित् तें मूळ लेखाच्या मांडणीशीं व भाषेशीं विसंगत ठरलें असतें.

ह्या संग्रह वाचकांस सादर करतांना अनेकांचे आभार मानणें अवश्य आहे. सर्वारंभीं, ज्यांच्या उठावदार व्यक्तित्वामुळें लेखनाची इच्छा माझ्या मनांत स्फुरली त्या लेखनविषयांस माझे आभार कृतज्ञतेनें पोंचविले पाहिजेत. ह्या विषयांत अनेक लहानथोर व्यक्तींचा समावेश झाला आहे आणि त्यांच्याबरोबर एक कुत्रा, कॅशिआ आणि शेवगा हे दोन वृक्ष आणि माझें जन्मस्थान ' संगमाश्रम ' हीं सुद्धां आलीं आहेत.

लेख व लेखाचे विषय कांहींसे वेगळ्या धर्तीचे व वाचकांच्या दृष्टीनें लेखिका बहुतांशीं अपरिचित, अशी परिस्थिति असूनही ज्या संपादकांनीं आपल्या मासिकांत ह्या लेखांना स्थान दिलें त्याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे. ' स्त्री ' आणि ' महाराष्ट्र सारस्वत ' ह्या मासिकांच्या संपादकांनीं सुरुवातीच्या लेखांचा स्वीकार केला म्हणूनच केवळ पुढें धीरानें कांहीं लिहितां आलें.

तुरळक तुरळक लिहिलेल्या ह्या लेखांचा संग्रह छापण्याची कल्पना सुमारें चार वर्षांपूर्वीं डॉ. ग. श्री. खैर ह्यांनीं सुचविली. त्याबद्दल मी त्यांची मनापासून आभारी आहें. पुढें अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशनानेंच हें काम हातीं घेतलें आणि अत्यंत जिव्हाळ्यानें व जातीनें मन घालून तें पुरें केलें ह्याबद्दल श्री. शं. दा. चितळे आणि श्री. वि. प्र. कुलकर्णी ह्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

माझे अनेक आप्त, मित्र-मैत्रिणी, विद्यार्थी-विद्यार्थिनी ह्यांनीं वेळोवेळीं प्रसिद्ध होणारे हे लेख अत्यंत आपुलकीनें आणि रसग्राहक वृत्तीनें वाचून अशा प्रकारचें लेखन चालू ठेवण्यास मला प्रोत्साहन दिलें त्याबद्दल मी सदैव त्यांची ऋणी असेन. ह्या वाचकवर्गाचे प्रतिनिधि म्हणून संग्रहाचें हें पुस्तक माझे स्नेही व व्यवसायबंधु डॉ. वें. वि. कामत ह्यांना अर्पण करण्याचें ठरविलें आहे. ह्याच वर्षीं त्यांची सत्तरी साजरी होत आहे हा एक चांगला योग आहे. त्यांनीं शैक्षणिक संशोधन आणि संख्याशास्त्र ह्यांतून डोकें वर काढून माझे हे लेख वेळोवेळीं आवडीनें वाचले आणि त्यांचें कौतुक केलें ही माझ्या दृष्टीनें मोठी नवलाची तशीच मोलाची गोष्ट आहे. तथास्तु ।

सुलभा पाणंदीकर

पुणें, २१ मे, १९५८

* * *

प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ

डॉ. वें. वि. कामत

यांस सादर अर्पण

* * *

# प्रकाशकाचे चार शब्द

स्त्री, सह्याद्रि इत्यादि मासिकांतून कु. सुलभा पाणंदीकर यांचे लेख मधून मधून प्रसिद्ध होतात. ते वाचनांत आल्यावर असें वाटूं लागलें कीं, अशा लेखांचा संग्रह पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यास मराठी वाचकांची चांगली सोय होईल. कांहीं मित्रमंडळींनीं तशा सूचनाहि केल्या. ही गोष्ट लक्षांत घेऊन आम्हीं कु. सुलभा पाणंदीकर यांना तशी विनंति केली. ती विनंति त्यांनीं तत्परतेनें मान्य केल्यानें, प्रस्तुतचें पुस्तक, वाचकांना आम्हीं देऊं शकत आहोंत याबद्दल आम्हांस आनंद वाटतो.

कु. सुलभा पाणंदीकर यांनीं या पुस्तकाचे सर्वाधिकार पुणें अनाथ विद्यार्थी गृह या शिक्षण-संस्थेस देणगी म्हणून दिलेले आहेत, हें नमूद करण्यास आम्हांला आनंद वाटतो. या त्यांच्या औदार्याबद्दल अ. वि. गृह संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे.

पुस्तकांतील व्यक्ति-चित्रें ज्या ज्या मासिकांतून आणि नियत-कालिकांतून घेतलेलीं आहेत त्यांचा त्यांचा त्या त्या लेखाच्या शेवटीं निर्देश केलेला आहेच. एकूण तेवीस व्यक्ति-चित्रें पुढें दिल्याप्रमाणें निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध झालेलीं आहेत :—स्त्री १०, संगम ४, सह्याद्रि ३, महाराष्ट्र-सारस्वत २, सुगंध १, बालिकादर्श रौप्यमहोत्सव अंक १, शिक्षण-पत्रिका १, जीवन-शिक्षण (हस्तलिखित) मासिक १. वरील नियतकालिकांतील या लेखांचा प्रस्तुत संग्रहांत अंतर्भाव केलेला आहे. आम्ही त्या त्या संपादक व प्रकाशकांचे अत्यंत आभारी आहोंत.

वाचकांना ही सेवा आवडेल असा भरंवसा आहे.

**ग. श्री. खैर**

**कार्याध्यक्ष**

अ. वि. गृह, पुणें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ...................... वि: ......................
क्रमांक ...................... नोंः दिः ......................

ठाणे. स्थ
अनुक्रम ............ वि: ............
नों: दि: ............

# अनुक्रम

## भाग १ ला


| | | |
|---|---|---|
| १. | राधाबाई | ३ |
| २. | भीमाबाई | ११ |
| ३. | शांताराम | २३ |
| ४. | काळूराम | ३३ |
| ५. | माझी गाडी आणि गाडीवान | ४२ |
| ६. | पुण्याचा टांगेवाला | ५६ |
| ७. | सगुणेचं निवेदन | ६८ |
| ८. | गोखले मास्तर | ८२ |
| ९. | मामा | ९० |
| १०. | मास्तर | १०० |


## भाग २ रा


| | | |
|---|---|---|
| ११. | चाकाची रवी | ११५ |
| ११. | बहिरोबाशीं गांठ | १२२ |
| १३. | मुंबईंतील कांहीं वेडे | १२९ |
| १४. | काकांचा पाहुणचार | १३७ |
| १५. | काकांचं दुखणं | १४४ |
| १६. | शिकलेली सून | १५० |


## भाग ३ रा


| | | |
|---|---|---|
| १७. | बाळू आणि मंडळी | १५५ |
| १८. | खुश्रूचें काम | १५९ |
| १९. | रघू | १६३ |
| २०. | पहिले बोल | १७१ |


## भाग ४ था


| | | |
|---|---|---|
| २१. | आमचा कॅशिआ | १८१ |
| २२. | शेवगा | १८९ |
| २३. | संगमाश्रम | १९८ |

# भाग पहिला

[व्यक्तिचित्रें १ ते १०]

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २३५७३ दि.
क्रमांक

# १ : राधाबाई



राधाबाई

गेल्या सहा वर्षांतल्या माझ्या जीवनांत प्रामुख्यानें वावरणारी कोणी व्यक्ति असेल तर ती आमची राधाबाई. एकदां दोन दिवस राधाबाईच्या पाहुणचाराचा अनुभव घेतलेली माझी एक मैत्रीण म्हणाली,

"तुझी राधाबाई म्हणजे पी. जी. वुडहाउसच्या जीव्हस्‌चीच प्रतिकृति आहे अगदीं!" जसजसा राधाबाईचा अधिक अनुभव येतो तसतसें जीव्हस्‌चें आणि तिचें हें साम्य जास्तच पटतें.

माझ्यासारख्या एकट्या स्त्रीचा 'उघडा' संसार संभाळण्यास योग्य

म्हणून माझ्या वडील वहिणीनें पुण्याहून राधाबाईस पाठवलें. बोरीबंदरवर बायकांच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून राधाबाईला शोधून काढावयाला वेळ लागला नाहीं. लहानशी ठेंगण्या बांध्याची मूर्ति, मावळशाही पद्धतीनें नेसलेलें लुगडें, कपाळावरचें भलें मोठें कुंकू, नाकांतली बांगडीवजा नथ, तोंडावरच्या अगणित सुरकुत्या, असा अवतार पाहून माझ्या मनांत शंका आली, " काय ताईनं माणसाची निवड केली ही ! हें पात्र माझा संसार संभाळणार कीं मलाच हिला पावलोपावलीं संभाळून घ्यावं लागणार ? " पण राधाबाईचें दहापंधरा दिवसांचें काम पाहून ही शंका दूर झाली. तरी सुद्धां ह्या दिवसांत म्हातारीनें आपला खरा इंगा दाखवला नाहींच. तिनें ह्या दिवसांत मालकिणीची परीक्षा केली आणि आपल्या मनाशीं ठरवलें, कीं पुस्तकें वाचणें आणि 'इस्कुलांत लिवायला शिकवणें ' ह्याच कामास बाई योग्य. परीक्षेचा असा निकाल आपणच लावून घरांतलें तंत्र राधाबाईनें सर्वस्वीं आपल्या हातांत घेतलें.

मी मायकेल ऍंजलोच्या दोन पुतळ्यांचीं छायाचित्रें हौशीनें माझ्या उठाबसायच्या खोलींत लावलीं होतीं. दोन्ही पुतळे वस्त्रविरहित होते. राधाबाईच्या पुणेरी दृष्टीला कसें सहन होणार तें ? एक दिवस नूर पाहून—हा नूर पाहाण्यांत मुहूर्त पाहाणाऱ्या ज्योतिष्याचें कौशल्य तिच्यांत आहे—तिनें सुचविलें, " हीं कसलीं चित्रं लावलींया ? लई वंगाळ दिसतात बसायच्या खोलीमंदी ! " मीं आपलें लक्ष नाहींसेंच केलें त्या वेळीं. कांहीं दिवसांनीं माझ्या लक्षांत आलें कीं नकळत चित्रांची स्थापना आंतल्या अभ्यासाच्या खोलींत झाली होती. त्यानंतर एकदोन घरें बदललीं आणि परवा पुन्हां चित्रांची चौकशी केली तेव्हां माळ्यावर त्यांची रवानगी झाल्याचें आढळून आलें. पण म्हातारीनें कसें बिनबोभाट केलें सारें काम !

घर बदलतांना राधाबाईची खरी कर्तबगारी दिसून येते. त्या दिवसांत तिची जी कांही धडपड चालते ती पुसूं नका. आमचें घर बदलणें म्हणजे

शेजाऱ्यापाजाऱ्यांना एक करमणूक असते मोठी ! घरांतल्या चुलीकडच्या विटा, भांडीं घासायची माती, नारळाच्या करवंट्या, फुटकीं मडकीं—एकन् एक चीज सामानांत बांधली जाते. एका वेळेस तर भिंतींतले खिळे ओढून काढण्यापर्यंत पाळी आली होती; पण मला वेळेवर पत्ता लागला म्हणून भिंती सुरक्षित राहिल्या. आणि सामान लॉरीवर चढवतांना " अर बाबा, तें अलग ठेव, तें अक्षी कोपऱ्यामंदी वायलं ठेव " असे सतरा हुकूम राधाबाईकडून सुटत असतात. सामान भरून होईपर्यंत लॉरीच्या भोंवतीं तिच्या किती फेऱ्या होतात त्याची गणतीच नाहीं. सगळें सामान भरून झालें कीं पुनः एकदां घरांत जाऊन खोलीखोलीनें कोनाकोपरा तपासून सुतळीचा तोडासुद्धां राहिला नाहीं अशी खात्री झाल्यावर स्वारी लॉरींत ड्रायव्हराशेजारीं विराजमान होते तेव्हां तिच्या तोंडावरचें कृतकृत्यतेचें समाधान पहाण्यालायक असतें.

भांडींकुंडी जमविण्याचा राधाबाईला भयंकर सोस ! माझ्या एकटीचा संसार, पण भांडीं इतकीं जमलीं आहेत कीं, दहावीस माणसांचा पंच-पक्वान्नांचा स्वयंपाक त्यांत व्हावा ! कोठें कोणाकडे नवीन घाटाचें भांडें राधाबाईच्या दृष्टिपथांत आलें कीं माझ्या पदराला खार लागलाच ! भांडें मला घ्यावयाला लावावयाचें तंत्र तिनें चांगलें शोधून काढलें आहे. एखादा दिवस स्वयंपाक चांगला झालेला असला आणि मी व्यवस्थित जेवलेली दिसलें कीं तिनें ठरवलें आहे, कीं माझी निश्चयशक्ति दुर्बल होते. मग संध्याकाळीं हळूच विचारते, " बाई, चलतां माझ्यासंगं ? काशीबाईच्या-वानी कडीचं भांडं घेऊं या आपल्याला. " ( माझें घर हें राधाबाई सर्वस्वीं आपलेंच समजते. आपण नोकर, आपल्याला काय करायचें ही भावनाच तिच्यांत नाहीं. ) एकदां दुकानांत गेल्यावर तिचें चांगलेंच फावतें. एका कडीच्या भांड्याच्या निमित्तानें आणखी तीनचार वाट्यापातेलीं घरांत येतात. तिची भांड्यांतली आवड विस्तृत आणि अद्ययावत् आहे. तांब्या-

पितळेचीं भांडीं तर हवींतच; पण कांचेचीं वेगवेगळ्या आकाराचीं भांडीं, कपबशा, चहादाण्या–सर्वच जमवायची तिला हौस. आणि एकाखालीं एक भांडें घालून ठेवलेलें तिला मुळींच खपत नाहीं. " दिसायला नगंत का भांडीं हायत तीं ? " भांड्यांची नामधारी मालकीण मी; पण त्यानें राधाबाईचेंच मोठेपण वाढतें !

आपलें मोठेपण वाढवण्यांत ती माझा चांगलाच उपयोग करते. अमकी बाई डॉक्टर आहे, तमकी बॅरिस्टर आहे, असें कोणी सांगितलें कीं तिचें ठरलेलें उत्तर आहे—" आमच्या बाईनीं त्याच्या पुढली परीक्षा पास केली हाये. मस् शिकल्यात आमच्या बाई बाप्यामानसावानीं ! " आणि असें सांगून तिच्याच अंगावर मूठभर मांस चढतें.

एकदां आईच्या ओळखीच्या एक श्रीमंत बाई माझ्याकडे बसायला आल्या आणि बोलतांबोलतां त्यांनीं आपल्या येथला जेवणाचा जंगी बेत सांगून मला विचारलें—" आज तुमच्याकडे काय आहे ? " राधाबाई स्वयं-पाकघरांतून सारें ऐकत होती. मी उत्तर द्यावयाच्या आंत तिनेंच आमच्या येथला बेत सांगितला. दोनचार महागाईच्या भाज्या, एकदोन रायतीं, चटण्या, भजीं, पक्वान्नें ऐकून मी तर गारच झाल्यें ! साधा भात-भाजी-आमटीचा आमचा नियम आणि ही हें काय सांगते ? पाहुण्या बाई गेल्यावर राधाबाईनें खुलासा केला. " मंग त्यांच्या इथं एवढं जेवण, अन् आम्ही काय भिकारी व्हय ? आम्हांला नाय् का मोठमोठालीं नांवं घेतां येत ? "

राधाबाईची काटकसर काय भलतीच आहे ! एक एवढीशी जिन्नस वायां जाऊं देत नाहीं. आणि दुसऱ्या नोकरांकडून कांहीं वाया गेलें कीं येथें हिच्या तोंडाचा पट्टा सुरू होतो ! दुकानांत गेली कीं " वर टाक उलिसं, " असें म्हणून अदपाव तरी भाजी उचलल्याशिवाय राहायची नाहीं. त्यामुळें नोकरांवर, भाजीवाल्यांवर तिचा चांगलाच दरारा आहे. " कडक आहे म्हातारी, " असें म्हणून मुकाट्यानें तिचें ऐकतात. तिला

भारी पडतात मुंबईच्या कोळणी! सुरवातीस मासळी आणतांना तिनें आपली नेहमींची दडपशाही चालवावयाचा प्रयत्न केला; पण लागलीच तिची खात्री झाली कीं, आपल्याला पुरून उरतील अशा ह्या आहेत! तेव्हांपासून कोळणींच्या वाटेला मात्र ती जात नाहीं.

आम्ही कोणत्याहि बाजूला राहावयास गेलों कीं महिन्याभरांत राधाबाईची ख्याति चहूंकडे पसरते आणि शेजारीपाजारी मला विचारतात, "कुठली म्हातारी ही? फार चांगली मिळाली आहे." ख्याति होण्याचें मुख्य कारण म्हणजे तिचा दुपारचा कार्यक्रम! तिला दुपारीं झोपणें मुळींच पसंत नाहीं. आपलें जेवण झालें कीं पोत्याचें एक तरट घेऊन स्वारी फूटपाथवर बसते. मग आयत्याच जाणाऱ्या येणाऱ्या आणिक चौघीपांचजणी बाटणी गोळा होतात आणि मग गप्पागोष्टींना असा कांहीं ऊत येतो! ह्या 'गंगा क्लब'ची बैठक चहाची वेळ होईपर्यंत रोज सुरू असते. मधें दोनचार महिन्यांनीं राधाबाईच्या गोधडीचें काम निघतें. तेवढ्या अवधींत जमलेले पातळाचे कांठ, रंगीत चिंध्या ह्या सर्वांचें गोधडीवर डिझाईन तयार होतें व शिवतांना चार 'आयाबायां'चे हातहि लागतात. ह्या गोधडीची मला चांगलीच दहशत आहे, कारण तिच्यामुळें दुपारच्या चहाची वेळ हळूहळू लांबणीवर पडते.

राधाबाईत नव्या-जुन्याचें फार मजेदार मिश्रण आहे. तिला देवाधर्माचें अतोनात वेड! एकादश्या, सोमवार, शनिवार, हरतालिका, ऋषिपंचमी—एक कधीं चुकत नाहीं. इतकेंच नाहीं, तर तिच्या समाधानाकरितां—घरांतल्या एकंदर स्वास्थ्याकरितां म्हणा पाहिजे तर—'मोठ्या' एकादश्या, शिवरात्र वगैरे उपास मलाहि धरावे लागले आहेत. तंबाखूसाठीं पैसा न खर्च करणारी राधाबाई (दर दोन महिन्यांनीं पुण्याहून रुपयाचा तंबाखू पाठविला पाहिजे अशी तिची नवऱ्याला सक्त ताकीद आहे.) पंढरपूर, आळंदीला आपला सर्व परिवार आपल्या खर्चानें घेऊन जाते. सकाळीं

उठल्यावर सूर्याला नमस्कार, अंग धुतल्यावर तुळशीला हळदकुंकू वाहणें हें अगदीं नियमानें चाललेलें असतें. त्याचप्रमाणें सोमवारीं केस विंचरायचे नाहींत, (बाहेरगांवची समजूत आहे कीं मुलेंबाळें किंवा पाठीवर भावंडें असणाऱ्या बाईनें सोमवारीं केसाला फणी लावूं नये) चुलीचें तोंड दक्षिणेला करायचें नाहीं, तीन भाकऱ्या हव्या असल्या तर नांवाला पैशाएवढी तरी चौथी भाकरी भाजली पाहिजे—अशा शेंकडों रूढी राधाबाई कडकपणानें पाळते. पण इतकें धर्माचें आणि रूढीचें वेड असूनहि अमका घरांत आलेला चालत नाहीं, तमक्याच्या हातचें खावयाचें नाहीं, असल्या त्रासदायक निर्बंधांची ती मुळींच पर्वा करीत नाहीं.

माझ्या घरीं कोणत्याहि जातीची पाहुणेमंडळी आली तरी ती बिनहरकत सर्वांचा सारखाच अतिथिसत्कार करते. माझी एक पारशी मैत्रीण तिच्या विशेष मर्जीतली आहे. ती भेटावयाला आली आणि मी राधाबाईला बाहेर बोलावलें नाहीं कीं माझ्या हातून केवढा 'अन्याव' झाला, असें तिला वाटतें! "दीनबाई आली आणि मला नाहीं ना हाक मारली?" असें अगदीं चुटपुटून ती म्हणते. 'दीनबाई' चहाला यावयाची म्हणजे मर्जी करतांना तिला दुप्पट हुरूप चढतो. आणि 'उलिसंक् घ्या आणिक' असा सारखा आग्रह चालतो.

माझ्या घरीं येणाऱ्या सर्व मंडळींचें नामकरण आपल्या सोयीप्रमाणें राधाबाई करीत असते. लेले ह्यांचे अचूक नेने होतात, वसंतरावाचे यशवंतराव, लीलाबाईच्या नीलाबाई वगैरे. इतरांना 'उंचाले बाबा', 'जाडयाल्या बाई', 'काळ्याले बाबा', 'चौपाटीवरले साहेब', 'धाकल्या बाई', 'थोरल्या बाई' अशा वर्णनात्मक नांवांनीं ओळखते आणि तिच्याशीं बोलतांना हींच नांवें आम्हांलाहि वापरावीं लागतात. त्याबद्दल तिला कधीं कांहीं म्हटलें कीं तिचें उत्तर आहेच—"मला सई नाहीं राहात त्याला म्यां काय करावं?"

ही तिची सई फार फायद्यावर पडते. मनांत कोणती गोष्ट करावयाची नसली कीं साफ सांगते, " सई नाहीं झाली म्हणून काम करायचं राहिलं. " पहिल्यापहिल्यानें हें तिचें खोटेपण मी तिला पटवून द्यावयाचा प्रयत्न करीत असे; पण आतां अनुभवानें शहाणपण आलें आहे. राधाबाईशीं वाद घालणें हें शहाण्या माणसाचें काम नव्हे. ती कोणाला हार जाणें शक्यच नाहीं. " बरं, माझं राह्यलं ! तुमचं का होईना " असें म्हणून वादाचा ती शेवट करते तेव्हां आपल्यालाच अगदीं खजील झाल्यासारखें वाटतें.

नव्या कल्पना ग्रहण करण्याची तिची शक्ति आश्चर्यकारक आहे. " स्त्री ", " किर्लोस्कर " चे अंक चाळून त्यांतल्या चित्रांची माहिती काढणें तिला फार आवडतें. सिनेमा, सर्कस पाहाण्याची तिला फार हौस. माझ्या येथें आल्यावर प्रथम ती पगारांतून गोटपाटल्या, नथीला मोठे मोती, टोपपदरी लुगडें असा खर्च करी. दागिन्या-कपड्यांचा चांगला साज जमल्यावर मीं तिला एक दिवस म्हटलें, "कशाला सारा पैसा असा खर्चून टाकतेस ? बँकेंत कां नाहीं ठेवीत ? " लागलीच बँकेची सगळी माहिती माझ्याकडून काढून घेऊन तिनें माझ्याकडून पोस्टांत खातें उघडून घेतलें. पैसे काढतांना आंगठा उठविण्यापेक्षां सही केलेली बरी, हेंहि तिला पटलें आणि एक दिवस कोठूनशी एक फुटकी पाटी घेऊन आली व चार दिवस अक्षरेंहि गिरवलीं; पण तें मात्र अर्ध्यावरच राहिलें ! नेहमींची तिची 'सई' आडवी आली. 'रा' कसाबसा घटवून 'धा' कडे वळली कीं 'रा' विसरून जाई. चार दिवसांनंतर तिनें तो नाद सोडून दिला !

राधाबाई अत्यंत विनोदप्रिय आहे कोणी कांहीं म्हटलें आणि तिला समर्पक उत्तर आठवलें नाहीं, असें कधींच होत नाहीं. अचूक मजेदार शब्द वापरण्यांत ती अगदीं पटाईत आहे. माझ्या बहिणीचीं मुलें मुंबईत आलीं कीं दिवसभर खूप गोंधळ घालतात. रात्रीं झोपलीं कीं राधाबाई एक

उसासा टाकून म्हणते, " झोपली का जत्रा ? " मी कॉलेजांत असतांना माझ्याविषयीं बोलायचें झालें तर " आमचे साहेब " असा उल्लेख करते. दूधवाल्यानें वरची धार कमी घातली कीं त्याला विचारते—" असें उंदीर मुतल्यावानी काय करतो रे ? " गरम पोळी डब्यांत घातली कीं वाफेनें ओली होते, मग राधाबाई म्हणते—" लई उकाडा हाये आज ! बघा पोळीला कसा घाम आला ! " दुकानांत कांहीं जड वस्तु घेतली आणि पाटीवाला बोलाविला कीं तिला तो पैशाचा अपव्यय वाटतो आणि मग अगदीं गंभीरपणाचा आव आणून विचारते—"आतां मी बसूं का पाटींत ?"

वर दोन चारदां 'म्हातारी' असा उल्लेख केला तो राधाबाईला कळला तर धडगत नाहीं ! रस्त्यांत "ए म्हातारे, बाजू ! " अशी गाडीवाल्याची ओरड ऐकली कीं कंबरेवर दोन्ही हात ठेवून त्याला सांगते—" हाये ठावं तूं मोठा तरणा बांड हायेस तो ! " तिचें वय किती, ही एक अज्ञात गोष्ट आहे. तिला कधीं विचारलेंच तर पहिल्या प्लेगांत मला अमुक झालें, मोठ्या दुष्काळांत तमुक झालें, अशा स्त्रियांत निसर्गानें होणाऱ्या स्थित्यंतराच्या अनुरोधानें ती आपलें वय लावते. या हिशेबी राधाबाईची साठी केव्हांच उलटलेली आहे असा अंदाज निघतो.

राधाबाई अस्सल मराठा आहे. 'कुणबी' 'कुळवाडी' असें कोणी म्हटलें, कीं त्याच्यावर ती तुटून पडते ! आणि तिच्या वागण्या-बोलण्यांत जुन्या मराठेशाहीचें तेज आणि कणखरपणा, साठी उलटली तरी, कायम आहे.

[—स्त्री—मे १९४१]



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथक्रम
अनुक्रम 2359३ दि: 1.9.६५
क्रमांक ....९१३४........ नों: दि: ६।।।६५

२ : :

# भीमाबाई

माझा पहिला-वहिला लेख ‘ राधाबाई ’ वर लिहिला. त्यानंतर तशीच लेखनाची स्फूर्ति देणारी बाई पुन्हा मिळण्याइतकं माझं भाग्य असेल असं वाटलं नव्हतं. राधाबाई सेवानिवृत्त झाल्यावर रुक्मिणी झाली, गंगाबाई झाली, माळणबाई झाली; पण एकेक उगवली अन् वर्षसहा महिन्यांत मावळली. रुक्मिणीचा एक आग्रह होता, “ बाई, छाप्यांत लिहा ना राधाबाईसारखं माझं कांहींतरी; आणि फोटो पण छापा ! ” पण तिच्यानं तोंवर टिकाव धरवला नाहीं. त्यानंतर खाणावळ पाठीं लागली, कुकरचाहि प्रयोग झाला व ह्या सर्वांना तोंड देऊन आठ वर्षं स्थिर झालेला बाळूहि गेला एक दिवस. अशी पूर्णपणें परित्यक्त अशा परिस्थितींत असतांना, तोंडओळख असलेल्या एक वृद्ध सारस्वत ब्राह्मणाच्या बाई आपल्या भाचीला ठेवाल का म्हणून विचारायला आल्या. मीं सांगितलं—“ छे छे. सारस्वताची बाई नको. तें सोवळंओवळं झेपायचं नाहीं आमच्या इथें ! मला मराठ्याची बाई हवी अन् तीहि आमच्या पूर्वीच्या बाईसारखी समंजस, म्हातारी हवी. ”

त्या बाई म्हणाल्या—“ अहो, आमची भाची एका ठिकाणीं कामाला आहे; अन् ती कंटाळली आहे तिथल्या सोवळ्याओवळ्याच्या ह्या

भानगडीला. ठेवून तर पाहा, अगदीं तुमच्यासारखं आहे तिचं. कांहीं एक पाळायला नको ! ”

पुढें दोन महिने त्या बाईचा पत्ताच नाहीं, भाचीचं तर तोंडहि पाहिलेलं नव्हतं. एक दिवस अचानक मावशीबाईंची रस्त्यांत गांठ पडली अन् मीं हटकल्यावर त्या म्हणाल्या—“ आजारी होती माझी भाची. आतां बरी आहे. घेऊन येईन तिला लवकरच. ” चार दिवसांनीं मावशी-भाची दोघीहि उपस्थित झाल्या.

भाची काळीसावळीच, पंचवीस-तीस वयाची, डोक्यांत मोगरीची वेणी, कपाळाला बारीक कुंकू, चोपूनचापून क्लिप लावून नेसलेलं लुगडं असा तिचा थाट ! मीं मावशींना विचारलं, “ काय हो, बरी नव्हती यांची प्रकृति, ती कशी आहे आतां ? ” उत्तर भाचीनंच दिलं—“ प्रकृति ही आहे ही अशी ! ” पुढच्या प्रश्नोत्तरांचा हाच रोखठोक जबाबांचा नमुना ! मी गारच झालें. पण खाणावळीचा कंटाळा आला होता, कुकरचं जेवण सात्त्विक असं कितीहि प्रतिपादिलेलं असलं, तरी तें बेचव लागूं लागलं होतं. तेव्हां ठरविलेलें सगळं बाजूला ठेवून म्हटलं “ राहा ” म्हणून. ही अशीच उगवणार अन् चार दिवसांनीं मावळणार, अशी खात्रीच होती. चार दिवस सारस्वती ‘ रसगोळीचं ’ जेवण तरी जेवून घ्यावं म्हटलं.

असा भीमाबाईचा माझ्या इथें जो अवतार झाला, तो माझ्या संसारांत कायमचंच स्थान मिळण्यासाठीं असं दिसत आहे. नेहमीं सांगत असतात त्या मला—“ तुमच्या सामानाची, संसाराची माया लागली. आतां इथून कांहीं माझी सुटका नाहीं. ” मी म्हणतें—“ माणसापेक्षां सामानाचीच माया अधिक वाटतं ? ” प्रेमांत असल्या तर जाभ चावून ‘ तसं कसं बाई ? ’ असं म्हणून माझं डोकं दुखत असलं तरी आपल्याला जेवण कसं जात नाहीं वगैरे बऱ्याच प्रेमाच्या गोष्टी ऐकवतात. खिळाडू वृत्ति जागृत असली तर म्हणतात—“ मीं आपलं खरं तें सांगलं ! ”

भीमाबाई सावंतवाडीकडच्या. आज पांचसहा वर्षं पुण्या-मुंबईच्या बाजूस असल्यानं मराठी बोलत असल्या, तरी त्यांचं बोलणं सावंतवाडीच्या कोकणी पद्धतीचं. त्यांत मराठीची सरमेसळ झाल्यानं, त्याला गमतीचं स्वरूप आलं आहे. विभक्तिप्रत्यय, सामान्यरूपं, क्रियापदं हीं सगळीं कोकणींतलीं आणि शब्द मात्र मराठींतले. सांचा कोकणीचा, आंतलं द्रव्य मराठीचं, असा कांहींसा प्रकार आहे. सगळ्या आकारान्त पुल्लिंगी नामांचं व विशेषणांचं एकवचनी रूप हटकून ओकारान्त होतं आणि अकारान्त नपुंसकलिंगी नामांचं बहुवचन 'आं'कारान्त होतं. 'गॅलिचो' 'बेवडो', 'कुत्रो', 'रस्तो', 'काळो', 'गोरो' वगैरे. तसंच 'पुस्तकां', 'फुलां', 'झाडां', 'फळां' वगैरे. स्वरादि शब्दांचं रूप सुरवातीस 'व' वा 'ह' घालून होतं; मग शब्द मराठी असो, का इंग्रजी असो, एकदा भीमाबाईच्या तोंडीं आला कीं त्याला सर्वसाधारण नियम लागू झालाच ! उंदराचा होतो 'हुंदिर', इच्छेची 'विच्छा'. इंजक्शनचं 'विंजेक्शनां' वगैरे. 'तुकां', 'माकां', 'खंय', 'देशात', 'करशात', 'आसां-नासां', 'जमलेसत-दिसलेसत' असे शब्दप्रयोग सर्रास वापरत असतात. कोकणीच्या धर्तीवर सर्वांचा 'अरे', 'अगो', 'तो', 'ती', 'तूं' एकेरीं उल्लेख करण्याची प्रवृत्ति ! त्यामुळं ह्या बाजूला किती गैरसमज होतात ! लोकांना वाटतं, ही आपल्याला मानानं वागवीत नाहीं, बरोबरीच्या नात्यानं वागते; आणि तें समजावून सांगतां सांगतां माझ्या नाकीं नऊ येतात. त्यांच्या मराठीबद्दल कधीं कांहीं म्हटलं तर त्यांचं उत्तर आहेच, "आम्ही वाडकरां, कित्याक होया तुमचा मराठी आमकां ?"

मराठीबद्दल असा हा अनादर असला तरी इंग्रजीकडे फार ओढा ! अर्धशिक्षितांत हा प्रकार नेहमीच आढळतो म्हणा ! माहीत आहेत ते सारे इंग्रजी शब्द वापरीत असतात. एकदा त्यांना विचारलं—"का हो, तुमच्या नांवापाठीं 'कु.' घालायचं का 'श्रीमती' का सौ. ?" त्यांनीं

उत्तर दिलं—" कांहीच नको ह्यांतलं. 'मिस्' घाला आपलं कसं तुमच्या-सारखं ! " एकदा बोर्डीस असतांना एक गुजराती पाहुणे घरीं आले. त्यांना चहा विचारला असतां ते इंग्रजींत म्हणाले–" चहा नको नारळाचं पाणी ( कोकोनट वॉटर ) असलं तर चालेल. " भीमाबाईंच्या कानावर 'कोकोनट वॉटर' हे इंग्रजी शब्द पडले; अन् मीं नारळाचं पाणी आणायला सांगितलं. 'वॉटर' शब्द त्यांच्या कोशांत असल्यानं त्यांना थोडासा बोध झालाच होता. जरा डोकं चालवून 'कोकोनट वॉटर' ह्या शब्दाची व्युत्पत्तीहि लावली स्वारीनं, आणि पाहुणे गेल्यावर मला म्हणतात—" नारळ कोकणांतले म्हणून इंग्रजींत नारळाच्या पाण्याला 'कोकणी वॉटर' म्हणतात वाटतं ? ! " इंग्रजी शिकवा म्हणून सारखा आग्रह चालू आहे त्यांचा, पण मीं म्हणतें वाडकरांना मराठी नको, मग इंग्रजी शिकून काय करायचं आहे ?

त्यांना वाडकरांचा फार अभिमान ! स्वत: होऊन वाडकरांचीं पन्नास उणीं दाखवतील, पण तें 'आमची वाडकरां' म्हणून ! मात्र आम्ही कुणीं वाडकरांना नांवं ठेवलीं कीं मग त्यांचा सारा अभिमान उसळून येतो; आणि आम्हांला चार खऱ्या-खोट्या गोष्टी मुकाट्यानं ऐकून घ्याव्या लागतात. " आमच्या वाडकरांना माणसांचं प्रेम नसलं, तरी मुक्या जनावरांची माया भरपूर हां ! " हें वाक्य अर्थात् मीं मराठींत लिहिलं तरी भीमाबाईंनीं आपल्या कोकणी मराठींत उच्चारलेलं अनेक वेळां ऐकलं आहे. आणि बरोबर त्याला पुस्तीहि जोडण्यांत येते " आणि वाडकरांना माणसांचं प्रेम नाहीं असं 'कित्याक्' म्हणूं ? आम्ही भांडूं, झगडूं, पण माणसं होयींत आमकां ! वाडकरांच्या मुलीला 'एकमुळी' घराणं नको, पुण्या-मुंबईच्या मुलीसारखा नुसता राजा-राणीचा संसार नको ! सासू-सासरा, नणंदा-दीर, जावा असं भरलेलं घर हवं. बरोबर कुत्रीं-मांजरं, गुरंहि हवींत. तुमच्या वहिनींचंच पाहा ना ! वाडकरांचीच

मुलगी ना ? " शेवटीं वहिनींचा हा असा उल्लेख आल्यानं सर्व मान्य करावं लागतंच आम्हांला !

मुक्या जनावरांचं प्रेम ही भीमाबाईंच्या स्वभावांतली फार मोठी गोम आहे. बोर्डीस असतांना त्या प्रेमाच्या पुरांत वाहून गेलों आम्ही ! माझा कसून विरोध असतांहि, चार कुत्रीं आणि एक मांजर येवढे प्राणी जवळ केले त्यांनीं. आपल्या जेवणांतला वांटा लपवून-छपवून त्यांना द्यायचा, अशी सुरवात करून पुढें रोज राजरोसपणें कुत्र्या-मांजरांची पंगतच वाढूं लागल्या ! मनूताई सर्वांत लाडकी. तिला स्वयंपाकघरांतच दहीभात-पोळी हें जेवण मिळे. लूशीला बाहेरच्या ओसरीवर याच जिनसा, दही व भात ह्यांचं प्रमाण बदलून मिळत. आणि खालीं अंगणांत मोत्या, बाळू आणि काळी ह्यांना भाकरी-आमटी आणि उगीच वासाला दही असं जेवण मिळे. मनूताई आणि लूशी हीं विशेष प्रेमांतलीं कुळं ! दोघींचीं नांवं स्वतः आवडीनं ठेवलीं होतीं. मी " मांजर, मांजर " म्हणून जातिवाचक नांवानं मांजरीचा उल्लेख करीं, पण भीमाबाईंना तिच्या स्वतंत्र व्यक्तित्वाची ओळख होती. त्या एक दिवस म्हणाल्याच शेवटीं—" अहो, मांजर काय म्हणतां तिला ? आमची मनूताई ती ! " लूशीचं पहिल्यानं 'सखूबाई' नांव ठेवलं. तितक्यांत एक कादंबरी त्यांच्या वाचण्यांत आली आणि तिच्यांतल्या कुत्रीचं 'लूसी' नांव फार आवडून त्यांनीं आपली हौस बोर्डीतल्या आमच्या गांवठी कुत्रीवर भागवली. त्यांत भीमाबाईंची छाप म्हणजे 'लूसीं'तल्या 'स' चा 'श' कार झाला. इतकं गोतावळ जमलं तरी भीमाबाईंचं समाधान नाहींच झालं. एक गाय नाहींतर म्हैस, व चार कोंबडया जवळ बाळगण्याबद्दल सारखा आग्रह चालूच होता. एक दिवस अचानक " एक बोकड हाढूं या आमकां " ? ही मागणी ऐकून मी चीतच झालें. सर्व सोडून 'बोकड' कशाला कांहींच कळेना. भीमाबाईंनीं पुढं वर्णन सुरू केलं—" 'येदोसो बोकड' येईल

आपला माझ्या मागंमागं, जाईल तुमच्याबरोबर कालिजांत ! ” तेव्हां माझ्या डोक्यांत प्रकाश पडला, कीं बोकड म्हणजे करडूं किंवा कोकरूं. ‘ मेरी हॅड ए लिटल लॅंब, ’ हें दृश्य भीमाबाईंच्या कविमनांत उभं राहिलं असावं.

पुण्यांत आल्यावर मुक्या जनावरांवरील प्रेमाच्या आविष्काराला अधिक मार्ग मिळाले. माझ्या बहिणीच्या इथला घरचा जातिवंत कुत्रा भेटला, आणि त्याचं अन् भीमाबाईचं जें प्रेम जमलं आहे तें विचारूंच नका. कधीं त्याला भाऊ म्हणतात, कधीं मुलगा म्हणतात; त्याच्याशीं लाडंलाडं बोबडं बोलतात आणि क्षणभरसुद्धां त्याच्याशिवाय करमत नाहीं. त्यानं माझ्याशीं लाडीगोडी केलेली खपत नाहीं. मग म्हणतात—“ मेल्या, ( सर्व कौतुक असल्याच संबोधनांतून होत असतं.) मी इतकं तुझं करतें; पण तूं आपला बाईचेच पाय चाटतोस ! ” आणि चिमण्यांवरच्या त्यांच्या प्रेमानं कहरच केला आहे. चिमण्यांना सकाळ-संध्याकाळ तांदळाच्या कण्या मिळाल्यानं त्यांनीं मुळीं वस्तीच केली आहे आमच्या घरीं. त्यांची चिव् चिव् ऐकली, रात्रीं त्या विजेच्या पट्टीआड निजलेल्या पाहिल्या की भीमाबाईचा जीव असा कांहीं आनंदतो. चिमणा व चिमणी जोडीनं आलीं की, “ बाई, दांपत्य आयलंसाहो ” असं सांगून त्यांच्या प्रणयचेष्टांचं कौतुक सुरू होतं. लेकीच्या आणि जावयाच्या प्रेमलीलाचं कौतुक आई ज्या जिव्हाळयानं करते तोच जिव्हाळा भीमाबाईच्या कौतुकांत असतो. मोठ्या आभिमानानं सांगत असतात—“ ह्या उन्हाळयांत चिमण्यांचीं दोन बाळंतपणं झालीं आमच्या इथं ! ”

मुक्या जनावरांप्रमाणं लहान मुलांवरहि फार जीव भीमाबाईचा ! आमची मोलकरीण ‘ उरलेलं अन्न मला देत चला ’ म्हणाली, तेव्हां सध्यांच्या स्थितीवर तिला एक प्रवचन ऐकवलं आणि आपण किती काटकसरीनें माझा संसार चालवला आहे त्याचं भरपूर तिखटमीठ लावून वर्णन केलं;

आणि 'आमच्याकडे कांहीं उरतच नाही' असं सांगून त्या बाईचं तोंड बंद केलं. दोन दिवसांनींच तिची अडीच वर्षांची मुलगी भीमाबाई जेवत असतांना समोर आली अन् म्हणाली,–"तुमी ढवली भाकली खातां? आमी कालीच खातों." तेव्हां लगेच तिला ताटलींत पोळी-भाजी देऊन आपल्यासमोर जेवायला बसवली आणि आतां अगदीं रोज नियमानं येते पोरगी जेवायला. मग सगळी काटकसर बाजूला राहते! एक वेळ आपण जोंधळ्यांची नाहीं तर बाजरीची भाकरी खातील; पण त्या पोरीला गव्हाचीच चपाती, तिच्या आवडीची 'ढवली भाकली' घालतील.

भीमाबाईंना बडबड खूप करायला हवी. चार दिवस खायला नाहीं मिळालं तरी चालेल; पण बोलायला मात्र भरपूर मिळालं पाहिजे. जसा गोष्टी-वेल्हाळपणा त्यांच्यांत आहे, तशीच एखाद-दुसऱ्या वाक्यांत उत्तराला प्रत्युत्तर करण्याची मार्मिकताहि त्यांच्यांत आहे. एकदां कचरा काढीत होत्या. तिथेंच माझ्या वहाणा पडल्या होत्या अन् सारा कचरा वहाणांवर चालला होता. मीं म्हटलं–"अहो, माझ्या वहाणा म्हणजे कचऱ्याची टोपली समजलांत कीं काय?" लागलीच उत्तर आलं–"कचऱ्याची टोपली! छे छेः! पादुका त्या!" त्यांनीं केलेल्या भाकरीचं कौतुक केलं नाहीं, पण घरांतल्या मुलींपैकीं कुणीतरी वाटलेल्या चटणीचं कौतुक केलं कीं म्हणतात–"आहेच असं; नाक दिलेल्याची कुणी आठवणसुद्धां काढीत नाहीं, पण नथ देणाऱ्याचे मात्र तोंडभर उपकार मानतात!" मी लिहिण्यावाचण्याच्या कामांत असलें तरी कांहीं ना कांहीं निमित्त काढून बडबड करायला सारख्या माझ्या खोलींत येतात आणि कामांत व्यत्यय आणतात. एकदां म्हटलं–"कशाला हो उगाच कसलं तरी निमित्त काढून येतां सारख्या?" त्यावर उत्तर आलं–"काम होतं म्हणून आलें. उगाच कशाला येईन मी? तुमच्या खोलींत आलें कीं पाय सोन्याचे नाहीं होत, उलट काळेच होतात!–" एकदां माझ्या एका मैत्रिणीकडे पितळेच्या

डब्यांत कांहीं खायचं पाठवलं. ती कांहींतरी डब्यांत घालून डबा परत द्यायला घेऊन आली, पण डबा हाताला हलका लागला, म्हणून रिकामा असं समजून भीमाबाईंनीं तो बाजूला सारला. तेव्हां माझी मैत्रीण मोघमच म्हणाली—" भीमाबाई, डबा उघडून बघा हं!" त्यावर त्यांनीं उत्तर केलं—" कां डब्याची सालपटं काढून नेलींत असं मला वाटेल, असं समजलांत कीं काय ?—" आतांशा माझी तीन फाऊन्टन्पेनं हरवलीं. दर वेळेस नवं विकत घेईपर्यंत एक जाडजूड काळं पेन आहे तें वापरावं लागतं. त्या पेननं लिहीत असतांना परवा भीमाबाईंनीं पाहिलं आणि त्यावर मल्लिनाथी केली—' पहिली बायको टाकणाऱ्या नवऱ्यासारखंच करतां तुम्ही. काळी जाडजूड बायको टाकून द्यायची आणि नवी सुंदरशी करायची. ती नाजुक नार पळून गेली कीं पुन्हा पहिलीला बोलवून यायची घरकामाला' नुकतीच मीं मुंबईहून येतांना आधुनिक पद्धतीची गळ्यांत



अडकवण्याची मोठी बॅग घेऊन, ऐटींत टांग्यांतून उतरलें. भीमाबाईंनीं पाहिलं मात्र आणि एकदम उद्गारल्या—" अग बाई! मुंबईतल्या कान साफ करणाऱ्या बाबाची पिशवी तुमच्या गळ्यांत कशी ?" एकदां जेवायला मंडळी बोलावली आणि टेबलावर बसतांना एक पुरुष एका घरांतले, त्यांच्या

शेजारीं बाई दुसऱ्या घरांतल्या अशी विलायती पद्धतीनें मंडळी बसली. मंडळी गेल्यावर भीमाबाई म्हणतात–" एकीचा नवरा आणि दुसऱ्याची बायको ही हो कसली जेवायला बसण्याची विलायती पद्धत ? "

भीमाबाईंचं अनेक प्रकारचं शिक्षण अर्धवट पुरं झालेलं आहे. मास्तरीण करायची म्हणून वडलांनीं त्यांना मराठी चौथीपर्यंत शिकवलं; तें झेपत नाहीं असं वाटून पुढं मिडवाईफचं शिक्षण देण्यास सुरवात केली. तिथंहि कंटाळल्या म्हणून घरींच बसल्या आणि पोळपाट-लाटणं हातीं आलं. त्यामुळं सगळे धंदे अर्धवट येत असलेल्या जॅकसारखी त्यांची अवस्था आहे. पण वडलांच्या ह्या सर्व खटपटींतून त्यांच्यांत वाचण्याची आवड निर्माण झाली आहे आणि त्या मानानं बौद्धिक प्रगतीहि बरीच झालेली आहे. कादंबऱ्या वाचतात, भाषणं ऐकतात, रेडिओवरचं नाटक किंवा वनितामंडळाचा एक कार्यक्रम चुकवत नाहींत व त्यावर मार्मिक अशी टीकाहि करतात. पण वाचण्यांत एवढी प्रगति असली तरी लिहिण्याची मात्र वेगळीच स्थिति ! त्या उर्दू पद्धतीचं मराठी लिहितात. व्यंजनं तेवढीं लिहायचीं, बाराखडींतल्या स्वरांच्या चिन्हास पार चाट किंवा लहर लागली तर मानेल त्याप्रमाणं काना नाहींतर मात्रा काढून ठेवायची. रोजचा हिशेब नियमितपणें लिहितात पण आज लिहिलेला हिशेब उद्यां वाचतां येईल तर शपथ ! बाहेरगांवीं असतांना त्यांनीं कधीं पत्र लिहिलं तर त्याचा अर्थ लावायला तास दीड तास लागतो. कांहीं शब्द अक्षरं-मात्रा-वेलांट्या वगळून लिहिलेल्या कोड्यासारखं असतं त्यांचं पत्र. एक दिवस म्हटलं,–" काय लिहितां हो ? परवांचं तुमचं पत्र लावून वाचायला दोन दिवस लागले ! " तशी म्हणतात–" मग काय, दोन दिवसांची रजा काढावी लागली कीं काय ? "

झाडपाल्यांची, औषधांची, अशा इकडून तिकडून गोळा केलेल्या माहितीचा खूप मोठा सांठा आहे त्यांच्यापाशीं. थंडीनं पोट बिघडलं, सुंठीची

लापशी द्या; उष्ण खाऊन जुलाब झाले धण्याजिऱ्याचं पाणी द्या, अंग खाजलं, कडुलिंबाच्या पाल्याची निवळी करा; असा आजीबाईचा बटवाच आहे त्यांचा.

भीमाबाईंचे एकंदर विचार बरेच आधुनिक आहेत. स्पृश्यास्पृश्यतेच्या कल्पना माझ्याकडे आल्यावर लवकरच त्यांनीं आपण होऊन बदलून घेतल्या. स्त्रीजातीविषयीं त्यांचा अभिमान आणि स्त्रियांच्या हक्कांचा पुरस्कार कोणत्याहि सफ्रेजेटला मान खालीं घालायला लावील इतपत जाज्वल्य. नवरा-बायकोमधल्या अखंड कलहांत त्या नेहमीं बायकोची बाजू घेऊन भांडत असतात. नवरे अविचारी, पैसे उडवणारे, बायकोच्या जिवावर जगणारे, लायकी नसतांना बायकोवर हक्क गाजवणारे अशी खात्री आहे त्यांची, पण एक दिवस आमच्या आवारांतल्या भंग्यानं आपल्या बायकोला बेदम मारलं आणि त्याच्यावर पोलिसचा खटला सुरू झाला, तेव्हां मात्र त्यांना आश्चर्याचा धक्का बसला आणि म्हणाल्या,—“ म्हणजे बाई आतां नवऱ्याला बायकोला मारायलासुद्धां हक्क नाहीं ? स्वराज्य मिळालं म्हणून असं झालं का हो ? ” पण लागलीच त्यांच्या मनाची तितपत तयारीहि झाली; आणि आनंदून आपल्या पहिल्या विचारास जोड दिली—“ असंच पाहिजे ह्या नवऱ्यांना ! फार दिवस गाजवली गरीब बायकांवर सत्ता त्यांनीं ! ”

भीमाबाईंना सोवळंओवळं, देवधर्म कांहीं पाळायला नको, अशी शिफारस त्यांच्या मावशींनीं केली म्हणून मीं त्यांना माझ्या घरीं ठेवून घेतलं आणि मींच त्यांच्या दबलेल्या धार्मिक वृत्तीला वाट करून दिली. त्याचं असं झालं, मी गेलें होतें जबलपूरला. तेथून संगमरवरी दगडाच्या पेपरवेट्स् वगैरे बऱ्याच वस्तु आणल्या. त्यांतच एक सुंदर रंगाची शंकराची पिंडी आणली. भीमाबाईंची नजर त्यावर गेली मात्र ! एकदम उल्हासित चेहऱ्यानं म्हणाल्या——“ पाहा, देवानंच तुम्हाला कशी बुद्धि दिली ती ! ” मग काय, ताबडतोब पिंडीची स्थापना होऊन देव्हारा, ताम्हण, पोथ्या सारं साहित्य

आपोआप घरांत झालं आणि रोज व्यवस्थित पूजा होऊं लागली. माझा मूर्तिपूजेवर विश्वास नाहीं, पूजेचं महत्त्व मला वाटत नाहीं, ह्याचं शल्य त्यांना सारखं बोचत असतं. कुणाहि सुशिक्षित बाईकडे मूर्ति पाहिली कीं मला ऐकवतात--"ती बाई कमी का शिकलेली आहे? चांगली एम्. ए. आहे, बी. टी. आहे आणि वोशिक का काय म्हणतात तें पण शिकली आहे. पण तिनं देवधर्म नाहीं सोडला. हस्तिदंती कृष्णाची मूर्ति आहे तिच्याजवळ आणि नियमानं रोज पूजा करीत असते ती!" मुलांच्या परीक्षांची, माझ्या बदल्यांचीं, बढत्यांचीं गाऱ्हाणीं सगळीं देवाजवळ गायिलीं जातात. देवानं गाऱ्हाणं ऐकलं नाहीं कीं त्याचं समर्थन करण्याचं शास्त्रहि भीमाबाईंना चांगलं अवगत आहे. माझं वजन बरंच वाढलं तेव्हां एक दिवस गंमतीनं भीमाबाईंना म्हटलं, "सारखं वजन वाढतंय्. बरं नाहीं हें. सांगा ना गाऱ्हाणं तुमच्या देवाजवळ!" दोनतीन महिन्यांनीं पाहिलं तरी माझी अवस्था तीच, पण भीमाबाईच आपल्या बारीक झालेल्या! तेव्हा सांगूं लागल्या--"मीं देवाला म्हटलं, वजन कमी होऊं दे, बाबा. माझ्या मनांत होतं तुमचं वजन; पण मी बोललें मोघम, तेव्हां देवाला वाटलं, माझंच वजन कमी करण्याचं गाऱ्हाणं सांगतें आहें मी; अन् त्यानं बिचाऱ्यानं माझंच वजन कमी केलं!"

भीमाबाईवरून परित्यक्तेला प्रतिकूल परिस्थितींतून मार्ग कसा काढतां येतो, जीवनांत आनंद कसा मानून घेतां येतो, याची चांगली कल्पना येते. त्यांनीं हा नोकरीचा मार्ग पत्करला हें त्यांच्या प्रतिष्ठित नात्याच्या मंडळीस मुळींच पसंत पडलं नाहीं. पण त्यांच्या विरोधाला भीमाबाईंनीं जुमानलं नाहीं. वडील होते तोंवर ठीक होतं पण पुढें इतरांवर अवलंबून राहणं, पदोपदीं त्यांचे अपमानाचे शब्द ऐकून घेणं हें त्यांना रुचलं नाहीं. आपल्या मावशीच्या आधारानं त्या मुंबईस आल्या; एक-दोन घरीं कामं केल्यावर मला गांठलं आणि आतां माझ्या इथेंच

स्थिर झाल्या आहेत. माझ्या संसारांत मन रमल्यानं संसाराची वरीचशी हौस फिटली. पाखरं, जनावरं, अंवतींभंवतींचीं मुलं, माझीं व आपलीं स्वतःचीं भाचरं यांच्यावरच्या प्रेमानं वात्सल्याची तहान भागली. मुळांत स्वभाव आनंदी, सदाफुलीच्या फुलासारख्या कोणत्याहि परिस्थितींत टवटवीत राहाणाऱ्या अशा वृत्ति, त्यामुळं ह्या बिकट परिस्थितींतहि दुःखाची दाट छाया त्यांच्या मनावर नाहीं. स्वभाव मनमिळाऊ, अत्यंत प्रेमळ, मन दिलदार, त्यामुळं अनेक संबंध जोडले. विणकाम-शिवणकाम शिकून घेतलं, वाचनाची आवड लावून घेतली, स्वतःच्या पाठीं मनाला विरंगुळा पाडणारे अनेक उद्योग लावले. पण या सर्वांपाठीं खोलखोल अशी अन्यायाची जाणीव आहे. ती कधीं राग, कधीं सूडबुद्धि, कधीं अस्वस्थ करणारी हुरहुर, अशा अनेक प्रकारांनीं बाहेर पडते. सदा आनंदी राहाण्याची धडपड हीसुद्धां सूडबुद्धींतूनच उत्पन्न झालेली असावी. परिस्थितीवर, त्या परिस्थितीस कारणीभूत झालेल्या व्यक्तीवर, विजय प्रस्थापित करण्याचा एक मार्ग आहे तो ! अनेक वेळां त्या म्हणतात—“ कांहीं झालं तरी देव मला विसरला नाहीं ना? काय वाईट झालं माझं ? त्यानं मला सुखासमाधानांत ठेवलं आहे. मी कुणाची बांधलेली नाहीं. ह्याहून काय हवं कुणाला अधिक?”

[–स्त्री–एप्रिल १९५१]

## २ : : : शांताराम



'तुझं नाव काय रे?' ह्या माझ्या प्रश्नाचं उत्तर आलं, तें "शांतारामरामचंद्र मोरे," असं एका दमांत कुठंहि न थांबतां उच्चारलेलं. दोनतीन वेळां उत्तर वदवून महत्प्रयासानं शब्द सुटे केले, तेव्हां त्याचं नांव 'शांताराम' हें ध्यानांत आलं. पुन्हा 'कुठचा राहणारा तूं?' ह्याचं उत्तर असंच एका शब्द-समूहांतून आलं, 'मुक्कामधेरापोस्टपालगडतालुकाखेडजिल्हारत्नागिरी.'

त्यानंतर वय, बाप, बापाचा धंदा, ह्याची स्वतःची अगोदरची नोकरी हे विचारण्याच्या भानगडींत मी पडलेंच नाहीं. शब्दांची फोड करण्यास सवड होती कुणाला ? मुलगा स्वच्छ उजळ दिसला, तरतरीत दिसला, तेवढ्यावरच त्याला वरच्या कामास म्हणून ठेवून घेतलं. उत्तर देण्याच्या शिस्तीवरून वाटलं कीं चांगल्यापैकीं प्राथमिक शाळेच्या तालमींतून स्वारी तयार झाली असावी आणि नकळतच आणिक एक प्रश्न विचारला गेला, "लिहायवाचायला शिकलायस् काय रे ?" तेव्हां ठराविक पद्धतीनं उत्तर आलं, "गांवच्या शाळेंतून मराठी चौथी इयत्ता पास झालों आहें." घरांतल्या कामाच्या भीमाबाईचं प्राथमिक शिक्षण झालेलं आणि हा नवा वरकामाचा मुलगा चौथी इयत्ता पास, तेव्हां नोकरवर्ग सुशिक्षित जमला हें पाहून आनंद झाला.

शांताराम वरकामाचा नोकर. 'रामागडी' नव्हे हो तो ! परवा शेजाऱ्यानं कुणीं त्याला 'रामा' म्हणून हाक मारली, तेव्हा असा तुटून पडला त्याच्यावर ! "मी रामागडी ? मी काय भांडीं घासतों, धुणीं धुतों ? मोरे आहें मी ! मोरे असलीं गड्याचीं कामं करीत नाहींत कधीं." मोरे घराण्याच्या मोठेपणाचा त्याला फार अभिमान. 'वाणकोटी कोण तें मला माहीत नाहीं, आम्ही मराठे !' असं अभिमानानं सांगत असतो. मोरे घराण्याला शोभत नाहीं, म्हणून तो गौरी-गणपतीच्या किंवा गोविंदाच्या नाचाला केव्हांहि जाणार नाहीं. उलट त्या दिवसांत कामांत चूर होऊन जाईल. त्याच्या नांवाचा वा आडनांवाचा वाटेल तो अपभ्रंश केलेला त्याला चालतो—त्याला 'शांतू' म्हणा, 'मोरू' म्हणा—पण 'रामा' म्हटलं कीं मात्र त्याचं पित्त खवळतं. मुंबईत पारशी आणि गुजराती लोकांनीं 'रामा', 'गंगा' हीं देवादिकांचीं पवित्र नांवं—विशेषनामं—विशिष्ट अर्थीं सामान्य नामं बनवून टाकलीं आहेत आणि त्यांच्या पावित्र्याची व विशेषत्वाची विस्मृति पाडली आहे. त्याला 'बॉय्' म्हटलं कीं शांताराम विशेष

खूष होतो. ‘ बॉय् ’ म्हटल्यानं पांढऱ्या सुटाबुटांतली, स्वतःच्या ऐटींत इतस्ततः वावरणारी व्यक्ति त्याच्या नजरेसमोर उभी राहात असावी.

शांतारामाचं वय चौदा-पंधरा वर्षं इतपतच असेल. तीन वर्षांपूर्वी त्याच्या गांववाल्यानं आपल्या हॉटेलांत काम करण्यासाठीं म्हणून त्याचं बोटीचं भाडं स्वतः भरून, त्याला मुंबईस आणलं. वर्ष दीड वर्ष त्यानं हॉटेलांत नोकरी केली आणि स्वतःच मनाशीं ठरवलं कीं आपल्यावर गांववाल्यानं केलेल्या उपकारांचं ओझं फिटलं. मग दुसऱ्या एका गांववाल्यानं त्याला माझं घर दाखवलं. हॉटेलांत राहिल्यानं स्वारी बरीच तयार झाली आहे. कोंकणी हेल काढून पण जोरांत हिंदुस्तानी बोलतो, एकटा असला की फिल्मी गाणीं गुणगुणतो. रेडिओवर कामगारसभेचा कार्यक्रम केव्हां लावायचा, रेडिओ–गोवा कसं लावायचं तें सारं समजतं. गांवचं पाणी जाऊन वर्ष-सव्वा वर्षांत नवी झिलई चढली आणि सुदैवानं विडी-जुगार हीं हॉटेलांतील पोऱ्यांचीं व्यसनं लागण्यापूर्वीं आणि त्याचा स्वाभाविक बालिशपणा लोपण्यापूर्वीं तिथून त्याची सुटका झाली. माझ्या इथेंहि सांगून ठेवलं आहे–“ वीस वर्षांचा होईपर्यंत हें काम करीन; पण मोठा झाल्यावर गिरणींत नाहींतर हपिसांत नोकरी पाहीन. अशीच नोकरी कायम केली तर गांववाले हसतील मला. ”

हॉटेलांत राहिल्यामुळं म्हणा वा त्याच्या अंगच्या समंजसपणामुळं म्हणा, तो स्पर्शास्पर्शाच्या जुनाट कल्पनांपासून मुक्त झाला आहे आणि भुताखेतांची भीतीहि त्याला उरलेली नाहीं. आमचं घर हॉस्पिट्लजवळ, मयताची खोली तर अगदीं शेजारी, त्यामुळं घराविषयीं ‘ घर झपाटलं आहे ’ वगैरे दंतकथा बऱ्याच आहेत. आम्ही ह्या घरांत राहायला आल्यावर सुरवातीला हें सर्व ऐकून भीमाबाई वगैरे मंडळी बरीच बिथरली. त्याचा फायदा घेऊन शांतारामानं आगींत तेल ओतण्याचा प्रयत्न सुरू केला. “ ती पाहा डंकीण, पांढरं पातळ नेसली आहे, केस पाठीवर सोडले आहेत. बघा कशी

झाडावर बसली आहे," असं वर्णन करून रात्रीं स्वतः भ्याल्याचं नाटक करी आणि मग इतर मंडळी खरोखरच घाबरली कीं मोठेपणाचा आव आणून त्यांची समजूत करी. "अहो, डंकीण आपलं काय करणार? आपण काय घोडं मारलंय तिचं! आलीच तर ही बघा तिला मारायला काठी आहे माझ्यापाशीं."

मयताच्या खोलींत दिवसरात्र येणारीं पोराथोरांचीं प्रेतं पाहूनहि तो डगमगला नाहीं. घरांतलं कुणी चुकचुकलं कीं म्हणे, "अहो, रेशनच्या दिवसांत एक गिऱ्हाईक कमी झालं!" त्याची बेफिकिरीची वृत्ति पाहून माझी भाची म्हणाली, "पाहा, तूं असं अभद्र कांहीं बोलतोस तें मी देवाला सांगीन, मग अशी कडक शिक्षा करील तो तुला!" मधला 'देवाला' हा शब्द त्याच्या कानीं पडला नाहीं तेव्हां त्यानं कावऱ्या बावऱ्या स्वरांत विचारलं, "कुणाला सांगणार–बाईना?" माझी भाची म्हणाली, "अरे बाईना काय, खुद्द देवाला गाऱ्हाणं सांगणार मी!" तेव्हा अगदीं निर्धास्त होऊन म्हणतो, "कुणाला? देवालाच सांगणार ना? मग खुशाल सांगा हं! मी घाबरलों बाईना सांगतां की काय!"

जात्या पोरगा निर्भीडच आहे, पण मितभाषणी. उगीच वटवट करणार नाहीं. यानं स्वतःलाच एक शिस्त लावून घेतली आहे कीं मी मालकीण तर माझ्याशीं जास्त बोलायचं नाहीं. अगदीं उंदीर कसा वावरतो माझ्या-समोर. कामापुरता बोलेल, अलीकडेपलीकडे एक शब्द नाहीं. मला तो मुखदुर्बळ वाटतो, पण त्याचं खरं स्वरूप इतरांना दिसतं. कुणाची भीति बाळगीत नाहीं पण माझ्यासमोर मात्र गोगलगाय अगदीं! तोंडांतून स्पष्ट शब्द निघेल तर शपथ!

त्याचं सगळं काम कलापूर्ण आणि अत्यंत हौसेनं केलेलं असतं आणि त्याच्या जोडीला त्याची बालिश वृत्ति असते. स्वयंपाकघर, जेवणघरांतल्या कपबशा नवीन नवीन धर्तीनं लावील आणि तें काम करतांकरतां पारे-

पणानं भांड्यांकडे बोलेल. एखाद्या मोठ्या भांड्यास उद्देशून म्हणेल, 'काय रे जाड्या, तूं इथं कशाला आलास? चल तुझी जागा खाली तिथं!' 'या बाई, वर या अशा' असें म्हणून उंच अशी बाटली फळीवर ठेवील. दुसऱ्या कुणीं लावलेलीं भांडीं त्याला पसंत पडत नाहींत. अंथरूण घालील तें असं कीं चुणी कुठं दिसणार नाहीं. तो कामांत असला आणि आम्हीं अंथरुणं केलीं कीं आपलं काम आटो-



पल्यावर लगेच सगळं उसकटून आपल्या मनाप्रमाणं चापूनचोपून चादर घालतो, पांघरुणांच्या घड्या व्यवस्थित ठेवतो आणि आमच्याकडे एक चोरटा कटाक्ष टाकून पसार होतो. जमीन पुसतांना एखादं गाणं गुणगुणेल, नाहींतर पुसायचं फडकं पायांखालीं घेऊन, ओल्या जमिनीवर घसरत स्केटिंग करण्याच्या पद्धतीनं सर्रकन् ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जाईल.

त्याला व्यवस्थितपणाची मनापासून आवड आहे. सगळं कांहीं वेळच्या-वेळीं पद्धतशीरपणानं करण्याचा प्रयत्न असतो. तें पाहून मी रोजच्या कामाचं एक वेळापत्रक करून दिलं. त्याला ती कल्पना फार पसंत पडली. सगळं काम वेळापत्रकाप्रमाणं होऊं लागलं आणि महिन्याभरांत वेळापत्रक तोंड-पाठहि झालं. सोमवारीं दिवाणखाना पुसायचा. मंगळवारीं रेशन आणायचं, बुधवारीं सामानाला पॉलिश् लावायचं वगैरे वगैरे. पण त्याचा एक नियम आहे. सकाळीं सांगाल तें काम करील; पण दुपारीं, जेवणं वगैरे झाल्यावर तो बांधून राहणार नाहीं. घरींच राहील; पण मन मानेल तेंच काम करील.

एरवीं त्याला कामाची फार हौस. अळंटळं न करतां, हंसतमुख चेहऱ्यानं, नाचतबागडत पडेल तें काम करील; पण मधेंच खूपखूप भटकण्याची अनावर हुक्की येते. प्रथम माझ्या रिवाजाची माहिती होईस्तवर 'आज आत्या गांवाहून यायची आहे,' 'आज आत्याचा नवरा आजारी आहे,' अशा कांहींतरी बनावट सबबीवर सटकत असे. आतां आठवड्यांतला एक दिवसच ठरवून दिला आहे. त्या दिवशीं बाहेर जातोच; पण सगळ्यांत मोठी सहल होते ती केस कापण्याच्या निमित्तानं. केस कापायला जाईल तो थेट सँडहर्स्ट रोडवरच्या एका ठराविक सलूनांत. दुसऱ्या कोणत्याहि सलूनांत जाण्यास तो राजी नसतो. धोबी तलावापासून तिथवर ट्रॅमनं जायचं, केस कापून घ्यायचे. ठराविक हॉटेलांत एक सिंगल चहा आणि भजीं मारायचीं. आणि ट्रॅमनं येण्यासाठीं दिलेल्या आण्याचे चणे घेऊन चणे खात रमतगमत पायींच घरीं यायचं. चौपाटीवर जाहीर सभा असली तर पंधरावीस मिनिटांसाठीं तिथें उपस्थिति असायचीच. एक दिवस प्रेतयात्रेबरोबर स्वारी सोनापुरांतहि पोचली आणि तिथं मनसोक्त हिंडून सर्व पाहून आली. त्याचं वर्णन ऐकून भीमाबाईंचा आग्रह चालू आहे "मलाहि जिवंतपणीं सोनापूर पाहूं द्या!"

शांतारामांतलं पोरपण अजून कायम आहे. सकाळीं भूक लागली की घरांत जाऊन सांगतो, 'पाव ओरडतोय् कपाटांत, म्हणतो कुणाच्या पोटांत जाऊन पडेन तेव्हां बरं!' भीमाबाईंचं पाहून त्यानंहि देव पुजला आहे. पण त्याच्या पूजेमधें धार्मिक भक्तिभावापेक्षां हौसेचाच भाग अधिक. तऱ्हेतऱ्हेनं फुलं मांडून ठेवायचीं, उदबत्त्या लावायच्या, दिवा लावायचा ह्याचंच महत्त्व! देवाला वाहायचीं फुलं आधीं हुंगून पाहातो. 'हें रे काय?' म्हटलं की उत्तर येतं 'वास आहे कीं नाहीं तें पाहतों. बिनवासाचीं फुलं देवाला कशीं वहायचीं?' मधें माझी भाची विषमज्वरानं आजारी पडली. ती माडीवर खाटेवर पडून असे. रात्रीं एकटी असली म्हणजे सोबतीला

म्हणून शांतारामास व्हरांड्यांत बसवीत असूं. कुठं कांहीं खुटखुट झालं, कीं ती बिचारी घाबरून विचारी, ‘कोण रे, शांतारामच ना?’ कीं तो घोगरा आवाज काढून उत्तर देई, ‘अहो, कुठला शांताराम घेऊन बसलांत? मी चोर--डाकू!’

त्याचं व्यवहारज्ञान मात्र थोराचं. आपल्या कपड्यांसाठीं एक लहानशी ट्रंक आणली आहे. तिच्यांत, आहेत ते चार कपडे, व्यवस्थित घड्या करून ठेवले आहेत, पण ट्रंकेला कुलूप घालायला तयार नाहीं. ‘कुलूप कशाला? कुलूप लावलं तर कुणाला वाटेल ट्रंकेंत आहे कांहीं दस्तऐवज आणि लहानशी ट्रंक कुणीहि उचलून घेऊन जाईल. कुलूप नसलं तर कुणाचं लक्षहि जाणार नाहीं.’ हा खुलासा करून मग मोठ्या प्रौढीनं सांगतो, ‘मलाहि कळतं माणूसशास्त्र!’—मानसशास्त्र हा शब्द बराच बोकाळतो आमच्या इथं. शांतारामानं आपल्या मतीप्रमाणं त्याचं रूप बदलून घेतलं आहे. आम्ही हसलों कीं आपलं कांहींतरी चुकतं एवढं ताडून घेतलं आहे, पण काय चुकतं त्याचा मात्र अद्याप पत्ता नाहीं.

बाकी त्याला ‘माणूसशास्त्र’ कळतं हें मात्र खरं. भीमाबाईंना त्यांच्यापुढं नमतं घेऊन कसं खूष ठेवायचं, ऐन कामाच्या तारांबळींत पुढं सरसावून अचूक नडलेलं काम करून माझी मर्जी कशी संभाळायची, कुणाकडे नम्रतेनं वागायचं, कुणाशीं चढेलपणा करायचा, कुणाशीं तुटकपणा धरून दूर राहायचं, हें सारं कांहीं लबाडाला उमगतं. कांहीं प्रश्न आपण विचारला आणि कुणाची आगळीक करायची नसली तर त्यानं आपलं एक उत्तर ठरवून टाकलं आहे, ‘मला काय माहीत!’ भीमाबाई किती वाजतां बाहेर गेल्या, दुपारीं निजल्या का, माझी भाची संध्याकाळीं किती वाजतां परत आली, ह्या सर्व प्रश्नांचं उत्तर—‘मला काय माहीत?’ त्यामुळं गुलाम सर्वांच्या विश्वासांतला झाला आहे. सर्वांची खात्री कीं आपलं गुपित हा कांहीं बाहेर फोडणार नाहीं.

त्याचं वय अवघं चौदा-पंधरा वर्षांचं; पण आपल्यावरच्या जबाबदारीची त्याला पूर्ण कल्पना आहे. भावंडांत, मुलांमध्यें आपण थोरला; वडील गांवीं कोकणांत शेती करून कसाबसा गुजारा करीत आहेत; तेव्हां ह्या वयांतच संसारास हातभार लावला पाहिजे ही जाणीव आहे. दोनदोन महिन्यांचा पगार जमा करून स्वतः मनीऑर्डर लिहून गांवीं पाठवून देतो आणि बरोबर 'खर्च बेतानं करावा ' अशी एक सूचनाहि करतो. मुंबईत राहून छानछोकीची आणि ऐटदार पोषाक करण्याची थोडीबहुत आवड उत्पन्न झाली आहे, पण त्यावर स्वतःच्या घामाचा ठराविक पगार खर्च करणार नाहीं. कुणीं पाहुण्यांनीं बक्षिसाचे आठ आणे–रुपाया कांहीं दिलं तर ते साठवून एखादा बुशकोट करून घेईल.

आपल्या हौसेसाठीं वा कामासाठीं कर्जाऊ पैसे कधीं मागणार नाहीं. मानीपणा अंगांत पूर्ण मुरला आहे. एरवीं खेळीमेळीनं, हंसतखेळत सर्वांशीं वागत असला तरी अन्नावरून वा खाण्यापिण्यावरून कुणीं थट्टेत कांहीं म्हटलं तर चटकन् त्याच्या मनाला तें लागतं आणि त्याचा दंश महिनेच्या महिने मनांत धरून बसतो. " ह्यांच्या अन्नावर माजला आहे " असं कुणीं म्हटलं की संतापानं अगदीं तिळपापड होतो नुसता. खाण्यासाठीं तो कधींहि कुणापुढं तोंड वेंगाडणार नाहीं. त्या बाबतींत माझं मिंधेपण पत्करायलाहि तयार नाहीं.

ह्या वेळीं गांवाहून परत आला तेव्हां पाठचा भाऊ हट्ट धरून बसला म्हणून त्याला घेऊन आला आणि गांववाल्याच्या खोलींत ठेवला. मी किती म्हटलं, ' राहूं दे आठ-पंधरा दिवस आपल्या इथंच,' तर ऐकलं नाहीं. त्याला फुकट माझ्या इथं कसं जेवूं घालायचं ? सातआठ दिवस झाल्यावर गांववाला कुरकुर करूं लागला, महागाईच्या अन् रेशनच्या अडचणी ऐकवूं लागला, तेव्हां एक दिवस घेतला भावाला बरोबर आणि

हिंदु हॉटेलं धुंडाळून, स्वतःच एका ठिकाणीं कामाला ठेवला. भावाची मुंबई पाहण्याची हौस फिटली तेव्हां त्याला परत धाडून दिला.

एक दिवस तो आंधोळीस गेला असतां विसरतेपणीं भीमाबाई स्वयंपाकघराला कुलूप लावून किल्ली बरोबर घेऊन गेल्या. ह्याचं वाढलेलं ताट आंतच राहिलं. तो पाणी प्याला आणि दिवसभर उपाशी राहिला. पण जेवणघरांतल्या कपाटांतलं काढून खाल्लं नाहीं कीं शेजारीं कुणाकडे जेवण मागितलं नाहीं. संध्याकाळीं घरीं आल्यावर खूप रागावलें मी ह्या आडमुठेपणाबद्दल. पण याचं त्याला कांहींच वाटलं नाहीं.

शांताराम इंग्रजी शिकला, बुशकोट, लांब पँट घालून, भांग पाडून थाटानं नटला तरी त्याचं अंतःकरण कोकणांतल्या खेड्यातलंच! मन रमतं तें गांवाच्या, शेतावरच्या कामाच्या, आपल्या आवडत्या बैलांच्या आठवणींतच! त्याच्या मतें झाडावर चढून वा दगड टाकून पाडलेल्या आंबट 'घोटां'ची चव हपूस आंब्याला नाहीं. लाकडावर भाजलेला खोबील व सुका बांगडा ह्यांच्या पुढें सरंगा, कोलंबी ह्या मुंबईकरांच्या आवडत्या मासळीची काय मातब्बरी? त्याचा संध्याकाळचा स्वतःच्या हक्काचा जो वेळ, तो स्वतः लावलेल्या परड्यांतल्या भाज्यांची मशागत करण्यासाठींच उपयोगांत येतो. त्याच्या परसांत केळीं आहेत, अळू आहे, सोनटक्का-अबोली-रतनअबोली हीं खास कोकणांतलीं फुलझाडं आहेत, काटेकणग्यांची वेल आहे. कोकणांतल्या नमुन्याचा एक छोटासा मळाच उठवून दिला आहे. त्याला पाणी मात्र अद्ययावत् पद्धतीनें, होज पाइप लावून देण्यांत येतं. केळ व्याली तेव्हां त्याला जो आनंद झाला तो विचारूं नका. असं शेतकऱ्यांचं मन असलं, तरी महत्त्वाकांक्षा आहे मुंबईत काम करण्याची. पण तें कशासाठी तर आपण मिळविलेल्या पैशावर गांवची शेती व्यवस्थित व्हावी, स्वतःच्या घराची शाकारणी नीट व्हावी म्हणून. रजा घेऊन गांवीं जातो, तो पोचल्या दिवसापासून तों निघायच्या दिवसापर्यंत सारखा शेतांत

राबत असतो. इथं असतांना सुद्धां मन ओढतं आपल्या खेड्याकडे, शेती-वाडीकडे, गुरांकडे, गांवच्या घराकडे आणि तेथील मंडळीकडे; पण शहरीं जीवनाचं एक प्रकारचं आकर्षण उत्पन्न झालं आहे आणि शहरांत मिळ-वलेल्या पैशांवर गांवचं जीवन चालेल ही एक जाणीव अस्फुट रूपांत झाली आहे. आज ' कायमचा गावीं राहा ' म्हटलं तर ते त्याला रुचणार नाहीं; पण जिव्हाळा आहे त्याच जीवनाविषयीं. त्या जीवनांत जिवंतपणा आहे. शेतांत धान्य पिकवायचं, गुरं पोसायचीं—त्यांत खरं जीवन आहे. शहरी राहणीचा मोह क्षणिक; तिचं महत्त्व तात्पुरतं, साधनरूपाचं. त्याच्या वडलांनीं तरुणपणांत गिरणींत नोकरी केली, घरच्या संसाराला मदत केली, गांवांतली परिस्थिति जरा स्थिरस्थावर झाल्यावर मुंबईतील नोकरी सोडून ते गांवींच स्थायी झाले. हासुद्धां वडलांचंच व्रत चालवील असं दिसतं.

[—स्त्री—जुलै १९५३]



बसलेले :—काळूराम व लेखिका.

उभे :—भीमाबाई—शांताराम—रामभाऊ.

[ १९५३ ऑगस्ट—युरप, अमेरिकेच्या दौऱ्यावर निघण्यापूर्वी. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २३६२३ दि. ११-५-५
क्रमांक ११३८५ नों. दि. ३-१-५

## ४ : : : काळूराम



मी पहाटेची कोल्हापुराहून येऊन पाहतें तों ओसरीवर निजलेल्या शिपायाच्या पायांशीं एक लहानसं काळं बोचकं दिसलं. ओसरीवरचा दिवा लावला तेव्हां त्या बोचक्यांत दोन कांचा लकाकल्या, अन् कांहीं वेळानें तें गतिमान् झालं तेव्हां तें कुत्र्याचं पिलूं हें ध्यानांत आलं ! मी चार दिवस बाहेरगांवीं आहें, हें पाहून भीमाबाईनीं हें साधलेलं दिसतं. त्यांना कुत्र्या-मांजरांची फार आवड. कुत्रं वा मांजर बाळगण्याबद्दल त्यांनीं माझ्यापाठीं सारखं टुमणं लावलं होतं; पण मीं कांहीं दाद दिली नव्हती. मला वाटे, 'कशाला उगाच कटकट लावून घ्या

पाठीं ?' आतां दार उघडल्यावर भीमाबाईंना मीं विचारलं, "कुठून अन् केव्हां आलं हे पाव्हणं ?" त्यांनीं पाल्हाळ लावून सांगितलं, (पाल्हाळ लावला असतां मुख्य मुद्दा विसरला जातो अन् माणसाचा राग ओसरतो, असा भीमाबाईंचा एक सिद्धान्त आहे !) "आगगाडीच्या फाटकापलीकडे तो बंगला आहे ना गुजरात्याचा ? तिथल्या माळ्याची कुत्री महिन्यापूर्वी व्याली आणि चार पिलं घातलीं तिनं. पण त्या मालकाला कुत्रीं डोळ्यांसमोर नकोत. तो तर परवां यायचा. त्यानं लिहिलं, वाडींत कुत्रीं असलीं तर नदीपलीकडे सोडून द्या. तो माळी आला होता आपल्या माळ्याकडे, तेव्हां मीं एक पिलूं आपल्यासाठीं आणायला सांगितलं. कसं छान आहे, नाहीं ? तुम्ही बाहेरगांवीं गेलांत कीं सोबत होईल मला." त्या पिलानेंच बुकूबुकू करून (नीट भुंकतांहि येत नव्हतं बेट्याला !) त्यांच्या बोलण्याला साथ केली आणि तें आमच्या दोघींच्या पायांत लुडबुडलं.

आतां ह्याच्या पालनपोषणाचं काम आलं आमच्या नशिबीं ! प्रथम जाऊन त्याच्या आईची चौकशी केली. पदरीं पडलं खरं पण त्याचा आगापिछा तर पाहावयाला हवा. तेव्हां कळलं, कीं कुत्री गांवठीच, पण अत्यंत इमानी व उत्तम राखणदार. बाप बेपत्ताच असल्यानं त्या बाजूची वंशावळ कशी तें कांहींच कळलं नाहीं. पण त्याच्या काळ्या केसाळ शरीरावरून बाप केसाळ जातींतील असावा असें वाटतें.

आतां आमच्याकडील नवोदित पाहुण्याचा नामकरणविधि करायचा ! कांहींतरी सार्थ नांव शोधून काढावं म्हणून त्याच्याकडे पाहात विचार करीत उभी होतें, इतक्यांत त्यानं माझी साडी दांतांत धरली आणि खेळूं लागलं. तेव्हां त्याला हाकलण्याकरितां त्याच्या वर्णास सार्थ अशी 'काळ्या, काळ्या' म्हणून भीमाबाईंनीं हाक मारली तेंच त्याचं नांव कायम झालं. खोड्या केल्या कीं 'काळ्या', एरवीं सीधेपणीं 'काळू' आणि लोकांना सांगायला 'काळूराम' असं ठरलं. त्याचं नांव नोंदवलं आहे तें 'काळूराम' म्हणूनच.

आतां अनेक प्रश्न पुढें उभे राहिले. ह्या काळूला पाळीव कुत्र्याची एकेक संवय लावायाची कशी ? पहिले आठ दिवस प्रत्येक खोलीचा संडास-मोरी बनवून वीट आणला बेट्यानं ! कुणीं म्हणालं, 'त्याचं नाक घाणींत खुपसा म्हणजे घडेल चांगली अद्दल !' कुणीं म्हणालं, 'घाण करतांना पकडा आणि द्या छडी.' काय करावं, ह्याचा विचार चालू असतांनाच काळूनं आपण होऊनच मोरीमधली एक ठराविक जागा सर्व विधींसाठीं कायम केली आणि आठ-पंधरा दिवसांत तर विधि बागेंतच जाऊन करूं लागला. त्याला शिकवावं लागलं नाहीं, कांहीं नाहीं. जणूं काय त्याची त्यालाच घरांत घाण करण्याची किळस वाटली !

त्याला खाऊं काय घालावं हा प्रश्न कधीं जाणवला नाहीं. महिन्याचं पिलूं घरांत आलं तें दूध-भाकरी खायला तयार असंच आलं. तळकट वस्तु एकदां हुंगली कीं पुढं ढुंकून पाहणार नाहीं ! गोडधोडाची विशेष आवड. पण सर्वांत कांहीं आवडत असेल तर मांस व हाडं. त्याचं तें खाद्य शिजत असलं कीं वासानंच मुग्ध होतो आणि सारखा शेगडीचा पाहारा करीत बसतो. फक्त भीमाबाई शेगडीजवळ गेलेल्या चालतात. पण त्याचं एक 'व्रत.' कितीहि भूक लागलेली असली तरी घरां-तली उघडी वस्तु स्वतः उचलून खाणार नाहीं. त्याच्यापुढं तरी धरलं पाहिजे, नाहींतर त्याच्या बशींत तरी टाकलं पाहिजे ! ह्या बाबतींत मुद्दाम कांहीं शिकवावं लागलं नाहीं. सुरवातीपासून जसं खाऊं घातलं, त्याची आपोआपच संवय लागली. संवयीचा गुलाम आहे अगदीं !

आंघोळीचा त्याला मनस्वी कंटाळा ! तशांतच पाण्याची भीति मनांत बसायला एक निमित्त झालं. एकदां बागेंत शेजारच्या कुत्र्याबरोबर खेळत असतां हौदांत पडला. अचानक आमचं तिथं लक्ष गेलं. कसाबसा वर तरंगत होता, नाकातोंडांत पाणी येत होतं, भुंकतां येत नव्हतं. अगदीं बुडतांबुडतां त्याला मानगुटीला धरून बाहेर काढलं. तेव्हांपासून त्याची

आंघोळीची बादली नुसती वाजविली तरी स्वारी धूम ठोकते. बांधल्या-शिवाय आंघोळ घालणं अशक्य.

काळूला पट्ट्याची आणि साखळीची संवय कशी लावायची हा पुढला प्रश्न. पहिल्या दिवशीं पट्टा घातला तेव्हां कूं-कूं करून भंडावून सोडलं. कांहीं वेळानं, खूप धडपड करून, आपली मान अलगद पट्ट्यांतून काढून घेतली आणि मोठ्या ऐटींत पट्टा दातांत धरून धावूं लागला ! मग पट्ट्याचा रोज खेळच होऊं लागला. शेवटीं त्याच्या मानेच्या मापाचा पट्टा करून आणला आणि रोज अर्धाअर्धा तास घालून संवय केली.

सांखळीची संवय लावणं महामुष्किलीचं काम. सांखळी बांधली कीं आपल्याभोंवतींच कूं-कूं करीत गरगर फिरे आणि फास लावून घेतो कीं काय अशी भीति वाटे. पण ही संवय गमतीच्या एका प्रसंगानं लागली. त्याचं असं झालं, मला आठ दिवस बाहेरगांवीं जायचं होतं. भीमाबाईना आपल्या गांवीं जायचं होतं. आतां काळूला कुठें ठेवायचं हा प्रश्न पडला. इतक्यांत, ट्रेनिंग कॉलेजमधल्या सौ० विनोद भेटण्यास आल्या होत्या, त्या म्हणाल्या, "द्या कीं आमच्याकडे पाठवून. आमच्या मुलांची तेवढीच करमणूक होईल." त्यांच्या इथें गेल्यावर काळूचा भाव चढला ! मुलांनीं त्याच्या येण्याची सूचना जाहिरात काढून अगोदरच वाड्यांतील मुलांस पोंचविली होती. काळू तिथें पोंचल्यावर 'राणीच्या बागेंतल्या' पाहुण्याचं स्वागत करण्यास मुलांच्या झुंडीच्या झुंडी आल्या. विनोदांच्या मुलांनीं आणि त्यांच्या स्नेह्यासोबत्यांनीं खूप कौतुक केलं त्याचं. अगदीं मुलांत मूल बनून चैनींत होता. तो तिथें असतांनाच ट्रेनिंग कॉलेजांत विद्यार्थिनींची पाठाची परीक्षा चालू झाली. एक विद्यार्थिनी 'कुत्र्याचें पिलूं' ह्या विषयावर पाठ देणार होती. तिनं एक लहानसं पिलूं वर्गांत नेण्यासाठीं ठरवूनहि ठेवलं होतं. पण ऐन वेळीं कुत्री त्या पिलास कुणाला हात लावूं देईना ! गुरगुरून चावायला येऊं लागली. आतां काय करायचं? ती विद्यार्थिनी

रडघाईला आली. तिला विषय सुचविणाऱ्या भाटेबाईंच्या तोंडचं पाणी पळालं. तितक्यांत सौ. विनोद म्हणाल्या, ' हात्तिच्या ! त्यांत काय झालं ? मी सुचवतें एक युक्ति. पाणंदीकरांचं कुत्रं आमच्या इथं आहे; त्याला आणवूंया. शिक्षणखात्याचं कुत्रं, त्याला प्रसंगाचं महत्त्व कळेल. ''

लागलीच काळूला आणायला मोटार गेली आणि मानासन्मानानं त्याला वर्गांत नेण्यांत आलं. स्वारी ऐटींत टेबलावर विराजमान झाली !



ती विद्यार्थिनी म्हणजे पाठी-राखीणच वाटली त्याला. जरा दूर गेली कीं ' बुक्बुक्' करी. फळ्यावर कांहीं लिहायचं तेव्हां ती त्याला काखोटींत धरी. तिचे हे हाल पाहून परीक्षिकांनीं सुचवलं, " कुत्र्याला बांधत कां नाहीं ?" त्यांना काय ठाऊक काळूला अद्याप सांखळीची संवय नाहीं तें ? पण त्या वेळेस काळूनं लाज राखली. वर्गांत इतक्या मुलींच्या समोर बांधत आहेत, तेव्हां तसंच कांहींसं कारण असावं, हें त्यानं ताडलं असावं ! मुकाट्यानं सांखळी बांधूं दिली. जरा कसरत केली सांखळीशीं आणि वर्गांतच झोपीं गेला ! अध्यापनाचा पाठ पुढं निर्विघ्नपणें चालू झाला आणि काळूची सांखळीची भीति गेली ती गेलीच !

काळू लहान असेपर्यंत मनसोक्त खेळला. आम्ही आमची कल्पकता लढवून दाराच्या कडीला दोरीनं बांधलेला चेंडू अडकवून त्याच्यासाठीं खेळणं तयार केलं. त्याच्याशीं खेळला तो भरपूर; पण त्याच्याहून किती-तरी सरस खेळणीं त्यानं स्वतः सहज शोधून काढलीं. नळकांडीच्या आकाराचा व्हिमूचा डबा आडवा पाडून तो ढकली. तो गडगडत गेला कीं गुरगुरून त्याच्यावर उडी मारी आणि त्याच्याशीं झटापट करी. पालथी पडलेली पातेली अशीच डावलत-ढकलत पुढं नेई, आणि लुटुपुटीच्या लढाईला रंग चढे. जुन्या वर्तमानपत्रांचा ढीग एका कोपऱ्यांत असे, त्यांतलं एकेक वर्तमानपत्र तोंडांत धरून खोलीभर धिंगाणा घाली. नारळ गरंगळत नेई आणि दांतानं धरून धूम ठोके. पण काळूचं बाळपण सहा-सात महिन्यांच्या वर टिकलं नाहीं. जातांजातां एक जोराची उसळी मारून मात्र गेलं. त्या उसळीसरशी त्याच्यांतला सगळा उनाडपणा एकवटून एकदम बाहेर पडला. त्या दहा पंधरा दिवसांत मात्र त्यानं सळो कीं पळो करून सोडलं ! बागेंतलीं रोपं उकरून काढलीं, गवतांत खड्डे खणून ठेवले, आवारांतलीं कोंबडीं मारलीं, घरांत पुस्तकांच्या चिंधड्या केल्या, बूट दांतांनीं फाडून टाकले. काय विचारूं नका ! एकदम सैतान त्याच्या अंगीं शिरला होता !

पण लागलीच प्रौढपण आलं तें त्याच्यावरच्या एकेक जबाबदारीची त्याला जाणीव देण्यासाठींच. घराची राखण करणं हें आपलं काम आहे हें पटलं. आणि थोड्याच दिवसांत तो त्या कामांत वाकबगार झाला. आवारांत परकं कुणी आलेलं चालत नाहीं, आणि कहर करतो. विशेषतः फेरीवाले किंवा गबाळे कपडे करून आलेलीं माणसं त्याला मुळींच खपत नाहींत. पण आवाजांतल्या मार्दवाला भुलतो. ज्याच्या अंगावर भुंकतो, त्यानं " काय रे ! ओळखलं नाहींस मला ? " असं न भितां प्रेमानं म्हटलं कीं तात्रडतोब विरघळतो. पण आधीं दिसतो अस्वलासारखा,

आव आणतो बहाद्दुराचा आणि जबडा वासून करडया आवाजांत भुंकतो तेव्हां धिटाई कायम ठेवून प्रेमानं त्याच्याशीं बोलणं सुचेल कुणाला? त्यामुळें आमच्या आसपास त्याची जरब चांगली बसली आहे. कुणी बागेंत लपून-छपून फुलं तोडीत असला आणि आम्ही घरांतले कुणी त्याच्यावर ओरडलों कीं हा कुठं असेल तिथून 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्' अशा आविर्भावानं जीव टाकून धावत येतो आमच्या मदतीला.

प्रौढपणाबरोबर इतरहि वैयक्तिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या आल्या. दर वेळेस नवी सहचरी, मग तिचं अनुनय, आराधन दर वेळीं नव्यानं होतं. हा प्रणयकाल सुरू झाला कीं तो भूक-तहान विसरतो, रात्रीचं जागं राहून पाहारा करण्याचं आपलं काम विसरतो आणि पुरा प्रेमवेडा बनतो. वर्षांत एकदोन वेळां येतं हें वेड. त्या भरांत आम्हांला पार विसरतो, इतकंच नव्हे, तर मनुष्य जातीशीं आपला कांहीं ऋणानुबंध आहे, ह्याची दखलहि नसते. कुणी येवो—जावो, त्याचं लक्षहि नसतं. सारं चित्त त्या वेळच्या प्रेयसीकडे लागलेलं असतं. ती वश झाली तर बरं, तिनं लक्ष नाहीं दिलं तर अगदीं बापुडवाण्यासारखी स्थिति होते!

वेडाची ही लहर ओसरली कीं मग आमच्याकडून कौतुक करून घ्यायची हुक्की येते. जणूं काय मधल्या ह्या विचित्र वागण्याबद्दल पश्चात्ताप होऊं लागला आहे आणि क्षमेची याचना करतो आहे! मग आडवा पडून उजवा पंजा मोठ्या प्रेमानें आपल्या पायावर ठेवील, तोंडांत पाय अलगद पकडेल आणि प्रेमानं अंगावर हात फिरवून घेतल्याखेरीज सोड-णार नाहीं.

कधीं त्याला शेराला सव्वा शेर कुणी भेटला—कुत्रा म्हणा वा माणूस म्हणा——कीं भिऊन गोळी होते. मग सारखा माझ्याभोवतीं घोटाळत राहतो. तसं मी त्याचं कांहीं करीत नाहीं. त्याला खाऊं घालणं, आंघोळ घालणं काय इजा झाली तर मलम लावणं—सगळं कांहीं भीमाबाई करतात.

पण मी त्याची मालकीण–त्याच्या रक्षणाची जबाबदारी माझ्यावर, ही त्याला जाणीव दिसते. संकटसमयीं तो माझ्याच पायांशीं लोळण घेतो आणि माझ्याकडूनच आपलं कोडकौतुक करवून घेतो. मी मधें सहा महिने बाहेर-गांवीं होतें तें त्याला फार जाणवलं. त्या दिवसांत तो बारीक झाला, भटक्या बनला व रात्रीचं आपलं पहारा करण्याचं काम त्यानं सोडून दिलं. मी आल्यावर महिन्याभरांत पुन्हा पूर्ववत् गलेलठ्ठ झाला आणि भटकंती सोडून, पुन्हा रात्रीं घरांत राहून पहारा करूं लागला. रात्रीचं त्याचं जेवण झाल्यावर तो एक फेरी मारून येतो. बहुधा आपल्या श्वान-मित्रमैत्रिणींची वास्तपूस करण्यास जात असावा. पण घरीं यायला चुकत नाहीं. आम्ही निजलेलों असलों तर माझ्या दारावर येऊन कूं–कूं करतो आणि त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं, तर दार उघडीपर्यंत दारावर जोराचे धक्के मारतो. आंत आला कीं सगळं एकदां हुंगून पाहून गच्चींत मोकळ्यावर आपल्या पहाऱ्याच्या जागीं स्वार होतो. भिमाबाई म्हणतात, "मेल्या, बाई नसतांना तुला आठवण नव्हती घराची आणि आतां कसा मुकाट्यानं येतोस?" मी म्हणतें, "मी नसतांना तुम्हीं खाऊं घातलंत त्याला, पण त्याचं पुरेसं कौतुक कुठं केलंत? तेव्हां मधल्या सहा महिन्यांत निव्वळ कुत्र्याचं जीवन जगला तो. आतां पुन्हां माणसांत आला!"

आम्हीं मुद्दामच काळूला माणसाळवण्याचा प्रयत्न केला नाहीं. त्याच्या गळ्यांत नंबराचा बिल्ला अडकविलेला पट्टा आहे, ह्याखेरीज पाळीव कुत्र्याचं कोणतंच बंधन त्याच्या पाठीं नाहीं. तो दिवसभर मोकळा असतो आणि स्वच्छंद हिंडत असतो; पण माणसांत राहून केवळ सहवासानं माणसाळला आहे. प्रेमानं खेळतो, अंगावर उड्या मारतो, पण आपली मर्यादा संभाळून असतो. खुर्ची-कोचावर सहसा कधीं बसणार नाहीं, चोरून खाणार नाहीं. आम्ही घर बंद करून बाहेर गेलों, तर पुढं ओसरीवर बसून आम्ही परत येईपर्यंत घर सांभाळील. अन् आम्ही

परत आल्यावर पायांवर लोटांगण घालील ! त्याला कुणी मारलं, कुठं कांहीं लागलं-खुपलं, तर बापुडवाणा होऊन आमच्याकडे येईल आणि भीमाबाई म्हणतात त्याप्रमाणं 'सेवा' करून घेईल ! ह्या बाबतींत त्याचा भीमाबाईवर विश्वास मोठा. त्यांच्याकडून शेकून घेईल, झोंबणारं औषध मुकाट्यानं लावून घेईल, त्या करतील तें आपल्या बऱ्यासाठीं असं जाणून त्यांना वाटेल तें करूं देतो. त्याच्या आवडीच्या माणसांपैकीं--हो, त्यालासुद्धां माणसांत आवडनिवड आहेच--कुणी मला भेटायला आलं तर माझ्या आनंदानं अंगावर उड्या मारून त्यांचं स्वागत करतो आणि तें माणूस जातांना थेट नाक्यापर्यंत त्याला पोंचवावयाला जातो. जसं कांहीं ह्याच्याच भेटीस आली होती मंडळी ! त्याच्याशीं प्रेमानं बोललं कीं प्रत्युत्तर म्हणून शेपटी हालवतो. रागानं बोललं कीं शेपटी पायांत घालून, डोळे घाबरट होऊन निघून जातो. आम्ही दुसऱ्या कुत्र्याचं किंवा लहान मुलाचं कौतुक केलं कीं हा अस्वस्थ होतो; कुत्र्याच्या अंगावरच जातो आणि मुलाच्या अंगावर सारखा भुंकत राहतो. त्याच्या दृष्टीआड कुणाकडे भेटायला गेलं असतांना तिथं त्यांच्या कुत्र्याला जवळ घेतलेलं असलं तर घरीं आल्यावर ताबडतोब काळू तें ओळखून काढतो. आमच्या कपड्यांना हुंगतो आणि बेचैन होतो. त्याची अक्कल माणसाची नसली तरी भावना माणसाची आहे. त्याचं वागणं लहान मुलासारखं लडिवाळपणाचं असतं. पण सगळ्या वागण्यांत संवयीचा प्रभाव फार. अकलेची उणीव ह्या गुणानंच तो भरून काढतो.

मला कुत्रीं नकोशीं वाटत .पण काळू आमच्याकडे आल्यापासून आतां वाटतं--कुत्र्याशिवाय घराला शोभा नाहीं.

[-स्त्री-ऑगस्ट १९५४]

## ५ : : : माझी गाडी आणि गाडीवान

शिक्षणसंस्थांतील आम्ही मंडळी–आणि ती सुद्धां अगदीं बोटावर मोजण्याजोगी थोडीथोडकी कांहीं मंडळी–आमच्या प्रदीर्घ नोकरीच्या शेवटल्या दहा-पांच वर्षांत मोटारगाडी ठेवण्याचा बेत करणार ! उतारवयांतील ब्रह्मचारी पुरुषाला एकाएकीं लग्नाची इच्छा झाल्यावर, बायकोची निवड करतांना जसें भांबावल्यासारखं वाटतें म्हणतात, तशीच स्थिति गाडी घेण्याच्या बाबतींत आमची होते. गाडी घाईनें तर हवी असते, पण गाडीची निवड मोठ्या चोखंदळपणानें करावी असेंहि वाटत असतें. पहिला प्रश्न गाडी नवी घ्यायची कीं जुनी ?

जुनी गाडी घ्यावी कीं काय, हा विचार मनांत डोकावतो ताच विद्युद्वेगानें तो जुन्या विकाऊ गाड्यांच्या मालकांत फैलावतो आणि एकेक आपली गाडी दाखवायला घेऊन येतो. मग गाडी ‘ पाहण्याचा ’ सोहळा सविस्तर सुरू होतो. ‘ गाडी चढणीवर कशी चढते, उतरणीवर कशी उतरते, सपाट रस्त्यानें कशी चालते, गर्दीच्या रस्त्यानें कशी जाते ’ हें दाखविण्यासाठीं चांगली २०–२५ मैलांची रपेट करवून आणण्यास गाडीमालक माघार घेत नाहीं. त्याला उजवायची असतेना आपली गाडी ?

तुम्ही गाड्यांच्या बाबतींत अनभिज्ञ आहांत असें आढळलें, तर तो अधिकच उदार बनतो आणि गाडीचीं स्तुतिस्तोत्रें ऐकवून त्याबरहुकूम तिची कृति करवून दाखवितो. तुमचें मन हळवें आहे असें त्याच्या लक्षांत आलें कीं, तो गाडीविषयीं मोठी माया दाखवूं लागतो. ' किंमतीची पर्वा नाहीं, पण माझी आवडती गाडी चांगल्या घरीं पडावी, तिची आबाळ होऊं नये, कधीं रस्त्यांत दिसली तर माझी गाडी मला ओळखूं द्यावी अशी इच्छा आहे ' अशा तऱ्हेचीं प्रेमाचीं बोलणीं करतो, आणि मोठ्या कौतुकानें आपल्याच गाडीकडे पहात रहातो.

बऱ्याचशा जुन्या गाड्यांतून रपेट केल्यावर वाटूं लागतें, आयुष्यांत एकदां कधीं गाडी घ्यायची, तर नवीनच सुरेखशी गाडी घेऊन जिवाची हौस कां करून घेऊं नये ?

मग नवीन गाडी घ्यायचें तंत्र वेगळें. नव्या गाडींतून पूर्वीसारखें मन मानेल तशी रपेट करतां येत नाहीं. जुनी गाडी दाखवायला गाडीमालक चार खेटे आपल्या येथें घालतात, एजंट दारीं धरणें धरून बसतात, पण नवी गाडी पहायला आपल्यालाच गाडीच्या माहेरघरीं, कारखान्यांत वा दुकानांत, धांव घ्यावी लागते. नवी गाडी घेण्याचा आपला बेत चारचौघांत झाला कीं, गाड्यांचीं माहिती-पत्रकें व अंतरंग-बहिरंग दाखविणारीं छाया-चित्रें खंडीभर येऊन पडतात. मग रस्त्यानें जाणाऱ्या गाड्या बारकाईनें न्याहाळण्यास आपली सुरुवात होते. गाडी घ्यायचा विचार मनांत येईपर्यंत, गाडी लहान का मोठी, तांबडी का हिरवी, इतके ठोकळ भेदच ध्यानांत येत म्हटलें तरी ही गाडी फोर्ड का ऑस्टिन तें वरचीं अक्षरें वाचल्याखेरीज समजत नसे. पण आतां गाड्यांतले बारकावे ध्यानांत येऊं लागतात आणि त्यांच्या घराण्याचें विशिष्ट भिन्नत्व ओळखूं येऊं लागतें.

अनेक प्रकारच्या गाड्या पाहिल्यावर, विशेषतः रंगरूप चाल-चलणुकी-कडे पाहूनच, मीं हिलमन घराण्यांतील ' मिंक्स ' गाडी घ्यायचें ठरविलें.

नांवाप्रमाणेंच ह्या गाड्या मोठ्या नखरेल, त्यांना ' मिंक्स ' ( नखरेबाज नाचरी पोरगी ) हें नांव अगदीं यथार्थ आहे. ठेंगणी ठुसकी, सडपातळ व नीटस बांध्याची, तरतरीत नाकाची आणि मोठ्या नखरेल मोहक चालीची ही गाडी ! एकेकीचे रंगही मोठे आकर्षक. माझ्यासाठीं माझ्या एका स्नेह्यांनीं सुंदर गाडी निवडून काढली. तिची काया जांभुळसर काळी, बसायच्या गाद्या लालचुटुक, आणि आंतलें काम तो लाल रंग खुलविणाऱ्या मऊ राखाडी रंगांत आणि चाकें पांढऱ्या पट्ट्यांची ! गाडी पाहूनच मनांत भरली एकदम ! त्यामुळें तिच्यांतल्या तांत्रिक बाबींचा विचार केला नाहीं मुळीं. त्यांतलें कांहीं गम्यहि नव्हतें आणि वाटलें कीं, प्रत्यक्ष परिचय होईपर्यंत माणसाच्या स्वभावाची तरी कुठें पारख होते ? दिसतें तेंच खरें. हौशीसाठीं आणि कोड-कौतुकासाठीं गाडी घ्यायची तर अशीच गाडी हवी !

गाडीसाठीं गाडीवान नेमण्याच्या बाबतींत मोठी तारांबळ उडाली ! नवी गाडी घ्यायची हा बेत ठरल्यावर एक चांगला अनुभवी कसलेला मनुष्य ठरवून ठेवला होता. पण तो नोकरीवर रुजू व्हावयास आला तरी गाडीची निवड निश्चित झाली नसल्यानें गाडीचा पत्ताच नव्हता, तेव्हां त्याला जावयास सांगितलें. पण शेवटीं झालें काय, तर ठरविलेली नवी गाडी दारांत येऊन उभी राहिली आणि गाडीवान मात्र तयार नाहीं ! पूर्वी भेटलेले सगळेजण ऐनवेळीं कुठें गडप झाले होते ! शेवटीं कुणीसा २१–२२ वर्षांचा एक पोरगेला मनुष्य पुढें आणून उभा केला. त्या पोरसवदा उमेदवाराच्या हातीं नवी कोरी गाडी देण्यास मन कचरूं लागलें; पण तो आलाच होता म्हणून, अगदीं मुठींत जीव धरून, त्याला गाडी चालवून दाखवावयास सांगितलें. ह्या चांचणी-परीक्षेंत त्यानें मोठ्या सफाईनें गाडी हांकली, रस्त्यावरच्या पाट्या बिनचूक वाचल्या, परत आल्यावर बॉनेट उघडून गाडीवर निष्णाताची नजर चहूंकडे फिरविली, उगाच दोन

तीन ठिकाणीं कांहीं खटकलें आणि अशी एकंदर छाप पाडली कीं ताबड-तोब त्याला नोकरीस ठेवून घेतला !

मला माझ्या कोणत्याच नोकराला निव्वळ सामान्य नांवानें संबोधण्यास आवडत नाहीं. तेव्हां त्याला नांवानें हांक मारतां यावें ह्या हेतूनें दुसऱ्या दिवशीं त्याचें नांव-गांव विचारलें. तो बिहारचा रहाणारा, पांच-सहा वर्षें मुंबईतच आपल्या गांवच्या एका टॅक्सीवाल्याकडे काम करीत असे आणि त्याच्या तालमींतच चांगला तयार झाला होता. त्याचें नांव त्यानें सांगितलें, " रामप्रसाद दीनदयाळ. "

मी नांव ऐकून चीतच झालें आणि म्हटलें, " अरे एवढा प्रसाद आणि दया कशाला हवी बाबा ? हांक मारतां येईल असं सुटसुटीत नांव सांग एखादं !"

त्यानें गालांतल्या गालांत मिस्किलपणें हंसून सांगितलें. " आपण नांव विचारलेंत, मीं सांगितलें. माझ्या गांवचे लोक मला ' रामबाबू ' म्हणतात, आपण अवश्य हांक मारा त्या नांवानें ! " तीन दिवस तो ' रामबाबू ' त्या नांवानें पुकारला गेला आणि त्याच नांवानें तो घरांत वावरला. पण चौथ्या दिवशीं आमच्या भीमाबाईनीं नवीनच बूट काढला. अचानक त्या म्हणाल्या, " बाई, रामबाबू हें कसं खुळं दिसतं नांव ! " (' खुळं ' ह्या शब्दाचा भीमाबाईच्या शब्दकोशांतील अर्थ हुडकून काढणें मोठें कठिण आहे ! लुगडें विटलें कीं म्हणतात, ' लुगडं खुळं कसं दिसूं लागलं, आमटींत हळद कमी पडली कीं म्हणतात, आमटी आज खुळी कशी दिसते. ' त्यांच्या मतें एखाद्या खुर्चीचा वा टेबलाचा आकार बरोबर नसला कीं म्हणतात, ' खुर्ची खुळी कशी वाटते. ') 'राम काय आणि बाबू काय ? त्याला रामभाऊ म्हटलं तर ? ' तो जवळच गाडी धूत होता. तो म्हणाला " माझी कांहीं हरकत नाहीं. बिहारी रामबाबूचा मरहट्टी मुलखांत रामभाऊ व्हावयाचाच ! "

तो ‘ बाबू ’चा ‘भाऊ’ झाला, आणि ‘ बाईसाब ’ हें माझें उपपद सोडून मला ‘ माताजी ’ म्हणून संबोधूं लागला. त्याच्या नांवाचें मराठीकरण झालें तेव्हां माझ्या नांवाचें पूर्णतया हिंदीकरण होणें क्रमप्राप्तच होतें, आणि ‘ भाऊ ’ ह्या शब्दानें जें आपुलकीचें नातें लागलें होतें त्याचाच पडसाद ‘ माताजी ’ मध्यें निघत होता.

त्यानें लवकरच घरांत सर्वांशीं संधान बांधून घेतलें. तो हिंदी अस्खलित बोले आणि ‘ मिडल पास कियेला आदमी ’ असल्यानें हिंदी भाषेवर त्याचें चांगलें प्रभुत्व होतें. तेव्हां मी आणि शांताराम त्याच्या हिंदीवर खूष. शांतारामच्या हॉटेलांत शिकलेल्या हिंदीला उजाळा मिळाला आणि मी ‘ प्रवीण ’ची तयारी करीत होतें, तेव्हां रामभाऊशीं हिंदी बोलण्यानें आयतीच तोंडी परिक्षेची तयारी होऊं लागली. ( प्रत्यक्ष परीक्षा दिली तेव्हां मात्र अनुभवास आलें कीं, बिहारी हिंदीपेक्षां ह्या बाजूचें मराठी छापाचें हिंदीच अधिक उपयोगीं पडलें असतें ! ) भीमाबाईनीं मात्र हिंदींत बातचीत करण्याचें साफ नाकारलें. एकदां त्यानें हिंदींत त्यांना कांहीं सांगितल्यावर त्या आपल्या अस्सल कोंकणींत उसळल्या, ‘ अरे मी सांगतंय तुकां, तुझां तां हिंदी की फिंदी माकां कळूंचा नाय ! मग घोटाळे होतले सगळे ! तूं माझ्यावांगडा मराठी बोल बघूं ! ’ तेव्हां त्यांच्याशीं तो मोडक्या-तोडक्या मराठींत बोले, आणि त्यांना खूष करावयाचें असलें कीं, एखाद-दुसरा कोंकणी शब्दही आपल्या बोलण्यांत घुसडून देई.

त्यानें सर्वांशीं दोस्ती केली तरी त्याला वाटे, ‘ मी ड्रायव्हर ! हा शांताराम आणि भीमाबाई बरोबरीच्या नात्यानें माझी चेष्टा करतात म्हणजे काय ? माझ्या हुद्द्याचा अपमान आहे हा !’ पण त्याला कोंकणचें पाणी काय माहीत ? एकदां चेष्टेस चिडला म्हटल्यावर, ह्या दोघांनीं त्याच्याशीं बोलणच सोडून दिलें. मग आला जेरीस ! माझ्याकडे कागाळ्यांस

सुरुवात झाली, " माताजी, जरा कुठें झगडा झाला तर बोलणं सोडून द्यायचं ही काय रीत झाली ? झगडा करायचा आणि एक व्हायचं ही आमची रीत ! नाहीं आवडली ह्यांची चेष्टा. रागावलों मी ! म्हणून काय माणसांतून उठलों मी ? बोलणं कशाला सोडावं ह्यांनीं ? "

शेवटीं मीं मध्यस्थी पडून तडजोड केली, आणि समेट घडवून आणला. पण कधीं मधीं तो आम्हांला ऐकवी कीं, ' मरहट्टी माणसें भारी मानी. ' तो स्वतः चिडे क्षुल्लक कारणावरून आणि तितकाच सहजगत्या राग विसरून जाई. आम्ही ' मरहट्टी ' माणसें सहसा चिडणार नाहीं; पण एकदां चिडलों कीं मनांत डंख धरून बसणार ह्याची प्रचीति आली त्याला !

त्याची खरें व खोटें ह्याबद्दलची कल्पनाहि अशी कांहींशी वेगळी होती. माझ्याकडे नोकरीस लागल्यावर दर महिन्याला कोर्टांत केसवर साक्षीला बोलावलें म्हणून पसार होई. कसली केस म्हणून विचारलें कीं सांगे, ' चाचांच्या मुलाला गुंडांनीं मारलें तेव्हां साक्षीदार म्हणून आपलें नांव पोलिसांनीं घातलें आहे. माझ्या ऐन कामाच्या वेळीं ह्याची कोर्टाची तारीख निघे. मी खूप चरफडे आणि त्यावेळीं हा मला गांवप्रेमाच्या गोष्टी ऐकवी. ' आमच्या गांवचा आहे लडका. त्याच्या संकटाच्या वेळीं त्याला मदत न करून कसं चालेल ? ' वगैरे.

एक दिवस कुर्ल्याच्या कोर्टांत काम करणारे एक वकील आमच्याकडे आले आणि त्याला पाहून मला म्हणाले, ' हा मनुष्य तुमच्या गाडीवर आहे वाटतं ? '

तेव्हां मीं विचारलें, ' कां ओळखीचा आहे तुमच्या ? '

त्यांनीं सांगितलें, ' अहो चांगलीच ओळख आहे ! कुर्ल्याच्या कोर्टांत केस चालू आहे त्याची ! '

तेव्हां मी म्हटलें, " कधीं आटपेल हो ही केस ? साक्षीदार आहे नाहीं ? तारीख लागली कीं धडपडत जावं लागतं त्याला साक्षीला आणि माझी पंचाईत होते."

तेव्हां ते वकील म्हणाले, " कुठला आला आहे साक्षीदार अन् साक्ष ? माटुंग्याच्या टॅक्सीवाल्याच्या दोन गटांत मारामारी झाली, त्यांतल्या एका गटांत होता हा. तेव्हां पकडला गेला आणि आतां जामिनावर सुटलाय ! "

वकील गेल्यावर मी रामभाऊला मला खोटें सांगून फसवल्याबद्दल खूप छेडलें. पण त्याचें उत्तर ठरलेलें !

" ह्यांत खोटं तें काय आणि फसवलं तें काय ? कुणाचं नुकसान केलं तर खोटं म्हणायचं ! मी मारामारीच्या खटल्यांत सांपडलों आहें असं सांगतों तर तुमच्या मनांत माझ्याविषयीं शक आला असता. तुम्हांला ड्रायव्हर तर हवा होता. मला माहीत आहे कीं, मी कांहीं वाईट माणूस नाहीं. तुम्हीं ठेवलंत तर तुम्हांला कोणताही त्रास पोंचूं देणार नाहीं. मग कशाला सांगायचं तुम्हांला खरं काय घडलं तें ? " त्यानें आजिजीच्या स्वरांत, ' इसमें झूट क्या था माताजी ? ' असें पुनः पुनः विचारल्यावर माझ्याही मनांत शंका आली कीं, घडलेलें जसेंच्या तसें सांगितल्यानें घटनेशीं संबंधित असलेल्या माणसांविषयीं चुकीचा ग्रह होत असेल तर तें खरें कसें ? सत्य हें घटनेच्या बाह्य स्वरूपाच्या जाणिवेंत कीं, घटनेंत गुंतलेल्या व्यक्तींच्या स्वभावधर्माच्या यथार्थ कल्पनेंत ? पण लवकरच रामभाऊ केसमध्यें सहीसलामत सुटल्यानें ह्या तत्त्वज्ञानाचा फारसा उपयोगच करावा लागला नाहीं !

त्याची पोलिसांविषयींची वृत्ति मोठी गमतीदार होती. त्यांच्या अधिकाराची व सत्तेची जाणीव असल्यानें त्यांत थोडी भीति होती, राग होता, हेवा होता आणि हें सर्व प्रगट करतांना त्याची विनोदबुद्धि जागृत

होत असे. रस्त्यावर एकेक पोलिस हात दाखवी त्यावर ह्याची अखंड टीका चालू असे. 'हा नवशिका आहे. बघा हात कांपत कांपत कसा वर करतो तो!' किंवा, 'त्याची ऐट तर बघा! सरकारच जणूं'. त्यांच्या गणवेषासंबंधीं अनेक नवनवीन कल्पना त्याच्या सुपीक डोक्यांतून बाहेर पडत. 'हात पांढरे करून काय उपयोग? रात्रीच्या अंधारांत दिसत नाहींत पोलिसदादा. वर दिवा असलेलें एक चाक त्यांच्या गळ्यांत अडकवलं पाहिजे.' मुंबईच्या पोलिसांना तो कांहींतरी मानी. बाहेरगांवीं गेल्यावर म्हणे, 'यहाँकी पुलिस तो देखिये माताजी! खाकी कपड़े पहनकर कौनसी भली बहादुरी करेंगे!' त्याचें म्हणणें कीं, लढाईवर जाणाऱ्या सैनिकांनींच खाकी कपडे करावे, रस्त्यावर उभें राहून हात वर-खालीं करणाऱ्या पोलिसांनीं कशाला सैनिकांची बरोबरी करावी?

रामभाऊची गाडी चालविण्यांतली सफाई पाहून मला गाडी चालवावयास शिकण्याची अनावर इच्छा झाली. त्यानेंही आपल्या इन मीन तीन वर्षांच्या ड्रायव्हरच्या आयुष्यांत, आपण किती जणांना शिकवून तयार केलें ह्याचें तोंडभर वर्णन केलें. तें ऐकून मीही केली शिकायला सुरुवात. हा पोरवयांतच धडाडीनें गाडी चालवावयास शिकलेला, त्याच धर्तीवर तो मला शिकवूं लागला. कसें जमणार तें? तो मला म्हणे, "माताजी, आप क्यों इतनी डरतीं?' त्यानें असें कांहीं म्हटलें कीं, गाडी शिकणें बाजूलाच राही आणि मीच त्याला प्रौढ मानसशास्त्रावर आणि प्रौढांना शिकविण्याच्या पद्धतीवर प्रवचन ऐकवीं. शेवटीं माझें शिकणें अपुरेंच राहिलें आणि त्यालाहि प्रौढ मानसशास्त्राच्या नियमांचें आकलन झालें नाहीं!

पण त्यालाही 'डर' नव्हती असें नाहीं. एकदां ऐन पावसांत मला महत्त्वाच्या कामासाठीं गाडींतून मुंबईहून पुण्यास जावें लागलें. त्यानें घाटांतून केव्हांहि गाडी नेलेली नव्हती. जातांनाचा प्रवास ठीक झाला; पण परत येतांना एकदम जोराचा पाऊस सुरू झाला. आम्हीं दुपारीं १२

त्या पुढें जेवण करून पुण्याहून निघालों आणि ऑफिसें बंद व्हायच्या आंत ४।।–५ ला मला मुंबईस सेक्रेटरिएटवर जाणें आवश्यक होतें. आम्ही जेवलों; पण रामभाऊ ‘ भूक नाहीं ’ ह्या सबबीवर जेवीना. आमची गाडी घाटांत आली आणि पहातों तर पावसाची सारखी झोड लागलेली ! अगदीं दहा फुटांपलीकडचा रस्ता दिसत नव्हता. जरा वेळ थांबलों, पण उघडीचें चिन्हच दिसेना, आणि मला तर ५ च्या आंत मुंबईस पोंचावयाचें होतें. रामभाऊनें धीर केला आणि गाडी काढली पुढें ! सबंध घाटांत कुणी शब्द बोलायला तयार नव्हतें. रामभाऊ अत्यंत काळजीनें, चहूंबाजूला बघून, ओंठ आवळून, मोठ्या निर्धारानें गाडी चालवीत होता. मुंबईला पोंचल्यावर तो सांगूं लागला कीं, गाडी चालवतांना भीति कशी वाटते तें त्या प्रसंगीं त्याला कळलें. सारा रस्ताभर मनांतल्या मनांत भगवानाचा धांवा केला म्हणे त्यानें आणि म्हणूनच त्यानें सकाळचें जेवण चुकविलें होतें !

त्याच्या वयाच्या मानानें त्याची भगवद्भक्ति थोर होती. रोज खोलींत तसबिरीची पूजा चाले, आणि भगवान-दर्शन होईल म्हणून तो



महाबळेश्वर-नाशिक अशा तीर्थांच्या ठिकाणीं जाण्यास उत्सुक असे. गणपतीच्या दिवसांत तर त्याच्या गाडींत बसायला भीतीच वाटे ! वाटेंत गणपति दिसला कीं खुशाल चाक सोडून दोन्ही हात जोडून भक्तिभावानें

ग्रं. क्र. ८५६४

त्याला नमस्कार करी. त्याबद्दल आपण म्हटलें तर सांगे, "[illegible], भगवानाच्या कृपेनें तर माझ्यांत गाडी चालविण्याचें सामर्थ्य आलें आहे, त्याला नमस्कार नाहीं केला तर कसं चालेल ?"

रामभाऊनें दोन वर्षें माझ्याकडे काम केलें असेल-नसेल, इतक्यांत मला हिंदुस्तानच्या बाहेर सहा महिन्यांच्या दौऱ्यावर जावें लागलें. त्या मुळें त्याला दुसरी नोकरी धरावी लागली. तितक्यांत त्याला टॅक्सी चालविण्याचें लायसेन्स मिळालें. तेव्हां ती प्राप्ति लाथाडून तो परत माझ्याकडे आला नाहीं. तो गेल्यावर कित्येक ड्रायव्हर माझ्याकडे लागले आणि गेले. मला इतर नोकरांचें धार्जिणें आहे; पण ड्रायव्हरांचें नाहीं असें दिसतें ! पण दर वेळीं नवा ड्रायव्हर रामभाऊनें दिला. कधीं दोस्त तर कधीं रिश्तेदार, तर कधीं आपल्या मुलुखांतला म्हणून. त्यांतल्या एकांतच मात्र माझ्या इतर नोकरांतली आपुलकी आणि एकप्रकारचें आगळें व्यक्तित्व निघालें.

त्याचें नांव शामू. राहणार मध्यप्रदेशांतला. मराठी व हिंदी मिश्रित-कोणत्याही व्याकरणाच्या नियमांपासून अलिप्त अशी धेडगुजरी भाषा तो बोले. शब्दाला शब्द लावावयाचा, सामान्यरूपाची भानगडच नाहीं. दिसायला अगदीं किरकोळ, जरत्कारू म्हटला तरी चालेल, पण ह्या शरीर-यष्टीवरून तो गरीब, सालस, भीरुवृत्तीचा आहे, अशी कल्पना केली तर ती साफ चुकीची ठरेल. त्याला एकाही भाषेचें व्याकरण माहीत नसलें तरी दोन्ही भाषेंतल्या शिव्या मात्र चांगल्या अवगत होत्या ! तो मालकाकडे वागायला जितका सरळ तितकाच इतरांशीं कर्दनकाळ ! एकदां चांगलाच प्रत्यय आला ह्या त्याच्या गुणाचा !

एकदां संध्याकाळीं भर गर्दीच्या वेळीं बसस्टँडजवळ

औषधाच्या दुकानांत मी गेलें होतें. बाहेर येऊन पहातें तर तीन बस-गाडया माझ्या इवल्याशा हिलमन गाडीला टक्कर देण्याच्या तयारींत उभ्या आणि आमचा दीड वीत छातीचा शामू त्या तीन बशींच्या तीन कंडक्टरांबरोबर आणि तीन ड्रायव्हरांबरोबर शिरा ताणून, शिव्या हांसडून भांडतो आहे ! बसवाले म्हणत होते, "गाडी पुढें उभी कर." तो म्हणे, "मी नियमानुसार गाडी उभी केली आहे, तुमच्या वाटेंत माझी गाडी नाहीं आणि मी बोटभर सुद्धां ती पुढें घेणार नाहीं."

ते सहा धटिंगण आणि केवळ आपल्या जोरदार वाणीनें आणि धीराच्या हटवादीपणानें त्यांना पुरून उरणारा, आमचा 'पाप्याचें पितर' दिसणारा शामू—त्या तीन तांबडया अगडबंब बशी आणि त्यांना सामना देणारी माझी छोटी गाडी ! सारें दृश्य इतकें विसंगतिपूर्ण म्हणून विनोदी होतें पण त्यावेळेला कुणाला सुचतो आहे विनोद ! नेणत्या मनानेंच तो टिपून घेतला आणि जाणत्या मनानें रागाचा आव आणून शामूला गाडी बाजूला घेण्याचा हुकूम सोडून बशींना पुढें जाण्यास मार्ग मोकळा करून दिला. जातां जातां बशींचे ड्रायव्हर, 'आतां कुठें गेला तुझा कायदा ?' असें म्हणत शामूला हिणवत पुढें गेले आणि शामूनें बिनशब्दांत, "नोकर आहे मी ! धन्याच्या सत्तेपुढें माझं शहाणपण थोडेंच चालणार ?" अशा अर्थाचा जबाब दिला. मी शामूला म्हटलें, "उगाच कशाला रे असं हट्टून बसावं ? त्यांनीं गाडीवर बस घातली असती म्हणजे ?" त्यावर त्याचें उत्तर तयारच होतें, 'काय बिशाद होती त्यांची ? रस्त्यावरची पब्लिक जिवंत ठेवती काय त्यांना ? आणि मी आपल्या साइडीला होतो. तशांत तुम्हीं दवाच्या दुकानमंदीतर गेलां होतां. किती वखत लागणार तुम्हांला ? कापडच्या नाहींतर पुस्तकच्या दुकानमंदीं गेलां असता तर मी नसती गाडी बाजूला घेतली ? बाई बस, मोठी असली तरी ह्या लोकाला भिऊन चालत नाहीं ! त्यांनीं दम दिला तर मी काय कमी आहें ?' त्याला आपल्या

किरकोळपणाची जाणीवच नव्हती. आवाज मोठा, धीर जबर, यावर तो आपल्याला बलवान समजत असे.

पण हा कायदा जाणणारा शामू अनेक वेळां रस्त्यावर आमचा पुढें जाण्याचा हक्क असतांही, डाव्या हातच्या गाडीला पुढें जाऊं देई. माझें पुस्तकी ज्ञान वापरून मीं म्हटलें कीं, 'अरे ती गाडी कां पुढें जाऊं दिलीस? नियम माहीत नाहीं तुला?' कीं तोच मला ऐकवी, 'नियम बेश माहीत आहे. पण गाडी चालवणार ओणर आहे. आमच्यासारखा नियमांची कदर राखणारा ड्रायव्हर नाहीं. ओणर लोक नियम पाळीत नाहींत कधीं आणि ते मोठे लोक, तेव्हां कायदाही त्यांच्या बाजूला आहे. आपणच संभाळून घेतलं पाहिजे.'

बोलण्यांतून बोलणें वाढवण्याची शामूला मोठी खोड! खुणेसाठीं म्हणून अमुक एका सिनेमाजवळ गाडी घ्यायला त्याला सांगितलें कीं त्याचें चऱ्हाट सुरू होई, 'बाई, मला काय ठाऊक तो सिनेमा कुठें आहे तो! मी कधीं सिनेमा पहात नाहीं. काय मिळायचं आहे सिनेमा पाहून? कशाला खर्च करायचा वांया?' मला कामाच्या वेळीं असा संताप येई त्या चऱ्हाटाचा, पण आपण दुसरी खूण सांगेपर्यंत तो आपलें चालूच ठवी. एक दिवस गाडींत बसल्यावर मला भास झाला शामू कांहीं बोलला. तेव्हां मी साहजिकच विचारलें, "'काय म्हटलंस रे?" ह्या सरळ प्रश्नाला उत्तर काय यावें तर आणिक एक प्रवचन— "बाई, मी कशाला काय म्हणेन? माझी काय आपल्यापुढें बोलायची योग्यता? धनी माणसाला काय बोलूं नये हें समजत नाहीं मला?" माझा प्रश्न राहिला कुठच्या कुठेंच!

शामूची खऱ्या-खोट्याची कल्पना थेट रामभाऊच्या कल्पनेप्रमाणें. वस्तुस्थिति जशीच्या तशी कधींच सांगणार नाहीं. मुख्य मुद्दाच गाळून टाकावयाचा! पण कोणत्याही नोकरांत दिसणार नाहीं—ड्रायव्हरांत तर केव्हांच नाहीं—असा एक त्याचा गुण म्हणजे सदोदितची त्याची अल्प-

संतुष्ट वृत्ति. पगार हातीं पडला कीं मनापासून आनंद होई आणि नोटांची चळत भीमाबाईपुढें अभिमानानें फडकवून दाखवी. पगार वाढावेण्याबद्दल कधीं कटकट नाहीं. जें कांहीं मिळेल त्यांत आनंद मानी! रोज पावशेर तर दूध घेई, पण तें कुठवर पोंचे त्याला? 'आज चायमंदी दूध टाकला, थोडा काळूला दिला, थोडा रात्रींला प्यायला ठेवला आणि बाकीच्या दुधाची लस्सी बनविली,' असें खुशींत येऊन सांगे! त्याच्या वृत्तीमुळें पावशेर दूध म्हणजे द्रौपदीच्या थाळीसारखें होतें! तसाच त्याचा पगारही त्याला दूरवर पुरे. गांवीं वडलांना पाठवी, कपडे करी, आपला नित्याचा खर्च भागवी आणि रुपाया दोन रुपये शिलकींत टाकी.

शामूला गाडीची माया मोठी! मोतद्दाराला घोड्याविषयीं माया लागते तें साहजिकच आहे, पण गाडीसारख्या निर्जीव वस्तूवर एवढा लोभ जडूं शकतो हें शामूच्या बाबतींतच पहायला मिळालें. गाडीची निगा मोठ्या आपुलकीनें आणि प्रेमानें तो राखीत असे. आज इथें ओरखडा निघाला, आज इथें खडा बोंचला असें रोज कांहीं ना कांहीं नवे दुखणें काढून तो गाडीचें कौतुक करीत बसे आणि मोठ्या मायेनें तिची धू-पूस अशी अखंड सेवा करी. गाडी साफ झाली आणि काळा रंग तकाकूं लागला कीं एकदां मन मानेल तशी डोळाभर पाहून घेऊन, तो हळूच चाकाच्या पांढऱ्या पट्ट्यावर चिखल फांसून ठेवी. कुणाची गाडीला दृष्ट लागूं नये म्हणून ही खबरदारी! शिवाय गाडींत रोज गाडीला वाहिलेलें एखादें फूल नाहींतर गाडीवर ओवाळून टाकलेला लिंबाचा तुकडा पुढच्या कोपऱ्यांत असे!

शामू ब्रह्मचारीच होता. अधूनमधून त्याचे हितचिंतक त्याला लग्न करण्याचा उपदेश करीत. अनेक वेळां एका कानानें ऐकलें आणि दुसऱ्या कानानें सोडलें असें केल्यावर एकदां गाडीकडे बोट करून त्यानें रोखठोक जबाब दिला, "लग्न लागलंय हिच्याशीं! एकीशीं लग्न झाल्यावर दुसरें

लग्न करायचें नाहीं असा कायदा आहे बंबई सरकारचा ! मग कसा लग्न करणार मी ?''

पण शामू आपल्या प्रेयसीला सोडून रजेवर म्हणून गांवीं गेला तो परत आलाच नाहीं. आतां माझी गाडी परित्यक्ता म्हणून जीवन कंठीत आहे !

(—सुगंध–दिवाळी १९५७)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 23563 दि:
क्रमांक नों: दि:

## ६ : : : पुण्याचा तांगेवाला

करमणुकीच्या दृष्टीनें भाडोत्री वाहनांमध्यें तांग्यासारखं वाहन नाहीं; आणि पुण्याच्या तांगेवाल्यासारखा त्याचा सूत्रधार नाहीं. टॅक्सी ( भाडोत्री मोटारगाडी ) किंवा व्हिक्टोरिया ( भाडोत्री बग्गी ) ह्यांतून हिंडणाऱ्यांस तांग्यांतल्या प्रवासाच्या गमतीची कल्पना यायची नाहीं. मोटारींतल्या किंवा बग्गींतल्या प्रवासांत माणुसकीचा जिव्हाळा नाहीं. बग्गी हाकणारा गाडीवाला आपल्या उच्च स्थानीं विराजमान, उतारू आंत गाडींत, बोलाचाली कांहीं झाली तरच दोघं एकमेकांशीं बोलणार ! एरवीं एकदां भाव ठरवला कीं मुक्कामास पोंचेपर्यंत दोघांत कांहींच संबंध नाहीं. पोचल्यावर पैसे हातांत ठेवले कीं झालं काम. टॅक्सीवाला काय ? यंत्रयुगांतला पुरुष तो ! यंत्राचा मालक, त्यामुळं स्वतःहि निम्माशिम्मा यंत्रच बनलेला. त्याचे सर्व व्यवहार यंत्रासारखे. सुरवातीपासूनच मोजकं, जेवढ्यास तेवढं बोलणार; म्हणजे गिऱ्हाईकानं अधिक कांहीं बोलण्याच्या भानगडींतच पडूं नये ! पोंचल्यावर मीटरकडे नजर टाकून, दीडपट भाव आकारतांना दोनचार आणे चढवून आपले पैसे तो घेणार. मीटर खटकला कीं चालला पुढं.

तांग्याची गोष्टच वेगळी ! गिऱ्हाईक, तांगेवाला अन् तांग्याचं घोडं सगळे एकाच पातळींतले–हाताहाताच्या अंतरावरले. त्यामुळं गिऱ्हाइकांतली माणुसकी जागृत असली, तांगेवाल्यांतली दबलेली नसली, आणि घोड्यांत माणसांच्या सहवासानं ती तयार झालेली असली, तर तिघांत गप्पासप्पा ह्या व्हायच्याच. तशांत तांग्याचा प्रवास आस्ते कदम, यदृच्छेनं होणारा. घोडा. तांगेवाला, गिऱ्हाईक कुणालाच विशेष डोकं वापरावं लागत नाहीं, तिघंहि गप्पा मारायला मोकळे ! गिऱ्हाइकानं एखादा प्रश्न विचारला ( तांगेवाला वाटच पाहात असतो प्रश्नाची ) कीं तांगेवाल्यानं उत्तर देऊन आणिक एक प्रश्न विचारावयाचा असं वाढतच राहातं. मधेंच, बोलायला विषय नाहीं असं झालं का तांगेवाला घोड्यास उद्देशून कांहीं तरी बोलतो. " आज मस्ती आली व्हय ? " किंवा " असं बिचकाया झालं काय ? सेंटल हपीस आजच पाह्यलं काय ? " किंवा " आज घरीं जायची घाई झाली व्हय ? कालच्यावाणी रोज लवकर नाहीं घरीं जायला मिळायचं !" मग आयतंच गिऱ्हाईक विचारतं, " काल लवकर कां सोडला तांगा ? " असा विषयातनं विषय निघून बोलणं सारखं चालूच राहातं. हल्लींच्या परिस्थितीवर किंवा चालू घडामोडींवर गोष्टी होतात, विचारांची अदलाबदल होते–असा माणुसकीचा जिव्हाळा तांग्याच्या प्रवासांत आहे. त्यांतल्या त्यांत पुण्याचा तांगेवाला म्हणजे आपलं स्वतन्त्र व्यक्तित्व कायम राखणारा मनुष्य ! तो कोणत्याहि साच्यांत बसणार नाहीं. पेहेराव, बोलणं-चालणं, तांग्याला अथवा घोड्याला शृंगारणं, कुठं ना कुठं आपल्या व्यक्तित्वाची चुणूक दाखवीलच. तुम्ही कितीहि नियम करा, त्या सर्वांतून त्याचं व्यक्तित्व वर डोकं काढीलच.

नोकरीनिमित्त पुण्यास आल्यावर, सुरवातीलाच एका तांगेवाल्यानं चांगली सूचना देऊन ठेवली. बोलतांबोलतां तो म्हणाला, " बाई, लई वंगाळ हा धंदा तांग्याचा ! "

मीं विचारलं, " तो कसा बाबा ? "

" तर काय ? " तो उत्तरला, " काय मान हाये ह्या धंद्यांत ! जो उठतो तो म्हणतो, ' अरे ए तांगेवाला, ' जणू काय तांगेवाला नोकरच ह्या लेकांचा ! "

तेव्हांपासून मीं तांगेवाल्यास ' अहो '-' जाहो ' म्हणण्यास सुरवात केली. कांहीं तांगेवाले हें मानार्थी संबोधन ऐकलं, कीं विचकून संशयित मुद्रेनं मजकडे पाहात, पण मीं तेंच चालू ठेवलं कीं तें साहजिकच आहे असं वाटून बरोबरीचं नातं प्रस्थापित होऊन आपलेपणा वृद्धिंगत होई.

एक दिवस एक तांगा आला. त्यांतला तांगेवाला बाजूस बसलेला आणि एक दहाबारा वर्षांचं पोरगं तांगा हाकीत होतं. मीं म्हटलं, " का हो, आज मुलगा कां तांगा हाकतोय ? शाळेंत नाहीं का जात तो ? "

मुलानंच चटकन् उत्तर दिलं, " जातों की शाळंत. पण आज सुट्टी हाये शाळंला ! "

त्या वारीं कसलीच सुट्टी असण्याचा संभव नव्हता. हिंदूंच्या अनेक सणांपैकींहि कांहीं नव्हतं आणि दुसऱ्या सर्व धर्मांच्या सणांतूनहि हा दिवस सहीसलामत सुटला होता. म्हणून मीं म्हटलं, " आज कसली सुट्टी शाळेला ? "

पोरगं जरा गडबडलं, पण तितक्यांत हजरजबाबीपणा दाखवून धिटाईनं उत्तरलं, " आज पंढरीची वारी निघायची म्हणून सुटी हाये शाळंला. " त्यावर मीं हटकलं त्याला. मग तांगेवालाहि मनांत उमगला आणि पोराला म्हणाला, " आज बरी भेटली बाई शाळंतलींच तुला ! आमाला बनवतो नाय् का रे ?" आणि मग मजजवळ त्यानें खुलासा केला, " बाई, हें माझ्या बहिणीचं प्वार ! बाप गमावला त्याचा, तवापासनं माझी बहीण काम करून शाळंत धाडते याला आणि हें प्वार बघा ! असं भटकाया होयं दिवसभर. आज ह्येची सुट्टी अन् उंद्या त्येची, असं

बळंच खोटं सांगून ह्येतो घरीं. आतां आमाला काय कळायचं त्यामंदलं ? ”

अनेक तांगे, घोडे, तांगेवाले ह्यांचे बरेवाईट अनुभव मिळाल्यावर दिनकररावाची गांठ पडली. म्हातारा, त्याचा घोडा, तांग्याचं बारदान सारंच मनांत भरलं, अन् रोज नवा तांगा न पाहतां महिन्यावरच तांगा लावावा असं ठरवलं. वर्षभर दिनकररावाच्या तीन तांग्यावरच कारभार चालवला. मोठा रुबाबदार म्हातारा. अंगलट लहानच. पण चांगलं कसलेलं शरीर, गोल भरीव चेहरा व त्यावर समाधानाचं हास्य आणि आत्मविश्वासाचं तेज आणि त्याला पुष्टी देणारा मिशांचा आकडा ! डोकीवर ऐटींत, पण म्हातारपणाला शोभेल अशा पद्धतीनं बांधलेला गुलाबी नाहींतर बदामी पटका. आवाजांतला दरारा, आदबी आणि अभिमान ह्यांतलं अगदीं युक्त असं मिश्रण साधणारी बोलण्याची पद्धत, गिऱ्हाइकावर छाप पाडण्यासाठीं ऐटींत हिंदुस्थानींत बोलणं, ह्या सर्व वैशिष्ट्यांमुळं इतर तांगेवाल्यांत उठून दिसे स्वारी.

लोकांना मोठेपण देऊन आपला रुबाब पटवण्याची त्याची शैलीहि मोठी खुबीदार. तुमच्याशीं बोलतांना वाक्यागणिक अत्यंत आदबीच्या सुरांत “ बाईसाहेब ” म्हणेल, आणि त्याचबरोबर स्वतःचा उल्लेख ‘ दिनकरराव ’ म्हणून पन्नास वेळां करील ! “ बाईसाहेब, आज तुमच्या वर्दीच्या वेळीं एक गिऱ्हाईक आलं आणि म्हणूं लागलं, ‘ दिनकरराव, चलतां का भाडं घेऊन लक्ष्मी रोडला ? ’ मीं म्हटलं, ‘ दिनकरराव कसा येईल बुवा ? वर्दी आहे ना सेंटल हपिसांतल्या बाईसाहेबांची ! ’ ” बोलायची नेहमींची पद्धत ही. कुणी कांहीं म्हटलेलं असेल तें त्याच्याच शब्दांत, त्याच्याच स्वरांत, त्याच्याच पद्धतीनं सांगायचं—मग हिंदुस्तानींतलं वाक्य असो वा इंग्रजींतलं वाक्य असो, तें जसंच्या तसंच फिरून सांगायचं ! त्याचं भाषण लिहून काढायचं म्हणजे अवतरणचिन्हाच्या दोन जोड्या तरी लागायच्याच.

दिनकररावाचा मामला मोठा! पांच घोडे, तीन टांगे, दोन नोकर–शिवाय स्वतः आणि मुलगा त्याच धंद्यांत. घोडे एकाहून एक तयार आणि त्यांचीं नांवं मराठेशाहीच्या पराक्रमाची ग्वाही देणारीं! तपकिरी रंगाचा, उंच, भरधांव चालीचा, फुरफुरणारा घोडा तो 'मराठा किंग', काळा, चकचकीत, पुष्ट, मस्त चालणारा घोडा तो 'शिवाजी.' पांढऱ्या ठिपक्यांचा तपकिरी, छोटासा पण अत्यंत उमदा घोडा तो 'तानाजी.' दुसरा काळा घोडा तो 'संभाजी.' सारी मराठेशाही प्रतीकरूपानं घोड्यांच्या डौलदारपणांत, त्यांच्या नांवांत आणि त्यांच्या मालकाला वाटणाऱ्या त्यांच्याबद्दलच्या अभिमानांत सामावली आहे! पांचव्या घोड्याचं कांहीं नांव कानावर आलं नाहीं, म्हणून मीं चौकशी केली, तेव्हा उत्तर आलं, "काय मनाजोगतं नाहीं घोडं बाईसाहेब हें. नांवाला शोभेल असं घोडं हवं ना? उगाच नांव मोठं देऊन करायचं काय? नोकर हाकतो घोडं हें. चालतं आपलं बिननांवानंच!"

दिनकररावाला केव्हांकेव्हां स्वतःचं, टांग्याच्या धंद्याचं, गतवैभव आठवतं आणि मग त्याच आठवणींत तो तल्लीन होतो. "बाईसाहेब, मोठं वारदान होतं आमच्या आजोबांचं. रिसाल्यांत त्यांची नोकरी. त्यांना घोड्याची पारख लई चांगली. हाडकुळंच घोडं विकत घ्यायचं, पण त्याची सेवाचाकरी करून वर्ष-सहा महिन्यांत असा फक्कड घोडा तयार करायचा! फौजेंतले साहेब अशी खूष आमच्या आजोबांवर! त्या वेळीं आमचीं दोन-चार दुकानं होतीं, जमीन-जुमला होता. पण आमचीं लोकं वाईट पघा. पांहावलं नाहीं आमचं मोठंपण त्यांच्यानं! कुणीं मूठ मारली, जादूटोणा केला अन् माझे पाय गेले. मग कमी केलं एकेक. आतां हाये हा एवढा मामला. हीं पांच घोडीं अन् तीन टांगे. शिवाय एक चाळ विकत घेतलीय् आवंदा. दोनचार म्हशी हायती, एक कडब्याचं दुकान हाये. आमचं माणूसबळ कमी झालं बघा ह्या तंट्याबखेड्यांपायीं अन्

हेव्यादाव्यापायीं ! आतां दुकान बायामाणसं चालवतात; पण बायामाणसांच्या हातून कुठवर काम होणार, बाईसाहेब ? ”

ह्या शेवटल्या वाक्यानं स्त्रीवर्गाचा आणि पर्यायानं माझा अपमान करण्याचा मुळीच हेतु नसतो. त्याच्या मतें ‘ बाईसाहेबां’ची गणना ‘बाप्या माणसांत’च होत असते.

कधीं पूर्वीच्या आपल्या पराक्रमाची दिनकररावाला आठवण येते. “ तवा इतक्या मोटारी नव्हत्या बरं का, बाईसाहेब ! तो २६ नंबरावरचा कर्नेलसाहेब आला एक दिवस आणि म्हणाला, ‘ क्या दिनकरराव, तांगा लेकर चलता है लोनीको ? जरुरी काम है; जलदी, घंटेमें पहुँचना चाहिये !’ मी म्हणालों, ‘ काय कु नहि साब ! ’ मग घोडा जुंपला अन् काढला



तांगा ! असा जोशांत नेलाय् तांगा ! वाऱ्यावाणी पळालं घोडं; पण कसं हवेंतल्या हवेंत, धक्का नाहीं पोचला साहेबाला. एका तासाच्या आंत साहेबाला लोणीला सोडला ! लई खूष झाला. म्हणाला, ‘ व्हेरि गुड् दिनकरराव, शाब्बाश दिनकरराव ! ”

ह्या आठवणी सारख्या चालूच असतात.

“ एकदां काय झालं बाईसाहेब, पाषाणाला जमले सात-आठ तांगे आणि म्हणाले रेस लावूं या आतां. माझ्या तांग्याची घोडी होती लहान.

सगळे तांगेवाले म्हणूं लागले, 'हा कसली रेस लावतोय, घोडी तर बघा त्याची!' हसलों मी, पण असा जोस चढलाय् मला! शब्द एक नाहीं बोललों कीं दोन नाहीं. कधीं नाहीं तो घोडीला चाबूक लावला. ती पण समजली मनांत, कीं आज परसंग काई येगळाच हाये! अन् आगीन-गाडीच्या विंजनाप्रमाणं निघाली जोरांत. रेस तर जितली. सगळे तांगेवाले चकित झाले! घरीं वडलांना सांगाया गेलों तर त्यांनीं कपाळालाच हात लावला! म्हणाले, 'अरं तुला कोणीं सांगितला हा उपद्व्याप? मीं आपले पैसे लावले होते मान्याच्या घोड्यावर. कां नाहीं येऊं दिला त्याला पहिल्या नंबरावर?' काय नशिब पघा, बाईसाहेब! पण मंग पाठल्या दारानं वडील तबेल्यांत गेले अन् घोडीची पाठ थोपटूं लागले कौतुकानं—मलाच मिळाली ती शाबासकी!"

अजूनहि तांग्याच्या घोड्याच्या ज्या दोन शर्यती वर्षांत होतात त्यांत दिनकरराव आपले घोडे उतरवितो. त्या दिवसांत गिऱ्हाइकांशीं त्याच गोष्टी सुरू असतात. कोणत्या घोड्याला 'विन्' मिळालं, कोणता 'प्लेस' कसा झाला, 'इष्टेक मनी' किती किती मिळाला ह्याची इत्थंभूत माहिती मिळते

दिनकररावाच्या सर्व घोड्यांत तानाजी माझ्या आवडीचा. दिसायला लहान असला, तरी मोठा उमदा घोडा. मीं विचारलं, "ह्याला कां नाहीं उतरवीत शर्यतींत? चांगली दौड आहे त्याची." दिनकररावानं दिनकररावी छापाचं आपलं मनप्रसन्न हास्य केलं आणि स्पष्टीकरण केलं, "त्याचं असं आहे बाईसाहेब, आमचे घोडे आतां सर्वांना माहीत झालेत. आमचा घोडा उतरविला कीं सगळेजण आमच्याच घोड्यावर पैसे लावतात. त्यामुळं घोडा रेस जितला, तरी आमच्या वांट्याला इष्टेक मनी विशेष कांहींच नाहीं येत. आतां ह्या तानाजीला उतरविला दोनदां; पण स्वाराला सांगितलं, ह्या दोन बाऱ्या दमानंच घे.

कुणाच्या मनांत नाहीं भरला घोडा. कुणी नाहीं पैसे लावीत त्यावर. आतां पुढच्या रेसला फक्कड स्वार पाहून घ्यायचा. मग कसा जितीत नाहीं रेस मी पघतों. मग अगुदर लावून ठेवलेले पैसे आपल्यालाच मिळायचे सर्व!"

गेल्या वर्षांत तांग्याच्या घोड्याच्या शर्यतीचं तंत्र बरंच आकलन झालं आहे मला. घोडं विकत घेतांनाच रेसची दृष्टी कशी ठेवायची, मग घोड्याला खुराक कोणता द्यायचा, रेसच्या अगोदर महिनाभर घरींच कसं बसवायचं, त्यांत नफा किती, नुकसान किती, स्वार कसा हुडकून काढायचा, त्याला तयार कसा करायचा, सगळं माहीत झालं आहे मला. पण त्या धंद्याचं गुपित तें. तेव्हा तें बाहेर फोडणं इष्ट नाहीं, म्हणून अधिक खोलांत शिरत नाहीं.

शर्यतीच्या दिवसांत आणि तांगे पास करण्याच्या दिवसांत दिनकर-रावाला चुरशीची, सर्वांवर मात करण्याची खुमखुमी असते. आधींच दोनचार महिने तांग्यांची दुरुस्ती करून टाकतो. कारण, नाहींतर पुढं भाव वाढतात. ( दिनकररावाच्या सगळ्या कारभारांत योजकता—व्यवस्थे-शीर प्लॅनिंग—मोठ्या प्रमाणांत असते. ) "तानाजीला प्रथम पासाला नेला तवा काय झालं बाईसाहेब, साहेबानं नाक मुरडलं आणि आपापसांत कुजबुजूं लागले दोघेजण, 'नो गुद् पोनी' म्हणून. मला काय कळतं त्यांतलं! पण आमच्या रामभाऊला थोडं इंग्रजी शिकवून ठेवलंय. त्याला कळलं तें आणि त्यानं डोळ्यानं खूण केली. मग असा पळिवला तानाजीला, पण चाबूक नाहीं लावला! चकित झाला साहेब! 'नो गुद् पोनी' म्हणतो काय लेकाचा!"

दिनकररावाच्या ह्या चुरशीच्या—झगडण्याच्या वृत्तीमुळं पूर्वीचं वैभव गेलेलं असलं, तरी त्याचा आशावाद कायम आहे. लोक आपल्या वाइटा-वर आहेत, जादूटोणा करण्यास टपलेले आहेत असं निमखास त्याला वाटत असलं, तरी त्याचा धीर खचत नाहीं. उलट अधिकच दुणावतो तो.

" आमचं बरं पाहवत नाहीं काय? थांबा लेकांनों, ह्या सर्वांतून डोकं वर काढीन तर नांवाचा दिनकरराव!" असं जणूं आव्हान देत असतो तो आपल्या खऱ्या व काल्पनिक शत्रूंना व परिस्थितीला!

" ह्या बशीमुळं टांग्यांचा धंदा बसत चालला म्हणतात लोक!" असं आपण म्हटलं कीं तोंडभर हसून, " असं बाईसाहेब?" ह्या दोनच शब्दांत तो आपला विरोध व्यक्त करतो.

मग कांहीं वेळानं तो पुस्ती जोडतो, " आम्ही वर्द्यांच करतों, बाईसाहेब, आमच्या धंद्याला खोट नाहीं यायची कधीं. सकाळीं तो अरब सांगून जातो, ' रेसकोर्सवर जानेका है. अबीका अबी मराठा-किंग लेकर रामभाऊको भेज दो!' मग त्या मडमीची वर्दी येते. ती म्हणते, 'तानाजीको लेकर तुम आना. मराठा-किंग की डर लगती है.' अकराची तुमची वर्दी. मग वाडिया कॉलेजमधल्या त्या मुलीची वर्दी. पण मुलगी भारी चंचल. दोन दिवस लागोपाठ गेली, तर तीन दिवस खाडे करील!...येईनात बशी. आम्हाला कांहीं नाहीं त्याचं."

त्याच्या ह्या वृत्तीमुळं तो आपल्या मुलांवर बेहद्द खूष. नाहींतर हल्लींच्या युगांत बाप तरुण मुलाविषयीं हरतऱ्हेचा असंतोष दाखवील, दोन पिढ्यांतलं अंतर तें, पण दिनकरराव आपल्या मुलाची स्तुतीच करील.

" रामभाऊ लाखांतला माणूस पघा. विडी काडी कांहीं व्यसन नाहीं. रात्रीं भाडं करून आला की एक फोनो तेवढा लावील. घर, धंदा, दुकान सर्वांकडं लक्ष कसं पण कधीं कुचराई व्हायची नाहीं कुठं!"

दिनकररावाची आनंद मानण्याची वृत्ति आमच्या पाटील टांगेवाल्यांतहि आहे. पण दिनकररावाचा संतोष परिस्थितीला कदापि हार नाहीं जाणार, लोकांच्या वैमनस्याला नाहीं जुमानणार ह्या युयुत्सु वृत्तींतून, तर पाटलाचा संतोष आहे त्या परिस्थितींत समाधान मानून घेण्याच्या अल्पसंतुष्ट वृत्तींतून निर्माण झालेला. पुण्यांतल्या माझ्या वास्तव्यांत पहिल्या

वर्षी दिनकररावानं वर्दी केली आणि दुसऱ्या वर्षी घर बदलल्यावर पाटलानं. त्यामुळं दोन स्वभावाचे नमुने पाहायला मिळाले.

पाटलाची महागाईबद्दल, धंद्याबद्दल, कधीं कांहीं कुरकुर नाहीं. थोडीशी शेतीवाडी, घर, टांगा एक घोडी ह्यांतच आनंद मानण्याची तयारी. शर्यती रेस ह्या भानगडींत तो कधीं पडणार नाहीं. म्हणतो, "काय करायचंय् रेस जितून नि हरून? इनाकारण—(पाटलांचं मराठी पांचवीपर्यंतचं शिक्षण झालेलं असल्यानं तो मधूनमधून असे शब्द वापरतो)—घोडीवर ताण!" त्याची एकच घोडी आहे, पण तिच्यावर अतोनात प्रेम. तिला भार पडूं नये म्हणून टांग्याचीं चाकं खासगी टांग्यासारखीं हलकीं, तारांचीं केलीं आहेत. "किंमत जास्त पडली जरा म्हणून काय? जानवराला सुख किती बाई!"

दिखाऊपणाची आवड मुळींच नाहीं. उन्हाळ्यांत घोडीचे केस मानेलगत कापणार. "ह्या दिवसांत केसांनीं उन्हाचा त्रास वाढतो, बाई. घोडीच्या जिवापक्षीं शोभा कसली करायची?" घोडीचं खाणंपिणं व्यवस्थित. रोज बाहेर पडतांना कडबा आणि लसूणघास असायचंच बरोबर. "लसूणघास म्हणजे चहासारखं आहे, बाई, त्यानं भूक नाहीं भागायची, पण एकदा तलफ आली कीं हवंच तें जानवराला. माणसाप्रमाणंच हाये त्यांचं पण."

घोडीला चाबूक नाहींच लावणार कधीं, गिऱ्हाइकाला फार घाई दिसली तरच घोडीला पळवणार. एरवीं तिला आरामांत, तिच्याच कलानं चालू देणार. उगीच श्रम कशाला तिला? दिवसभर हिंडायचंच असतं ना तिला? घोडीला एखादं दिवस भाड्याच्या लोभानं अधिक राबवली, एका दिवसांत भाड्याचे बारातेरा रुपये मिळवले कीं दुसऱ्या दिवशीं हटकून पश्चात्ताप व्हायचा. मग त्या दिवशीं तिच्याकडून अर्ध्या दिवसाचंच

काम घ्यायचं आणि वर्दीच्या गिऱ्हाइकाला आपल्यासारख्या धंद्यांत कमाईचा मोह फार वाईट, ह्यावर आपले विचार ऐकवायचे !

पाटील शिस्तीचा भोक्ता. घोरपडींत भुरट्या चोऱ्या अन् मारामाऱ्या होऊं लागल्या. व्यापारी लोक चोरीचा माल विकत घेतात त्यामुळं चोरट्यांचं फावतं हें पाटलाच्या ध्यानांत आलं. देवळांत एक सभा भरवली, पाटलानं भाषण केलं, व्यापाऱ्यांची चूक त्यांना पटवून दिली, आणा-भाका झाल्या, व्यापाऱ्यांनीं शपथ वाहिली कीं, चोरीचा संशयित माल घेणार नाहीं म्हणून. आणि अशा सनदशीर मार्गानं त्यानं चोऱ्या बंद केल्या. मला रोज ऑफिसांत जातांना ह्या प्रकरणाची इत्थंभूत माहिती मिळत असे. आदल्या रात्रीं केलेलं भाषण सारांशरूपानं ऐकायलाहि मिळत असे. वास्तविक माझ्या घराहून ऑफिस मैल, सव्वा मैल दूर. पोचण्यास फार तर दहाबारा मिनिटं लागावीं. पण असं कांहीं प्रकरण सुरू असलं कीं बाराचीं पंधरा-सतरा मिनिटं आपोआप होत. "बाई, रोजची वर्दी धरायची म्हटलं; तर गिऱ्हाईक बोलकं हवं. चार शब्द बोललं, वास्तपूस केली कीं बरं असतं."

एक दिवस वेदान्त ऐकवणारा एक टांगेवाला भेटला ! कांहीं प्रश्न विचारला तरी उत्तर गीतेंतल्या श्लोकांत नाहींतर एखाद्या संतवचनांत यायचं ! दाढी-टोपी ह्यावरून दिसत होता मुसलमान. मी जरा बुचकळ्यांत पडलें; पण मग त्यानंच आपली जीवनकथा सांगितली. तो राहणार सोलापूरचा. मुसलमान कोष्टी वर्गांतला. तरुणपणींच एकदां कामानिमित्त पुण्यास आला असतांना एका बुवांचं भजन-कीर्तन अवचित ऐकलं आणि तेव्हांपासून त्या बुवाला आपला गुरु मानूं लागला.

"ब्राह्मण होता आमचा गुरु. असा पुरुष कधीं झाला नाहीं आणि पुन्हा कधीं होणार नाहीं. सर्व धर्मांच्या पलीकडे होता तो. कुणीहि त्याला गुरु मानावं अशी त्याची योग्यता—हिंदु काय, ईसाई काय, मुसलमान काय !"

त्याच्या वेदान्तामधून मधेंच ऐहिक गोष्टींविषयींचं त्याचं कुतूहल डोकं वर काढी. रंगांत येऊन दोन-तीन कॉलेज-कन्यकांच्या प्रणय-कथा त्यानं मला ऐकवल्या. मीं आश्चर्यचकित होऊन विचारलं, "हें सगळं तुम्हाला हो कसं कळलं ?"

तेव्हां हसून म्हणाला, "तुमच्यासारख्या दोघी कुणी बसल्या तांग्यांत कीं होतात गप्पा अन् मग कळतं एकेक. अशा बाया तांग्यांत बसल्या कीं आपल्याच भानांत असतात. विसरून जातात, तांगेवाला आपलं बोलणं ऐकतो आहे तें. आम्ही मान मागं वळवीत नाहीं; पण कानाचं काम चालूंच असतं !" माझी नोकरी–शिक्षण–पगार ह्या सर्वांची चौकशी झाली. मग मुलाबाळांचा प्रश्न निघाला. मी अविवाहित असल्याचं त्याला सांगितलं. तेव्हां एकदम नाटकी धर्तीनं त्यानं चाबूक बाजूला ठेवला, घोडं आवरून धरलं आणि गहिवरून म्हातारा उद्गारला, "बाई, संसाराच्या मोहांत पडला नाहींत, मिळवलीत तुम्ही !"

अशी गंमत आहे तांग्याच्या रपेटीची ! पुण्यांत कुठं जायचं असलं, वेळ भरपूर असला अन् करमणूक हवी असली तर टॅक्सी, रिक्षा ह्या भानगडींत न पडतां जगाचा व आपल्या धंद्याचा भरपूर अनुभव घेतलेला असा म्हातारा तांगेवाला पाहून त्या तांग्यांत बसावं अशी माझी सूचना आहे.

(–स्त्री–जानेवारी १९५२)

## ७ : : : सगुणेचं निवेदन

वडलांनीं मला बी. ए. पर्यंत शिकवलं तें केवळ हौसेखातर! आमच्या घराण्यांतील कुणाहि मुलीची मजल मॅट्रिकपर्यंतसुद्धां पोंचलेली नव्हती. पण वडलांची फार इच्छा, कीं आपल्या तीन मुलींपैकीं एकीनं तरी चांगलं शिकावं. मी तिघी बहिणींत सर्वांत लहान, तेव्हां मलाच ही संधि मिळाली. वडलांचा आवडता विषय संस्कृत, तोच त्यांनीं मला घ्यायला लावला आणि आपल्या वकिलीच्या कामांतून सवड काढून मोठ्या उत्साहानं माझी तयारी स्वतः करवून घेतली. पण इतकं शिकवलं तरी मीं नोकरी करावी ही कल्पना आमच्या कुणाच्याहि मनाला शिवलीसुद्धा नाहीं. माझं शिक्षण हा एक हौशीचा भाग होता. आमच्या कुटुंबांतील इतर मुलींचं, लग्न आणि संसार, हें जें ध्येय तेंच माझंपण ध्येय होतं आणि इंग्रजी मुळींच न शिकलेल्या पण उत्तम गृहिणी असलेल्या माझ्या आईच्या जीवनाचा आदर्श माझ्यापुढं होता.

बी. ए. ची परीक्षा झाली आणि निकाल लागायच्या आंतच माझं लग्न झालं. मला विचारलं इतकंच, पण सगळं ठरवलं आईवडलांनींच. मीहि त्यांच्या शब्दांच्या बाहेर नव्हतें. माझे पति सुविद्य आणि नांवाजलेल्या

सुधारकी घराण्यांतले. 'कर्ते सुधारक' म्हणून ह्या घराण्याची प्रसिद्धि होती. ह्या घराण्यांतील पुरुषांनी समाज-सुधारावर नुसतीं व्याख्यानं झोडलीं नाहींत, तर आपल्या नित्याच्या जीवनांत हरेक बाबतींत प्रत्यक्ष सुधारणा करून दाखविली. जातिभेद त्याज्य मानून त्यावर केवळ प्रवचन केलीं नाहींत, तर सर्व जातींच्या लोकांना आपल्या घरीं बोलावून, त्यांच्याशीं खरंखुरं मित्रत्वाचं नातं जोडून, जातिभेद प्रत्यक्ष जीवनांत विसरून दाखविला.

मुख्य म्हणजे, स्त्री-शिक्षणाची व स्त्री-स्वातंत्र्याची कळकळ अनेक मार्गांनीं कृतीनं दाखविली. लोकांचा कसून विरोध असतांहि मुलींच्या शाळा काढल्या आणि आपल्या लेकीसुनांना प्रथम त्यांत दाखल करून घेतलं. स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार निव्वळ व्यासपीठावरून केला नाहीं, तर आपल्या घरांतील मुलींबाळींना शिकवून, त्यांना नोकरीचा व स्वावलंबनाचा मार्ग दाखवून देऊन केला. ह्या घराण्यांतील मुली एका नोकरीच्याच बाबतींत नव्हे तर आचार-विचार सर्वच दृष्टींनीं स्वतंत्र होत्या. स्वतःच्या मतानं चालण्याची त्यांच्यांत ताकद होती आणि वडीलधाऱ्या माणसांनीं तशी मुभाहि त्यांना दिली होती. घरांतील मुलींना सर्व बाबींत मुलांच्या बरोबरीनं समान हक्क होते.

आमच्या घरच्या अगदीं वेगळ्या वळणाखालीं वाढलेल्या मला हें सर्व नवीन होतं. मला शेजारीं मैत्रिणीकडे जायचं तर आईची परवानगी लागे आणि कुणाची सोबत लागे; पण माझ्या नणदा दूरवरचे प्रवास एकेकट्या करीत आणि नोकरीसाठीं दूर कोणत्यातरी गांवीं जाऊन आपला जम बसवीत.

आमच्या कुटुंबांत सासरे शिक्षणखात्यांतून सेवानिवृत्त झालेले. थोरले दीर प्रसिद्ध शास्त्रज्ञ; ते विवाहाच्या भानगडींत पडलेच नव्हते. एक नणंद एम. ए. होऊन परगांवीं नोकरीला लागलेली आणि दुसरी एम. ए. चा अभ्यास करणारी.

सर्वांचं व्यक्तित्व रेखीव आणि प्रत्येक जण हरेक बाबतींत आपल्या स्वतंत्र बाण्यानं चालणारा. त्यामुळं घरांतली राहणी अगदीं वेगळ्याच नमुन्याची ! प्रत्येकाची एक स्वतंत्र खोली. बाहेर जातांना जो तो आपल्या खोलीला कुलूप लावून जाई. खोल्या रांगेनं एकाला एक लागून आणि पुढं एक व्हरांडा. उठा-बसायला अशी वेगळी खोली नव्हतीच. कुणी भेटायला आलं तर ज्याला भेटण्यासाठीं आला त्याच्या खोलींत त्याची बैठक होई. सगळ्यांच्या ओळखीचं नात्यांतलं कुणी आलं तर त्याला त्रिस्थळींची यात्रा करावी लागे. त्याला निरोप देण्यासाठीं सर्व दाराजवळ क्वचित् जमलीं तर.

मुली लहान असतानांच सासूबाई वारल्या. त्यामुळं संसाराचा सांचा व्यक्तिस्वातंत्र्याची चहा असणाऱ्या पुरुषांनीं घडविला आणि घराला असं हें हॉटेलचं स्वरूप आलं. घरांतलं सगळं एक आचारी पाहात असून, मालक मंडळीस शोभेल असंच त्यांचंहि व्यक्तित्व ! सासूबाई गेल्यापासून त्यांनीं चूल सांभाळली, अगदीं शिस्तींत सांभाळली, कुणाची त्यांना कांहीं म्हणण्याची प्राज्ञा नव्हती. धाकट्या वन्संपासून तों मामंजींपर्यंत सगळे त्यांना वचकून असत. त्यांनींहि प्रत्येकाचा सवता सुभा नीट सांभाळून घेतला, आणि प्रत्येकाचा स्वतंत्र बाणा कायम राखला. सर्वांची आवड व तत्त्वं साधण्यासाठीं जेवणांत तीन प्रकार होत—एक निव्वळ शाकाहारी, तर दुसरा मत्स्याहारी आणि तिसरा मांसाहारी. तीच गोष्ट मधल्या वेळच्या खाण्याच्या आणि पेयांच्या बाबतींत. एक कोको घेणार, एक चहा, तर एक कॉफी. संध्याकाळीं मंडळी कामाहून परत आलीं कीं, ज्याला जें हवं तें मिळे. एकेकजण येईल त्याच क्रमानं त्याला त्याचं पेय देण्याची खबरदारी मात्र घ्यावी लागे.

घरांत कधीं कुणाचं भांडण नाहीं, झगडा नाहीं. कुणी कुणाच्या अध्यांत ना मध्यांत ! माझ्या माहेरचीं सगळींजणं म्हणत, " लाडांत वाढलेल्या

सगुणीला हवं तसं सासर मिळालं. कुणाचा सासुरवास नाहीं कीं जाच नाहीं. सासरा, दीर, नणंदा—कुणीच तिला कांहीं म्हणणार नाहींत. अगदीं राजाराणीचा संसार चालवावा तिनं !

पण मला मात्र घर खायला आल्यासारखं वाटे. आईच्या नाहींतर थोरल्या बहिणींच्या भोंवतींभोंवतीं असणारी मी ! मला माणसं हवीं आणि भरलं घर हवं. रागावण्याचं वा बोलून घेण्याचं मला कांहींच वाटत नसे. माहेरीं सतरा वेळ रागावून घेण्याची मला संवय. त्या रागांत लोभहि भरपूर असावा लागे मात्र ! माझ्या नव्या घरीं मला रागावणारं कुणी नाहीं ह्यांत आनंद न वाटतां, मला त्यामुळं अवघडल्यासारखंच वाटूं लागलं. मीं मनांत खूप मांडे खाल्ले होते कीं, भरल्या घरांतली मी सूनबाई होईन, सासू-सासऱ्यांची सेवा करीन, त्यांच्याकडून चार गोष्टी शिकेन अन् बरं म्हणवून घेईन, दीराचं आणि नणंदांचं कौतुक करीन, त्यांच्याकडून आपलं कौतुक करवून घेईन. मला कुठं हवा होता राजाराणीचा संसार ? इथं जाच नव्हता, कलह नव्हते, कुणाचीं घालून-पाडून बोलणीं ऐकून घ्यावीं लागत नसत, कामाचा रगाडा नव्हता,—सासुरवास म्हणून म्हणतात त्यांतलं कांहींच नव्हतं; पण घराला घरपणा नव्हता. माणसाला वाईट जागेंत हवा नाहीं म्हणून गुदमरल्यासारखं वाटतं आणि डोंगराच्या शिखरावर भर वाऱ्यांत हवा फार म्हणून तीच अवस्था होते. तसंच झालं माझं. इतर सुना सासरीं स्वातंत्र्य नाहीं म्हणून वैतागतात, तर ह्या नव्या मिळालेल्या अचाट स्वातंत्र्यानं आणि मोकळिकीनं माझा जीव उबगला.

मी माहेरीं फार लाडांत वाढलें होतें आणि त्या लाडामुळें कमालीची भित्री बनलें होतें. मला झुरळाची, पालीची विलक्षण भीति वाटे, तर माझ्या नणंदा झुरळ उचलून खिडकीबाहेर फेकून देत आणि माझ्याकडे आश्चर्यानं पाहात. वीज लकाकली, आभाळांत गडगडलं कीं घाबरून गोळी होई माझी ! माहेरीं अशा वेळीं मी आईला बिलगून बसावं, वडलांनीं

माझी पाठ थोपटावी–असं सर्वांकडून माझ्या भीतीचं कौतुक होई. माझ्या नव्या घरीं अशी वेडी भीति कुणालाच माहीत नव्हती. वीज लकाकली आणि मी डोळे बंद करून, कानांत बोट घालून अंग चोरलं की सगळी मंडळी माझी ही भीति पाहून गांगरल्यासारखी होत. शेवटीं आईनं माझ्या पतींना माझ्या ह्या संवयीबद्दल सांगितलं, आणि मुली ह्या भ्यायच्याच, त्यांत जगावेगळं कांहींचं नाहीं, असा सूर उमटविला. त्यांना माझं हें वागणं विचित्र वाटणं साहजिक होतं.

मला गाण्याचा आणि पेटी वाजवण्याचा फार नाद, पण माझ्या सासरीं सर्वांना आवाजाचं वावडं. त्यानं त्यांच्या वाचनांत व्यत्यय येई ना? मीं पेटी वाजवायला घेतली की कुणी नको म्हणत नसे; पण वन्सं पुस्तक घेऊन स्वयंपाकघरांत अभ्यासाला जात, भावोजी खोलीला कुलूप घालून प्रयोगशाळेंत निघून जात आणि मामंजी अस्वस्थपणें व्हरांड्यांत, येरझाऱ्या करूं लागत. कुणी घरांत नाहीं असं पाहूनच मी पेटी वाजवूं लागलें. माझ्या पतींना गाण्याची थोडीबहुत आवड होती, ही त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट.



मला कुत्रा, मांजर, पोपट अशा पाळीव जनावरांची फार आवड

होती. माहेरीं आमचा एक पोपट होता, त्याचा आईवर अन् माझ्यावर फार लोभ ! मी कॉलेजमधून आलें कीं आईसारखा आवाज काढून म्हणे, ' सगुणी आली, ताई आली, बाई, चहा करा ! ' आणि नाचून थैमान घाली. त्याचा पिंजरा साफ करण्यांत, त्याला खाऊं घालण्यांत, त्याच्याशीं बोलण्यांत मी कितीतरी वेळ काढी आणि किती वेळां त्याबद्दल वडलांचं बोलणं ऐकून घेई. आमच्या घरीं शिवाय तीन मांजरें होतीं. मोठी मनी आणि तिचीं सुंदर पिलं—मंगी अन् बाब्या. मीं सासरीं गेल्यावर आईनं मंगीला पाठ-राखीण म्हणून माझ्याबरोबर पाठवून दिली. तीसुद्धां चांगलीच लाडावलेली होती. तिला संवय, आम्ही जेवायला बसलों कीं आमच्या पानांतलं मागून घेऊन खायची. सासरीं अशीच आली स्वारी आमच्या जेवणाच्या वेळीं जेवणघरांत; पण इथं कुणालाच मांजरांची आवड नव्हती. ती पानाजवळ गेलेली कुणालाच चालेना. आचाऱ्यांनीं तिची बशी खायचं घालून कोप-ऱ्यांत व्यवस्थित ठेवली, पण ती तिकडे ढुंकून पाहीना. ती सोकावली होती पानांतलं खायला. सर्वांनीं ' हुड्डथ हुड्डथ ' केल्यानं ती घाबरून गेली. मी तर सासुरवाशीण, मी कशी त्यांची शिस्त मोडून हिला पानांतलं खायला घालणार ? दोन दिवस उपाशी राहिली ती आणि ' म्याव ', ' म्याव ' करून सर्वांना भंडावून सोडलं. शेवटीं तिसऱ्या दिवशीं मींच तिला परत माहेरीं पोंचवून दिली.

माझ्या नव्या जीवनांत त्रास कसलाहि नव्हता, पण त्यांत प्रेमाचा ओलावा नव्हता. हें स्वतंत्रतेचं व समान हक्कांचं नवं वारं माझ्या हळव्या मनाला झोंबूं लागलं. एखादी वेगळ्या वृत्तीची मुलगी असती तर तिला हें मनापासून आवडलं असतं, पण माझा मात्र कोंडमारा झाला. माझ्या आईवडलांना ही परिस्थिति जाणवली. त्यांनीं ह्यांना सांगून आपल्या परीनं आमच्या संसाराचा पुरुषी थाट बदलण्याचा प्रयत्न केला. आचारी ह्याच सुमारास गेले, त्यांच्या जागीं बाई ठेवली. एक

गडी काढून मोलकरीण ठेवली. सर्वांना एकत्र बसतां यावं म्हणून एका खोलीचा दिवाणखाना सजविला. पण माझं व्यक्तित्व तेवढं नाहीं म्हणून म्हणा वा अन्य कांहीं कारणांनीं म्हणा, संसाराचं बाह्यांग बदललं पण अंतरंग होतं तेंच कायम राहिलं. मला हळूहळू एकेका गोष्टीची संवय झाली इतकंच, पण मन रमलं कांहीं नाहीं. घरकुलाची कल्पना मनांतच विरली.

अजूनपर्यंत मामंजी आणि आचारी घरांतलं सगळं पाहात होते, तें काम आतां माझ्याकडं आलं; पण त्यांत कठिण कांहींच नव्हतं. ह्या मंडळींचा पैशाचा व्यवहार बँकेइतका चोख. मिळवत्यांनीं आपल्या पगाराचा ठराविक हिस्सा घरखर्चासाठीं मजकडे आणून द्यावा. मी हिशेब व्यवस्थित ठेवावा इतकीच माझ्याकडून अपेक्षा. एखाद्या महिन्याला पैसे पुरले नाहींत तर सर्वांनीं पुरवणी करावी आणि पुढच्या महिन्यांतला खर्च कमी करण्यासाठीं एकेकानं एकेक खाण्यांतली वस्तु सोडून द्यावी. पैसे उरले तर पुढल्या महिन्यांत प्रत्येकानं त्या मानानं पैसे कमी द्यायचे. ह्या रोखठोकीच्या व्यवहारांत कुणी कुणाला प्रेमानं वस्तु देण्याघेण्याचा प्रश्नच निघत नसे. ही रोखठोकी व्यवस्थित खरी; पण माझं मन तिच्याखालीं दडपलं जाई. मला वाटे, प्रेमानं द्यावं घ्यावं, कधीं भांडावं, पुन्हां एक व्हावं व समजूत काढण्यासाठीं कांहीं द्यावं, सदा अगदीं काटेकोरपणानं वागायचं तर तें घर कसलं? हें व्यक्तिस्वातंत्र्य, तो विवेकवाद, न्यायाची ती कडेकोट शिस्त हें मला मुळींच रुचत नसे; पण त्या सर्वांचा प्रतिकार करण्याचं सामर्थ्य माझ्यांत नव्हतं.

चार वर्षं अशींच गेलीं. धाकट्या वन्स विलायतेंतला आपला शिक्षणक्रम पुरा करून मुंबईतच कॉलेजांत नोकरीस लागल्या. घरराहणींत कांहींच बदल झाला नव्हता. मी तो घडवून आणूं शकलें नव्हतें हेंच खरं. मी नवी नवरी म्हणून ह्या घरीं आल्यावर माझ्या मामेसासूबाईंनीं एकीकडे नेऊन मला सांगितलं होतं, "हें बघ सूनबाई, मुलं लहान असतांनाच वन्सं वारल्या! त्यामुळं ह्या कुटुंबांतलं जीवन रूक्ष बनलं आहे. त्यांत ओलावा

आणण्याचं काम तुझं. तूं लहान असलीस तरी तुलाच हें केलं पाहिजे. तुमच्या इथल्या काय, अन् आमच्या इथल्या काय, ह्या सगळ्याच मंडळींचा आचार-विचाराचा थाट सर्वस्वीं सुधारकी अन् कांहींसा पुरुषी बनला आहे. त्यांना कळत नाहीं कीं सगळं कांहीं विवेकवादावर चालत नाहीं. बुद्धीच्या आहारीं गेल्यानं भावनांचा चुराडा होतो. आपण हा थाट बदलला पाहिजे. आमच्या कुटुंबांत मला थोड्या प्रमाणांत तें साधतां आलं. तूंहि तोच प्रयत्न कर."

ह्या माझ्या मामेसासूबाई स्वभावानं अत्यंत प्रेमळ आणि समंजस. मीं त्यांच्या सांगण्याप्रमाणं वागण्याचा खूप प्रयत्न केला पण मला कांहीं तें जमलं नाहीं. माझ्या सासरच्या मंडळीपुढं माझं व्यक्तित्व अगदींच फिकं पडलं; त्यांच्या विवेकवादापुढं माझी भावना निर्बल ठरली.

लग्न झाल्यावर चार वर्षांनीं मला मुलगी झाली. ती अगदीं मरतां-मरतां वांचली आणि पहिल्या वर्षांत सारखी आजारी असे. मी अननुभवी, सासरीं कुणी वडीलधारं बाईमाणूस नाहीं. तेव्हां बेबी चांगली दीडपावणे-दोन वर्षांची होईस्तवर मीं माहेरींच राहिलें. मला सारखी काळजी वाटे, कीं बेबीला घेऊन सासरीं गेल्यावर कसं व्हायचं? तिचा अवखळपणा, तिचं रडणं, आरडणं-ओरडणं ह्या मंडळींना कसं सहन होईल?

पण प्रत्यक्ष सारा उलटाच प्रकार झाला. घरांत मूल नसल्यानं माझ्या ध्यानांत नव्हतं आलं कीं, ह्या सर्वच मंडळींस मुलांची मनापासून आवड होती. त्यांच्या विवेकवादाच्या अभेद्य भिंतीस इथं चीर गेली होती.

सासरीं आल्यावर पहिल्याच दिवशीं उगीच कांहीतरी निमित्त करून बेबीनं मोठ्यानं भोकांड पसरलं. किती समजूत घातली तरी ऐकेना. भावोजी कामांत होते. त्यांना गडबड होऊं नये म्हणून मी बेबीला दटावून गप्प करूं लागलें. तों भावोजीच आले अन् 'चल गंमत दाखवतों तुला' असं सांगून तिला घेऊन गेले. आणि तिला गंमत-जंमत दाखवून पंधरा-वीस मिनिटांत त्यांनीं तिला पुन्हा हंसती करून माझ्या खोलींत आणून सोडली.

सासरीं बेबी प्रत्येकालाच हवी असे. तिला एकेकानं किती वेळ तरी खेळवावं, ती रडली कीं धांवून यावं आणि विचारावं, ‘ काय झालं बेबीला ? ’ आणि तिला रिझवावं. ह्यांना मुलांची आवड, त्यामुळं मुलंहि त्यांच्याकडे धांव घेत. बेबी तर अगदीं झेप टाकून त्यांच्याजवळ जाई.

ती सुटी चालूं लागल्यावर चांगलीच धीट बनली. खुशाल भावोजींच्या खोलींत, पार्टिशनखालून वांकून जाऊन, त्यांच्या खुर्चीवर विराजमान होई आणि त्यांच्या टेबलावर एकेक वस्तु दाखवून घेई. वन्सं वाचत असल्या तरी ‘ आत्या, गोष्ट सांग ’ म्हणून हट्ट धरून बसे आणि त्यांच्या मांडीवर बसून गोष्ट ऐकल्याखेरीज त्यांना सोडीत नसे. आजोबांना आपल्या लुटुपुटीच्या संसारांतलं सारं जेवण रोज वाढी. मनांत आलं तर केव्हां-केव्हां सगळ्यांची पंगतच बसवी आणि चांगलं पंचपक्वान्नांचं जेवण वाढी.

बेबी पोटांत असतांना मला कसले डोहाळे लागले असतील तर गाण्याचे, आणि त्याचाच परिणाम असावा बहुधा, बेबीला अगदीं उपजतच गाण्याची मोठी आवड असल्याचं दिसून आलं. लहान होती तेव्हां रेडिओवरून संगीताचा कार्यक्रम सुरू झाला कीं कान देऊन ऐके. बोलतां येऊं लागल्यावर तर तिला कंठच फुटला. पहाटे जाग आली कीं आपल्या छोट्या पलंगावर बसून एकटीच गाणं म्हणण्यास सुरवात करी. प्रातःकालच्या भूपाळ्याच जणूं ! फिरणं झाल्यावर घरीं येई, तें गाणं म्हणतच ! आणि गाण्याच्या ठेक्यावर एकेक पायरी चढे. खेळतांना अखंड गाण्याची साथ असेच. पण मला आश्चर्य वाटे तें हें कीं, आवाजाचं व गाण्याचं वावडं असणाऱ्या ह्या मंडळींस बेबीच्या गाण्याचा त्रास होत नसे हें कसं ? उलट तिच्या गाण्याचं कौतुकच होई. आजोबा विचारीत, “ काय बेबी, आज कुणाचं गाणं ? कावळ्याचं का चिमणीचं ? ” वन्संनीं तिला गाण्याबरोबर कृतीहि शिकवावी. भावोजींनीं गाणं ऐकण्यासाठीं तिला मुद्दाम आपल्या खोलींत न्यावी.

अनुक्रम 23473 दि: 17-6-77
क्रमांक 9935 नों: दि: 6-1-78

बेबी फार लहान वयांत पत्ते खेळायला शिकली. कुठं फिरायला जाई, तिथं मुलांच्या बरोबर येणारे नोकर पत्ते खेळत आणि त्यांचं पाहून मुलंहि खेळत. एक दिवस घरीं असतांना स्वारीला पत्ते खेळायची हुक्की आली आणि आजोबांनाच पत्त्यांच्या डावास बसण्याचा आग्रह करूं लागली. मी त्या वेळीं रागावलें तिला; पण दुसऱ्या दिवशीं पाहातें तर आजोबाच अक्षरांचे आणि चित्रांचे पत्ते घेऊन आले. बेबीला ह्या नव्या पत्त्यांची मोठी गंमत वाटली आणि तिनं त्यांतून अक्षर-ओळखहि करून घेतली.

बेबीनं तीन-चार वर्षांतच आमच्या घराची राहणी पार बदलून टाकली. प्रत्येकांतला मुळांतला हळुवारपणा जागृत केला आणि चार स्वतंत्र वृत्तीच्या, आपापल्या चार मार्गांनीं जाणाऱ्या मंडळींचं कुटुंब बनवलं. बेबीला खेळणं किंवा खाऊ आणतांना पूर्वींचा रोखठोकीचा व्यवहार विसरला गेला. मामंजींपासून तों वन्संपर्यंत सर्वजण सारखं बेबीसाठीं कांहीं ना कांहीं आणीत असत.

प्रयत्न करून चार वर्षांत मला जें साधलं नाहीं तें ह्या मिरकुटलीनं कसं साधलं ह्याचीच मला राहूनराहून गंमत वाटते. आपल्या बाललीलांनीं तिनं आमच्या संसाराची बुद्धीची बैठक हालवून प्रेमाचा अन् हळुवार-पणाचा आधार तिला दिला. पूर्वीं सगळ्या गोष्टींचा विचार, न्याय-अन्याय, हक्क-कर्तव्य, शास्त्र-व्यवहार ह्या दृष्टीनं होई; पण आतां बदललं सारं. ती बुद्धिवादाची आणि समान हक्कांची जाणीव मागं पडली आणि तिचं स्थान प्रेमानं घेतलं. बेबीचं कौतुक करतांना, तिच्याशीं वागतांना, प्रत्येकजण आपल्या हक्कांची जपणूक करण्याचं पूर्वींचं तें ब्रीद विसरला. नकळत एकेकाच्या रेखीव व्यक्तित्वाचे कानेकोपरे घासले गेले अन् प्रत्येकांत मिळतं-जुळतं घेण्याची वृत्ति निर्माण झाली.

बेबीनं सुरवात केली आणि त्यानंतर तीन तीन वर्षांच्या अंतरानं झालेल्या वसंत व मोहननीं त्यांत भर घातली. प्रत्येकाचा वेगळेपणा,

आपपरभाव, निव्वळ विवेकवाद जो सारखा माझ्या मनाला खटकत असे तो दूर झाला, घराला घरपण आलं, भावनेला स्थान मिळालं. आमचं खरं प्रेमाचं कुटुंब बनलं. सासूबाईंची उणीव नातवंडांनीं भरून काढली.

बेबी झाल्यावर आमच्या घरीं संगीताचा शिरकाव झाला, तो दोघां मुलांनीं आणखीच वाढवला. एक तबला वाजवी; तर दुसरा बासरी. पण सगळं न शिकतां-सवरतां, जणूं काय रक्तांतूनच त्यांना संगीताची आवड व त्यांतलं कौशल्य प्राप्त झालं. ह्या मुलांनीं माझी दुसरीहि बाळपणाची आवड पुरी केली. दोघांनाहि माझ्यासारखंच पाळीव जनावरांचं मोठं वेड. सर्वांच्या पाठीस लागून त्यांनीं दोन कुत्रे आणलेच घरीं, पिलं म्हणून आणलीं आणि आपणच त्यांचं सर्व करून मोठीं केलीं. आणि गंमत ही कीं आजोबांना आणि वन्संना ते कुत्रे मोठे प्रिय झाले.

ह्या झालेल्या बदलाचं सगळं श्रेय मी मुलांना आणि त्या मंडळींत मुळांत असलेल्या हळुवारपणाला देतें. मी करूं शकलें नाहीं तें ह्या मुलांनीं केलं. प्रेमभावनेनं दडी मारली होती, तिला वर यायला सवड करून दिली. माझं त्यांत कांहिंचं नाहीं असंच मानून घेतलं मीं आजवर, पण परवां बेबीच्या लग्नांत धाकट्या वन्संचं विलायतेहून तिला पत्र आलं तें वाचून माझं मलाच आश्चर्य वाटलं. त्यांनीं लिहिलं होतं.--

तुझ्या लग्नप्रसंगीं तुला थोडासा उपदेश करण्याची लहर आली आहे! तूं इतकं शिकलीस तें बहुतांशीं आमच्यासारखीच वैयक्तिक महत्त्वाकांक्षेनं. कांहींतरी कार्य करून दाखवावं, स्वतःच्या पायांवर उभं राहावं, स्वतंत्र होऊन नांव मिळवावं ही कल्पना सदैव उराशीं बाळगलीस. त्याच हिरीरीनं अभ्यास केलास, एकेका परीक्षेंत चांगलं यश मिळवलंस. तुझ्या डोळ्यापुढं आमचं एकेकीचं उदाहरण होतं. आपली आई हीसुद्धां आपल्यापुढील आदर्श आहे, हा विचारहि तुझ्या मनाला कधीं शिवला नसेल; तुम्हीं सगळींच मुलं आईनं बी. ए. होऊन काय मिळवलं, अशी एकमेकांत थट्टा करीत असां.

पुढें तूं आपल्या पसंतीनं जीवनाचा जोडीदार निवडलास व त्याच्याशीं वचनबद्ध झालीस. “ आतां कुठं तुझं स्वातंत्र्य ? काय करणार तूं आपल्या शिक्षणाचं चीज ? ” असं म्हणून तुला कुणी चिडवलं, कीं तूं त्वेषानं उत्तर द्यायचीस, ‘ लग्न झालं म्हणून काय ? मी काय माझं शिक्षण चुलीपुरतं ठेवणार नाहीं. मी नोकरी करीन, लेख लिहीन, समाज-सेवा करीन. शिक्षणाचा कांही ना कांहीं उपयोग करीनच. आईसारखी घरांत नाहीं बसून राहणार. ’ तें सर्व ठीक आहे. विवाहबद्ध होऊनहि ह्या सर्व गोष्टी तूं करूं शकशील; पण तें करीत असतांना आपल्या आईचा आदर्श समोर धरायला विसरूं नकोस. कुटुंबाची बैठक प्रेमावर आहे. एकमेकांसाठीं केलेल्या स्वार्थत्यागांत आहे, केवळ आपापले हक्क जतन करण्यांत नाहीं, आणि त्यांतच कौटुंबिक जीवनाचं स्वारस्य आहे, हें तुझ्या आईनं आपल्या वागण्यानं सर्वांना कसं पटवून दिलं तें तूं लक्षांत ठेव.

एकाच प्रसंगाची आठवण झाली म्हणून तुला लिहीत आहें. एकदां वहिनींनीं आणि आम्ही चौघी-पांचजणींनीं सिनेमाला जायचं ठरवलं. वहिनींचा आवडता चित्रपट लागलेला होता आणि तो शेवटचा दिवस होता. सकाळीं वहिनींचा निरोप आला—आपण येऊं शकत नाहीं म्हणून. मला वाटलं कुणी आजारी असेल, वहिनींना स्वतःला बरं वाटत नसेल. म्हणून दुसऱ्या दिवशीं मी मुद्दाम चौकशीला गेलें. तेव्हां वहिनी म्हणाल्या, “ छे हो, आजारी कुणीच नाहीं; पण सकाळीं मुलं जायचीं त स्काऊट कँपला आणि ह्यांना जायचंय दिल्लीला. सर्वांचं सामान व्यवस्थित काढून बांधायला हवं ना ? एखादं कांहीं राहिलं तर किती अडचण होईल एकेकाची ! आणि सिनेमाला जायचं म्हणून घाईघाईत सामान बांधलं तर हटकून कांहींतरी राहातंच. म्हणून म्हटलं सिनेमाचा बेत रद्द करावा. तुम्ही पांचजणी जाणार होतां तेव्हां तुमची कांहीं अडचण होण्याचा संभव नव्हता. ”

दिसायला गोष्ट अगदीं क्षुल्लक, पण म्हणूनच तिचं महत्त्व अधिक. कुटुंबांतील माणसांच्या साध्या रोजच्या व्यवहारांतील सुखसोईसाठीं आपली चैन व आवड बाजूला ठेवली पाहिजे आणि त्यांत आपण काय मोठा स्वार्थत्याग केला अशी अहंपणाची भावनाहि वाटूं नये, ह्याच वृत्तीनं कुटुंबांतलं सुख कायम राहातं. वहिनींना सिनेमाची आवड किती तें माहीत आहेच तुला. पण सिनेमाला न जाण्यांत आपण मोठं कांहीं केलं, आपली चैन इतरांच्या क्षुल्लक गरजांसाठीं गमावून बसलों, ह्याचं त्यांना मुळींसुद्धां वैषम्य वाटलं नाहीं. कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीनं ह्या भावनेनं वागलं पाहिजे. पण त्याचा धडा कुटुंबांतील मुख्य स्त्रीनं घालून दिला पाहिजे. आज तुझ्यावर ही जबाबदारी येऊन पडली आहे, हें तूं विसरूं नकोस.

तूं म्हणशील, ही वहिनींच्या मुळांतल्या स्वभावाची गोष्ट झाली. त्यांत शिक्षणाचा उपयोग कुठं झाला? हो, त्यांनीं नोकरी केली नाहीं, समाजसेवेचं असं कांहीं कार्यहि केलं नाहीं, कोणत्याहि भगिनी-समाजाच्या व मंडळाच्या सभासद असण्यापलीकडे अधिक कांहीं केलं नाहीं; पण त्यांनीं शिक्षणाचा उपयोग स्वतःचं व्यक्तित्व बनवण्यांत व मन खरं सुसंस्कृत व समंजस बनवण्याकडे केला आणि त्यांतून कुटुंबाचं मोठंच हित साधलं. अनेक गोष्टींत त्यांनीं आपलं मन मारलं, कितीक वेळां आपल्या आवडी-निवडी दूर सारल्या. पण अगदीं मनाच्या गाभ्यांतील ज्या आवडी त्या सोडल्या नाहींत. आपल्या संस्कृतीचा व चालीरितींचा अभ्यास करायचा, आपल्या हिंदु धर्मांतील सणांची, देवादिकांची व त्यांतील मूळ कल्पनांची माहिती मिळवायची, आपलं संतवाङ्मय वाचायचं जी मनापासूनची आवड ती कायम ठेवली. तुम्ही मुलं मोठीं झाल्यावर तो व्यासंगच झाला. कुटुंबाचं हित आधीं—मग आपली वैयक्तिक आवड, ही दृष्टि सदैव ठेवली हें जरी खरं, तरी ज्यांत खरंखुरं मन रमतं, ज्यापासून उच्च प्रकारचा सात्त्विक व बौद्धिक आनंद मिळतो त्या गोष्टींचा नाद केव्हांहि सोडला

नाहीं. वहिनींच्या शिक्षणाचा उपयोग थोड्याच मंडळींसाठीं आहे,- आपल्या कुटुंबासाठींच आहे; पण तीहि एक प्रकारची समाज-सेवाच आहे, नाहीं का? तुम्ही मुलांनीं त्यांतलं सार घेऊन, आपल्या जीवनांत तें बिंबवून दाखवलं पाहिजे. तेव्हां सांगायचं इतकंच कीं, स्वतःच्या संसाराची जबाबदारी उचलतांना ह्याहून चांगला आदर्श तुला मिळणार नाहीं."

तें कांहीं असो. मी ह्या स्तुतीस पात्र आहें असं मला वाटत नाहीं; पण माझ्या शिक्षणाचा उपयोग विस्तृत अशा क्षेत्रांत मी करूं शकलें नसलें तरी माझं शिक्षण वायां गेलं असं मला केव्हांहि वाटत नाहीं. माझ्या शिक्षणाचा उपयोग जीवनाच्या हरेक प्रसंगीं मला झालेला आहे आणि माझ्या कुटुंबांतील इतर मंडळींसहि तो पर्यायानं झाला असावा एवढं मी सांगूं शकतें.

लग्न करून मी ज्या घरीं आलें तें घर आतांपर्यंत पार बदललं हें निश्चित. आतां माझीं मुलं मोठीं झालीं. बेबी लग्न होऊन सासरीं गेली. वसंत आणि मोहन नोकरीनिमित्त बाहेरगांवीं आहेत. भावोजी संशोधनार्थ अमेरिकेंत स्थायी झाले. दोघी वन्सं आपापल्या गांवीं नोकरी करीत आहेत. मामंजी हें जग सोडून गेले. आतां एवढ्या मोठ्या घरांत आम्ही दोघंच राहिलों; पण घरांत पूर्वीचा तो भकासपणा जाणवत नाहीं. प्रथम मी सासरीं आलें तेव्हां घर भरलं असूनहि रिकामं वाटे. आज अनेक गोड स्मृतींनीं घर भरून आलं आहे आणि माणसं नसतांहि घर भरल्यासारखं वाटत आहे.

## ८ : : : गोखले मास्तर

गोखले मास्तर त्यावेळीं इंग्लिश पांचवींच्या वर्गावर असत. पांचवींत येईपर्यंत आम्हांला त्यांची ओळख वरच्या वर्गांतल्या मुली त्यांच्या 'जम्मती' सांगत तेवढ्यावरूनच असे. ते शाळेंत लागल्यावर पहिल्या महिन्यांतच त्यांचें सुंदर इंग्लिश उच्चार करून म्हटलेलें 'Do you understand?' हें वाक्य शाळेंत वरपासून खालपर्यंत प्रसिद्धीस पोहोंचलें होतें. तसेंच त्यांचा स्थूल देह, कसाबसा बांधलेला डोक्यावरचा रुमाल, खालीं पाहून मान एका बाजूला कलती धरून जड पावलांनीं चालण्याची पद्धत, उजव्या हाताचा अंगठा सदा तोंडांत धरून कुरतडण्याची संवय हें सर्व आमच्या परिचयाचेंच होतें. पण मास्तरांची खरी ओळख झाली पांचवीच्या वर्गात आल्यावर! चौथीच्या वार्षिक परीक्षेनंतर तुकड्या पडल्या व आम्ही पहिले, तिसरे, पांचवे, असे विषम नंबर गोखले मास्तरांच्या 'अ' तुकडींत आलों. नुकत्याच सहावींत गेलेल्या मुली आम्हांला सांगू लागल्या, 'पाहा हो! गोखले मास्तर एरवीं फार चांगले; पण मागें लागून अभ्यास नाहीं करवून घेत. पुढच्या परीक्षेंत 'ब' च्या मुली मागें टाकणार तुम्हांला' ह्या भेडसावणीनें नंबर वर आणण्याची महत्त्वाकांक्षा

असणाऱ्या आम्ही कांहींजणी खऱ्याच घावरलों व तुकडी बदलतां येईल कीं काय, ह्या विचारांत पडलों. पण जसजसा गोखले मास्तरांचा अनुभव येऊं लागला तसतसा तो विचार आपोआपच मागें पडला, आणि तुकडी बदलण्याची धडपड केली नाहीं म्हणून आनंदच वाटला.

मास्तरांच्या वर्गातला पहिला दिवस इतर वर्गातल्या पहिल्या दिवसांहून फार वेगळा असे. इतर शिक्षक–विशेषतः शिक्षकिणी–वर्षभर सहवास असलेल्या मुली आपल्याला सोडून वरच्या वर्गात गेल्या म्हणून कांहींसे खिन्न असत व नव्या आलेल्या मुलींना उपदेश करीत–"हें पहा गेल्या वर्षीच्या मुली फार चांगल्या वागल्या. त्यांनीं अभ्यासहि उत्तम केला. तुम्हीही तसंच वागण्याचा प्रयत्न करा." हेतु हा कीं स्पर्धेनें नवीन मुलींनीं अभ्यास जोरांत करावा व चांगलें वागावें. पण गोखले मास्तरांचा उलटाच न्याय! ते म्हणत, "गेल्या वर्षीच्या मुली अगदींच कुचकामी. तुम्ही तशा निघालां नाहींत म्हणजे मिळविली!" आणि वर्गात कधीं गडबड केली, चुकारपणा दाखविला कीं, ते म्हणत–"मला वाटलं होतं गेल्या वर्षीच्या मुलींहून बऱ्या निघाल तुम्ही; पण कांहीं नाहीं. तुमचा सुद्धां अगदीं तोच नमुना!"

पांचवीच्या वर्षात आम्हीं यथेच्छ मौज मारली. नाहींतरी शिक्षकिणींच्या थोड्याबहुत कडक शिस्तींतून निघालेल्या मुली शिक्षकांच्या वर्गात आल्या कीं मोकाट सुटतातच. तशांत आणि हे गोखले मास्तर! मास्तरांच्या बोलण्यांत एक प्रकारची खोंच असे. ते सरळ कधींच बोलत नसत; पण त्यांचें मन मात्र फार मायाळू! वर्गात गडबड केली, आडवेतिडवे प्रश्न करून मास्तरांना भंडावलें कीं, त्यांचें ठराविक उत्तर येई–'काय करूं, मुलगी पडलांत. मुलगा असतात तर ह्या प्रश्नाचें उत्तर चांगलेंच दिलें असतें!' पण मुलाला तरी मारायला त्यांनीं हात उगारला असेल हें पटत नाहीं.

आपले खोंचक शब्द कोणाला लागले असें दिसलें कीं, मात्र मास्तरांना अत्यंत वाईट वाटे. एक प्रसंग चांगलाच आठवतो आहे.

वार्षिक परीक्षा जवळ आली होती. परीक्षेच्या वेळीं झालेल्या अभ्यासक्रमांतील अडलेले प्रश्न विचारतां यावे म्हणून कांहीं तास मुद्दाम राखून ठेवण्यांत येत असत. मास्तरांना स्वतःच्या मर्जीविरुद्ध हा नियम पाळावा लागे; नाहींतर दंगा करून मुलींनीं आकाशपाताळ एक करून सोडलें असतें. पण हें प्रश्न सोडविण्याचें काम त्यांना फार कंटाळवाणें वाटत असे. त्यामुळें ते तुटक उत्तरें देऊन कशीबशी वेळ साधून नेत. फारच कंटाळले म्हणजे म्हणत, "कशाला डोक्याला त्रास देतां उगाच ! पुढच्या वर्षीं कळेल आपोआप ! तुम्हींही आहांत; मीहि आहें !" म्हणजे प्रश्न विचारणारी मुलगी नापास होऊन पुढल्या वर्षीं त्याच वर्गांत रहाणार, असा सूचित अर्थ असे. त्या दिवशीं त्यांनीं असेंच उत्तर दिलें आणि विचारणाऱ्या मुलीच्या मनाला तें फार लागलें, आणि नेहमीं गडबड करून मास्तरांचें डोकें भंडावून सोडणारी ती मुलगी एकदम गाल फुगवून गप्प बसली. मास्तरांच्या तें लक्षांत आल्यावर आपल्या बोलण्याचें त्यांना वाईट वाटलें. बाकीच्या वेळांत आमचे सर्व प्रश्न कधीं नाहीं इतके व्यवस्थित समजावून दिले, आणि मधेंच मजेदार कांहींतरी बोलून खेळीमेळीनें वागून त्या मुलीला आपला राग विसरावयास लावला.

मास्तर तोंडावर कधीं कौतुक करीत नसत आणि स्पष्ट कधीं रागावतही नसत. एखादा वाईट निबंध लिहिला कीं, आम्हांला कळावें कीं पूर्वींचे निबंध मास्तरांना पसंत पडले होते. "हें काय लिहिलंत ह्या वेळीं? पहिल्या पहिल्या निबंधांतले विचार, भाषा दिसत नाहींत आतांशा कधीं?" असें म्हणून अप्रत्यक्ष रीत्या पहिल्या निबंधाची शिफारस होई. "आतांशा, आतांशा बिघडलांत तुम्ही गद्रे !" असें म्हटलें कीं गद्रेला कळावें कीं पूर्वी आपण चांगलें वागत होतों. रागावण्याच्या बाबतींत सुद्धां असेंच आडून आडून चाले. एकदां शाळा पहाण्यास कोणी मंडळी आली. आमच्या वर्गांत आल्यावर आमच्या दोघी-तिघींकडून इंग्रजी कविता

म्हणवून घेतल्या. त्या दिवशीं काय झालें होतें न कळे, पण 'भरंवशाच्या म्हशीला टोणगा' असाच प्रकार झाला. नेहमीं चांगल्या कविता म्हणणाऱ्या आम्ही; पण त्या दिवशीं तिघींही बऱ्याच अडखळलों आणि आलेल्या पाहुण्यांचा ग्रह कांहीं चांगला झाला नाहीं. मास्तरांचें तोंड उतरलें, पण त्यावेळीं ते आम्हांला कांहींच बोलले नाहींत. दुसऱ्या दिवशीं कवितेच्या तासाला आम्हीं तिघींनींही कविता चांगली म्हटली. तेव्हां आदल्या दिवशींचा वचपा काढण्याची संधि मास्तरांना मिळाली, आणि पुटपुटतच म्हणाले—"कुणी वर्ग पहायला आलें कीं गोंधळून जाणार असलांत तर नेहमीं वर्गांत तरी कशाला म्हणावी कविता चांगली ? उगाच शिक्षकाची पंचाईत होते अशानें !"

मास्तरांना वाचनाचा व्यासंग दांडगा होता. त्यांचा स्वतःचा पुस्तकांचा संग्रहही पुष्कळ मोठा होता. त्यांतलीं मुलांना वाचण्यास योग्य अशीं पुस्तकें आम्हांला नेहमीं वाचण्याला मिळत. एकदां असेंच मीं पुस्तक घेतलें होतें, आणि कसा कोणास ठाऊक; पण वाचतां वाचतां त्यावर शाईचा मोठा डाग पडला. दुसरे दिवशीं भीतभीतच हें सांगायला मास्तरांकडे गेलें, तशी ते मुळींच न रागावतां इतक्या सहजपणें म्हणाले, "हात्तीच्या डाग पडला एवढंच ना ? पुस्तक तर शाबूद आहे ना ? मग कांहीं हरकत नाहीं. पुस्तकसंग्रहवाले जी जिवापाड पुस्तकांची काळजी घेतात," आणि इतरांना पुस्तक वाचणें नकोसें करून टाकतात ते गुण मास्तरांत नव्हते.

त्यांच्या ह्या पुस्तकें गोळा करण्याच्या आवडीचा आम्हांला चांगलाच फायदा होई. पांचवींत आम्हांला ते बरेच विषय शिकवत, त्यांत गणितही शिकवावें लागे. गणिताच्या रीती ठोकून घेऊन बसवणें, कोणताही मुद्दा अगदीं स्पष्ट करून सांगणें हें त्यांना तितकेंसें साधत नसे. पण गणिताची खरी आवड त्यांनींच आमच्यांत प्रथम उत्पन्न केली. आमच्या क्रमिक पुस्तकांतलीं उदाहरणें सोडवून झालीं कीं लागलीच दोन-तीन वेगवेगळीं

पुस्तकें ते आमच्यापुढें आणून टाकत आणि सांगत–“ ह्यांत फार मजेदार गमतीचीं उदाहरणें आहेत. करून तर पहा ! ” त्यामुळें आम्हांला कांहीं-जणींस गणित म्हणजे एक गंमतीचा आणि करमणुकीचा विषय वाटूं लागला.

मास्तरांचें वाचन दांडगें होतें. त्यामुळें त्यांना वाङ्मय, निर-निराळ्या देशांचा इतिहास, पौराणिक कथा ह्यांतल्या पुष्कळच गोष्टी माहीत असत. पण गोष्ट खुलवून सांगणें मात्र त्यांच्या भिडस्त स्वभावामुळें त्यांना साधत नसे. गोष्ट सांगण्यास सुरुवात व्यवस्थित करावी; पण मग मध्येंच त्यांना भास व्हावा काय लांबलचक चऱ्हाट वळतों आहों आपण, ह्या मुली तें ऐकून कंटाळल्या असतील बिचाऱ्या ! आणि मग अर्ध्यावरच ते गोष्ट कशीबशी घाईघाईनें संपवून टाकीत ! त्यामुळें गोष्टींतला मुख्य मुद्दा ऐकणाऱ्याच्या ध्यानांत येतच नसे, आणि कांहीं मुद्द्याचें नाहीं अशाच एखाद्या वाक्याला भलतेंच महत्त्व प्राप्त होऊन एकच गोंधळ उडे. सबंध गोष्ट विसरलों तरी तें वाक्य मात्र चांगलेंच लक्षांत राही. ‘टोगा झाडला’ हें अशांतलेंच एक वाक्य आहे. आम्हांला तें वाक्य अजून आठवतें. पण गोष्ट मात्र विसरली गेली. तेव्हां सुद्धां नीट समजलेली नव्हतीच. कसली तरी दोन रोमन सरदारांची गोष्ट होती. एकानें दुसऱ्यास फसवण्याचा प्रयत्न केला; तर त्यानें अधिकच चाणाक्षपणा दाखवून पहिल्यावरच बाजू उलटवली, आणि त्याला परत जावयास लावलें अशी कांहींशी गोष्ट होती. मास्तरांनीं नेहमींप्रमाणें धांदलीनें गोष्टीचा समारोप केला, “त्या सरदारानें टोगा झाडला, आणि गेला बिचारा निघून ! ” मुख्य मुद्दा आमच्या ध्यानांत न आल्यानें आम्हीं विचारलें, “ पण मास्तर झालं काय ? ” “ टोगा झाडला त्यानें ! ” हें त्यावर मास्तरांचें उत्तर. किती परींनीं विचारून पाहिलें तरी मास्तरांचें उत्तर आपलें ठरलेलें, “ अहो टोगा झाडला त्यानें आणि दुसरें काय ? ” त्यानंतर कितीक दिवस आम्ही नुसतें तें वाक्य कसाना कसा संबंध आणून वर्गांत मास्तरांना ऐकवत असूं.

मास्तरांच्या बोलण्यांत विनोद भरपूर होता. आणि त्यांचे शब्द-प्रयोग मजेदार असत कांहींतरी ! एकदां मास्तर आठवड्याच्या परीक्षेचे तपासलेले ' पेपर ' परत देत होते. स्वारी जरा गरम झालेली होती कारण आम्ही कोणींच त्यांच्या मनाप्रमाणें लिहिलेलें नव्हतें. प्रत्येक पेपर देतांना, दोन-तीन खोंचक वाक्यें बोलून पेपर देत. माझा पेपर हातांत घेतला आणि फर्रकन वही उघडून मधलें पान काढलें. वहीचा कागद हलक्या प्रतीचा असल्यानें त्या पानावर बदामाच्या आकाराचें तेवढेंच मोठें एक भोंक पडलेलें होतें. तें दृष्टीस पडल्यावर पेपरांतल्या चुकांसंबंधीं बोलणें दूरच राहिलें, आणि त्याकडेच बोट करून मास्तर म्हणाले, " पाणंदीकर, हा रॉबीनूसन् क्रुसोच्या फ्रायडेचा पाय कशाला तुमच्या पेपरांत ? " झालं, आमचा एकच हंशा सुरू झाला अन् त्यांत मास्तर घुस्सा विसरून गेले. त्यामुळें पुढच्या मुलींना सरळ, विशेष टीकेशिवाय पेपर मिळाले.

ते इंग्रजी धड्यांतल्या नव्या शब्दांचे अर्थ असेच मजेंत कांहींतरी सांगत. ' Wholesome food ' ह्याचा अर्थ सांगत—" अहो, म्हणजे हगवण लागत नाहीं असं अन्न, " ' hag ' चा अर्थ 'जख्खड म्हातारी'. आमच्या वर्गातल्या एका उनाड मुलीनें ते मास्तरांनीं सांगितलेले अर्थ जसेच्या तसे पुस्तकांतच उतरवून घेतले होते, शाळा-तपासणीच्या दिवशीं मास्तर आपलें पुस्तक आणावयास विसरून गेले. आणि घाईघाईनें आमच्या कोणाजवळून पुस्तक घ्यावयाचें ठरवलें. आणि योगायोग असा कीं बरोबर त्याच मुलीचें पुस्तक त्यांनीं घेतलें. पुस्तक उघडून पाहिल्यावर त्यांनीं ते अर्थ पाहिले तेव्हां धक्काच बसला त्यांना ! आणि त्यांनीं विचारलें " अहो परांजपे, हे असले भरमसाट अर्थ सांगितले कोणीं तुम्हांला ? " हीं सर्व आपलींच मुक्ताफळें, हें कळल्यावर रागावणें शक्यच नव्हतें. नुसतें इतकेंच म्हणाले—" परांजपे, काय म्हणावं तुम्हांला ? आतां रबर तरी आणा. तो इन्स्पेक्टर यायच्या आंत सगळं खोडून काढलं पाहिजे. "

आमच्या वर्गांत एक ख्रिश्चन मुलगी होती. तिला एक संवय होती कीं, कोणत्याही वाक्याची सुरवात 'मास्तर' ह्या शब्दानें करावयाची आणि शेवटही त्याच शब्दानें. जसें कांहीं रामनामच तें! एकदां भूगोलाच्या तासाला पॅसिफिक महासागरांतील कांहीं बेटांचा शोध कोणी लावला, असा प्रश्न विचारला. तेव्हां त्या मुलीनें आपल्या नेहमींच्या संवयी-नुसार उत्तर दिलें—" मास्तर, कुक, मास्तर." त्यावर मास्तर म्हणाले— 'अहो आज मास्तराचा कुक बनवलांत, वर्षअखेर तुमची मजल कुठपर्यंत जाईल कोण जाणे!'

पांचवीचें सबंध वर्ष मास्तरांच्या हाताखालीं अशा रीतीनें फार चैनींत घालवलें आम्हीं! मास्तरांचें आमचें चांगलेंच जमलें. आम्हाला मास्तर आवडूं लागले आणि आम्हांला वाटलें कीं, मास्तरांनाही आमचा वर्ग, आमच्यापैकीं बऱ्याच जणींत असणारा एक प्रकारचा पोरकटपणा, पसंत पडला असावा. पांचवी पास होऊन वरच्या वर्गांत जाण्याची वेळ आली तेव्हां आम्ही मास्तरांच्या टेबलाभोंवतीं गराडा घातला आणि त्यांना विचारूं लागलों—' मास्तर, आतां नव्या मुली येणार तुमच्या वर्गांत. त्यांना आम्हीं कुचकामी म्हणूनच सांगणार का हो तुम्ही?" कोणाची स्पष्ट स्तुति करणें मास्तरांच्या गांवींच नव्हतें. तशांत आणि परीक्षेचा निकाल तयार करून आणि शेरे लिहून ते जेरीस आलेले होते. बराच वेळ आमची गडबड त्यांनीं ऐकून घेतली आणि मग संकट टाळण्याची युक्ति म्हणून म्हणतात कसे—" परांजपे, पाणंदीकर आतां मोठ्या झालांत तुम्ही! आतां सहावीच्या वर्गांत जाणार. आतां असे लहान मुलांसारखे वेडेवांकडे प्रश्न विचारणें बरें दिसत नाहीं, नाहीं का?"

सहावीच्या वर्गांत मास्तरांनीं आमचा एकही विषय घेतला नाहीं. सातवींत मास्तर आमच्या भूगोलावर होते. सातवींतला भूगोल गोखले मास्तरांनीं घ्यावयाचा ही बरीच जुनी प्रथा होती; पण मास्तरांना वाङ्-

मयाची जशी मनापासून आवड होती तशी भूगोलाची नव्हती. भूगोल कसा तरी भरकटून घेत. "कधीं "मास्तर, हें नीट कळलं नाहीं. जरा समजावून सांगा" असें म्हटलें तर ते सांगत—"कांहीं हरकत नाहीं. हाच भाग ह्या वर्षात दोन-तीनदां घेणार आहे मी. तेव्हां पुढें केव्हां तरी नक्की समजेल तुम्हांला तें." आणि खरोखरच सातवींतल्या एका वर्षात, उत्तर व दक्षिण अमेरिका तीनदां तरी झाल्या.

पण सातवींतलें मास्तरांचें आमच्याशीं वागणें फार बदललें होतें. पूर्वीचा तो मोकळेपणा, आमची थट्टा, हें त्या मानानें कांहींच राहिलें नव्हतें, आणि त्यामुळें आम्हांला फार चुकल्या-चुकल्यासारखें होई. पांच महिने गेल्यावर आम्हीं हिय्या करून एक दिवस मास्तरांना विचारलेंच, "मास्तर, पांचवीच्या वर्गातील मौज सातवींत येत नाहीं. तुम्ही गप्पा मारत नाहीं! आमच्याशीं बोलत नाहीं, असं कां?" ह्या विकट प्रश्नाचें उत्तर देण्याची मास्तरांनीं बरीच टाळाटाळ केली; पण आम्हीं आमचा हेका सोडला नाहीं. शेवटीं त्यांना उत्तर द्यावें लागलेंच. "हें पहा पांचवींत मुली लहान असतात, पुढें सहावींत एकदम त्यांना शिंगं फुटतात. मग कशाला जा त्यांच्या वाटेला?" हें एकदां ऐकल्यावर मास्तर थोडे विरघळले; पण पांचवींतली मौज वेगळीच होती!

[—बालिकादर्श—रौप्यमहोत्सव—ऑक्टोबर १९४२]



## ९ : : : मामा

आम्ही सगळींजणं त्याला ' मामा ' म्हणत असूं. आजींचा मामा, आईचा मामा, आम्हां मुलांचाही मामा, असें तीन पिढ्यांचें ' मामापण ' त्याच्यांत होतें. त्याचें खरें नातें काय, ह्याची आम्हां मुलांपैकीं कोणालाच नीटशी कल्पना नव्हती. तो आजींचा दूरचा मामा लागे म्हणे ! पण वयानें त्यांचा लहान भाऊ शोभेल इतपत होता.

तो आमच्या आजोळींच असे. कोंकणांतून शिक्षणासाठीं म्हणून आजींच्या आश्रयाला आला. शिक्षण फारसें झालेंच नाहीं, पण आजोबांनीं त्याला कुठेंतरी कारकुनाची नोकरी लावून दिली. एक दीड वर्ष त्यानें कशीबशी नोकरी केली; पण रोज कांहीं ना कांहीं कुरकुर चाले. साहेब ' मिस्टर ' उपपद न लावतां नुसतीच हांक मारतो, सही करतांना आपल्या नांवापाठीं ' मिस्टर ' असें मोठ्या अक्षरांत आपण लिहिलें तरी त्याची चूक त्याला पटत नाहीं, मुंबईचें स्पेलिंग व्यवस्थित Mumbai असें केलें तर वसकन् अंगावर ओरडतो, अशासारख्या कागाळ्या येत असत. एक दिवस अशीच कांहीं चूक झाली अन् साहेबानें ' You d—d fool ' असें रागांत म्हटलें. मामाला वाटलें, ' आतां कहर झाला ! केवढा

अपमान हा! कारकून झालों म्हणून काय शहाण्यांतून उठलों?' आणि त्याच रागांत त्यानें नोकरीचा राजीनामा देऊन टाकला. आजोबा-आजींनीं किती समजूत घातली! मण मामा अगदीं हट्टासच पेटला होता. त्याच्या हट्टापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं.

नोकरी सुटली, शिक्षण तर खुंटलेलेंच होतें. वास्तविक तो कोंकणांत परत जायचा. पण त्याच्या जवळच्या नात्याचें असें कोणीच उरलेलें नव्हतें. आई-वडील दोघेंही अगोदरच वारलीं होतीं. त्याचें लग्नही झालेलें नव्हतें. मामा सुट्टींत कोंकणांत गेला असतांना, त्याच्या आईनें लग्नाची गोष्ट काढली, कीं डोक्यांत राख घालून मामा दोन-दोन दिवस घरांतून फरारी होई. शेवटीं त्या माउलीनें तो नाद सोडून दिला आणि एखाद्या गरीब मुलीला आडांत ढकलण्याचें पाप आपल्या माथीं घेतलें नाहीं. त्याला दुसरा कोणताच पाश नसल्यानें नोकरी सुटल्यावर आजींनीं आमच्या आजोळींच त्याला ठेवून घेतलें.

त्याला आजोबांच्या घराण्याविषयीं अत्यंत अभिमान वाटे. 'भांडारकर' ह्या आडनांवांतच त्याच्या दृष्टीनें कांहीं जादू असावी अन् त्या जादूनें तो भारल्यासारखा होई! त्यामुळें आजोबांच्या मुलांच्या मुलांत आणि मुलींच्या मुलांत तो फार भेदभाव करी. तसा प्रेमळ होता तो. सगळींच मुलें त्याला प्रिय होतीं, पण आमच्या मामेभावंडाला तो अगदीं डोक्यावर चढवून ठेवी. याबद्दल कधीं त्याच्यावर रागावलें कीं तो म्हणे, "मग त्यांत काय झालं? किती केलं तरी तुम्हीं दारचीं, हीं आमचीं मुलं घरचीं. तुमचं मोठेपण तुमच्या बापाच्या घरीं!" आजोबांनीं एकदां विनोदानें आपल्या नातवंडांत 'घरचीं' आणि 'दारचीं' असा भेद केला होता; पण मामाला तें मोठें ब्रह्मवाक्यच वाटे. त्याच्या 'घरच्या' भाचरांनीं आमची कांहीं खोड काढली कीं मामानें अगदीं कौतुकानें पाहात उभें राहावें. माझा मामेभाऊ मधू जरा उनाडच. त्याच्या हातीं आमचें एखादें खेळणें लागलें कीं तें

सहीसलामत कधीं सुटत नसे. अशा वेळीं मामा जवळ असला कीं त्यानें म्हणावें–‘ मधू, अवघा तीन वर्षांचा; पण भांडारकर घराण्याचा बाणेदारपणा त्याच्यांत आहे हं पुरेपूर ! आतां भांडून कमळीची बाहुली हिसकावून घेतली आहे, तिचे हातपाय मोडून डोकं धडापासून वेगळं करीपर्यंत जेवणखाण कांहीं सुचायचं नाहीं त्याला ! ’ इतकें कौतुक झाल्यावर लहानग्या मधूनें आपला हट्ट जोरांत चालू ठेवला तर त्यांत कांहीं नवल नाहीं.

आजींचा मामावर अतिशय लोभ, आणि तोहि त्यांच्या हाताशीं राहून त्यांचीं वरींचशीं कामें करून देई. त्यामुळें स्वयंपाकघर, माजघर ह्यांतच त्याचा वावर अधिक. आजींना जेवणांत भारी खोड असे. सगळें व्यवस्थित असलें, अळणी-खारट कांहीं नसलें, तरच त्यांना जेवण जाई. तेव्हां पानावर बसल्यावर त्या मामाला सर्व पदार्थ चाखून पाहायला सांगत आणि ‘ सर्व उत्तम ’ म्हणून त्यानें निकाल दिला कीं आजींच्या जेवणाला सुरुवात होई. पण कधीं कधीं मामाला वात्रटपणा करण्याची लहर येई. आमटींत मीठच नसलें कीं मामानें म्हणावें–‘ आज आमटी काय छान झाली आहे ! ’ आणि जोरांत दोन-तीन भुरके मारावे. आमटी खरीच चांगली झाली म्हणून बिचाऱ्या आजींनीं आपणही एक भुरका मारावा आणि तोंड आंबट करून म्हणावें-‘ जळ्ळं मेल्याचं लक्षण ! तुलासुद्धां पोरासारखी थट्टा सुचते का रे अजून ? ’

आजींना मामा आपल्या मुलासारखाच वाटे, आणि त्याच्या आईनें सोडून दिलेला त्याच्या लग्नाचा ध्यास त्यांना लागे. एकदां त्यांच्या कानावर एक स्थळ आलें. मुलीचें घराणें चांगल्यापैकीं; पण स्थिति मात्र अत्यंत खालावलेली. त्यामुळें मुलगी चांगली वाढलेली असून, रूपानेंही बरी असून, तिचें कुठें कांहीं जमत नव्हतें. आजींना वाटलें हा बरा योग आहे, दया येऊन तरी मामा ह्या लग्नाला तयार होईल. त्या मुलीच्या घरच्या हलाखीच्या परिस्थितीचें तोंडभर वर्णन करून त्या मामाला

म्हणाल्या, ‘ बघ मनांत आणशील तर, मुलगी आहे नक्षत्रासारखी; पण गरिबीनं गांजलेली. पोटभर अन्नसुद्धां मिळत नाहीं बिचारीला ! ’ मामानें हळूच विचारलें–‘ मुलीला भाऊ आहे कीं नाहीं ? ’ एकदम नकार न देतां, मामानें मुलीविषयीं एवढें कुतूहल दाखविलें. आजींना वाटलें निम्में काम झालें. त्या उत्साहानें म्हणाल्या–‘ आहे रे एक भाऊ तिच्या पाठ-चाच, पण काय त्यालाही नोकरी नाहीं, कांहीं नाहीं.’‘मग तोही उपाशी एका-पोटीच राहतो कीं काय ?’ मामानें विचारलें. आजींना वाटलें अडेलतट्टू, पण हललें, तेव्हां ही संधि दवडतां कामा नये. त्यांनीं जोरांत सांगितलें–‘ तर रे काय ! काय करील बिचारा ? म्हणून म्हणतें बघ विचार करीत असशील तर ? ’ पण मामाचा डाव दुसराच होता. तो एकदम म्हणाला–‘ होय ना आक्का, मग आपली ताईच तिथें देऊन, त्या मुलाला घर-जांवईच करून घे ना ! तेवढंच त्यांचं ओझं कमी होईल. ’ ताई, आमच्या थोरल्या मामांची मुलगी, अगदीं सर्वगुणसंपन्न अशाच वराला द्यायची हा आजींचा कृतनिश्चय. कोणी कितीही चांगलें स्थळ सांगितलें तर त्या नाक मुरडत अन् कांहीं ना कांहीं दोष काढून पुढें खटपट करीत नसत. आणि आतां असा हा भणंगभिकारी वर मामानें तिच्यासाठीं योजला ! मग आजींनीं अगदीं शेलक्या कोंकणी शिव्यांचा त्याला अहेर केला तर नवल काय ? भोंवतालच्या मंडळींची चांगलीच करमणूक झाली. पण आजींच्या रागापुढें कोणाचीच हंसण्याची प्राज्ञा नव्हती. मामा मात्र विजयी मुद्रेनें सर्व मुकाट्यानें ऐकून घेत होता.

आजींचा स्वभाव जरा कडक. त्यामुळें आम्ही सर्वजण त्यांना भीत असूं. पण मामा माहेरचेंच कुळ असल्यानें त्याला इतरांहून जास्त सवलती मिळत.

एकदां दाराला पडदे लावण्याची नवीन टूम निघाली. आजोबा नुकतेच विलायतेहून आले होते. तिथली गृहव्यवस्था त्यांना फार पसंत

पडली होती. पडदे लावण्याची ही कल्पना त्यांनींच आजींना सुचविली असावी. आजी ताबडतोब लागल्या तयारीला ! दुपारीं चहा झाल्यावर आम्ही मधल्या दिवाणखान्यांत बसलों होतों. तेव्हां आजींनीं पडद्यासाठीं दारांचीं मापें घ्यायला सुरवात केली. उंचीचें माप घेतलें कसेंबसें. आतां रुंदीचें माप घ्यायचें. पडदा दाराच्या चौकटीच्या वरच्या बाजूस लागायचा, तेव्हां त्या टांचा उंच करून तिथले माप घेण्याची धडपड करूं लागल्या. पण तें कांहीं नीटसें जमेना. मामा बसून पाहत होता आणि गालांतल्या गालांत हंसत होता. आजींचें त्याच्याकडे लक्ष गेलें आणि कांहींशा रागांतच त्याला म्हणाल्या–'हंसत काय बसला आहेस ? हें माप घेणं सोपं काम नाहीं. ऊठ आणि घे पाहूं तूंच हें माप.' मामाला तरी काय, तेंच हवें होतें ! तो दाराजवळ गेला, खालीं उकिडवा बसला आणि दाराच्या चौकटीच्या खालच्या पट्टीचें व्यवस्थित माप घेतलें. मग आमच्या सर्वांच्याच डोक्यांत प्रकाश पडला कीं पडदा जरी वरून लागायचा, तरी चौकटीच्या वरच्या अन् खालच्या पट्टीचें माप सारखेंच ! तेव्हां खालच्या पट्टीचें माप घेतलें तरी भागण्याजोगेंच आणि तें माप घेणेंही अधिक सोईचें. आजींनीं टांचा उंच करून जी इतकी धडपड केली, त्याची जरूर कांहींच नव्हती. मामाच्या अगोदरच ध्यानांत आलें होतें हें, पण वेळेवर बोलला तर तो मामा कसचा ? आजींचा हुकूम झाल्यावंर इतक्या सफाईनें आणि सहजगत्या त्यानें काम केलें कीं, जमलेल्या सर्वांना मोठी मौज वाटली. आजींना मात्र अगदीं ओशाळल्यागत झालें आणि त्या म्हणाल्या–'चूक झाली खरी, नाहीं आलं माझ्या ध्यानांत; पण तुला अगोदर बोलायला काय झालं होतं रे ?'

मामा बायकांत आणि घरांतल्या बाळगोपाळ मंडळींत विशेष प्रिय होता. त्याचं एक कारण म्हणजे गोष्टी रंगवून सांगण्याची त्याची हातोटी. खुशींत असला म्हणजे एकामागून एक गोष्ट सांगे. आपल्या सगळ्या गोष्टी प्रत्यक्ष घडलेल्या हकीकती म्हणून तो सांगे. त्याच्या गोष्टींत तसं मुद्द्याचं

कांहींच नसे. त्यामुळं पुरुषमंडळींत त्याच्या गप्पागोष्टींचं विशेष कौतुक होत नसे. माजघरांत किंवा ओसरीवर बायकांमुलांसमोर त्याच्या गोष्टींना रंग भरे. मामाची गोष्ट म्हणजे नुसती कानानं ऐकायची नसे; तर डोळ्यांनीही पाहण्याजोगी असे. गोष्टीचं खरं स्वारस्य त्याच्या हावभावांतच असे. गोष्ट सांगतांना तो इतका रंगून जाई कीं, त्याला कशाचीच शुद्ध राहत नसे. आम्ही सर्व त्याच्या पाठीला लागून तीच तीच गोष्ट पुनः पुनः सांगून घेत असूं

त्याची उंदराची गोष्ट सर्वांच्या आवडीची. संध्याकाळीं ओसरीवर बसलों असतां आम्हीं म्हणावं, "मामा, अरे तुझी उंदराची गोष्ट सांग ना !' लहर असली तर मामा चटकन् सुरुवात करी–"त्याचं असं झालं, आम्ही तेव्हां त्या धोंडयाच्या माडींत राहत होतों. एक दिवस मला घरीं यायला रात्र फार झाली, आणि अंधारांत एका उंदरावर पाय पडला. कोंकणी नाल लावलेली व्हाण पायांत; तेव्हां शेपूटच गेली त्याची तुटून !"—(एका बोटावर दुसरें बोट ठेवून शेपूट तुटण्याची अविर्भाव)–मग म्हणे, त्या उंदरानं चंग बांधला कीं आपली शेपूट तोडली, आतां आपले दांत दाखवायचे. रात्रीं सामसूम झाल्यावर, अचूक मामाला शोधून कसा कडकडून चावला म्हणे त्याच्या पायाला ! (आपण अंथरुणावरून पाय धरून कसे उठलों ह्याचें एक नाटक होई). मामानं उठून दिवा लावायच्या आंत उंदीर पसार !चार-पांच रात्रीं लागोपाठ हाच प्रकार. मामानं निजावयाची जागा बदलली, आपल्या दोहीं बाजूंना दुसऱ्या दोघांना निजविलं तरी रोज रात्रीं उंदीर नेमका त्याच्याच पायाला येऊन चावे ! शेवटीं मामानं निश्चयच केला कीं, आज उंदराचा मुडदा पाडायचा. दिवा बारीक जळता ठेवून सर्व मंडळी बिछान्यांत पडली. रात्रीं दोन वाजतां उंदीर आला आणि लागला मामाच्या पायाला. मामा जागाच होता. त्यानं झट्दिशीं दिव्याची वात मोठी केली, सर्वांना तयार राहण्याचा हुकूम सोडला अन्

एक काठी लगावली. काठ्यांनीं सुसज्ज असे सगळे वीर समरांगणावर उतरले. आत्याबाई व मावशींकडे कड्या तुटलेलीं दारं धरून बसण्याची कामगिरी आली. मग झाली युद्धाला सुरुवात. वीरांनीं काठ्या लगावल्या कीं उंदीर दारावर जाऊन आपटे, नाहीं तर आत्याबाई अन् मावशींच्या पायावर लोटांगण घेई. मग त्या किंचाळल्या कीं मामा आर्जवं करी– ' आत्या, दोन मिनिटं दम धरा ! हा आलाच लेकाचा तावडींत ! ' अशी बरीच धामधूम झाल्यानंतर उंदीर अर्धमेला होऊन पडला. मग मामाला दुप्पट चेव आला. ' हं, आतां सरा बाजूला तुम्ही सगळे ! माझ्यावर सूड धरतो, आतां करतों ह्याची रेवडी ! ' असं म्हणून त्या उंदरावर पांच-सहा तडाके लगावले, आणि तो पुरा मेला ही खात्री झाली तेव्हां त्याचा जीव खालीं पडला.

ही गोष्ट सांगतांना मामा हवेंतल्या हवेंत काठीचे तडाके देई, उंदरासारखा धांवून दाखवी, बायकांसारखे हातपाय झाडी, किंचाळे ! मामाची गोष्ट म्हणजे एक बोलता चित्रपटच असे.

मामाचं शिक्षण बेताचंच झालेलं असावं, तरी त्याला वाचनाची फार आवड. आजोबांच्या वाचनालयांतील बहुतेक सारीं मराठी पुस्तकं त्यानं वाचलीं होतीं. दुपारच्या वेळीं आजींना कांहीं तरी वाचून दाखवायचं. ही कामगिरी त्याच्याकडे होती. त्याचा आवडता ग्रंथ म्हणजे चिपळूणकरांचं भाषांतरित केलेलं महाभारत. त्यावरून त्यानं बनवलेलीं मतं व्यासऋषींना कळतीं तर त्यांना धक्काच बसला असता, आणि असला ग्रंथ आपल्या हातून लिहिला गेला, त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याचीच जरुरी भासली असती.

मामाच्या मतें महाभारतांत नीच–खलपात्र–कोण तर श्रीकृष्ण, आणि पांच पांडव हे त्याचे साथीदार ! त्यांच्या एकेक नीच कृत्यांचा पाढा वाचतांना मामाला असा जोर येई ! शिरा ताणून आपल्या गगनभेदी आवाजांत मामा एकेका प्रसंगाची चर्चा करी. जरासंधाचं आणि भीमाचं

युद्ध. भीम आपल्या तोडीचा म्हणून जरासंधानं त्याला युद्धाचं पाचारण केलेलं. भीमाला जरासंध आटपत नाहीं म्हटल्यावर खुणेनं कृष्णानं त्याला मारण्याची युक्ति भीमाला सुचवावी, हें काय धर्मयुद्ध झालं ? तसेंच भूरिश्रव्यानें सात्यकीला जेरीस आणून त्याची शेंडी पकडली असतां कृष्णानं अर्जुनाला भूरिश्रव्यावर पाठीमागून वार करण्यास सांगावं, ही काय युद्धनीति झाली ? धर्मराज मोठे सत्याचे चाहते, आणि अश्वत्थामा मेला असं सांगून द्रोणाचार्यांची, आपल्या गुरूची, फसगत करायची ? कर्णार्जुनाच्या युद्धांत कर्ण निःशस्त्र झाला, अशा वेळीं अर्जुनाला युद्ध चालू ठेवण्याची आज्ञा श्रीकृष्णानं द्यावी म्हणजे नीति, न्याय, धर्म ह्याची कांहींतरी चाड बाळगली ? त्याच्या मतें कर्ण हाच महाभारतांतील नायक, औदार्य, शौर्य हे गुण त्याच्यांतच उठून दिसतात. आज कर्णालाच नायक बनवून ‘ महारथी कर्ण ’ ह्यासारखा बोलपट निघाला, हें मामाच्या स्वर्गस्थ आत्म्याला कळलं असेल तर त्याला अत्यंत समाधान वाटलं असेल.

पुराणांतील देवादिकांसंबंधीं मामाची अशीच चिकित्सक दृष्टि असे. समजूं लागल्यापासून तो सहसा देवळांत कधीं गेलाच नाहीं. सर्व देवांचा तो एकेरी नांवानं, आणि कांहींशा तुच्छतेच्या वृत्तीनं उल्लेख करी. कवळ्याची शांतादुर्गा (आजोबांचं कुलदैवत) ‘ शांति ’ मंगेशीचा मंगेश म्हणजे ‘ मंग्या ’ वगैरे. ह्या त्याच्या धर्मभ्रष्ट वृत्तीवरून तो अनेक वेळां आजी-कडून बोलणीं खात असे. तरीसुद्धां–‘ आक्का, आज मंग्या आडवा आला बघ मला,’ असं म्हणण्याची लहर येईच त्याला. मग आजी काय बोलतील तें ऐकून घेण्याची तयारीही असे.

मामाचें आणिक एक विचित्र मत म्हणजे मनुष्यप्राणी हा सृष्टींतील सर्वांत नीच प्राणी ! मुकीं जनावरं माणसांहून किती तरी उच्च मनोवृत्तीचीं; माणसांतला दुष्टपणा, मोहवशता, कपट त्यांच्यांत नाहीं. ह्या मतावर मामाची मोठीं प्रवचनंच चालत असत. ‘ असा गाढवासारखा काय

वागतोस, ' असं कोणाला म्हटलें कीं, मामाला सात्त्विक संताप येई. ' गाढवासारखा वागला तर पुष्कळ बरं ! ' तो म्हणे, 'गाढवाइतकं सालस, गरीब जनावर कुठं आढळायचं नाहीं. उगाच त्याच्या नांवानं कां खडे फोडतां ? ' त्याचप्रमाणं घरच्या कुत्र्यानं कांहीं हुशारी दाखविली आणि खूष होऊन कोणी म्हटलें कीं, ' ह्या टिप्याला अगदीं माणसाची अक्कल आहे हं ' कीं मामा म्हणे—' एका बाजूनं कौतुक करून, दुसऱ्या बाजूनं अशी थप्पड कां लगावतां ? टिप्याची अक्कल कुत्र्याची; नीच वृत्तीच्या मनुष्यप्राण्याची नव्हे ! '

हा टिप्या म्हणजे मामाचा जीव कीं प्राण ? आम्ही त्याला ' मामाचा लेक ' असंच म्हणत असूं, आणि मामाही ' चिरंजीव ' म्हणूनच त्याचा उल्लेख करी. टिप्यासाठीं त्यानं स्वतःच एक गादी शिवली होती, आणि टिप्या रोज त्याच्याच उशाशीं झोंपत असे. पावसाळ्यांत अगदीं नवीन पद्धतीचा पावसाळी कोट, थंडीसाठीं शालीची बंडी (दोन्ही वस्तु मामानं स्वहस्तानंच बनवलेल्या) अशी टिप्याची ऐट असे. रोज सकाळ-संध्याकाळ मामा टिप्याला घेऊन परसांत हिंडत असे. टिप्याशीं अनेक प्रकारच्या गप्पा चालत. तोही गुलाम आपल्याला सर्व कांहीं समजतं, आणि आपलीं मतं मामाच्या मतांशीं तंतोतंत जुळतात असाच आव आणी ! टिप्याशीं बोलायचं म्हणजे मामाच्या आवाजांत वेगळंच मार्दव येई. टिप्यानं कितीही खोड्या केल्या, मामाचीं धोतरं दांतांत धरून फाडलीं तरी ' काय रे टिप्या, असं धोतर फाडतात होय ? ' एवढेच उद्गार मामाच्या तोंडून निघत.

एक ना दोन, मामाच्या आठवणी सांगाव्या तितक्या थोड्याच ! आमच्या आठवणींत तरी मामा कांहीं कधीं आमचं आजोळ सोडून कुठं गेला नाहीं. आजोळीं सुटींत जायचं म्हणजे आनंद वाटायचाच; पण त्यांत विशेष भर पडे ती मामा भेटणार, त्यांच्या गोष्टी ऐकायला मिळणार ह्या विचारानं ! आजींची कळ काढण्याचं धाष्टर्य एकट्या मामांतच होतं;

अनुक्रमांक 23463 दि: 10.05
क्रमांक 9135 नों. दि. 6/8/58

त्याचीही आम्हांला मोठी मौज वाटे. आजोळीं गेलों कीं, फाटकापाशींच आमचं स्वागत करण्यास मामाची स्वारी हजर असे. ठेंगू आणि किंचित् स्थूल अशी त्याची मूर्ति, काळासांवळा भरीव देह, फाटकं अनेक ठिकाणीं शिवलेलं धोतर, व्यवस्थित गांठ मारलेली शेंडी, पुढचे दांत पडल्यानं पसरट झालेलं तोंड, डोळ्यांतली खोडकर हास्याची चमक असं मामाचं यथासांग दर्शन घडलं कीं आलों आतां आजोळीं असं वाटून आनंद होई आणि प्रवासाचा शीण केव्हांच उतरून जाई.



मामाचा स्वभाव फार आनंदी. त्यामुळं तो सर्वांना हवासा होता. पण विचार करूं लागलं तर आनंद मानण्याजोगं असं त्याच्या जीवनांत काय होतं ? त्याच्या हक्काचं असं कोण होतं ?—आमच्या आजींचं आणि त्याचं नातं तसं पाहिलं तर किती दूरचं. त्याच्या आयुष्याला ध्येय कांहीं नव्हतं, कशाची ओढ नव्हती. कशावर त्याची सत्ता नव्हती. पैसा, मानमरातब, मुलाबाळांचं किंवा इतर गृहसौख्य हें कांहींच त्याच्या वांट्याला आलं नव्हतं. पण त्याला कशाचीच पर्वा नव्हती. तो नेहमीं म्हणे—'एकटा जीव सदाशिव ! म्हणेन तर सगळं जग माझं; नाहीं तर कोणी नाहीं.' आणि ह्याच विचारानं त्याची आनंदी वृत्ति कधींच ढळली नाहीं.

[महाराष्ट्र-सारस्वत १ एप्रिल १९४७]

---

('मामा' ही व्यक्ति खरी नाहीं; पण केवळ काल्पनिक अशीही नाहीं. तीच गोष्ट ह्या स्वभावचित्रांत उल्लेखिलेल्या इतर व्यक्तींची.)

## १० : : : मास्तर

गांवांतल्या मंडळींचा निरोप घेऊन दिवे-लागणीला मास्तर घरीं परतले. दुसऱ्या दिवशीं सकाळींच ते तीस-पस्तीस वर्षें आपलें म्हणून मानलेलें गांव व आपली शाळा कायमची सोडून जाणार होते. गेले आठ-दहा दिवस निरोपाचे कार्यक्रम आणि सामानाची आवराआवर ह्याच उद्योगांत गेले होते. आज, शेवटच्या दिवशीं, ते निरोप घ्यावयास गेले असतांना बिऱ्हाडांतल्या सर्व सामानाची बांधाबांध त्यांच्या पत्नीनें व दोघां मुलांनीं करून ठेवली होती. घरीं आल्यावर गोणपाटांत बांधलेलें सामान पाहून आधींच विषण्ण असलेलें मास्तरांचें मन अधिकच दुःखी झालें. वापरांतलें सामान बांधून इतस्ततः पडल्यानें घरावर एक प्रकारची निर्जीवतेची अवकळा आली होती. मास्तरांनीं भिरभिरत्या नजरेनें आपली संवयीची आरामखुर्ची शोधली. ती सामानांत बांधली न जातां, व्हरांड्यांतल्या आपल्या ठराविक जागीं नेहमींसारखी मोकळीच आहे, हें पाहून त्यांनीं समाधानाचा एक निःश्वास सोडला आणि पत्नीला विचारलें, "ही माझी खुर्ची नाहीं बांधली सामानांत ?"

काकूंनीं अगदीं सहजपणें उत्तर दिलें, "होईल कीं उद्या सकाळीं बांधायला. गाडीवर सामान चढतंय तोंवर सदाशिव बांधून घेईल हो !"

मास्तरांचा जीव हलका झाला आणि त्या खिन्न मनःस्थितींतहि त्यांना एक प्रकारचें समाधान वाटलें. आज कित्येक वर्षें थकून-भागून घरीं आले कीं रोज संध्याकाळीं व रात्रीं ह्या खुर्चीवर बसून ते आराम करीत. पत्नीची व मुलांची वास्तपूस झाली, घरगुती गप्पा आटपल्या कीं ह्याच खुर्चीवर बसून ते आपलें रोजचें वाचन करीत व वाचन आटपलें कीं पुस्तक बाजूला ठेवून विचारांत दंग होत. हे विचार बहुधा आपली 'शाळा व तिचा विकास' ह्याचभोंवतीं गुंतलेले असत. आज बाहेर जातांना त्यांच्या ध्यानांत आलें होतें कीं, खुर्ची एकदां सामानांत बांधली गेल्यावर शेवटच्या रात्रीं आपल्याला नेहमींसारखें तिच्यावर बसायला मिळणार नाहीं. ह्या विचारानें ते बेचैन झाले होते. पण आपल्या संयमशील मनाला त्यांनीं शिस्तीचा धडा शिकविला होता. 'शाळा सोडायची, आपलं मानलेलं गांव कायमचं सोडायचें, आवडत्या विद्यार्थ्यांचा, गांवातल्या लोकांचा वियोग सहन करायचा हा कठीण निश्चय तूं केलास, आणि एक दिवस आपल्याला खुर्चीवर बसायला मिळणार नाहीं म्हणून डगमगतोस तूं ?'— शिस्तींत वाढलेलें त्यांचें मन स्थिरावलें. त्यांनीं सामानांत खुर्ची बांधूं नका, असें एका शब्दानेंहि कुणाला सांगितलें नाहीं. पण आपल्या पत्नीनें व मुलांनीं, आपण कांहींएक न सांगतां, आपली मनीषा ताडून घेतली आणि ती पुरी करण्याचा यत्न केला ह्याची जाणीव होऊन, त्यांचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून आलें आणि डोळे ओलावले.

कोट-टोपी उतरून ते खुर्चीवर विसावले. पत्नी व मुलें सामानाच्या आवराआवरींतच गुंतून राहिलीं आणि त्यांना हवा असलेला एकान्त मिळाला. असे एकटेच बसले असतांना त्यांच्या डोळ्यासमोरून त्यांच्या जीवनाच्या मागल्या पस्तीस वर्षांचा चित्रपट सरकूं लागला. पस्तीस वर्षां-

पूर्वी मास्तर ह्या गांवीं प्रथम आले. लहानसें आडगांव तें, तिथली माध्यमिक शाळाहि लहानच ! वास्तविक त्या काळांत कोणीहि पदवीधर तरुण नोकरीसाठीं सहजासहजीं अशा आडगावांत जाणें शक्य नव्हतें. पण गांवकऱ्यांनीं उत्साहानें काढलेली शाळा बंद होण्याचा प्रसंग आला तेव्हां कुणी जाणत्यानें ' स्वार्थत्यागी वृत्तीचा कर्तबगार तरुण ' म्हणून मास्तरांची शिफारस केली आणि गांवकऱ्यांनीं आग्रहानें मास्तरांना शाळेचे हेडमास्तर म्हणून बोलावून घेतलें. मास्तर ह्या गांवीं आले तेव्हां शाळा अगदीं डबघाईला आली होती; पण मास्तर आले तें तनमनधन शाळेस वाहाण्याच्या निर्धारानें ! त्यांनीं जिवापाड मेहनत केली आणि अवघ्या तीन-चार वर्षांत शाळा चांगली नांवारूपाला आणली. इन्स्पेक्टरांचे शेरे उत्तम मिळालेच; पण मुख्य म्हणजे मास्तरांनीं गांवकऱ्यांचा विश्वास संपादन केला. त्यामुळें ते आपलीं मुलें शिक्षणासाठीं बाहेर न पाठवितां आपल्या गांवच्या शाळेंतच पाठवूं लागले. शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या भराभर वाढूं लागली आणि शाळा ही गांवकऱ्यांच्या अभिमानाचें स्थान होऊन बसली.

शाळेची होत असलेली भरभराट पाहून गांवकऱ्यांनीं शाळेसाठीं स्वतंत्र इमारत बांधण्याचें ठरविलें आणि त्यासाठीं निधि जमा केला. ह्या निधीला गांवांतील सर्व मंडळींचा हातभार लागला होता. एकदां शाळेची इमारत बांधावयाची कल्पना निश्चित झाल्यावर प्रत्येकानें आपापल्या ऐपतीप्रमाणें कांहीं ना कांहीं दिलें होतें. मास्तरांना काय, किंवा इमारतीच्या समितीच्या सभासदांना काय, गांवाबाहेरचा कुणी धनाढ्य गृहस्थ गांठावा लागला नव्हता कीं कुणापुढें मदतीसाठीं हात पसरावा लागला नव्हता. गांवकऱ्यांच्या सदिच्छेच्या जोरावरच पै-पैसा येऊन निधि उभा राहिला होता. इमारतीसाठीं जागा निवडण्यापासून ते प्लॅन होऊन इमारत पुरी होईपर्यंत शाळा बांधण्याचें काम मास्तरांच्या सल्ल्यानेंच झालें

होतें. गांवाला लागून असलेल्या माळावर इमारतीचा पाया घातला. पायाभरणी झाल्यावर छप्पर चढून रंग-रंगोटी होईपर्यंत मास्तरांच्या दररोज दोन फेऱ्या तरी शाळेवर होतच. शाळा अशी नमुनेदार बांधली कीं, शिक्षणाच्या अद्ययावत् गरजा उत्तम रीतीनें तर भागाव्या, पण शाळेची इमारत, गांवांतील घरबांधणी व रचना ह्यांच्याशीं विसंगत वाटूं नये. शाळा गांवांत उठून दिसली तरी गांवाला शोभून दिसे.

मास्तरांनीं शिक्षणाविषयींच्या आपल्या नवनवीन कल्पनांना शाळेच्या इमारतींत मूर्त स्वरूप दिलें होतें. त्या काळांत दूरदृष्टीनें व्यवसाय-शिक्षणाचें महत्त्व जाणून घेऊन, त्यांनीं सुतारी, चित्रकला-शिक्षण शिकविण्यासाठीं सर्व सोयींनीं परिपूर्ण अशा मोठमोठ्या खोल्या बांधून घेतल्या होत्या. गांवांतली मंडळी हरहुन्नरी होती आणि कलेची व कारागिरीची आवड उपजतच त्यांच्यांत होती; तें पारखूनच मास्तरांनीं शाळेंतल्या बौद्धिक शिक्षणांत ह्या व्यवसायासहि स्थान करून दिलें होतें. त्या वेळच्या शिक्षणांत हें नवीनच होतें. शाळेपुढें प्रशस्त आवार होतें आणि एका बाजूला सुंदर बाग बनविली होती.

शाळेच्या इमारतीच्या सजावटींत गांवाचें सौंदर्य व गांवकऱ्यांची कलेची आवड हीं एकवटून आलीं होतीं. मास्तरांच्या अभिजात कलाभिरुचीनेंच हें साधून घेतलें होतें. शाळेची इमारत पुरी झाल्यावर गांवकऱ्यांनीं आपण होऊनच कृतज्ञताबुद्धीनें शाळेजवळच हेडमास्तरांसाठीं म्हणून एक टुमदार बंगली उभारली होती. मास्तर ह्या घरांत तीस वर्षें राहिले होते आणि येथूनच त्यांनीं शाळेच्या आणि गांवाच्या जीवनाचीं सूत्रें हालविलीं होतीं. आडगांवांतल्या माध्यमिक शाळेचा हेडमास्तर आणि तोहि मास्तरांसारखा उत्साही, कर्तबगार व ज्ञानाविषयीं, गांवाविषयीं जिव्हाळा वाटणारा असा असला तर गांवाचें नेतृत्वहि त्याच्याकडेच येतें.

आजच्या पिढींतले ह्या गांवांतील कर्तबगार स्त्री-पुरुष मास्तरांच्या

तालमींतूनच तयार झाले होते आणि त्यांना अद्यापहि गुरुस्थानीं मानीत असत. मात्र ' मास्तर ' ह्याखेरीज कोणतीहि संज्ञा मानून घेण्यास मास्तर तयार नसत. स्वतःला रावसाहेब वा रावबहादूर म्हणवून घेणें त्यांना पसंत नव्हतें; त्याचप्रमाणें आचार्य वा गुरुजी म्हणवून घेण्यासहि ते तयार नसत. अलीकडे रूढ झालेल्या ' गुरुजी ' शब्दाचा सर्रास वापर पाहून त्यांचें अंतःकरण व्यथित होई. ते म्हणत, " अरे, काय ज्याला-त्याला गुरुजी म्हणतां रे ? आपली गुरुपरंपरा किती उज्ज्वल आहे ! गुरुस्थानीं असलेल्या ऋषिमुनींची सर आम्हांला रे कशी येणार ? उगीच शब्दाचा विपर्यास कशाला बरं करावा ? आम्ही मास्तरच ! " पण त्यांना मास्तर म्हटल्यानें ' मास्तर ' ह्या शब्दाचाच दर्जा उंचावतो आणि ' गुरु ' वा ' आचार्य ' ह्या शब्दांतील सारसर्वस्व त्या शब्दांत येतें, ह्या भावनेनेंच लोक मास्तरांचें म्हणणें कबूल करीत. गांवकऱ्यांच्या, त्याचप्रमाणें मास्तरांच्या आजी व माजी विद्यार्थ्यांच्या मनांत मास्तरांचें स्थान पूर्वकालीन गुरुइतकेंच उच्च व अढळ होतें. प्रेम, आदर, निष्ठा ह्या सर्वच भावना गांवकऱ्यांनीं मास्तरांना वाहिल्या होत्या आणि त्या सर्व कोणत्या तरी अद्भुत किमयेनें ' मास्तर ' ह्या संबोधनांतच व्यक्त होत असत.

नोकरीनिमित्त मोठमोठ्या शहरीं गेलेली मंडळी गांवीं आली कीं, मोठ्या आदरानें आणि भक्तिभावानें मास्तरांना भेटावयास येत. कुणी पायाला हात लावून, मस्तक चरणीं ठेवून नमस्कार करायला लागला कीं, दोन्ही हातांनीं त्याला उठवून मास्तर म्हणत, " अरे, साष्टांग नमस्कार देवाला करायचा; मी यःकश्चित् माणूस. माझ्यापुढं उभ्याउभ्या दोन्ही हात जोडून नमस्कार केलास तरी पुष्कळ झालं. " आणि मग एक नवीनच कल्पना त्यांना सुचे. " देवालाहि नमस्कार आणि माणसालाहि नमस्कार म्हणजे ' सर्वां भूतीं परमेश्वर ' ह्याचीच जाणीव दाखवण्याजोगें आहे. ह्यांत वेदान्ताच्या ' तत्त्वमसि ' ह्या गहन तत्त्वाची प्रचीति दिसून

येते. आमचें तत्त्वज्ञान निव्वळ वेदान्त्यांनीं प्रतिपादिलें नाहीं, तर सामान्य व्यक्तींच्या जीवनाशीं एकरूप झालें, त्यांच्या दैनंदिन व्यवहारांत उतरलें तें हें असें! इतर धर्मांत व त्यांच्या अनुयायांत दिसेल का हा प्रकार, कीं जें अभिवादन देवाला तेंच माणसाला?" मास्तरांशीं गप्पा मारतांना असे ज्ञानामृताचे घुटके आपोआपच मिळत. त्यांच्या विचारांत आपल्या परंपरेचा अभिमान असे आणि एक प्रकारचा ताजेपणा असे. प्रत्येक गोष्टीकडे पाहाण्याची दृष्टि स्वतःची व स्वतंत्र अशी असल्यानें साध्या गप्पांतूनहि कांहींतरी स्फूर्तिदायक कल्पना स्फुरे.

मास्तरांकडे सुटींत बैठकीला मंडळी जमली कीं अनेक जुन्या आठवणी जागृत होत. केशव–आजचे घाटे वकील–प्रथम शाळेंत दाखल झाला तेव्हां कसा ओक्सा-बोक्शी रडे, मग मास्तर त्याच्या अंगावरून हात फिरवून त्याला आपल्याजवळ बसवून घेऊन कसे शिकवीत, ह्याच्या गोष्टी निघत. मग मास्तर म्हणत, "अरे, केशव मोठा वकील झाला आहे आतां! वास्तविक ह्या गोष्टी विसरायला हव्यात आपण. पण कुणाला खरं वाटेल का, कीं आज कोर्टांत उत्तम वक्तव्यानं आणि मुद्देसूद मांडणीनं आपली केस जिंकणारा हा केशव, बाळपणीं असा रडतराऊत होता तें? भित्र्या व लाजवट मुलांसमोर मी नेहमीं ह्याचं उदाहरण ठेवीत असतों. म्हणजे त्यांना जरा धीर वाटतो आपल्या भविष्याविषयीं!" अन् मग त्यांच्या मनांत एक नवीनच शंका उपस्थित होई. कांहींशा साशंक वृत्तीनें ते म्हणत, "पण मी अजून ह्याला 'केशव' म्हणतों, हें बरोबर नाहीं बरं का मंडळी. वास्तविक मी केशवराव म्हणायला हवं त्याला! पण आजच्या ह्या नामांकित वकिलांत मला तो रडवा केशव आणि त्याचा विकास दिसतो. म्हणून मुखावाटें चटकन् 'केशव' हें एकेरी नांवच येऊन जातं." ह्या शंकेचें उत्तर केशवराव वकील आपल्या वकिली चातुर्यानें देत, "मास्तर, तुम्ही आपल्याला आमच्याकडून आचार्य म्हणवून घ्यायला तयार नाहीं अन्

मग आमचीं शाळेंतलीं नांवं कशीं बदलणार तुम्ही? ‘ मास्तर ’ शब्दाबद्दल तुम्हांला आपुलकी वाटते तशीच ‘केशव’ ह्या एकेरी नांवाबद्दल मला वाटते. मी नाहीं तुमच्याकडून केशव म्हणवून घेण्याचा माझा हक्क सोडणार ! ” असें चतुराईचें आणि आपल्यावरचें प्रेम व आदर व्यक्त करणारें उत्तर ऐकलें कीं मास्तरांचें मन आनंदित होई.

नागपूरचे डॉ. चव्हाण पांच-सहा वर्षांनीं कधीं येत. पण आले म्हणजे आपलें शिक्षण पुरें करण्यास मास्तरच कसे कारणीभूत झाले, ह्याचें तोंड-भर वर्णन करीत. जमलेल्या मंडळींपुढें त्या सर्व हकीगतींचा पाढा वाचला जाई. “ तुम्हां मंडळींच्या आतांच्या काळांत लक्षांतहि येत नसेल, पण मी सांगतों मी धोबी जातीचा. आपल्या गांवीं मी चवथीची परीक्षा पास झाल्यावर माझे वडील मोठ्या हुरूपानें मला इथल्या माध्यमिक शाळेंत दाखल करण्यासाठीं घेऊन आले. मास्तरांनीं माझी दहा मिनिटांत परीक्षा घेतली आणि तावडतोब मला इंग्रजी पहिलींत दाखल करून घेतलं. माझ्या वडिलांना नि मला अतोनात आनंद झाला, पण सात दिवसांतच तो आनंद मावळला ! माझी जात धोब्याची असल्यानं ह्या गांवीं कुणीच मला वस्तीला ठेवीना. तीन कोसांवरच्या गांवांत माझ्या आत्याचं घर होतं, तिथं मी राहायला गेलों, पण तीन कोस तंगड्या तोडीत सकाळीं शाळेंत यायचं अन् पुनः संध्याकाळीं शाळा आटपल्यावर तीन कोस चालत जायचं हें माझ्या प्रकृतीला पेलेना. सात दिवस काढले कसेबसे आणि मग मास्तरांना सांगायला गेलों कीं, इंग्रजी शिक्षण कांहीं माझ्या नशिबीं दिसत नाहीं. मास्तरांनीं कांहीं वेळ विचार केला अन् म्हणाले, ‘ अरे, आमच्या इथेंच ये पाहूं वस्तीला तूं उद्यांपासून. ’ मला हें संकटच वाटलं एक ! ह्या ब्राह्मणाच्या घरीं कसं जमायचं आपलं? गांवांत कोणत्याही जातीचा घरधनी मला ठेवून घ्यायला तयार नव्हता. पाहिल्याच दिवशीं जेवायच्या वेळीं मास्तरांच्या आईनीं ओसरीवर माझं पान वाढलं. मास्तर जेवायला

आले, त्यांना कांहीं हें रुचलं नाहीं. त्यांनीं आईना एका शब्दानंहि कांहीं विचारलं नाहीं. मुकाट्यानं त्यांनीं आपलं पान उचललं आणि ओसरीवर माझ्या शेजारीं, माझ्या पंक्तीला ते येऊन बसले. आई काय समजायचं तें समजल्या आणि दुसऱ्या दिवसापासून मला जेवणघरांतच वाढूं लागल्या. मी मास्तरांकडे चार वर्षं राहिलों, पण कधीं अपमानाचा प्रसंग आला नाहीं. धोबी जातीचा मी, पण मास्तरांच्या मुलांप्रमाणं त्यांच्या घरांत वावरलों. समाज-सुधारक म्हणून मास्तरांची प्रसिद्धि नाहीं. कारण आपलीं मतं प्रवचनाच्या रूपानं लोकांपुढं मांडायचीं, हा मास्तरांचा मार्गच नाहीं. ते आपलीं पुढारलेलीं मतं आचरणांतच आणून दाखवतील! 'बोले तैसा चाले। त्याचीं वंदावीं पाऊलें'। ह्याच्या पुढची पायरी आहे मास्तरांची. ते बोलणार नाहींत पण जसे विचार तशी त्यांची वागणूक."

कधीं गमतीच्या गोष्टी निघत. शाळेच्या नाटकाच्या तालमीच्या वेळीं मास्तर नाटकाशीं पूर्णपणें समरस होऊन मुलांना पात्रांच्याच नांवानें हांका मारीत आणि मग पुढें तींच मुलांचीं टोपण-नांवें होऊन बसत. संस्कृत नाटकाच्या वेळीं ते म्हणत, "अरे, शार्ङ्गरवा, वेदीला प्रदक्षिणा कशी घालायची, तें माहीत नाहीं का रे तुला? कसला रे कण्व मुनींचा शिष्य तूं!" मराठी नाटकांत स्त्री-भूमिका घेतलेल्या मुलाला उद्देशून म्हणत, "अहो आनंदीबाई" किंवा "अग शारदे", मग कांहीं दिवस तेंच नांव गाजत राही.

मास्तरांचे शिकवण्याचे आवडते विषय म्हणजे भाषा—इंग्रजी व मराठी. आणि त्यांतहि वाङ्मयापेक्षां व्याकरण व उच्चारशास्त्र शिकवण्यांत त्यांचा विशेष हातखंडा! ते व्याकरण इतक्या खुबीनें शिकवीत कीं, आपण कांहीं रुक्ष विषय शिकतों आहोंत, ह्याची जाणीवही मुलांना होत नसे. ज्या उदाहरणावरून व्याकरणाचे नियम शिकवावयाचे त्यांची निवड मास्तर मोठ्या कौशल्यानें करीत; त्यांत विनोद असे, मुलांच्या रोजच्या जीवनावर

सहानुभूतिपूर्वक पण मार्मिक अशी कांहीं टीका असे किंवा वाङ्मयांतलींच वाक्यें असत. व्याकरण इतक्या तन्मयतेनें मास्तर शिकवीत कीं विद्यार्थ्यांना अत्यंत क्लिष्ट नियम तावडतोब उमगत व व्याकरणांतील नीरसपणा जाणवतहि नसे. काव्य शिकवितांना त्यांत काव्यात्मकता व तल्लीनता असणें साहजिकच आहे; पण व्याकरण शिकवितांना ही तल्लीनता एखाद्यालाच साधते. त्यासाठीं व्याकरणांतली सुसंबद्धता कविमनानेंच जाणून घ्यावी लागते आणि तेंच मास्तरांच्या शिकवण्याचें वैशिष्ट्य होतें.

मास्तर मिशनरी इंग्रजी शिक्षकांकडून इंग्रजी शिकलेले असल्यामुळें त्यांचे स्वतःचे इंग्रजी उच्चार व लिहिण्याची शैली मोठी सफाईदार असे. त्यांचे हुशार विद्यार्थी त्यांच्याकडून आपोआपच केवळ अनुकरणानेंच हे उचलत. मास्तर लॅटिन शिकलेले असल्यानें त्यांना व्युत्पत्तिशास्त्र चांगलें अवगत होतें. नाना तऱ्हेचे शब्दकोश जमवून ते पद्धतशीरपणें वाचावयाचे असा त्यांना नाद होता. मंडळीस हें पाहून आश्चर्य वाटे; पण शब्दार्थांच्या गोष्टी निघाल्या कीं, मोठी मनोरंजक अशी ऐतिहासिक व सामाजिक माहिती त्यांच्या तोंडून ऐकायला मिळे.

त्या गांवांतल्या पस्तीस वर्षांच्या आपल्या वास्तव्यांत उजाड माळावर मास्तरांनीं सुंदर बाग उठवून दिली होती. त्याचप्रमाणें गांवांतल्या लोकांच्या जीवनांत एक चैतन्याचा झरा प्रसृत केला होता. सगळें गांव आपल्याला मास्तरांचें ऋणी मानीत होतें; तर मास्तर गांवाची सेवा हेंच आपल्या जीविताचें ध्येय समजत होते. गांव—शाळा—विद्यार्थी—सहाध्यापक ह्यांतच मास्तरांचें जीवन गुंतून राहिलें होतें.

मास्तरांची साठी जवळ येत चालली तशी गांवकऱ्यांनीं आणिक दोन वर्षें तरी शाळेंत राहण्याचीच मास्तरांना विनंती केली होती. शाळेच्या समितीचे सभासद आणि मास्तरांनंतर हेडमास्तरच्या जागेवर येणारे त्यांचे विद्यार्थी—ह्यांनीं तर मास्तरांनीं आणिक कांहीं वर्षें शाळेवर राहावें, असा

आग्रहच धरला होता. पण मास्तरांनीं विचारपूर्वक निश्चय केला होता कीं, साठ वर्षें पुरीं झाल्यावर शाळेची जबाबदारी दुसऱ्यावर सोंपवावयाची व शाळेच्या बाबतींत आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारावयाचा. हा निश्चय मनाशीं कायम झाल्यावर त्यांनीं आपल्या दैनंदिनींत लिहिलें होतें—

"मीच शाळेची जबाबदारी उचलूं शकेन, दुसऱ्या कुणाला हें काम साधायचें नाहीं, ही भावना अहंपणाची आहे. ह्या मोहांत फसून मी शाळेचें व माझें स्वतःचें अहित होऊं देणार नाहीं. सुदैवानें शाळेचा भार वाहण्यास समर्थ, शाळेवर लोभ असणारी, अशी कर्तबगार माणसें शाळेला लाभलीं आहेत. माझ्या बरोबरीनें कामें करून तीं चांगली तयार झालीं आहेत. त्यांच्या कर्तबगारीला वाव मिळणें आवश्यक आहे. मी शाळेंत राहिल्यानें तें शक्य होणार नाहीं. शाळा माझी नाहीं, ती गांवकऱ्यांची आहे, गांवांतील उमेदी तरुण पिढीची आहे. गांवांतील लोकांत जोम असला, एकजूट असली तर शाळा केव्हांहि प्रगति-पथावरच राहील. शाळेचें अस्तित्व व भवितव्य एका व्यक्तीवर अवलंबून असून चालणार नाहीं. शाळा व्यक्तीहून फार मोठी आहे. माझ्याशिवाय शाळेचें चालणार नाहीं, असें असतें, तर तो दोष केवळ माझा ठरला असता. नाहीं, शाळा माझ्यावर अवलंबून नाहीं. मी गेलों तरी ती व्यवस्थित चालेल अशी माझी खात्री आहे. लोकांनीं कितीहि आग्रह केला तरी मी त्याला बळी पडणें योग्य होणार नाहीं. शाळेचें हित उराशीं आहे, शाळेच्या मोठेपणावर व भक्कमपणावर विश्वास आहे म्हणूनच मी शाळा सोडणार.

—शाळा सोडणार, इतकेंच नाहीं तर हें गांवहि मी सोडणार. गांवावर, लोकांवर माझें अतोनात प्रेम आहे, म्हणूनच मी त्यांना सोडून दूर जाणार. मी ह्या गांवांत राहिलों तर मंडळी माझ्यावरच विसंबतील माझ्याच मार्गदर्शनाची अपेक्षा धरतील. शाळेच्या दृष्टीनें तें योग्य नाहीं. मी ह्या गांवांत राहिलों तर माझा वानप्रस्थाश्रमहि पुरा होणार नाहीं."

हा कठोर निश्चय कायम होईपर्यंत मास्तरांचें मन अस्वस्थ झालें होतें. अनेक आठवणी, भावना, इच्छा उचंबळून आल्यानें मनानें आपलें स्थैर्य गमावलें होतें. पण एकदां हा निश्चय पक्का झाल्यावर मनाला समाधानाची शांति लाभली होती. पस्तीस वर्षांपूर्वीं ह्या गांवच्या शाळेंत येण्याचें मास्तरांनीं ठरविलें तेव्हां त्यांनीं आपलें निश्चयबळ असेंच कामीं आणलें होतें. त्याच्याच जोरावर संपत्ति व मानमरातब मिळविण्याच्या इतर मार्गांकडे त्यांनीं पाठ फिरविली होती आणि पस्तीस वर्षांत कधींहि कोणत्याहि लुभावणीस न भुलतां कडक सेवाव्रत पत्करून, त्यांनीं आपलें कार्य हंसत-खेळत, पण आत्मीयतेनें पुरें केलें होतें. आज शाळा व गांव सोडण्याचें ठरवितांना पुन्हा तेंच निश्चयबळ विरुद्ध दिशेनें वापरावें लागलें होतें.

स्वतःचा निश्चय कायम झाल्यावर मास्तरांनीं हळूहळू इतरांची मनोभूमिका तयार केली होती. त्यांच्यावर मंडळींचा अढळ विश्वास! मास्तरांचें म्हणणें त्यांना पूर्णपणें पटलें असें नाहीं; पण मास्तरांचा दृढ-निश्चयी स्वभाव, तटस्थ वृत्तीनें सारासार विचार करण्याची त्यांची शक्ति, शाळेविषयीं व गांवाविषयीं वाटणारा त्यांचा नितान्त स्नेहभाव ह्या सर्वां-वर भार टाकून लोकांनीं अगदीं नाइलाजानें मास्तरांचें म्हणणें मान्य केलें होतें—केवळ मास्तरांची आज्ञा शिरसावंद्य असावी, ह्या शिष्यत्वाच्या भावनेनें. त्यामुळें शाळेंतले व गांवातले शेवटचे दिवस मास्तरांनीं उच्च प्रकारच्या समाधानवृत्तींत घालविले होते. सेवानिवृत्ति, ही दुसऱ्यानें वा परिस्थितीनें वा हुकूमशाहीनें लादलेली आपत्ति नाहीं, तर स्वतः स्वखुषीनें, योग्य वेळीं स्वहितासाठीं व अंगिकारलेल्या कार्याच्या अभिवृद्धीसाठीं पत्करलेला मार्ग होय, हें मास्तरांनीं लोकांना दाखवून दिलें. सेवा-निवृत्तींत कृतकृत्यतेचें समाधान असायला हवें, हें पटवून दिलें.

गेल्या महिन्यांत निरोपाचे अनेक कार्यक्रम झाले होते. लोकांचीं

अंतःकरणें भावनांनीं भारावलीं होतीं. मास्तरांच्या वियोगाची कल्पना सर्वांच्या मनाला असह्य वाटत होती. निरोपाच्या भाषणांत वक्त्याचा कंठ दाटून आल्यानें भाषण अनेक वेळां अपुरें राहिलें होतें आणि भाषणाचा समारोप कोणत्याहि शब्दांत व्यक्त होणार नाहीं, अशा अश्रूंच्या ओघांत झाला होता; पण मास्तरांची मनःशांति व चित्तवृत्ति केव्हांहि ढळली नाहीं. त्यांनीं अशा प्रसंगीं लोकांना धीर दिला होता; लहान बालकांना आंजारून-गोंजारून समजुतीनें सांगितलें होतें—

" अरे, मी माझ्या मूळ गांवीं जायला नको का आतां ? माझं गांव अगदीं गांवंड गांव आहे. तिथें प्राथमिक शाळाहि अद्याप कुणी काढली नाहीं. मी गांवीं जाऊन स्थायी झालों कीं, एक शाळा काढणार. आपल्या शाळेची लहानगी बहीण बरं का ती ! तुमचा आशीर्वाद हवा बरं तिला ! "

रात्रभर मास्तरांना झोंप लागली नाहीं. डोळ्यांपुढून एकेक दृश्यें



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 23573 कि:
वर्ग 7.135 नों: दि:

जात होतीं. पहाटेस उठून, आपल्या घराच्या गच्चीवर उभे राहून त्यांनीं आपली शाळा, आपलें मानलेलें गांव एकदां डोळे भरून पाहिलें. त्यांची

नजर घराच्या आवारांतल्या कोपऱ्याकडच्या बकुळवृक्षाकडे वळली. दर उन्हाळ्यांत बकुळीचीं फुलें गोळा करण्यासाठीं येणाऱ्या चिमण्या मुला-मुलींची त्यांना आठवण झाली. अनेक वेळां कार्डीत फुलें अडकवून एखादी धिटुकली चिमुरडी त्यांना लाजत लाजत वासासाठीं म्हणून फुलाची काडी देऊन पळत जाई त्याची आठवण झाली. आजहि नाजुक फुलांचा सडा पडला होता आणि मधुमंद सुगंध हवेंत दरवळला होता. तें समोरचें दृश्य मास्तरांनीं मनांत सांठवून घेतलें आणि त्या सर्वांचा मनोमन निरोप घेण्यासाठी हात जोडले. हातावर नकळत पडलेले अश्रुबिंदु पाहून त्यांच्या ध्यानांत आलें कीं, शाळा सोडायचा निश्चय केल्यापासून कधींहि डोळ्यांत पाणी आलें नव्हतें तें आज आलें आहे. प्रातःकाळच्या बकुळीच्या त्या चिरपरिचित सुगंधानें व चिमुकल्या बालकांच्या आठवणींनीं मास्तरांच्या धीरगंभीर मनामध्यें नाजुक हळुवार भावनांच्या ऊर्मि उठवून दिल्या होत्या.

मास्तरांनीं डोळ्यांची उघडझाप केली, इतक्यांत सामानासाठीं बोलावलेली लॉरी समोरून येतांना दिसली. मास्तर खालीं उतरले आणि त्यांचा थोरला मुलगा सदाशिव त्यांची आरामखुर्ची बांधण्याच्या तयारींत होता त्याच्याकडे विमनस्कपणें पाहूं लागले.

[—स्त्री—नोव्हेंबर १९५६]

[ टीप—हें स्वभावचित्र अमुक एका व्यक्तीचें असें नाहीं. पण तें लिहीत असतांना दोन आदर्श शिक्षकांच्या स्फूर्तिदायक अशा कांहीं आठवणी माझ्या मनांत होत्या. त्यांपैकीं एक म्हणजे माझे वडील कै. गो. व्यं. पाणंदीकर व दुसरे राजापूरच्या हायस्कूलचे प्रिन्सिपाल कै कुलकर्णी.

— लेखिका].

# भाग दुसरा

[ व्यक्तिचित्रें ११ ते १६ ]

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

## ११ : : : चाकाची रवी

वीस वर्षांपूर्वी मी माझा स्वतंत्र संसार उभारला तो राधाबाईच्या जोरावर ! तिनं उणंपुरं एक तप माझ्याजवळ काढलं. तेवढ्या अवधींत युक्तीप्रयुक्तीनं, कधीं माझं मन वळवून, तर कधीं माझ्यावर जबरदस्ती करून, एकेक वस्तु संग्रहीं केली आणि 'संन्याशाचा संसार' हें जें माझ्या संसाराचं स्वरूप ठरूं पाहात होतं तें पार पालटून टाकलं. राधाबाई गेल्याला आज आठ वर्षं होत आलीं, पण अद्याप एकेका वस्तूवर नजर फिरली कीं राधाबाईची आठवण येते अन् ती वस्तु कशी घेतली गेली त्याचा साद्यंत इतिहास डोळ्यांसमोर उभा राहातो. राधाबाईच्या स्वभावाचा आणि माझ्याशीं वागण्याच्या तिच्या तंत्राचा एक नमुना म्हणून पुढील हकीकत आठवली तशी लिहीत आहे.

आम्ही त्या वेळीं गांवदेवीला राहात असूं. आमच्या शेजारीं एक ख्रिश्चन बिऱ्हाड होतं. मंडळी राहणारी पुण्याची, पण नोकरीनिमित्त मुंबईस आलेली होती. दोन मुलं, नवरा आणि बायको एवढीच मंडळी कुटुंबांत होती. दुपारीं यजमान नोकरीवर गेले, मुलं शाळेंत गेलीं, कीं बाई

एकत्र्याच घरीं असत. राधाबाईला दुपारची पायरीवर बसलेली पाहून त्यांनीं तिची ओळख करून घेतली आणि केव्हां-केव्हां दुपारीं त्या तिला आपल्या घरीं बोलावून नेत. त्यांची करमणूक होई आणि तिलाहि पुण्यातल्या माणसांच्या गप्पा मारायला मिळत म्हणून आनंद होई. शिवाय त्यांच्या इथं, थेट स्वयंपाकघरापर्यंत शिरकाव होत असल्यानं, घरांतलं सारं सामान न्याहाळून पाहायला मिळे, हें विशेष आनंदाचं कारण !

मी संध्याकाळीं घरीं आलें कीं मेरीबाईच्या इथल्या एकेक वस्तूचं रसभरित वर्णन मला ऐकायला मिळे. मेरीबाईकडे कशा तऱ्हेतऱ्हेच्या फुलंपानं काढलेल्या ' कपबशा अन् पिलेटी ' आहेत, चहा थंड होऊं नये म्हणून मेरीबाई चहादाणीवर ' कापशी टोपी ' कशी चढवितात, दिव्याच्या बटणावाणी बटन दाबलं कीं वाजणारा कसा सुंदर बाजा त्यांच्या इथं आहे, एक ना दोन सतरा गोष्टींचं कौतुक चाले. असं हें तोंडभर वर्णन करण्यांत राधाबाईचा हेतु काय असावा त्याची मला कल्पना होती; पण अगदीं निकराला आल्याशिवाय तोंड द्यायचं नाहीं, असं मीं मनाशीं ठरवलं होतं. त्यामुळं मीं हीं सारीं काव्यमय वर्णनं स्वस्थपणें ऐकून घेत असें.

एक दिवस कॉलेजांतून संध्याकाळची घरीं येऊन नेहमींप्रमाणं स्वयंपाकघरांतल्या टेबलापाशीं चहा घ्यायला बसलें. राधाबाईहि आपल्या पद्धतीप्रमाणें चुलीच्या ओट्यावर बसून गप्पा मारीत होती. आज डोळ्यांत नवीनच चमक दिसली. खास स्फूर्ति होण्याजोगी एखादी कांहीं वस्तु मेरीबाईकडे पाहिली कीं काय, अशी शंका मला वाटलीच. चहा आटपत आल्यावर, जरा आराम वाटलेला पाहून, राधाबाईनं हळूच विषयाला सुरवात केली—

" आज दुपारीं मेरीबाईनीं नेलं होतं बोलावून. क्याक् का काय म्हणत्यात ना तें करीत बसल्या होत्या. त्याला काय दूध अन् अंडं अक्षीं फेस येऊन एकजीव होईस्तवर घुसळावं लागतं म्हणे. पण तें घुसळायला कशी नामी चाकाची रवी हाये त्यांच्यापाशीं ! "

न बोलतां ऐकण्याचा माझा निश्चय मोडून मीं एकदम आश्चर्यानं विचारलं, " चाकाची रवी ? "



राधाबाईला तेवढं उत्तेजन पुरेसं होतं. तिनं लागलीच सविस्तर खुलासा केला, " म्हंजे असं, वरच्या अंगाला चाक हाये, तें फिरवलं म्हंजे खालच्या अंगाला पट्ट्या हायतीं, त्या गरगरा फिरत्याती, अन् असं नामी घुसळतं त्या रवीनं !" बोलतांबोलतां हवेंतल्या हवेंत हातानं सगळी क्रिया करून तिनं दाखविली. तेव्हां माझ्या डोक्यांत प्रकाश पडला कीं, स्वारीनं मेरीबाईच्या घरीं 'एग्‌बीटर' पाहिला असावा.

" आपल्याला घ्यायची तशी रवी ? " राधाबाईनं खडा तर टाकलाच. " ती काय करायची आपल्याला ? आपण थोडीच केक घरीं करतों ? "– मी कपाळावर आठ्या चढवून म्हटलं, " लोकांकडे जें पाहशील तें तुला आपलं घ्यावंसं वाटतं. कशाला हवी ही विलायती रवी आपल्याला ? आपल्याकडे आहे रवी, तिला काय झालं ? "

माझा हा भडिमार ऐकून, " बरं, नगं तर नगं, राह्यलं माझं !" असं म्हणून राधाबाई मुकाट्यानं संध्याकाळच्या स्वयंपाकाला लागली. तें

प्रकरण तेवढ्यावरच मिटलं म्हणून मला आनंद झाला आणि मीं मनाशीं म्हटलंसुद्धां कीं जरा कडकपणानं बोललं कीं म्हातारी आपला हेका सोडून देते.

त्या दिवशीं फिरून चाकाच्या रवीचा प्रश्न निघालाच नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं जेवायला बसेपर्यंत तो विषय माझ्या डोक्यांतून पार गेला होता. जेवतांना ताकाची वाटी तोंडाला लावली अन् तशीच खालीं ठेवावी लागली. ताक कसलं तें? एका बाजूला दही, एका बाजूला पाणी, असं धड ना घन ना द्रव, असं अमिश्रित पेय होतं तें! मीं राधाबाईला खडसून विचारलं, " हें ग काय ? आज असं काय ताक हें ? नीट घुसळलंससुद्धां नाहीं ! "

" पुचकल् (आपलं बोलणं परिणामकारक व्हावं म्हणून मुद्दाम आपले मावळी शब्द सोडून असल्या आमच्या वापरांतल्या शब्दांचा राधाबाई उपयोग करी ) घुसळलं; पण त्या दोडं रवीनं घुसळतच नाहीं मुदलीं त्याला मी काय करूं आतां ? " राधाबाई उत्तरली.

अरेच्या ! आदल्या दिवसाचं रवीचं प्रकरण तेवढ्यावरच आटपलं, म्हणून मी आनंद मानीत होतें, तो खोटाच तर आनंद? " रवी आतांच द्वाड झाली होय?" मीं म्हटलं, " इतके दिवस कसं चांगलं ताक होत होतं?" "अन् मंग आजच ताक काय रोजच्या परीस येगळं हाये व्हय?" राधाबाईनं विचारलं, " अक्षी रोजच्यावाणी घुसळलं, काकणभर जास्तच; पण कमी नाहीं. "

चार दिवस जेवणाच्या वेळीं हाच प्रकार आणि असाच संवाद चाले. स्वतः ताक घुसळून आमच्या देशी रवीची योग्यता पटवून द्यावी असं मनांत आलं, पण तितका आत्मविश्वास वाटेना. ताक घुसळण्याचं नाहीं जमलं तर कशाला शोभा करून घ्या आपली आणि बरोबर त्या रवीचीहि ? कानाडोळा केला कीं चार दिवसांत म्हातारी आपोआप वठणीवर येईल असं ठरवून, तें दही अन् पाणी ताक समजून, चार दिवस कसंबसं घशाखालीं उतरवलं. आणि पांचव्या दिवशीं सुंदर ताकानं भरलेली वाटी पुढं आली, तेव्हां आपला उपाय रामबाण लागू पडला, असा माझा

समजहि झाला. ह्या चार दिवसांत चांगल्या ताकाची महति पुरी पटली होती. बऱ्याच दिवसांनीं चांगलं ताक प्यायला मिळालं म्हणून अपूर्व आनंद झाला. राधाबाईनं अगदीं मनांतलं ओळखून, ताकाची वाटी रिकामी होते न होते तोंच पुन्हा भरली. मीं खूष होऊन म्हटलं, " आज कसं सुंदर ताक झालं ? उगाच रवीच्या नांवानं ओरडत होतीस ती ?"

माझं शेवटचं वाक्य ऐकलं नाहींसंच करून राधाबाईनं साळसूदपणानं विचारलं, " अक्षी पूरीइत्कं सरस ( ग्वाड् ) झालंय का ताक ? "

मीं भरांत येऊन म्हटलं, " अग, पूर्वींइतकं काय घेऊन बसली आहेस ! पूर्वींहून कितीतरी चांगलं ताक झालं आहे आज. "

हें वाक्य ऐकतांच राधाबाई खुद्कन् हंसली आणि म्हणाली, "तरी मी सांगीतच होतें न्हवं का ! आज मेरीबाईच्या इथल्या चाकाच्या रवीनं केलं होतं ताक ! त्यांना म्यां म्हटलं, कीं तुमची रवी द्या जराशीक आम्हांला. बाई ह्या रवीचं ताक प्याल्याबिगर त्यांना असली रवी घ्याईशी नाहीं वाटायची !"

ह्या स्पष्टीकरणानं मी अगदीं चीत झालेशी पाहून, तिनं आपलं घोडं पुढं दामटलं. " मंग, आतां घ्यायची ना चाकाची रवी आपल्याला ? गिरांट रोडाला बोहऱ्याच्या दुकानामंदीं हायती असल्या रव्या ! म्यां मेरीबाईना पुसलंय्, किंमत बी काई लई नाई. लहानमोठी घेऊं तशी रवी, पडत्याल रुपया दोन रुपये ! "

राधाबाईनं हा प्रयोग इतक्या कुशलतेनं घडवून आणला होता कीं, आतां नाहीं म्हणणं अशक्यच होतं. माझ्या भोळेपणाची मला कींव आली, तिच्या हुशारीचं कौतुक वाटलं. दुसऱ्या दिवशीं रविवार होता. सकाळच्या जेवणाची घाई नव्हती, तेव्हां सकाळीं राधाबाईबरोबर रवी आणावयास जावयाचं कबूल केलं.

राधाबाईबरोबर बाहेर जाणं म्हणजे एक विचित्रच रपेट असे ती ! तिच्यानं लवकर चालवत नसे आणि मला तिच्याबरोबर रेंगाळणं जमत

नसे. तेव्हां मी कांहीं वेळ माझ्या गतीनं चालावयाचं आणि राधाबाई व माझ्यामधलं अंतर वाढलेलं दिसलं कीं अंमळ उभं राहावयाचं आणि राधाबाईनं गाठलं कीं फिरून चालावयास लागायचं, अशी मिरवणूक निघायची आमच्या दोघींची !

त्या दिवशीं ग्रँटरोडला भाजीवाल्यांच्या रांगेपाशीं आम्हीं दोघी बरोबरच पोचलों. मी बरोबर असलेली पाहून पहिल्या भाजीवालीनें आरोळी दिली, " काय वं राधाबाई ! आज बाईना संगं घेऊनशान आल्यात काय ? " तिच्याकडे भाजी घेऊन, चार पावलं पुढं गेलों तर पुढची बाई म्हणते, " राधाबाई, आज तुमच्या बाईच्या हातून आमच्या हिथली बोहनी तर होऊं द्या." तिथं आणिक भाजी घेतली; आणि पुढंहि दोनचार दुकानांवर अशीच बोहनी करावी लागली. हिच्याकडून कांदे, बटाटे घेत असते, तिच्याकडून मिरची-कोथिंबीर, अशा हिशेबीं राधाबाई सर्वांचीच नेहमींची गिऱ्हाईक होती असं दिसलं. चार-पांच वर्षं रोज ग्रँट-रोडला येऊन राधाबाईनं सर्वांवर आपली जरब चांगलीच बसवलेली दिसली. भाजीबाजारांत मिळालेल्या ह्या अचानक प्रसिद्धीनं मी मात्र अगदीं जेरीस आलें आणि कधीं एकदां तें बोहन्याचं दुकान गांठतों, असं मला होऊन गेलं. तोंच " अग म्हातारे, तुझ्या बाईना माझ्या दुकानावर नाईस कां आणीत ! " अशी जोराची हाक ऐकूं आली.

" आतां आणखी नको वरात !" मीं राधाबाईला म्हटलं, " चल एकदां त्या बोहन्याच्या दुकानांत ! " राधाबाई समजूत घालण्याच्या स्वरांत उत्तरली, आतां येवढी येकच ! नगराची हाये म्हातारी ! " आतां मला उलगडा झाला कीं राधाबाईनें ' म्हातारी ' ही हाक मुकाट्यानं कशी ऐकून घेतली. राधाबाईचं माहेर अहमदनगरचं, त्यामुळें नगराकडील माणसांचे शंभर गुन्हे तिच्या पदरीं माफ असतात ! नगरची बाई म्हटल्यावर आतां आपली सुटका होणं अशक्य हें मीहि जाणलं आणि

विशेष कुरकुर न करतां, जरूर नसतांहि म्हातारीच्या दुकानावर अच्छेर वांगीं घेतलीं आणि एकदांचं मीं बोहऱ्याचं दुकान गांठलं.

दुकानांत गेल्यावर आणिक धिंडवडे निघणार कीं काय, अशी भीति वाटत होती, पण तिथं थोडक्यांतच आटपलं. राधाबाईनं पांचसहा 'चाकाच्या रव्या' हाताळल्या, प्रत्येकीचीं चाकं जोरजोरानं फिरवून पाहिलीं आणि सर्वांत जड मोठी रवी पसंत केली. अर्थात् दुकानांतल्या अनेक वस्तूंवर तिची नजर आशाळभूतपणानं फिरलीच आणि काळी चहा-दाणी पाहून तसली आपल्याला घ्यायची काय म्हणून विचारलं सुद्धां; पण शेवटीं एका रवीवरच समाधान मानून एकदांच्या आम्ही बाहेर पडलों.

चाकाची रवी आणल्यावर ताक तर उत्तम होऊं लागलंच, पण वरणाची डाळ रवीनंच घाटली जाऊं लागली आणि इतर कितीक गोष्टींसाठीं रवी उपयोगांत येऊं लागली. राधाबाईहि एकंदरींत आनंदांत दिसूं लागली. पण हा आनंद आणि समाधान दुसरी एखादी वस्तु मनांत भरेपर्यंतच टिकतील, अशी मला भीति होती आणि त्याप्रमाणें झालंच. पंधरावीस दिवसांत रवीचा आनंद ओसरला आणि राधाबाई म्हणाली, "चाकाची रवी आली, आतां मेरीबाईच्यावाणी क्याक करूं या आपल्या हिथं? पण त्यांच्यापाशीं क्याक करावयाचा डबा हाये, त्याला उघडायला, बंद करायला दार हाये, अन् आंतल्या अंगाला जाळीचे खण हायती. त्या खणांवर ताटली ठेवली की क्याक भाजून निघते. तसल्या पत्र्याचा डबा आणू या आपल्याला?"

जोंवर तिच्या हातांत माझ्या संसाराचीं सूत्रं होतीं तोंवर असंच चाले हें!

[ स्त्री--मार्च १९५५ ]

## १२ : : : बहिरोबाशीं गांठ

मुंबईच्या कुजबुजाटाला मन कंटाळून गेलें होतें. सुटींत अगदीं शांत ठिकाणीं निवांतपणानें रहावें म्हणून माझ्या मावस-बहिणीच्या गांवीं, तिचें घर व शेतीवाडी होती तिथें जाण्याचा बेत केला. 'अगदींच गांवडें गांव, बरोबर गप्पागोष्टीस तिथें कोणी मिळणार नाहीं,' असें ताईनें अगोदरच बजावून ठेवलें होतें. ताई म्हणाली होती, "तिथं आमच्या जमिनीची व्यवस्था पहाणारे रामभाऊ आहेत ग, त्यांची सोबत मिळेल तुला, पण गप्पासाठीं कांहीं उपयोग नाहीं त्यांचा. अगदीं बहिरे आहेत ते. बाकी गृहस्थ विद्वान् हं. मागें तिथल्याच मिशनच्या शाळेंत शिकवीत असत. पण बहिरेपणा वाढल्यावर ती नोकरी सोडून द्यावी लागली."

पोंचलें तेव्हां मला मुक्कामास नेण्यास स्टेशनावर रामभाऊ हजर होते. ताईची वर्णनशैली मोठी दांडगी, त्यामुळें आम्ही एकमेकांस ताबडतोब ओळखून काढलें. स्टेशनापासून घर गांठेपर्यंत, माझ्या खड्या आवाजाबद्दल जो मला गर्व वाटत असे तो पार नाहीसा झाला. ताईनें रामभाऊंच्या बहिरेपणाची अडचण सांगितली, तेव्हां मीं मनांत म्हटलें

सुद्धां होतें, “हो असतील जरा बहिरे, पण माझा आवाज आहे कीं मोठा ! मूळचाच आवाज मोठ्यापैकीं, आणि कितीक वर्षें प्राध्यापक म्हणून व्याख्यानबाजी केल्यानें तो अधिकच खुलला आहे. वर्गाच्या कानाकोपऱ्यांत सुद्धां पोंचतो. त्याबद्दल कुणाची कधीं तक्रार नाहीं. मग काय रामभाऊंना माझं बोलणं ऐकूं जाणार नाहीं ? जन्म-जात बहिरे नाहींत कांहीं ते.” किती फोल ठरला आवाजाबद्दलचा हा अभिमान ! स्टेशनपासून घरापर्यंतची १५–२० मिनिटांची वाट चालतांना अशी त्रेधा उडाली आहे ! पहिल्यानें दोन-चार वाक्यें नेहमींच्या खड्या आवाजांत उच्चारलीं. गृहस्थाला मी बोललें हा पत्ता-सुद्धां लागला नाहीं. विचार न करतां एकदम तार स्वर लावला, पण शेजारीं कांहींच परिणाम नाहीं. इतक्यांत सुचलें कीं बहिऱ्या माणसांशीं बोलतांना खर्जांतला सूर लावून, शांतपणानें, गडबड न करतां बोलावें म्हणजे बोलणें चटकन् ऐकूं जातें, असें कुणीसें सांगितलें होतें. तोहि प्रयोग करून पाहिला, पण शेजारीं चेहरा निर्विकारच ! मग आठवलें, लहानपणीं थोर लोकांच्या गोष्टींच्या एका पुस्तकांत वाचलें होतें कीं, सातव्या एडवर्ड बादशहांच्या पत्नी अलेक्झांड्रा राणी ह्यांना बहिरेपणाचा विकार होता, पण बोलणाऱ्यांच्या ओठांच्या हालचालीं-वरून कोण काय बोलतें, तें त्या बिनचूक ताडून घेत, आणि बोलणाऱ्याला त्या बहिऱ्या आहेत, असा संशयसुद्धां येत नसे. आतां म्हटलें तो उपाय करून पहावा. सारें उच्चारशास्त्र आठवून, ओंठ खूप वेडेवांकडे करून बोललें, पण रामा-शिवा गोविंदा ! मी कांहींतरी बोलतें आहें, एवढी गृहस्थाला शंका आली इतकेंच. काय बोललें ह्याचा पत्ता नाहींच. शेवटला निर्वाणीचा उपाय म्हणून म्हटलें सगळे प्रकार एकदम करून पहावे. आवाज फुगवला, खर्जांतला सूर लावला, ओंठ खूप हलवले आणि शांतपणाचा आव आणून सावकाश बोललें. मग आमच्या श्रोत्यांच्या कानांत ध्वनि

उमटला. किंवा मनांत कल्पना स्पष्ट झाली. घरीं आल्यावर ह्याच संमिश्र उपायानें मला काय हवें नको तें सांगितलें. माझी व्यवस्था लावून गृहस्थ गेले तेव्हां हायसें वाटलें. पण मग लक्षांत आलें कीं, आतां इतरांशीं बोलतांनाहि बहिरोबांशीं बोलतांना जी धडपड केली तीच नकळत चालू राही.

दुसऱ्या दिवसापासून रामभाऊंशीं गांठ पडण्याचे प्रसंग वारंवार येऊं लागले. मला हिंडायला हवें, गांवाची तर माहिती नाहीं, तेव्हां रोज सकाळ-संध्याकाळ त्यांची माझी जोडी. पण आतां जरूरीच्या गोष्टींसंबंधानें बोलून झालें होतें, माझी सर्व व्यवस्थाहि पण लागली होती. तेव्हां माझें बोलणें ऐकूं गेलें नाहीं तरी पंचाईत नव्हती.

आदल्या रात्रीं एक गोष्ट अगदींच ध्यानांत आली नव्हती. करपल्लवी भाषेचा उपयोग मी मुळींसुद्धां केला नव्हता. शब्दांची उत्पत्ति होण्यापूर्वी आपले पूर्वज हावभावांच्या योगानेंच आपले सारे विचार प्रकट करीत म्हणे. आज तो उपाय अंमलांत आणण्याचें ठरविलें. पण प्रत्यक्ष उपाय-योजना करतांना इथेंहि अडचणी किती ! एकाच हावभावानें किती वेग-वेगळे अर्थ प्रकट होऊं शकतात ! केव्हां–कुठें–किती–कोण–काय–कसें हें सर्व दर्शविण्यास मला एकच हावभाव परिचित होता. त्यामुळें असा गोंधळ उडे ! रामभाऊंनीं एखादी नवी बांधलेली बंगली दाखवावी. लहानशी बंगली बांधण्याची फार दिवसांची माझी हौस असल्यानें माझ्या मनांत यावें ‘ बंगलीला खर्च किती आला असेल. ’ प्रश्नार्थक मान वांकडी करून उजवा हात असाच प्रश्नार्थी वळवून, बंगलीचा खर्च किती, हें विचारायचा मी प्रयत्न करावा. प्रथम रामभाऊंना वाटावें, मी त्यांच्याच वर्गांतली, नीट ऐकूं न आल्यानें ‘ काय ’ म्हणून विचारतें आहे. त्यांनीं तेंच उत्तर फिरून द्यावें. मीं पुन्हा तसाच हावभाव केला कीं, त्यांनीं म्हणावें, “ केव्हां बांधली म्हणतां होय ? झालीं असतील सरासरी दोन वर्षे ! ” मी हें विचारलें नाहीं, हें दर्शविण्यासाठीं नकारार्थी मान हलवली कीं त्यांना

वाटे, मी त्यांच्या विधानास विरोध करीत आहें, आणि मग ते पुराव्यानिशी, तारीखवार, आपण दिलेली माहिती खरी आहे, हें आग्रहानें सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न करीत. कीं मी हावभाव थोडासा बदलून तोच प्रश्न दुसऱ्या तऱ्हेनें विचारण्याचा प्रयत्न करावा, कीं रामभाऊ म्हणत, "कुटुंबांत किती माणसं म्हणतां होय ? बराच मोठा पसारा आहे !" शेवटीं मी तो नाद तरी सोडून द्यावा, किंवा एकेक अर्थ वगळून माझ्या मनांतल्या प्रश्नावर त्यांचें उत्तर येऊन थडकेपर्यंत वाट पहावी. आमचे पूर्वज हावभावांनींच आपले विचार कसे प्रकट करीत, तें त्यांचें तेच जाणोत ! विसाव्या शतकांतले आम्ही इतके शब्दांच्या आधीन झालों आहोंत कीं, मनांतला अर्थ बिनचूक व्यक्त करण्याच्या बाबतींत आमचे हात लुळे पडले आहेत.

लोक रामभाऊंशीं बोलतांना करपल्लवी भाषा वापरीत. त्याची स्वाभाविक प्रतिक्रिया अशी झाली होती कीं, रामभाऊ इतरांशीं बोलतांना तीच भाषा वापरूं लागले होते. वाक्यांत अधेंमधें एखाद-दुसरा शब्द उच्चारून बाकी सगळे ते हावभावांनींच सांगत. 'तें तळं किती दूर आहे ?' असें विचारलें कीं, त्यांचें उत्तर असें कांहीसें येई, "दूर." मग तीन बोटांची खूण "पण–" मग हात उंच करून चढावाची खूण "आणि मग–" उताराची खूण, आणि शेवटीं हंसून, "तुम्हां मुंबईच्या माणसांना" 'जमणार नाहीं' ह्या अर्थी फिरून एक हावभाव. म्हणजे आपण असें समजावें कीं, तें तळें तीन मैल दूर आहे. आणि रस्त्यावर चढ-उतार बराच आहे. आणि––रामभाऊंच्या मतें––मुंबईच्या सुखसोयींच्या चैनी वातावरणांत आळसावलेल्या शरीरास तें झेपण्याजोगें नाहीं.

कधीं कधीं फार गमतीचे घोटाळे होत. एक दिवस आम्ही गांवांतल्या गवळीवाड्याजवळ उभे असतांना, रामभाऊंच्या ओळखीच्या एक बाई भेटल्या. त्यांनीं विचारलें, "काय अण्णा, गोदू (बाळंतपणासाठीं माहेरी आलेली रामभाऊंची मुलगी) अद्याप माहेरालाच आहे ना ?"

रामभाऊ गवळीवाड्यांतल्या म्हशी पहाण्यांत गुंतले होते. बाईचा हात प्रश्नार्थी फिरलेला पाहिला, आणि त्यांनीं चटकन् उत्तर दिलें, " नाहीं, आटली आतां म्हणून विकून टाकली. " बाईंना आश्चर्याचा धक्काच बसला! पण मग त्यांच्या ध्यानांत आलें कीं गवळीवाड्याच्या वातावरणांत केलेल्या प्रश्नाचा संबंध रामभाऊंनीं साहजिकच आपल्या नुकत्याच विकून टाकलेल्या म्हशीशीं लावला होता. बाईंनीं आरडून ओरडून आपण काय विचारलें तें त्यांना सांगितल्यावर एकच हंशा पिकला.

रामभाऊंची विनोदी वृत्ति सदा जागृत असे आणि मुख्य म्हणजे आपल्या स्वतःच्याच अनेक गोष्टींविषयीं, आपल्या बहिरेपणामुळें निर्माण झालेल्या गोंधळाविषयीं, त्यांना मोठी गंमत वाटे, आणि अगदीं पोट धरून हंसत ते. ही विनोदी वृत्ति नसती तर त्यांच्यासारखा बहिरा माणूस कडवट बनला असता, आणि त्याच्याशीं संबंध नको, असें इतरांना होऊन गेलें असतें. पण रामभाऊंच्या विनोदी स्वभावामुळें आणि मोकळ्या हास्यामुळें ते सर्वांना हवे होते.

माझ्या मुक्कामांत रामभाऊ वक्ते आणि मी श्रोती असाच प्रकार चाले. संभाषणाचा प्रयत्न म्हणजे आम्हां दोघांच्या बुद्धीवर फार मोठा ताण पडत असे. मी काय म्हणतें आहे हें हुडकून काढण्यासाठीं त्यांच्या बुद्धीला कसरत करावी लागे आणि आपल्याला सांगावयाचें आहे तें ह्या बहिरेबुवांना कसें सांगावें, ह्या धडपडीसाठीं माझी बुद्धि वापरावी लागे. दोघांच्या बुद्धीचे आणि कल्पकतेचे श्रम चुकविण्यासाठीं त्यांची वक्त्याची आणि माझीं श्रोत्याची भूमिका श्रेयस्कर वाटत.

गांवची माहिती सांगून झाली. येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांची माहिती झाली. हवामान, पीकपाणी ह्यांच्या गोष्टी झाल्या कीं मग ते हल्लींचें शिक्षण, नाहींतर कसला तरी सामाजिक प्रश्न ह्याकडे वळत. मी त्यांचें बोलणें ऐकून घेई; फार झालें तर एखादा प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करीं, पण माझीं मतें त्यांना ऐकविण्याची शक्यताच नव्हती, आणि मी त्या

भानगडींत पडलेंहि नाहीं. त्यांचें बोलणें पण ऐकून घेण्याजोगें असे. त्यांनीं आपल्या बहिरेपणांतूनहि जगाची, जनरीतीची, एकंदर प्रचलित घडामोडींची खूप माहिती मिळविलेली होती, विचारहि भरपूर केला होता. शिवाय त्यांचें बोलणें मार्मिक असे, त्यांत विनोदाची व मनमोकळ्या हास्याची खळबळ असे, म्हणून तें कधींच कंटाळवाणें होत नसे. आणि दुसरें म्हणजे, पूर्वाश्रमींच्या आपल्या शिक्षणपेशाच्या संवयीमुळें म्हणा, ते आपल्या बोलण्याला वादविवादाचें स्वरूप देत. प्रथम एक बाजू मांडत, आणि आपणच 'तुम्ही असं म्हणाल,' अशी प्रस्तावना जोडून, त्यावर शंका उपस्थित करीत; आणि फिरून आपल्या मूळच्या भूमिकेवरून शंकेचें निरसनहि करीत. त्यामुळें ते एकटे बोलत राहिले तरी नकळत त्याला संभाषणाचें रूप येई.

मी तिथें असेतोंवर रामभाऊंना ह्या आमच्या भूमिकांत कांहीं गैर दिसलें नाहीं. उलट समव्यवसायी श्रोता मिळाल्याच्या ते आनंदांतच असत. रोज सकाळीं, हंसत हंसत, आमच्या बिऱ्हाडीं येऊन 'आज कुठें जायचें?' अशी सलामी देत. त्यामुळें मी मुंबईस परत आल्यावर, एक दिवस ताई म्हणाली, 'रामभाऊ रागावले आहेत हं तुझ्यावर.' तेव्हां मला आश्चर्यच वाटलें. मी म्हटलें, 'तें कां बाई? तिथें तर आमच्या खूप गप्पागोष्टी झाल्या!" तेव्हां तिनें खुलासा केला, "तेंच तर ते म्हणतात कीं, तूं युक्तियुक्तीनें प्रत्येक विषयावरचीं त्यांचीं मतं वदवून घेतलीस, आणि स्वतःच्या मतांचा कांहींच पत्ता लागूं दिला नाहींस म्हणे?" मीं कपाळालाच हात लावला! जिथें साधा प्रश्न विचारण्याची सोय नाहीं तिथें माझीं मतें कशीं ऐकवणार मी ह्या बहिरोबाला?

पुढें रामभाऊ कामानिमित्त मुंबईस आले असतांना, मी ताईला माझ्यासमोर मुद्दामच हा प्रश्न काढायला सांगितला. फार दिवसांच्या दीर्घ परिचयामुळें ताईनें करपल्लवी भाषेंत बरीच प्रगति केलेली होती, त्यामुळें तिचें रामभाऊंशीं संभाषण होऊं शके. प्रश्न निघाल्यावर रामभाऊ उडवा-

उडवी करूं लागले. पण मी ऐकत नाहींसें पाहून शेवटीं त्यांनीं आपलें मन मोकळें केलेंच, "अहो, त्या पंधरा दिवसांत काय वाटेल त्या विषयावर मला बोलवलें ह्यांनीं! हिंदुमहासभा-कॉंग्रेस-समाजवादी पक्ष, सर्वांचें राजकारण झालें, सोशलिझम् झाला, कम्युनिझम् झाला, कॅपिटॅलिझम् झाला. मिश्र-विवाह–बालविवाह–प्रीतिविवाह ह्यावर माझं प्रवचनच झालं. शिक्षणाचं माध्यम, मुलींनीं किती शिकावं ह्यावर भाष्य केलं मीं. बाई तिथें असेतोंवर कांहीं ध्यानांत नाहीं आलं माझ्या; पण त्या गेल्या अन् मी विचार करूं लागलों कीं, बाईंचीं राजकीय मतें कोणतीं? विवाहाच्या प्रश्नाविषयीं त्यांचं काय म्हणणं? शिक्षणाविषयीं त्यांचं काय मत? तेव्हां लक्षांत आलं कीं, माझीं सगळीं मतं त्यांच्यापुढं मांडलीं; पण त्यांनीं मात्र आपल्या कोणत्याच मताचा मला थांगपत्ता सुद्धां लागूं दिला नाहीं!"

आरोप बहिऱ्याच्या दृष्टीनें रास्तच होता. बहिरा आपले विचार प्रकट करतो, पण दुसऱ्याचे विचार त्याला कळत नाहींत. बोलण्या-भाषणाला विचारांची जी देवघेव लागते ती त्याच्या सामर्थ्याबाहेर असते. त्याचा आपला एकतर्फी कारभारच चालू असतो. आपल्या घरचा पाहुण-चार एखाद्यानें यथास्थित लुटावा आणि आपण त्याच्या घरीं गेल्यावर मात्र त्यानें घराचें दार बंद करून घेऊन आपल्याला बाहेरच उभें करावें, तशांतलाच प्रकार होतो. पण आरोप रास्त असला तरी अन्यायाचा होता. त्यांत दोष परिस्थितीचाच. महत्प्रयासानें ताईनें रामभाऊंना हें पटविण्याचा प्रयत्न केला. तेव्हां त्यांनीं तात्पर्य शोधून काढलें, "बहिऱ्यानं फार बोलूं नये हेंच खरं. जीवन म्हणजे एक प्रकारची अखंड देवाण-घेवाण. ज्याला एक शक्य नाहीं त्यानें दुसरंहि करूं नये. श्रवण शक्य नाहीं तर भाषणहि वर्ज्य केलं पाहिजे; नाहींतर मनांत वैषम्य रहातं एक प्रकारचं." बहिऱ्याचें हें तत्त्वज्ञान मननीय आहे. [–संगम–जानेवारी १९५३]

## १३ : : : मुंबईंतील कांहीं वेडे

मुंबईंत वेड्यांचा अगदीं सुकाळ! गल्लोगल्लीं वेडे हे दिसायचेंच! बाकी प्रघात म्हणून ह्यांना वेडे म्हणावयाचें; वेडेपणाची तशी व्याख्या देऊं गेलें, तर आपल्या प्रत्येकांत वेडाचा थोडाबहुत अंश आहे असेंच आढळेल, आणि कोणाला वेडा म्हणूं नये हाच प्रश्न पडेल.

मीं लहानपणीं वेड्यांना अत्यंत भीत असें. त्या वेळीं आमच्या शेजारच्या घरांत एक वेडी कोंडून ठेवलेली असे. मीं तिच्या बाजूच्या खोलींत सहसा फिरकत नसेंच, पण कधीं फिरकलेंच, तर ती केस पिंजारून, डोळे भिंगरीसारखे फिरवून, खिडकीचे गज गदगदां हालवून, घोगऱ्या आवाजांत विचारी, "बाबी, येतेस माझ्या घरीं? तुला तेल लावीन, तुला न्हाऊं घालीन, जेवूं घालीन—(मग एक विकट हास्य करून)—अन् मग देईन तुला बावडींत ढकलून!" तेव्हां माझी भीतीनें अशी गाळण

उडे, काय विचारूं नका. वेडी कोंडलेली आहे, ती खिडकीच्या गजांतून बाहेर येईल कशी, आणि आली तरी मला ढकलून द्यावयाला गिरगांवांत विहिरी आहेत कोठें, असें किती समजावलें तरी माझा थरकांप कमी होत नसे. आतां मात्र वेड्यांविषयीं मला एक प्रकारचें कुतूहल वाटतें. मुंबईंत बऱ्याच वेड्यांची व माझी तोंडओळख तरी आहे. निदान मी त्यांना ओळखतें; ते मला ओळखीत असतील कीं नाहीं तें मी सांगूं शकत नाहीं.

ह्या सर्व वेड्यांत प्रमुख स्थान पूर्वीं चर्नी व नवा क्वीन ह्या रस्त्यांच्या नाक्यावर एक गृहस्थ बसत असे त्याला. आतां स्वारीनें आपलें ठाण उठविलें आहे. हल्लीं तो आपल्या नेहमींच्या ठिकाणीं दिसत नाहीं, पण अद्याप हयात आहे त्याबद्दल शंका नाहीं, कारण परवांच ठाकुरद्वारला भटक्या मारतांना दिसला होता. पूर्वीं तो मांडी ठोकून बसलेला असा दृष्टीस पडे. अंगानें चांगला गलेलठ्ठ, त्यामुळें मल्लच असें वाटे. अंगावर कपडे पोलिसाला पकडतां येऊं नये इतपतच अगदीं! एक वीतभर रुंदीची चिंधी कशीबशी गुंडाळलेली, बाकी वरखालीं उघडा बंब! पण डोक्यावरची साहेबी टोपी मात्र त्या उच्च स्थानावरून



कधीं ढळली नाहीं. त्याच्याकडे जरा कुतूहलानें पाहिलें, कीं ऐटींत टोपीला हात लावून ‘ गुद् मार्निंग, सर ’ म्हणे. सकाळ, संध्याकाळ, रात्र, वेळ कोणतीहि असो, त्याला भेटणारी व्यक्ति स्त्री असो, पुरुष असो, तीन्ही

त्रिकाळ त्याची आपली ‘ गुड् मॉर्निंग, सर ’ हीच सलामी ठरलेली. त्यानें कधीं कोणापुढें तोंड वेंगाडलें नाहीं, पण कोणी आपण होऊन पैसा पुढें ठेवला, कीं मग अगदीं आनंदाचें भरतें येऊन ‘ ठॅंक्यू सर ’ म्हणे. त्याची चर्या सदोदित आनंदी असे. चकणी नजर, मुद्रेवरची थोडीशी वेडसरपणाची छटा यांतून त्याचें तें बालिश आनंदाचें स्मित फार खुलून दिसे. त्याला एवढा कशाचा आनंद वाटत होता कोण जाणे ? स्वतःला शहाणे म्हणवणाऱ्या आम्हां लोकांच्या चेष्टा पाहून त्याला हसूं येत असेल का ? कीं त्यानें स्वतःची आनंदमय अशी निराळी सृष्टि निर्माण केली असेल ? ऊन असो, पाऊस असो, खावयाला मिळो न मिळो, त्याला आंतून कसला तरी अनिर्वचनीय आनंद सतत होत असावा. त्याचें तें आनंदाचें स्मित–वेड्याच्या विकट भयानक हास्याची त्यांत झांकही नव्हती–पाहिलें कीं मन अगदीं प्रसन्न होई ! आणि घटकेंत शंकाही येई कीं, सच्चिदानंद अशा परमस्थितीप्रत पोहोंचलेली कोणी विभूति तर ही नसेल ना ?

नंबर दोनच्या वेड्याची स्थिति मात्र कांहींशी केविलवाणी होती. ह्याची माझी फार जुनी ओळख ! मीं शाळेंत असतांना हा रोज अचूक त्याच वेळीं ठराविक रस्त्यानें फिरावयाला निघत असे. त्यावेळीं स्वतःशींच पुटपुटणें व हातवारे करणें ह्याखेरीज वेडाचें दुसरें कांहींच चिन्ह नव्हतें. एकदम पहाणाऱ्याला तो एक सुखवस्तु गृहस्थ असाच वाटे. पारशी पद्धतीचा काळा रेशमी लांब कोट, काळी विजार, डोक्याला पारशी फेटा, बूट, मोजे, असा पोषाख अगदीं व्यवस्थित असे. मध्यंतरी मीं बाहेरगांवीं असल्यानें त्याची हालचाल कांहीं कळली नाहीं. पुढें पंधरा वर्षांनीं मीं मुंबईत आलें तेव्हां माझें बिऱ्हाड त्याच्या नेहमींच्या रस्त्यावरच होतें, त्यामुळें फिरून तो मला रोज दिसूं लागला. अद्याप तेच पंधरा वर्षांपूर्वींचे कपडे अंगावर असत, पण कोट विजारीच्या चिंध्या-चिंध्या झालेल्या होत्या आणि बुटांतून पायाचीं टोंकें बाहेर डोकावूं लागलीं होतीं.

मधल्या ह्या पंधरा वर्षांत कपडे अंगावरून खालीं उतरलेच नसावेत बहुतेक ! कारण ह्या लकतऱ्या अंगावरून काढून पुन्हां जशाच्या तशा फिरून घालणें ही अशक्य कोटींतील गोष्ट होती. तो आतां अत्यंत कृश झाल्यानें पूर्वी अंगाबरोबर असणारे कपडे आतां खुंटीवर टांगल्याचा भास होई. एकंदरींत शेतांतल्या बुजगावण्याचें स्वरूप त्याला आलें होतें. आतां मात्र त्याच्या पेहेरावावरूनच तो वेडा असल्याचें एकदम लक्षांत येई. चालण्याची पद्धत पूर्वींचीच, पण जोरजोरानें पावलें पूर्वी पडत, तीं अशक्तपणामुळें गतिमंद झालीं होतीं. आपल्याशींच कांहींतरी गूढ विचार व मधून मधून पुटपुटणें हें चालूच होतें. बाहेरील जगाचा विसर अधिकच दृढ झाला होता. आजूबाजूला असणारीं माणसें, गाडया, घोडे, ह्यांची कशाचीच त्याला दाद नसे. त्याची दृष्टि सदा जमिनीवर खिळलेली; तोंडावर आनंद नाहीं, दुःख नाहीं. एक गंभीर विचारी भाव मात्र मुद्रेवर स्पष्ट दिसे. हल्लीं सरासरी वर्षभर त्याच्या ठराविक रस्त्याला तो दिसला नाहीं. तो इतका अशक्त झालेला होता कीं, फार जगेल असें वाटत नव्हतेंच. शिवाय त्याच्याशीं कधींहि ताटातूट न झालेले त्याचे कपडे अगदीं बंड पुकारून त्याला सोडून जावयाच्या तयारींत होते. बहुतेक कपडयां-बरोबरच त्यानेंहि राम म्हटलें असणार. त्याला कसलें एवढें गूढ कोडें उकलावयाचें होतें ? त्या कोडयाच्या विचारापायीं तो सर्व जगाची ओळख विसरला होता. मरावयाच्या अगोदर त्याला तें कोडें सुटलें असेल कां ?

नंबर तीनची वेडी अशीच कळवळा वाटण्याजोगी ! ही कधीं एका जागीं नसे. एकदम मुंबईतल्या कोणत्याहि रस्त्यावर अचानक उपस्थित होई. नेहमीं ती अशी वणवण फिरतांनाच दिसे. अंगावर एक विटकें लुगडें, डोक्यावर एक ट्रंक आणि काखोटीला छत्री हा तिचा फिरता संसार नेहमीं तिच्याबरोबर. ही छत्री ही काखोटीला मारण्याची

जिन्नस एवढाच तिच्या दृष्टीनें छत्रीचा उपयोग होता. अगदीं कडक बाराचें ऊन असलें तरी तिनें छत्री बाहेर काढून उघडली नाहीं, कीं धो धो पाऊस आला तरी आपण इतरेजन जो छत्रीचा उपयोग करतों, तो केला नाहीं. काखोटीची छत्री व डोक्यावरची ट्रंक ह्यांची व तिची कधींच फारकत झाली नाहीं. नाहीं म्हणायला एकदां तसा प्रसंग आला. एक दिवस भर दुपारीं चौपाटीपलीकडच्या बांधावर फिरावयाला गेलें. ती वेळ सामान्यतः फिरण्याची नसल्यानें नेहमीं बुजबुजणाऱ्या बांधावर अगदीं शुकशुकाट होता. जरा पुढें आल्यावर ही बाई दिसली. आज मात्र ट्रंक व छत्री बाजूला काढून ठेवली होती आणि समुद्राकडे एकचित्तानें पहात समुद्राशीं बोलण्यांत बाई गुंग झाली होती. कोणाही माणसाला पाहून तिची एककल्ली वृत्ति ढळली नव्हती; पण आज पुढें पसरलेल्या अफाट सागरापुढें तिच्या दुःखाचा बांध फुटला होता. डोळ्यांतून अश्रु वहात होते, आणि अगदीं उमाळ्यानें शब्द बाहेर पडत होते. आज बाईनें विश्वासानें समुद्राजवळ आपलें हृदय उघडें केलें होतें. ऐकलें असेल का समुद्रानें तिचें गाऱ्हाणें ?

नंबर चारची वेडी पहिल्या वेड्याच्या वर्गातली. तिच्या वेडामुळें ती ह्या शहाण्यांच्या जगांतल्या त्रासापासून आणि कटकटीपासून मुक्त झालेली होती आणि निराळ्याच कक्षेंत एका आनंदमय सृष्टींत मनानें नांदत होती. तिची शरीरयष्टी सुखी माणसाला साजेशीच होती. अंगानें चांगली भरलेली, तिचें एकंदर शरीर, तिचा प्रत्येक अवयव, चेहरा, सर्वच आपापल्या परीनें वर्तुलाकार होते. तिची वेषभूषा पहाण्यालायक असे. बहुतेक तिच्याच कल्पक डोक्यांतून निघालेली असावी. साडी नाहीं, झगा नाहीं, घागरा नाहीं, कीं पायजमा नाहीं, पण कांहीं वेगळाच प्रकार असे. निरनिराळ्या रंगाचे वार दोन वार लांबीचे तुकडे वरून खालून आडवे उभे मर्जेत गुंडाळलेले असत. नाकांत एक मारवाडी धर्तीची नथ, हातांत मनगटा-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

पासून कोपरापर्यंत तऱ्हेतऱ्हेच्या बांगड्या, पायांत तोडे अशी ऐटींत फुटपाथवर बसलेली असे. शेजारीं तिच्या एवढेंच अगडबंब रंगीबेरंगी चिंध्याचें एक गाठोडें असें. बहुतेक त्याच गाठोड्यांतून तिची पुढची वेषभूषा निर्माण व्हावयाची असेल. तिचा उद्योग म्हणजे आपल्याच कपड्यांकडे आणि चिंध्याच्या त्या गाठोड्याकडे कौतुकानें पहावयाचें व मधून मधून लहर फिरेल त्याप्रमाणें बारके बारके दगड जाणाऱ्या येणाऱ्यांकडे मारावयाचे आणि कधीं दैवयोगानें नेम बरोबर लागला कीं खुष होऊन पोराप्रमाणें हसावयाचें. त्या गल्लीचीच वेडी होती ती म्हणून तिच्यावर कोणी रागावत नसे. जवळपासचे लोक तिला खाण्यापिण्यांतहि कांहीं कमी पडूं देत नसत. पण पोट भरलें असतांना जर का कोणी तिला वाढण्याचा अविचार केला तर विचारूं नका ! कधीं न बोलणाऱ्या त्या वेडीला एकदम वाचा फुटे आणि कोणालाही कळणार नाहीं अशा स्वकपोलकल्पित भाषेंत–पेहेरावाप्रमाणें आपल्या भाषेचेही सारे हक्क तिच्याच स्वाधीन होते–शिव्यांची सरबत्ती चाले. आनंदी प्राणी होती एक !

हे झाले चार विशिष्ट वेडे; पण मुंबईत त्या लोकांचा एक वर्गच आहे. आतां मला इतकी ओळख पटली आहे कीं दहा हातावरूनच ह्या वर्गांतल्या माणसाला शोधून काढावें. पोलिस शिपायाचे किंवा सैनिकांचे जसे ठराविक कपडे असतात, तसाच ह्यांच्याही कपड्यांत बराच ठराविकपणा आलेला आहे. उन्हाळा असो, पावसाळा असो, हिवाळा असो, कपडे तेच. एक लांब ओव्हरकोट, लांब असली तर राखाडी रंगाची गरम विजार, नाहीं–तर खाकी आखूड विजार, डोक्याला जुनी साहेबी टोपी, पायांत बंद नसलेले जुने टेनिसचे बूट, कोटावर छातीच्या बाजूला जुनीं सिगारेटचीं चित्रें किंवा मासिकांतील रंगीत चित्रें बिल्ल्याप्रमाणें, ठिकठिकाणीं फडकत असतात. एक हातांत असल्या चित्रांनीं भरलेलें कागदाचें पुडकें असतें. ही सर्व मालमत्ता कचरापट्टींतून गोळा केलेली असावी; पण कंजूष सावकार आपल्या

धनदौलतीची काळजी घेणार नाहीं इतक्या काळजीनें व प्रेमानें वेडा तें पुडकें उराशीं वाळगीत असतो. उद्योग म्हणजे भटक्या मारावयाच्या, पण त्या अशा ऐटीनें व जोरानें, कीं कोणाला वाटावें स्वारी कसल्या तरी मोहिमेवरच निघाली आहे. आणि स्फूर्ति होईल त्याप्रमाणें बोलत सुटायचें. कांहीं वेडे अगदीं व्याख्यानबाजी चालवितात. बोलण्याची धर्तीं, हावभाव, माना व शरीर येथून तेथें हलविणें हें सगळें कसलेल्या व्याख्यात्याचें असतें. वेड्यांच्या व्याख्यानाला श्रोत्यांची जरूर असतेच, असें नाहीं पण



मुंबईसारख्या ठिकाणीं चार लोक जमावयाला वेळ लागत नाहीं व बहुतेक ह्या वक्त्यांच्या पाठीं दहा-पांच रिकामटेकड्या लोकांचा घोळका असतोच. कांहीं वेडे व्याख्यानबाजी न करतां काल्पनिक मित्रांशीं किंवा शत्रूंशीं वाद घालीत असतात तर कांहीं आपणच दोन-तीन पात्रांचें एक नाटक उठवून देतात. परवा चांगलीच फसगत झाली माझी! रात्रीं आठाचा सुमार असेल. रस्ता शांत होता. दूर दिव्यापाशीं ह्या ठराविक पेहेरावांत एक व्यक्ति दिसली. जरा जवळ जातें तों ऐन रंगांत आलेलें तिघा-चौघांचें भाषण कानांवर पडूं लागलें. हल्लींच्या मुंबईतल्या अंधाऱ्या रात्रीं " दिव्याखालीं अंधार " ही जुनी म्हण बदलून केवळ " दिव्यापुरताच

उजेड " अशी स्थिति असते, तरी डोळे फाडून पाहिलें आणि एकच माणूस उभा आहे ही खात्री करून घेतली. पण भाषण चौघांचें नक्की, हें काय गौडबंगाल, भुताटकी तर नव्हे ना? जवळ आल्यावर खरा प्रकार लक्षांत आला. एकच मनुष्य चार वेगळे आवाज काढून एक नाटक रंगवित होता. कसलेल्या नटाला लाजवील इतक्या निपुणतेनें तो एकटा चार पात्रांचें काम वठवीत होता.

असो! आतां हें वेडेमहात्म्य तूर्त येथेंच आटपतें घेतें.

[–महाराष्ट्र सारस्वत,–जानेवारी १९४२]

## १४ : : : काकांचा पाहुणचार

दर उन्हाळ्याच्या सुट्टींत महाबळेश्वर, माथेरान, खंडाळा येथील ठराविक वाऱ्या करून कंटाळा आला, म्हणून एका सुटींत कोंकणांत गांवीं जाण्याचा बेत केला. तिथं सेवानिवृत्त झालेले वडलांचे एक स्नेही राहात असत. फार घरोबा आमचा. आम्ही त्यांना काकाच म्हणत असूं. वडील असतांना काका अनेक वेळां मुंबईस आमच्याकडे राहिले होते आणि आपल्याकडे येण्याचं अत्याग्रहाचं कायमचं आमंत्रण त्यांनीं आम्हांला देऊन ठेवलं होतं. पण आजवर त्यांच्याकडे जाण्याचा योग आला नव्हता.

मी मुंबईहून सकाळच्या बोटीनं निघालें. बोट दुपारीं चार साडे-चारच्या सुमारास माझ्या उताराच्या बंदरास लागली. काका स्वतःच बंदरावर आले होते. दहा वर्षांनीं आमची भेट झाली. मला भेटल्यावर काका अगदीं गहिवरले आणि मोठ्या प्रेमानं म्हणाले, " ताई, आलांत आमच्या गांवीं ! फार बरं केलंत हो. दादांना या म्हणत होतों, पण त्यांचे पाय कांहीं लागले नाहींत आमच्या गांवाला. असो, तुम्ही तरी आलांत. अगदीं मना-पासून आनंद होतोय् तुमच्या येण्याचा. कितीक दिवसांत असा आनंद झाला नाहीं. आपलं बोलायचं म्हणून नाहीं हो. "

त्यांनीं आणलेल्या बैलगाडींतून आम्ही घरीं पोचलों. काकूंच्या पायां पडून, हातपाय धुऊन, काका अंगणांत बसले होते तिथं मी आलें. काकांनीं विचारलं, " काय ताई, चहा ठेवायला सांगूं ना ? बोटीवर कांहीं मिळालं नसेल ? "

मीं म्हटलं, " असं कसं होईल ! मला बोट लागत नाहीं आणि कसला विधिनिषेधहि नाहीं. तेव्हां बोटीवर चहा, दुपारीं चमचमीत जेवण, सारं कांहीं व्यवस्थित झालं आहे.

" तुम्ही आधुनिक मंडळी, तुम्ही आमच्यासारखे जिवाचे हाल नाहीं करून घेणार वेडगळ समजुतींनीं. " असं मला म्हणून दारांत काकू उभ्या होत्या त्यांना उद्देशून काका म्हणाले, " अहो, नका ठेवूं चहाचं आधण आणि आज रात्रींचं जेवण पण ताईंना नको बरं का. जड झालंय बोटीवरचें जेवण. अंगाशीं येईल तें अन् मग म्हणतील, कोंकणची हवा मानवत नाहीं; अन्न पचत नाहीं, रात्रीं आपलं नेहमींसारखं चहा–केळं असंच द्या कांहींतरी. "

मला आश्चर्यच वाटलं जरा; पण म्हटलं काका मला अद्याप लहानच समजतात. मी काय खावं न खावं तें आपणच ठरवित आहेत. कशाला थोडक्यांकरितां मन दुखवा त्यांचं. म्हणून मी कांहीं बोललें नाहीं.

रात्रीं चहा झाला, पुन्हां सकाळीं चहाच झाला. पावडरचा उकळलेला, काळाकाळा चहा ! मी निववून कसाबसा घट्दिशीं प्यालें तो. पण काकांच्या बारीक नजरेंतून तें सुटलं नाहीं. ते म्हणाले, " ताई, वडलांसारख्या पट्टीच्या चहा पिणाऱ्या नाहीं दिसत तुम्ही. " अन् काकूंना सांगितलं, " अहो, उद्यांपासून आपली जंवाची कॉफीच द्या कशी ताईंना. त्या दिसत नाहींत चहाबाज ! आणि ती चहाची बुकी आणली आहे ती डबा गच्च बंद करून ठेवा. चहाशिवाय नडेल असे पाहुणे आले कुणीं कीं येईल कामीं. "

सकाळीं जेवायला बसलों. पातळ भाजी, गवारीची भाजी, ओल्या नारळाची चटणी, भात, पोळी असा बेत होता. असं भरलेलं पान पाहून काका एकदम उद्गारले, " अहो, हें काय, पातळ भाजी केलीत तर आणिक ही दुसरी भाजी कशाला ? पातळ भाजी ह्याचा अर्थ काय ? आमटीसारखी पातळ अन् भाजी तर भाजी. एक पातळ भाजी केली कीं आमटी-भाजी दोहोंच काम भागतं. काय आज जेवायला पाहुण्या म्हणून दोन जिन्नसा जास्तीच्या केल्या ? अहो, पाहुण्या कोण ? ताई रागावतील हो त्यांना पाहुण्या मानल्यात तर. दादांनीं केला कां आपल्या बाबूत अन् त्यांच्या स्वतःच्या मुलांत कांहीं फरक कधीं ? ताई आमच्या घरच्याच हं. मुळींच परक्या नाहींत त्या आम्हांला. आम्ही रोज खातों तें खाण्यांतच त्यांना आनंद. काय ताई ? "

ताई काय म्हणणार यावर ? ' तर काय ' असं म्हणून वेळ साधून घेतली आणि भाजी, पातळ भाजी दोहोंवर आडवा हात मारला. रात्रींच्या उपासामुळें चरचरून भूक लागली होती.

दुपारच्या चहाबरोबर—नाहीं जेवाच्या कॉफीबरोबर—काकू हपूस आंब्याच्या फोडी एका ताटलींत घेऊन आल्या. काका म्हणाले, "हें काय ? ताईंना हपूस आंबा का द्यायचा ? अहो, मुंबईत हपूस आंबे खाऊन कंटाळल्यांत ताई. त्यांना आपल्या वाडींतल्या रायवळ आंब्यांची चव तर पाहूं द्या. त्याचीच गोडी वाटेल त्यांना. अढीचे-पडीचे आंबे असतील ते आणा. आणि उद्यांपासून तेच आंबे काढायचे बरं का. ताईच्या वडलांना फार आवडत रायवळ आंबे. त्यांचं बाळपण कोकणांत गेलं, त्यामुळं अढीचा आंबा कोणता आणि पडीचा आंबा कोणता तें चवीवरून अचूक शोधून काढीत ते. "

जेवण झाल्यावर मीं माझं सामान लावलं, तेव्हां काकूंनीं माझी पुस्तकं पाहिलीं होतीं. त्यांनीं हळूच काकांना सुचवलं, " वाचायचा नाद

दिसतोय् ताईंना. आपल्या कंदिलावर कशा वाचणार त्या रात्रीच्या? नानाशेठकडून स्टँडचा दिवा तरी आणावा, त्या असत तोंवर रात्रींचा लावूं या."

काकांना आणिक एक आश्चर्याचा धक्का बसला. ते म्हणाले, "अहो, काय समजलांत काय? दहा वर्षांनीं ताई भेटतायेत आज, त्या वाचायला का आल्यात आपल्याकडे? दहा वर्षांचं हितगुज व्हायचं आहे, दिवसाचे चोवीस तास पुरायचे नाहींत आणि रात्रीं वाचण्याच्या कसल्या गोष्टी करतां?" रात्रीं ८॥ ला सर्व आटपलं अन् आम्ही पडल्या पडल्या गप्पा मारायच्या हेतूनं अंथरुणावर पडलों. थोडयाच वेळांत माझ्या लक्षांत आलं कीं बोलतेय मी एकटीच. काका-काकूंचे मंद हुंकार यायचे, तेहि थांबले होते आणि झोपेंतलं मोकळं व नियमित श्वसन सुरू होतं. नित्याच्या सवयीप्रमाणं त्यांना नऊ वाजतांच झोप लागली. मग मी तास दीड तास, माझी नेहमींची झोपायची वेळ होईस्तवर, अंधारांत मनाशींच हितगुज केलं काय तें, अन् स्टँडच्या दिव्याचं तेल वांचवलं.

माझ्या वास्तव्यांत काकांनीं मला चार ठिकाणीं भेटायला न्यायचं ठरवलं. माझी ओळख करून द्यायला इतरांना आपल्या घरीं बोलावण्यापेक्षां हाच मार्ग काकांना अधिक सोईस्कर वाटला. नानाशेठ संध्याकाळीं आले होते, त्यांना काका म्हणाले, "उद्यां सकाळीं नवाच्या सुमारास ताईंना घेऊन तुमच्या येथें येणार हो!"

नानाशेठ म्हणाले, "काका, घर आपलंच आहे. सांगून येण्याची काय जरूर? केव्हांहि या नं ताईंना घेऊन."

त्यावर काकांनीं खुलासा केला, "आगाऊ सांगितलेलं बरं हो, नाहीं—तर ऐन वेळीं शहाळीं काढायला कुणाला चढवणार माडावर? आधीं सांगितलेलं असलं म्हणजे अगोदरच चार शहाळीं काढून ठेवतां येतील. नाहींतर होतं काय ताई, आपण जावं ह्यांच्या भेटीला अन् चार गोष्टी

बोलायला, तर ह्यांची नजर भिरभिरी फिरत राहते माडावर चढायला कुणी मुलगा मिळेल तें पाहाण्यासाठीं. तुमच्याआमच्या गोष्टींकडं लक्षच नसतं मग. ”

दुसऱ्या दिवशीं नानाशेठकडे शहाळीं, काप्या फणसाचे गरे, हपूसचे आंत्रे ( त्यांच्याकडे नाहीं काकांनीं हरकत घेतली कांहीं ) असा कार्यक्रम झाला. दुसऱ्या कुणाकडे पोहे झाले, तिसरीकडे आणिक काय असं चालूंच होतं. बाहेर हपूसचे आंबे, शहाळीं, गरे हें चाललं होतं अन् घरीं होतीं केळीं अन् अढीचे अन् पडीचे आंबे.

असे सातआठ दिवस गेले. एका रात्रीं काकांनीं काकूंना विचारलं, “ तो आपला बर्का फणस पिकला का हो ? ” काकू म्हणाल्या, “ हो तर, अगदीं फोडायला झालाय् बरं का. ” मग काकांनीं बेत केला, “ मग असं करा, उद्यां सांदणं करा गऱ्याचीं. ताईंना कोकणचं आमचं पक्वान्न तर खाऊन पाहूं द्या. उद्यां मेजवानीचाच बार देऊं उडवून. दोनतीन मंडळींहि बोलवूं. तुमच्या हातची अळवाची भाजी आवडते ताईंना, तीं करा. कांद्याचीं चार भजीं काढा गरमगरम आणि बाकीचं पाहा काय करायचं तें.” काकू सांदणासाठीं तांदूळ भिजत घालायला म्हणून उठल्या, तेव्हां काका म्हणाले, “ अहो, आतांच काय घाई ? उद्यां सकाळींच घाला तांदूळ भिजत. होईल जरा जेवणाला उशीर; पण कुणाला हपिस नाहीं कीं कालिज नाहीं. होऊं द्या सावकाश तुमचं.”

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून पाहतें, तर काकू अंथरुणावरच आणि काका सकाळची कॉफी करण्याच्या तयारींत दिसले. काका मला पाहून कांहींशा उद्वेगानं म्हणाले, “ पाहिलंत ताई, काल मेजवानीचा बेत केला आपण आणि आज अंथरुण धरलं ह्यांनीं. रात्रभर मेजवानीचीच चिंता, त्यामुळं झोप नाहीं आणि मग सकाळीं भोंवळ येऊं लागली. आतां चार दिवस हंथरुण सुटायचं नाहीं. आजचा बेत राहिला आमचा.”

जराशानं मीं काकांना विचारलं, "आजचा स्वयंपाक मी करूं काय मग ?" काकांनीं एकदम कानांवर हात ठेवले आणि म्हणाले, "अहो, छे, छे. हें काय ताई ! दादांनीं कसं तळहाताच्या फोडांसारखं वागवलं तुम्हांला तें डोळ्यांनीं पाहिलंय ना मी ? कधीं काम पडूं दिलं नाहीं तुमच्यावर. परकेपणा नाहीं म्हटलं म्हणून कामाला नाहीं हो लावणार तुम्हांला. चार दिवस आरामाला आलांत तर चूल पाठीं लावून देऊं ? नाहीं, नाहीं, त्रिवार नाहीं. कधीं नाहीं व्हायचं असं. आज मीच मऊ भात करणार अन् मेतकूट-भात तुपाशीं वाढणार तुम्हांला. म्हाताऱ्याच्या हातचं खाऊन तर पाहा आज. तो योग तरी केव्हां येणार होता?"

सकाळीं मेतकूट-भात झाला. दुपारीं बक्र्या फणसाचे गरे झाले. सांदणं मनांतच जिरलीं. संध्याकाळीं जेवाचीं कॉफी होतीच. दुसऱ्या दिवशीं असंच पिठलं-भात झालं. काकू 'बरं वाटतं' म्हणत होत्या, पण काकांनीं त्यांना उठूं दिलं नाहीं. दिवसभर त्यांच्या नाजुक प्रकृतीच्या गोष्टी ऐकवल्या.

"अगदीं तोळा-मासे प्रकृति हो ! मुळापासूनच तशी. लहानपणीं तर काय, केसागणिक दुखणं म्हणतात ना तशांतली स्थिति होती. आणि आतां वय पण झालं. आतां रोजचं दोघांचं काम रेटतात कसंबसं, पण एखादं कुणी पाहुणं आलं तरी झेपत नाहीं. चार दिवस करतात अन् मग अशी स्थिति होते." 'एखाद्या कुणी पाहुण्यांपैकीं' मी, तेव्हां हें ऐकून मला अगदीं अवघडल्यासारखं वाटलं.

लागलीच दुसऱ्या दिवशीं, मुंबईत एकदम अनपेक्षित कांहीं काम निघालं असं निमित्त करून, मीं गाशा गुंडाळायचं ठरवलं. काकांकडे लवकर जायची गोष्ट काढल्यावर काका फिरून एकदां गहिवरले. डोळ्यांत पाणी आणून राहायचा आग्रह करूं लागले.

"ताई, राहा ना आल्यासारख्या महिना-पंधरा दिवस. ह्यांचं दुखणं मनावर नका हो घेऊं तुम्ही. चालायचंच तें. त्यांना पाहुण्यांची बडदास्त

ठेवायचा मोठा सोस हो. सात-आठ दिवस कसा तुमचा बेत अगदीं व्यवस्थित राखलान् पण ! मीं म्हटलं तर माझं ऐकलं नाहीं. आणि आतां धरलंन् हंथरूण. पण ताई मी आहे ना तुम्हांला काय हवं नको तें पाहायला ? माणसं हवी हो आम्हांला. राहाच तुम्ही. ''

पण मीं निश्चयच केला निघायचा. काकांचा पाहुणचार 'बोलाचा भात, बोलाचीच कढी', असल्या प्रकारचा असला, तरी त्यांना अगत्य खरंखुरं होतं, त्यांचा राहण्याचा आग्रह मनापासून होता, हें कळत होतं मला. पण काकांचं मन द्विधा होऊन एका बाजूनं आपलेपणाची ओढ आणि दुसऱ्या बाजूनं आज कितीक वर्षं अंगवळणीं पडलेला कवडीचुंबक-पणा ह्यांच्या द्वंद्वांत सांपडलं होतं त्यामुळें त्यांची जी केविलवाणी स्थिति झाली होती ती पहावत नव्हती. तेव्हां काकांच्या आग्रहाला बळी पडलें नाहीं. निश्चय कायम ठेवून निघालेंच. निघतांना काकांनीं अढीच्या अन् पडीच्या रावयंळ आंब्यांची भेट दिली मोठ्या प्रेमानं अन् आत्मविश्वासानं विचारलं, '' काय ताई, आमच्या पाहुणचारांत कांहीं कमी नाहीं ना पडलं ? ''

[ —स्त्री ऑक्टोबर १९५५ ]

## १५ : : : काकांचं दुखणं

काका अगदीं जिवावरच्या दुखण्यांतून उठले नुकतेच. आपल्या सर्व मंडळींस भेटण्याची त्यांची इच्छा आहे, असा काकूंचा निरोप आला म्हणून मुद्दाम सवड काढून काकांच्या फिरून गांवीं गेलें.

काका बरेच अशक्त झालेले दिसले; पण पूर्वीचंच प्रसन्न चित्त, आपुलकीचं आगत्य आणि बोलण्यांतला अघळपघळपणा पाहून बरं वाटलं. मी भेटल्यावर काका एकदम उद्गारले, "दादांना भेटायला निघालों होतो ताई, पण ह्या मंडळींनीं अगदीं दारांतून ओढून आणलं बघा." काकू काकांचे पाय दाबीत बसल्या होत्या, त्यांच्याकडे पाहून मी म्हटलं, "आम्ही नाहीं इतक्यांत जाऊं देणार तुम्हांला, काका! वडील माणसाचा मोठा आधार वाटतो आम्हांला!" काका पुढें म्हणाले, "तुम्ही अगदीं मुसंब्याचा रतीब लावलांत ताई, पण त्यानंच अंगांत ताकद आली हो!" मला आश्चर्यच वाटलं. एकदां कधीं मी २०-२५ मुसुंबं धाडलीं आणि रतिबाच्या कसल्या गोष्टी काका करताहेत? नेहमींची प्रेमाची अतिशयोक्ति, कीं कांहीं समजुतीचा घोटाळा आहे? मी पुढं कांहीं बोलणार इतक्यांत काकू गप्प राहण्यास खुणावत आहेत त्याकडे लक्ष गेलं आणि मी विषयच

बदलला. नंतर आम्हीं दोघीच असतांना काकूनीं खुलासा केला, " ताई त्याचं असं झालं बघा. जरा आराम पडल्यावर डॉक्टरांनीं सांगितलं रोज मुसंब्याचा रस देत चला म्हणून डझन मुसुंब्रं बाजारांतनं आणलीं. ह्या अनाडी गांवांत महागाचींच मिळालीं. इकडे तें कळल्यावर एकदम त्रागा सुरू केला स्वारीनं. ' काय करायचीं होतीं मुसुंबं ? मला सोसायचीं नाहींत तीं ! काय कळतंय त्या डॉक्टरला ? तुम्ही त्यांचं ऐकतां म्हणजे काय ? ' वगैरे. बळेबळे घातला रस, पण तो अंगीं लागेना. घसा खवखवतो, सर्दी होते— एक ना दोन कितीतरी तक्रारी सुरू झाल्या. चार दिवस मुसुंबं बंद केलीं. तितक्यांत तुम्हीं मुसुंब्रं धाडून दिलींत. तुम्ही इतक्या प्रेमानं धाडलींत म्हणून तीं घ्यायला सुरुवात केली. तीं मुसुंबं मात्र बाधलीं नाहींत हो. तुम्ही आपुलकीनं धाडलेलीं कशीं बाधणार तीं ? तेव्हां त्या बोटीच्या एजंटाला दर बारीला डझन दोन डझन मुसुंब्रं आणायचं सांगून टाकलं. इकडे मात्र सांगितलं कीं ताईनींच मंचरच्या पाटलांकडून मुसुंबं पाठविण्याची व्यवस्था करून ठेवली आहे. मग लागलीं हो तीं मुसुंब्रं अंगीं !"

काका पडल्यापडल्या आपल्या दुखण्याच्या आठवणी काढीत बसत. एक दिवस म्हणाले, " ताई आमच्या आयुष्याची दोरी बळकट खरी, नाहींतर कसा उठलों असतों या दुखण्यांतून ? अहो, दोन वेळां शुद्धसुद्धां गेली म्हणे. अन् अचूक त्याच वेळीं तो अलिबागचा मोठा डॉक्टर नेमका इथं हजर ! काय म्हणाल या योगायोगाला ? परमेश्वराला इतक्यांत न्यायचं नव्हतं हेंच खरं. " नंतर काकूंचं आणि माझं ह्यावर बोलणं झालं. तेव्हां काकू म्हणाल्या, " अहो, कुठला योगायोग ताई ? शुद्ध गेल्यावर मोटार पाठवून डॉक्टरला बोलावून घेतलंन् हो. पहिल्या खेपेस बाबू होताच घरीं. इकडे कांहीं सांगितलं नाहीं. उगंच त्रागा करून जिवाला त्रास करून घेतला असता. दुसऱ्याहि खेपेला शुद्ध गेल्यावर माझ्या तोंडच पाणी पळालं बघा. मग नानाशेटकडूनच डॉक्टराला बोलावून घेतलंन् .

पुन्हां मोटारीनंच आणलं आणि मोटारीनंच पोंचवलं. डॉक्टरांचं काम तें. वेळेवर आपल्या गांवीं हजर न होऊन कसं चालेल ?"

एक दिवस माझ्या अचानक लक्षांत आलं कीं काकांच्या खोलींत अंथरुणाजवळच्या कोनाड्यांत बाटल्या सगळ्या वसाकाच्या नाहींतर द्राक्षासवाच्या...मीं काकूंना आश्चर्यानं म्हटलं, "एवढं जिवावरचं दुखणं आणि ह्या असल्या औषधांनींच का गुण पडला ?" काकू जरासं थांबून म्हणाल्या, "आतां खरं सांगूं ताई तुम्हांला ? त्या डॉक्टरानं औषधं लिहून दिलीं तीं इथं मिळेनातच. एकेकाचं नांव केवढं म्हणतां ! माझ्या मेलीच्या ध्यानांतहि राहात नाहीं. आणि किंमती तर काय विचारतां एकेकाच्या ? त्या एजंटाकडून मागवलीं. स्वारीला कळतं तर 'हें औषध सोसत नाहीं, तें माझ्या प्रकृतीला मानवत नाहीं,' असं झालं असतं. मग काय केलं ताई, औषधं आणायचीं डॉक्टरांनीं सांगितलेलीं आणि तीं असल्या बाटल्यांत भरून जवळ ठेवायचा आणि त्यांतूनच वेळेला औषध काढून द्यायचं असं चालवलं. अद्याप पत्ता नाहीं लागला स्वारीला. त्यामुळं वसाकाचं आणि द्राक्षासवांचं गुणवर्णन चालू असतं."

मी तिथं असतांनाच डॉक्टरांनीं काकांना हवा बदल करा असं सुचवलं. प्रवासांत दगदग मात्र न होऊं देण्याची काळजी घ्या म्हणून बजावून ठेवलं. काकूंनीं बाबूकडे जायचं ठरवलं अन् काकांच्या कानांवर घातलं. काकांनीं एक चमत्कारिकच अट घातली. "हो, जाईन बाबूकडे पण बोटीचा प्रवास खालच्या वर्गानें आणि आगगाडीचा प्रवास तिसऱ्या वर्गानं होत असेल तर." मीं किती सांगितलें, काकूंनीं किती आर्जवं करून पाहिलीं, पण काकांचा निश्चय बदलेना. "मला माणसांत प्रवास करायला हवा. कुणीं सांगावं हा इहलोकचा शेवटचाच प्रवास असेल माझ्या नशिबीं ! पुढचा प्रवास एकट्यानच व्हायचा आहे. तिथं कुणी नाहीं येणार बरोबर. पण हा प्रवास माझ्या मनाप्रमाणं चारचौघांत हंसून-

खेळून झाला पाहिजे. नसेल ऐकत तुमचा डॉक्टर तर सांगा त्याला, कीं मीं अस्सा राहीन् इथं. हीं नवीन थेरं नकोत आम्हांला. बापजन्मांत कधीं केबिनचा प्रवास केला नाहीं. ”

शेवटीं काकूंनीं तो नाद सोडून दिल्याचं दिसलं. सातआठ दिवस असेच गेले अन् माझं परत जाणं अगदीं दोन दिवसांवर आलं. एका रात्रीं काकू म्हणाल्या, “ ताई, आम्ही पण तुमच्याबरोबरच केबिननं येऊं म्हणतों. ” मीं म्हटलं, “ पण काकू, कसं जमायचं तें ? काका अपरचा-सुद्धां प्रवास करायला तयार नाहींत. उगाच भलत्याच अशुभ गोष्टी बोलतात. मग केबिननं येण्याचं कसं जमणार ?” “पाहूं या जमेल कसें तें” असं काकू म्हणाल्या, पण त्यांच्या डोळ्यांत नवीनच कांहीं चमक दिसली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठायला मला जरा उशीर झाला. मी माझं सारं आटोपून काकांच्या खोलींत पाय ठेवतांच काकू साचिंत मुद्रेनं काकांना म्हणाल्या, “ आपल्याला भेटायला म्हणून ताई सवड काढून इथं आल्या; पण रात्रीं पोट बिघडलं त्यांचं. सारी रात्र बेचैन हात्या. परवां तर त्यांना मुंबईला परत गेलंच पाहिजे. केबिनचा एकटीचा प्रवास कसा झेपणार त्यांना ? त्याचीच काळजी लागून राहिली आहे मला. सारखं बाहेर जावं लागतंय त्यांना आणि चक्करहि येतेय्. काय पडल्या अन् लागलं तर उगंच आपल्यासाठीं त्यांनीं दुखणं ओढवून आणलंय असं व्हायचं !” काका कांहींच बोलले नाहींत, त्या वेळीं, पण त्यांच्या डोक्यांत ह्याचाच विचार चालू होता हें दिसलंच. तासाभरानं काकूंना म्हणाले, “ ताईंच्या दुखण्याची काळजीच वाटते मला. अशा वेळीं त्यांना एकट्या जाऊं दिल्या तर दादा काय म्हणतील स्वर्गात ? ‘ हा काका विसरला आमचे उपकार सर्व ।’ मग असं करा—आपल्याला जायचंच आहे ना मुंबईस ? ताईबरोबर केबिननंच जाऊंया आपण. ताई आपल्यासाठीं आल्या ना ? मग त्यांच्या अडचणींत त्यांना एकटं टाकून

कसं चालेल ? काढा केबिनचीं तिकिटं आपल्यासाठीं—पण पुढचा आगगाडीचा प्रवास मात्र अगदीं थर्ड क्लासनं बरं का ? ”

काकूंना तरी दुसरं काय हवं होतं ? पण त्यांनीं एकदम काकांचं म्हणणं मानलं नाहीं. मग काकांनीं अधिकच आग्रह धरला केबिननं जाण्याचा. मला मात्र दोन दिवस काकूंनीं जडवलेल्या ह्या व्याधीचं नाटक करावं लागलं. सारखं बाहेर जाण्यापासून तें तूपभातावरच भागवण्याइतपत !



बोटीवरचा आमचा प्रवास फार मजेंत झाला. संध्याकाळीं मावळत्या सूर्याला मनोभावानं हात जोडून नमस्कार करतांना काकूंना पाहून काका म्हणाले, “ ताई, हे दिवस पाहीन असं वाटलं नव्हतं हं. त्यांच्या काळजीचं अन् शुश्रूषेचं चीज झालं. माझ्या दुखण्यांतच ह्यांचा देवधर्म पण फार वाढला आहे हं, उपासतापाससुद्धां किती काढले ! त्यामुळंच उठलों मी असहि असेल वाटत त्यांना. त्या माउलीची पुण्याई मोठी खरी. आज बारा वर्षांनीं बोटीवरचा प्रवास घडतो आहे. माझं दुखणं बरं झालं तरी ह्यांच्या देवाच्या प्रार्थनेत कांहीं कमी नाहीं बरं का ! ”

रात्रीं काकू अन् मी बोलत बसलों. काकू जराशा चिंताग्रस्त दिसल्या. त्यांच्या मनांत कांहीं धुमसत आहे असं वाटलंच मला. आम्ही

दोघीहि कांहीं वेळ स्तब्धच होतों. समुद्राच्या पाण्याचा आणि त्या पाण्यास सरसर कापत जाणाऱ्या बोटीचा काय तो आवाज होता. वारा वाहत होता. काकूंनीं आपल्या दबलेल्या विचारास वाट करून दिली. " ताई, अगदीं कठीण प्रसंग आला होता बघा. परमेश्वरानंच निभावून घेतलं सारं. आतां एकच मागणं आहे त्याच्याजवळ. ' ह्या दुखण्यांत प्रतारणा फार केली, त्याचं पाप मानूं नकोस बाबा. ' अगदीं नाइलाज झाला. मुद्दाम जाणून बुजून का फसवलं ? तूंच समजून घे काय तें. अन् कळलंच स्वारीला सारं तर तूंच समजूत घाल कशीतरी. ' ताई, आतांशा हीच एक चिंता नडते आहे. "

काकूंचे डोळे भरून आले होते. मला कौतुक वाटलं तें हें कीं इतक्या दिवसांत काकूंनीं काकांच्या स्वभावदोषांचा कधींसुद्धां निर्देश केला नाहीं. मनांतल्या मनांत तरी त्यांना जाणीव होती कीं नाहीं ह्याचीसुद्धां शंका वाटत होती. काकांचं दुखणं संभाळलं, काकांचं मन संभाळलं, त्यांच्या स्वभावदोषांवर झांकण घातलं आणि प्रतारणेचं पाप स्वतःच्याच माथ्यावर घेतलंन् माउलीनं. आणि त्यांतून सुटका करण्यासाठींच देवाला आळवणं चालू होतं.

काकांनींसुद्धा आपला हेकेखोरपणा सोडला तो आम्हां मंडळींवरच्या त्यांच्या मायेनं. आमच्या वडलांविषयींची त्यांची कृतज्ञताबुद्धि सदैव जागृत होती आणि त्यामुळं आमचं मन दुखवणं, आमच्या गरजांकडे दुर्लक्ष करणं हें काका कसोशीनं टाळत असत. ह्याचाच फायदा काकूंनीं काकांच्याच स्वास्थ्यासाठीं घेतला. काकांचं आमच्याविषयींचं सौजन्य आणि आमच्या-वरचा लोभ आणि काकूंची काकांवरची भक्ति ह्यांच्याच योगानं काका दुखण्यांतून उठले. इतक्या सद्भावना मुळाशीं असल्यावर प्रतारणेचं पाप कुणाला ?

[स्त्री–एप्रिल–१९५६]

# १६ : : : शिकलेली सून !

मी वर्षभर हिंदुस्थानाच्या बाहेर होतें. आणि काय योगायोग पहा, नेमक्या त्याच वर्षांत आमच्या घरोब्याच्या तीन बिऱ्हाडीं लग्नं झालीं. उमाकाकूंचा नाना, शेजारच्या आत्याबाईंचा बापू, अन् साळूमावशींचा तात्या. तिघंहि वयानं व शिक्षणानं बरोबरीचेच. तिघांनींहि गेल्या वर्षीं पदवीधर मुलींशीं विवाह करून, आपापल्या कुटुंबांत नवा पायंडा घातला होता. ह्या शिकलेल्या सुनांविषयीं सास्वांचं काय मत आहे तें कळण्याची मला उत्सुकता लागून राहिली होती, तेव्हां मुद्दामच सूनबाई घरांत नाहीं अशी वेळ साधूनच तिन्हीं बिऱ्हाडीं गेलें.

## काकूंचं मत

प्रथम उमाकाकूंकडे गेलें अन् म्हटलं, "काय काकू, काय म्हणतात सूनबाई ? आतां नानानं पदवीधर सून घरांत आणली, आतां काय अस्मान ठेंगणं वाटत असणार तुम्हांला ?" काकू जरा कडवट तोंड करून म्हणाल्या, "हो आहे खरी पदवीधर सून, पण नांवापुढं दोन अक्षरं लावण्यापुरतीच पदवी हो ! नोकरी नाहीं कांहीं नाहीं. घरांतच डुंबत असते. शिक्षणाचा उपयोग काय तर म्हणे 'आदर्श गृहिणी होणार, आणि आदर्श संसार

करून दाखवणार.' नानाच्या बरोबर कॉलेजांत गणित शिकत होती म्हणे! पण घरांत एक गणिताचं पुस्तक हातांत धरील तर शपथ! पुस्तकं वाचणार कोणती तर 'हजार पाकक्रिया', 'स्वयंपाकांचे कांहीं प्रकार' किंवा असेल एखादं विणकामाचं नाहींतर शिवणकामाचं पुस्तक! रोज चालतात एकेक स्वयंपाकाचे प्रकार! मग दुपार जाते शिवणकामांत नाहींतर घरच्या सजावटींत. मी म्हणतें काय वाईट होती बिन शिकलेली बायको? आपल्या वर्गांतली मैत्रिण म्हणून नानानं हुंडासुद्धां घेतला नाहीं हो. पण तेव्हां नोकरी करीत होती. मी म्हटलं, नसेना का हुंडा, मिळवती सून तर लाभली. पण हिनं लग्न झाल्यावर नोकरीच दिली सोडून. काय म्हणे 'संसार नेटका करायचा तर नोकरीची दगदग नको पाठी.' करा म्हणावं संसार अन् द्या आम्हांला रजा. बसूं आम्ही टाळ कुटीत अन् जाऊं द्या तुमचं शिक्षण चुलींत!"

## आत्याबाईचं मत

तिथून गेले आत्याबाईकडे अन् तसेंच विचारलं, "काय, आत्याबाई बापूनं शिकलेली बायको आणली, आतां आनंदी आनंद असेल?"

आत्याबाई तांदूळ निवडित बसल्या होत्या. त्यांनीं चष्म्यावरून माझ्याकडे दृष्टिक्षेप केला, अन् एकेक शब्द चावीत म्हणाल्या, "खरं आहे, आणली शिकलेली बायको बापूनं! पण बायको कोण अन् दादला कोण हाच प्रश्न पडला आहे. सकाळीं ह्याची दवाखान्याची घाई तर हिची हपिसाची. स्वयंपाक करण्याची गोष्ट सोडा, एकमेकांची पंगतसुद्धां नाहीं लाभत जेवायला. काय करायची नोकरी अन् पैसा? म्हणे 'एवढी शिकलें, वरची जागा मिळवली, तें काय चूल सजवायला?' चूल संभाळायची नव्हती तर कशाला बाई लग्न केलंस? रहायची होतीस कुंवार उभा जन्म! आतां माझं वय कां उरलं आहे संसार संभाळण्याचं? मी म्हणत होतें कीं

बापूची बायको आली कीं तिच्यावर सारं सोपवीन अन् मी मोकळी होईन; पण अजून सारंच आहे माझ्या अंगावर, उलट नोकरीवाली सून आल्यानं, वाढतंच आहे तें ! देवधर्म-तीर्थयात्रा राहिलं सारं. संसार कांहीं ह्या जन्मींचा सुटत नाहीं. ''

## साळू मावशीचं मत

साळू मावशीकडे जाऊन फिरून तीच चौकशी केली. मावशी उपरोधिक स्वरांत म्हणाल्या, '' वा ! काय सांगूं शिकलेल्या सुनेचं माहात्म्य ? एक ना धड भाराभर चिंध्या ! मी म्हणते शिकलीस ना, नोकरी करायचीय ना, मग कर नीट नोकरी. बरं, नसेल करायची नोकरी, मिळतंय् देवाच्या दयेनं तात्याला पोटापुरतं, तर घरीं रहा अन् कर संसार. पण हिला दोन्हीं हवं, मग एकहि साधत नाहीं नीट, अन् जीवाची होते आटापीट ! भाजी–आमटी कसली करायची ते आपण ठरविणार. काय म्हणे ' आहार समतोल असला पाहिजे.' सकाळीं भाजी चिरणार आपणच–मला चालत नाहीं म्हणून–शिजवायला आपण लावीत नाहीं इतकंच. तितक्यांत शाळेच्या वह्या तपाशीत बसणार. मग धडपड करून शाळेंत जाणार. संध्याकाळीं मला जेवायचं नसतं तेव्हां संध्याकाळचा स्वयंपाक आपल्याच अंगावर घेतला आहे. पण त्यांत सुद्धां गंमत पहा. शाळेंतून आली कीं कुकर लावील. मग नवरा हपिसांतून आला कीं जोडप्यानं फिरायला जायचं अन् घरीं येऊन ते उकडलेलं बेचव जेवण जेवायचं. अहो सांगितलेत कुणी हे धंदे ? रात्र थोडी अन् सोंगें फार ! आमचे हातपाय मोडले कां आहेत ? मी नाहीं का घरांत पहाणार ? हिनं कशाला दोन्हीं ठिकाणीं मन गुतवावं ? '

तीन घरचीं अशीं तीन मतं ऐकून मी मात्र बुचकळ्यांत पडलें.

[संगम–ऑगस्ट, १९५४]

# भाग तिसरा

[ व्यक्तिचित्रें १७ ते २० ]

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23653 दि: 12-8-55
क्रमांक ...1135 नों: दि: 30-1-55

## १७ : : : बाळू आणि मंडळी

[ बोर्डीतल्या जीवन-शिक्षण मंदिराच्या विद्यार्थ्यांनीं पंधरा दिवस प्राथमिक शाळा चालवली. त्या अवधींत पहिली-दुसरींतल्या छोट्या, सरल मनाच्या भाबड्या मुलांनीं आमचें मन आकर्षून घेतलें. लपवाछपवी नाहीं, वरवरची शिस्त नाहीं, हंसणें, बोलणें, दंगा करणें सर्वच सरळ आणि निर्व्याज ! तीच ही बाळू आणि मंडळी त्यावेळच्या दैनंदिनींत अवतरली. ]

### बाळू

दिसायला मोठा गोजिरवाणा ! गोरापान चेहरा, लालबुंद ओठ आणि लुकलुकणारे पिंगट पण पाणीदार डोळे. वर्गाच्या मानानें त्याचें वय फार लहान आहे. खरें म्हणजे बालवाडींतली मौज लुटण्याचें त्याचें वय, पण वडिलांनीं पहिलींतच डांबून बसवला आहे. मुलांनीं भराभर शिकून तयार व्हावें अशी पालकांची महत्त्वाकांक्षा असते ना ? बाळूचें लक्ष वर्गांत क्वचितच असतें. तो कधीं दांडगाई करीत नाहीं, गडबड करीत नाहीं, भिंतीला टेकून आपल्याच मनोराज्यांत दंग असतो. पण एकदां कां लक्ष लागलें कीं मग विचारूं नका ! काय करीत असेल त्यांत पुरा तन्मय होऊन जातो. एकदां कताईच्या वेळीं झाला असा प्रकार. वर्गांत मुळींच लक्ष देत नाहीं म्हणून गुरुजींनीं त्याला आपल्याजवळ बसवून घेतला. कधीं

नाहीं तें त्या दिवशीं कताईचें साहित्य भरपूर होतें. बाळूची स्वारी अशी कांहीं कामांत गर्क झाली ! कापूस साफ झाला, रेचला गेला, पेळूहि बनले अन् तकलीवर धागाहि झराझर निघूं लागला. येथें "गुरुजी गुरुजी" अशी गडबड वर्गांत सुरू होतीच. पण बाळूला त्याचें भानहि नाहीं. वीस मिनिटांत पाठ भिंतीला एकदांहि टेकली नाहीं. आणि दृष्टि अधांतरी कोठें तरी लागली नाहीं. बाळू आपल्या कामांत चूर ! इतकी एकाग्रता, एखादें वेळ कां होईना पण साधत असल्यावर आणिक काय हवें ?



## सुरेश

अत्यंत गडबड्या व खोडकर ! वर्गांत दोन मिनिटें लक्ष ठरत नाहीं. शेजारच्या मुलाला मार, मधेंच उत्तर दे, मधेंच उठून उभा रहा, कुणाचें पुस्तक घे, पाटी घे, असे धंदे सारखे चाललेले असतात. दिसायलाहि मूर्ति मोठी गंमतीची ! डोकें पाठीमागून चपटें, एका पायावर वांकडें उभी राहण्याची लकब आणि हाताचे कांहीं ना कांहीं विचित्र चाळे सतत सुरू. अशी आहे स्वारी ! पण बोलण्यांत पटाईत आणि जातिवंत नट आहे आणि त्याची पुरेपूर कल्पनाहि आहे गुलामाला ! वर्गांत नाट्यीकरण सुरू झालें कीं हात वर करून वाकडा चालत पुढें येतो अन् म्हणतो, "बाई, मला घ्या नाटकांत, मला छान जमतं नाटकांतलं काम !" –आणि खरंच नाटकांत काम करतांना स्फूर्तीनें आपल्या भूमिकेशीं पूर्णपणें समरस होऊन तो काम करतो. पाठ केलेलें जसेंच्या तसें बोलत नाहीं पण अगदीं प्रसंगास अनुरूप

असें आपलेंच कांहीं तरी बोलून घेतो. नाटकांतल्या भूमिकेशीं तादात्म्य पावण्याची हातोटी इतकी कीं 'डुक्करभाऊ' ह्या संवादांतल्या घाणेरड्या दिनूचें काम केल्यापासून थेट तसाच घाणेरडा रहातो. तोंडावर चिकट डाग आणि ओघळ असायचेच, आणि त्याच्या गौरवर्णावर ते अधिकच उठून दिसतात. एकदां मी त्याला म्हटलें, "अरे सुरेश, नाटकांतल्या त्या दिनू-सारखा खराच कीं रे डुक्करभाऊ बनलास तूं !" इतर मुलें हंसलीं, ह्यानें नुसतें गंभीरपणानें विचारलें, "मग तोंड धुवून माणूस बनून येऊं का ?"

## मालती

पहिल्या दिवशींचा तो अवतार पाहिला, मळका फ्रॉक, केसाच्या जटा झालेल्या—कधीं तेलपाणी लागलें असेल कोण जाणें—नाक वहात असलेलें—अन् वाटलें कसें निभायचें हें काम ? पण तीन दिवसांत किती फरक ! चौथ्या दिवशीं तेल लावून व्यवस्थित वेणीफणी केलेली मालती रांगोळी घालीत असतांना पाहिली तेव्हां तीन दिवसाच्या परिश्रमांचें सार्थक झाल्यासारखें वाटलें. नव्या बाईंनीं व गुरुजींनीं कौतुक केल्यावर कळी खुलली होती आणि हळूहळू आपल्या लाघवी स्वभावानें सर्वांची आवडती होऊन बसली. होती मालती साऱ्या गांवची बोलघेवडी आणि तितकीच प्रेमळ. पंधरवड्याची शाळा आटपली तेव्हां मालतीला म्हटलें, "मालती ! आतां शहाण्यासारखी वागणार ना ? रोज वेणीफणी करशील ना ?" प्रथम म्हणाली—"हो बाई" अन् मग विचार बदलून एकदम कशी म्हणते—"नाहीं बाई, पुन्हां वेडी होणार मी ! म्हणजे मग तुम्ही वर्गात याल, ह्या दुसऱ्या बाई येतील. शहाणी झालें तर कशाला याल तुम्ही ?"

कधीं रस्त्यांत कुठें भेटली कीं प्रेमानें हांक मारते आणि आमच्या वर्गात कधीं येणार म्हणून विचारते. तिच्यांत कला आहे, गाण्यानाचण्याची तिला आवड आहे, प्रेमाची भुकेली आहे आणि ह्या सर्वांला आमच्या त्या पंधरवड्यांत शिक्षकांच्या आपुलकीच्या वागणुकीनें पूर्ण वाव मिळाला.

## २ री अ च्या चिमण्या

पंधरा दिवसांनंतर त्यांना चिमण्या म्हणतां येईल. सुरुवातीला असा कलकलाट करीत कीं गुरुजींचं काय, निरीक्षकांचं काय डोकें उठून जाई ! एकेकीचे आवाज तरी किती खणखणीत ! पण मौज ही कीं सर्व मिळून असा धिंगाणा घालत पण व्यक्तिशः कोणाहि एकीला प्रश्न विचारला कीं एकेक काय लाजे अन् मुरके ! आर्जवें करून राहिलीच उभी तर अंगाला सतरा आळोखे पिळोखे, मान खालीं, आणि तोंडांतून शब्द निघेल तर शपथ ! निघालाच चुकून शब्द तर लगेच तोंडावर हात धरून केवढाली जीभ बाहेर काढून खालीं बसायचें. पण एकदां खालीं बसली अन् मेळाव्यांत सामील झाली कीं पुन्हां बडबड सुरू. मग लाजेचं नांव नाहीं. सगळ्यांनीं मिळून एकदम बोलायचें, हंसायचें, हें सर्व चालू ! ह्या टिटव्यांना शिस्त लावण्यांत चार दिवस खर्ची पडले. पण मग मात्र त्यांच्या कलकलाटाला चिमण्यांच्या किलबिलाटाचें स्वरूप आलें. हळूहळू लाज पळाली. निर्भीडपणें उठून उत्तरं देऊं लागल्या आणि पूर्वीच्या त्या सामुदायिक बडबडीला आळा पडला. पुढं पुढं तर चौकसबुद्धीनें प्रश्नहि विचारूं लागल्या. ह्यांच्याच जोडीला तो छोटा चंद्रकान्त. बुद्धि कुशाग्र पण अत्यंत बडबड्या. आणि बडबडीची खुबी ही कीं, तींत गुरुजींनाहि सामील करून घेऊं पहायचं. त्याची विनोदबुद्धि अतिशय तीव्र ! भोंवतालीं जें कांहीं चालतं त्यांत कांहीं ना कांहीं हंसण्याजोगं मिळतंच त्याला आणि ते गुरुजींच्या निदर्शनाला आणून देऊन त्यांना हंसवायचें. ‘ गुरुजी, मालती आज उलटा फ्रॉक घालून आली बघा ! ’ किंवा ‘ गुरुजी, हा पेळूला पेरु म्हणतो, आतां ह्याला पेरु कुठून आणून द्यायचा ? ’ उत्तरं पटापट देईल, प्रश्नहि भरपूर विचारील आणि कंटाळला कीं, वर्गांतल्या वर्गांत कांहींतरी खेळहि शोधून काढील.

समवाय पद्धतीच्या प्रयोगाला वर्ग हवा तो असा !

[जीवन शिक्षण (हस्तलिखित) मासिकांतून]

## १८ : : : खुश्रूचें काम

खुश्रू हा आम्ही रहात होतों त्या हॉटेलांतील मालकीणबाईंचा नातू. त्यांना लहान मुलांची फार आवड म्हणून तान्हां असल्यापासून त्यांनीं त्याला आपल्याजवळ ठेवून घेतलें आणि तिथेंच तो वाढत होता. वय असेल सरासरी चार वर्षें. गोरा-गोमटा, धष्ट-पुष्ट, गुबगुबीत चेहरा, हंसरे डोळे, आणि लालचुटूक ओंठ–दिसायला मोठा आकर्षक दिसे. रोज सकाळीं आंघोळ घालून परीटघडीचे शर्ट आणि विजार, अशा पोषाखांत आजी त्याला तयार करी. सकाळीं साताच्या सुमारास जो घराबाहेर पडे तो लगबगीनें धांवतच ! 'काय खुश्रू, खेळायला निघालास काय ? ' असें आपण विचारलें कीं त्याचें उत्तर ठरलेलें, 'नाहीं, काम करायला चाललों मी ? ' ' कसलं काम ' म्हणून विचारलं, कीं कधीं हातांतला फुटका कप दाखवून म्हणे 'आज बागेला पाणी घालायचं आहे.' कधीं फावडे दाखवून म्हणे ' आज विहीर खणायची आहे ' किंवा ' आज घर बांधायचं आहे. ' काय त्या दिवसाची लहर असेल तें काम, पण त्या कामांत ढिलाई नाहीं कधीं व्हायची. आम्हां सर्व वडील माणसांचा त्याच्या कामाच्या खरेपणावर पूर्ण अविश्वास. कुणी थट्टा करी, कुणी रागावे, पण

त्याची त्याला दिक्कत नसे. त्याचें झाडांना पाणी घालणें सुरू झालें, कीं माळीणबाई गाजतच यायची. ' कशाला घालीतो वाटी वाटी पाणी ? तुझ्या इवल्याशा पाण्यावर जगल का तें झाड ? उगंच नाशाडी कशाला करतो समुद्राची ? ' त्याची विहीर अर्धी अधिक खणून झालेली असली, कीं म्हाताऱ्या माळ्यानें म्हणावें, ' कशाला खणून ठेवला हा खळगा ? कुणी पाय फसून पडला म्हंजे ? ' आम्हीं जाणाऱ्या येणाऱ्यांनीं त्याच्या बांधल्या 'घराची' कुचेष्टा करावी, पण त्याला कशाचीच पर्वा नसे. त्याचा उद्योग चालूच असे. मधेंच एखादृदुसरी फेरी चिंचेच्या झाडाकडे, नाहींतर बोरीकडे किंवा जांभळीकडे व्हायची आणि मुद्दयाचें कांहीं मिळालेंच खालीं, तर तें विजारीच्या खिशांत कोंबलें जाई. काम करतां करतां चघळायला त्याचा उपयोग होई.

त्याला जेवणाची भ्रांतच नसे. ' खुश्रूशेठ, चला जेवायला ' म्हणून होटेलच्या नोकराची हांक ऐकली कीं यावें, आणि आजीच्या आग्रहास्तव टेबलाशीं बसून जेवावें, पण त्या जेवणास झाडाखालीं गोळा केलेल्या चिंचाबोरांची सर कशी येणार ? आजीनें दुपारीं झोंपण्यासाठीं म्हणून डांबून नाहीं ठेवलें, तर पुनः बागेंत आपल्या कामावर पसार व्हावें. दुपारीं असेंच दुसरें कांहीं काम शोधून काढण्यांत येई. दुपारीं सगळी मंडळी विश्रांतीसाठीं म्हणून पहुडली, सर्वत्र सामसूम झालें, तरी कुठून तरी खणण्याचे नाहींतर ठोकण्याचे आवाज येतच असत.

होटेलांत वर्षभर रहाणारें एक कुळ होतें.—एक सत्तर वर्षांचा म्हातारा रक्तदाबाच्या विकारानें वैतागलेला आणि पूर्णपणें निष्क्रिय बनलेला. त्याला खुश्रूची ही अखंड चळवळ पाहून वेडावल्यासारखें होई व त्याचा रक्तदाब एकदम वाढे. खुश्रू त्याला डोळ्यांसमोर नको असे. तो म्हणे " कार्टं, खेळतं दिवसभर, मग ही धांवपळ आणि जिवाची आटापीट कशाला ? " खुश्रूला कामावर धांव मारतांना पाहिलं, कीं " पळूं नको वेडयासारखा, सावकाश चाल " म्हणून त्याच्या अंगावर

खेंकसे, मग खुश्रू जास्तच जोरांत पळे. त्याच्या कामाला आणि इतर उद्योगांना दिवसाचे चोवीस तास पुरत नसत, मग हळू चालण्यांत वेळ घालवला तर कसें व्हायचें ?

ऑक्टोबर व मे महिन्यांत होटेलमध्यें उतारूंची आणि मुलांची गर्दी फार ! कुणी चार दिवस राही, कुणी आठ दिवस राही, सारखी ये-जा चालूच असे. सगळे उतारू खुश्रूचे 'अंकल' नाहीं तर 'आंटि'; पण कुणाविषयीं विशेष आपुलकी नाहीं कीं लाजरेपणा वा भित्रेपणा नाहीं. कुणीं बोललें आपल्याशीं तर बोलायचें, कुणी आपल्या खोलीत बोलावलें तर आंत जायचें, नाहीं तर एरवीं मोठ्या माणसांच्या वाऱ्याला उभें रहायचें नाहीं.

मे महिन्यांत खुश्रूला मित्रमंडळी मोठी लाभत असे. पण हा परिवार



बदलताच राही. एका आठवड्यांत होटेलमध्यें मुलीच पुष्कळ जमल्या. मग काय खुश्रू राजा त्यांचा ! त्यांनीं विटा रचून सिंहासन उभारावें

आणि खुश्रूनें त्याच्यावर विराजमान होऊन राजाची ऐट आणावी आणि चहूबार हुकूम सोडावे. पुढल्या आठवड्यांत मुलगेही जमले बरेच. त्यांनीं उद्योग काढला विटांचा किल्ला बांधण्याचा. मग आमचे खुश्रूशेट–आदल्या आठवड्याचे बादशहा–गवंडी बनले. पण राजा काय, गवंडी काय, कामांतला जिव्हाळा तोच. गवंड्याचें काम जोरांत चाले. माळ्याचा डोळा चुकवून घमेलें आणायचें, त्यांत विटा भरून, दोघादोघांनीं घमेलें वाहून न्यायचें, विटांमध्यें भरायला चिखल करायचा–अंगांतून घाम गळेतोंवर काम चालू रहायचें.

संध्याकाळीं खुश्रू घरांत येई तों कपडे मळलेले, विजारीचे बंद तुटलेले, केस विस्कटून घामानें चिकटलेले, हातातोंडावर मातीचे ओघळ वहात असलेले, अशा अवतारांत ! सकाळीं आजीनें न्हाऊं धुऊं घालून, स्वच्छ परीटवडीचे कपडे चढविलेला तोच हा खुश्रू हें कुणाला खरेंहि वाटायचें नाहीं. होटेलमध्यें मुंबईच्या एक बाई आल्या होत्या, त्या संध्याकाळचा हा अवतार पाहून खुश्रूच्या आजींना म्हणत, " तुमच्या मुलीच्या गांवीं मॉंटेसरी शाळा आहे ना ? मग धाडून द्या खुश्रूला आपल्या आई-जवळ तिथें शाळेंत तरी जाईल तो. " मी मनांतल्या मनांत म्हणें, खुश्रूने ह्या बागेची अन् होटेलची मॉंटेसरी शाळाच बनवली आहे. आपलें सर्व जीवन अगदीं मॉंटेसरीच्या तत्त्वावरच चालवलं आहे त्यानं, मग इतक्यांतच कशाला त्याला दुसरी शाळा ? " हो, मॉंटेसरी शाळेंत गेला तर तिथल्या शिक्षकांना बालमनाची पारख असल्यानें, काम आणि खेळ ह्याची खरी, म्हणजे बालमनाला असते तशी कल्पना असल्यानें, खुश्रूला तिथें वडील माणसांकडून अधिक सहानुभूति मिळेल, पण खुश्रूला थोडीच अशा सहानुभूतीची जरूर आहे ? तो आपल्या स्वतःवर, आपल्या एकंदर जगावर, मुख्यतः आपल्या कामवार मनापासून खूष आहे !

[शिक्षणपत्रिका–जून १९५२]

## १९ : : : रघू

रघू हा आमच्या ड्रायव्हरचा तीन वर्षांचा मुलगा. तो घाटावर गांवीं जन्मला, त्या सुमारास त्याच्या बापाला नोकरी नव्हती. त्यामुळं रघूच्या छोटया आयुष्यांतील पहिलं वर्ष-दीडवर्ष त्यानं अत्यंत हालांत काढलं. आई लोकांकडे किंवा शेतावर काम करून काय थोडं-बहुत मिळवी आणि आपलं व मुलाचं कसंबसं पोट भरी. रघूला पोटभर खाणं मिळण्याची पंचाईत असे. सकाळीं जरासं कुठं दूध मिळे, मग दिवसभर भाकरीचा तुकडा चघळीत बसे. सारखे आईच्या वाटेवर डोळे लागलेले असत. ती कामावरून येतांना लोकांकडे उरलंसुरलेलं अन्न आणीत असे, तेवढ्यावरच बिचारा समाधान मानून घेई. पुढें बापाला नोकरी लागली, रहायला खोलीहि मिळाली, तेव्हां रघूची आई त्याला घेऊन मुंबईस आली. आतां हालाचे दिवस संपले, आतां अन्नाची ददात नव्हती. पण छोटया मनास ह्या बदललेल्या परिस्थितीचा एकदम विश्वास

वाटेना. त्याला वाटे हें सुख दोन्ही हातांनीं धरून ठेवलं नाहीं तर कधींहि कुणीतरी तें हिरावून घेईल. जेवायला बसला कीं, ताटली भरून भात मागून घेई. तेवढा जातहि नसे. मग खातां खातां झोंप येई, पण झोंपे तो भातावर हात ठेवून. मग त्याला झोंप लागल्यावर त्याची आई हळूच ताटली उचलून बाजूला ठेवी. पण महिन्याभरांतच तो पहिले बिकट दिवस विसरला आणि आनंदानें नाचूं-बागडूं लागला.



आमच्या घराजवळ रहात असतांना त्याला भीमाबाईचा मोठा लळा लागला. आपल्यावर प्रेम करील, आपलं कौतुक करील, तें माणूस आपलं, एवढंच त्याच्या बालमनाला माहित होतं. परक्यांनीं कुणी खाऊ देऊं केला तर घेत नसे. पण भीमाबाईकडे हक्कानं वाटेल तें मागायला तयार ! त्याला बटाटा फार प्रिय. रोज सकाळीं आमच्या स्वयंपाकघरांत येऊन चौकशी चाले, 'मावछे, आज पटाट हाये ग ?' बटाट्याचं कांहींहि केलं तरी त्यांत ह्याचा वांटा निघायचाच. श्रावणी सोमवारला संध्याकाळच्या लवकरच्या जेवणाची भीमाबाईची धांदल पाहून त्याला मोठा आनंद होई. मग एकदां देवाला नैवेद्य दाखवून झाला कीं हे बालदेव जेवायला बसत. पाट, केळीचं पान, पाणी प्यायचा तांब्याभांडं सर्व कांहीं व्यवस्थित लागे. एरवीं उंबरठ्यावर बसून जेवायला तयार, पण श्रावणांतल्या सोमवारीं सर्व कांहीं टीकठाक हवं असें. कांहीं कमी पडलं तर बिनसें सगळं. त्याला असा जेवायला बसलेला पाहून लोक भीमाबाईंना विचारीत, 'काय आज सोमवारचा ब्राह्मण जेवायला बोलावला काय ?' भीमाबाई म्हणत, 'हा सवाई ब्राह्मण आहे आमचा ! सर्वांहून पवित्र, कधीं त्याच्या मनाला पाप शिवलेलं नाहीं.'

रघूला भीमाबाईंचा मोठा आश्रय! बाहेरून आला कीं केव्हां केव्हां एक लांब काठी घेऊन येई. काठी कशाला आणलीस म्हणून चौकशी केली कीं सांगे, "तातानं (वा बयोनं) वाटंत मारलं मला, आतां तूं मार त्याला या ताठीनं," जितका मार खाल्ला असेल आणि मारणाऱ्याचं व्यक्तित्व रघूच्या दृष्टीनं जितकं मोठं असेल, तितकी काठी मोठी असायची.

त्याला मधेंच जेवतांना गप्पा मारायची लहर येई. आई बोलण्याच्या लहरींत नसली तर आपली वाढलेली ताटली घेऊन आमच्या स्वयंपाक-घराच्या उंबरठ्यापाशीं मांडी घालून बसे. आणि मग ज्या कांहीं गप्पा सुरू होत त्या विचारूं नका. त्याचं अर्धअधिक बोलणं ऐकणाऱ्याला कळत सुद्धां नसे, पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालत नसे. त्याच्या गोष्टी असत चेंडू-विषयीं, वा गोट्याविषयीं वा फुलपांखरांविषयीं; पण त्यानं जोरांत "अं? काय मावछे?" म्हटलं, कीं होकाराचं वा नकाराचं उत्तर आलंच पाहिजे.

तीन वर्षं वयाच्या मानानं रघू बोले पुष्कळ, पण मधून मधून 'क' वर्ग आणि 'त' वर्ग त्याच्या जिभेला दगा देत. बरेच दिवस 'क' वर्ग वर्ज्यंच होता आणि 'त' वर्गावरच दोहोंचं काम भागत असे. 'ताता, नतो' 'मी तरतों' वगैरे. पण 'क' वर्ग जमूं लागल्यापासून जरा घोटाळाच होऊं लागला. 'ताता' (काका) सारखे एकदां 'त' वर्गात बसलेले बरेचसे शब्द तसेच कायम राहिले,पण 'क' वर्गातले नवीन शब्द जमले. इतकंच नाहीं, तर नको तिथं 'क' वर्ग जिभेवर येऊन बसूं लागला. मग 'दाळभाता'चा-डाळ म्हणण्याइतका चोखंदळपणा त्याच्या उच्चारशास्त्रांत नव्हता-होऊं लागला "गाळभात"! सगळीं चिडवत, 'काय रघू, आज गाळभात खाल्ला कां?'

आपल्यांतला आणि वडील माणसांतला फरक रघूच्या ध्यानांत आलेला नव्हता. बाह्य गोष्टींत तो मोठ्या माणसांच्या वागण्याचं अनुकरण

करी, पण त्यांच्या मनाची पारख अजाणतेपणीं आपल्या मनावरूनच करी. मनांत आलं म्हणजे उठण्याबसण्याची, चालण्याची ऐट मोठ्या माणसाची अगदीं. आमच्या घरापाठच्या परसांत यंदा पावसाळ्यांत दुधी भोपळ्याचे वेल मांडवावर चढवले होते. दुधी चांगले लांबलचक लागले आणि मांडवावरून लोंबूं लागले. मांडवाखालून जायचं म्हणजे आम्हांला वांकून जावं लागे. आमचं पाहून हें दीड फुटाचं बुटबैंगणहि तसंच करी. त्याच्या डोक्यापासून भोंपळा चांगला हात, दोन हात दूर असला तरी हा आपला अगदीं वांकून त्याच्या खालून जाई.

पण वडील मनुष्य कुणी नाराज दिसलं कीं तो आपल्यावरून त्याच्या मनाची कल्पना करी. तो स्वतः रागावला कीं खाऊनं त्याचं समाधान होतं, तेव्हां रागांत वा दुःखांत असलेल्या वडील माणसाला तो बिचारा समजुतीच्या स्वरांत विचारी, 'चणे आणूं? मरमरे आणूं?' त्यानं नाराजी नाहीं गेली कीं त्याला वाटे मग आतां ह्याला वडील माणसांच्या आवडीचा खाऊ दिला पाहिजे. मग दुडुदुडु आपल्या घरांत धांवत जाई आणि आपल्या बापाची तंबाखूची चंची घेऊन येई आणि प्रेमानं, रुसवा काढण्याच्या स्वरांत म्हणे 'कात खाते? पान खाते? खा, खा मावछे!'

पण कधीं मोठं मनुष्य आपल्यासारखं वागतांना पाहिलं कीं पुनः बुचकळ्यांत पडे. एकदां मला बॅडमिंटन् खेळतांना त्यानं पाहिलं आणि त्याच्या मनांत मोठा गोंधळ उडाला. मोठीं माणसं काय करतात ह्याबद्दल त्याच्या विचारांची जी चौकट होती त्यांत तें बसेना. अगदीं गांगरून भीमाबाईकडे गेला, शब्दसुद्धां स्पष्ट उमटेना, आणि हावभावांनींच त्यांना सांगूं लागला, 'बाई, अछं करते, मारते कुणाला! मोठी पतड (पकड) हाये हातांत.' मोठीं माणसं आपल्यासारखीं खेळतात ही कल्पना त्याच्या बालमनाला अगदींच अपरिचित होती. तसंच वडील माणसांना भांडतांना पाहिलं कीं गांगरून जाई बिचारा! लहान मुलं भांडतात, मारतात, हें

त्याला माहित होतं; पण मोठीं माणसं ह्या क्षुल्लक पोरकटपणाच्या पलिकडे असतात अशी एक त्याची समजूत होती. मोठ्या माणसांच्या चांगुलपणावरचा, त्यांच्या शहाणपणावरचा, त्यांच्या सामर्थ्यावरचा विश्वास त्याच्या बालमनांत अढळ होता.

रघूला बरोबर खेळायला घरीं दुसरं कुणी मूल नसे आणि चाळींतल्या मुलांत तो फारसा मिसळत नसे त्याचं वर्याह एकटं खेळण्याचंच होतं. त्यामुळं तो सदा कशांत ना कशांत अगदीं तन्मय होऊन गुंतलेला असायचा. वेळ कसा घालवावा, मनाची करमणूक कशी करावी हा प्रश्न त्याच्या मनाला कधींच जाणवला नाहीं. सकाळीं आईबरोबर बाजारांत जायचं, मग घरीं आल्यावर पायरीवर बसून चहा आणि पाव खायचा, आपल्या स्वतःच्या आणि आमच्या स्वयंपाकघराचा कचरा भरायचा, मग बागेंत माळ्याबरोबर काम करूं लागायचं, मधेंच फुलपाखरं दिसलीं कीं 'पाखा आला' असं म्हणत एक काठी घेऊन त्यांच्या पाठीं लागायचं, तितक्यांत कोणी फूल तोडतांना दिसला कीं, त्याला हटकायच. लटकचमेलीचीं फुलं गोळा करून तीं आईच्या व भीमाबाईच्या अंबाड्यांत खुपसायचीं, असं कांहीं ना कांहीं सारा वेळ चाललेलं असे. शिवाय त्याची एक लहानशी चार इंच लांबीची गाडी होती, तिचं बरंच करावं लागे. बाप गाडी धुई तशी ती रोज धुवावी लागे, पुसावी लागे. रोज सकाळीं बापाकडे चौकशी चाले; 'आज तुमची गाडी धुतली ?' गाडीसाठीं रोज नवीन नवीन रस्ते तयार करावे लागत, मधून मधून ती कारखान्यांत न्यावी लागे. इतका कामाचा बोजा डोक्यावर असतांना वेळ जाण्याचा प्रश्न उद्‌भवणार तरी कसा ? शिवाय गप्पा असत, मधून मधून गोट्याचेंडू ह्यांचा खेळ असे.

लहानपणीं स्वतःचंच सर्व सांभाळून घ्यावं लागलं असल्यानं त्याच्यांत व्यवहारज्ञान आणि हुशारी भरपूर होती, पण ती बालिश निरागस

स्वरूपाची ! माळी दुरून दिसला कीं म्हणे, 'हा आला माळी, बागेत काम नाहीं करीत.' पण माळी जवळ आला कीं, लगेच त्याच्याशीं लगट करून लाघवीपणानं म्हणे, 'या माळीमामा !' बागेला पाणी दिलं ? बसा कात चुना खा, तमाखू खा ! '

सौदे पटविण्यांत मोठा वस्ताद ! आमच्या बागेच्या कुंपणापाशीं आंतल्या बाजूला आहेत अबोलीचीं रोपं आणि बाहेरच्या बाजूला रस्त्यावरच्या झाडांचीं लटकचमेलीचीं फुलं पडतात. रस्त्यावरून जाणारीं शाळकरी मुलं रघूला कुंपणापाशीं खेळतांना पाहून त्याला म्हणत, 'बाळ, हीं घे तुला वासाचीं छान छान फुलं. अन् तीं झाडावरचीं फुलं काढून दे पाहूं आम्हांला.' रघू कबूल होई, अन् एखाददुसरं अबोलीचं फूल काढून देई आणि लटकचमेलीचीं फुलं मागे. तीं एकदां हातीं लागलीं कीं मग म्हणे, 'आतां उद्यां या ! '

कुणी काम सांगितलं कीं आधीं आपला मोबदला ठरवून घेणार. 'रघू तेवढी घरांतली टोपली आण रे' म्हटलं कीं, लगेच विचारणार, 'मग पटाट देशील मला ? ' वाळत घातलेलं कांहीं कावळा खात असला कीं, आपणच वर्दी पोंचवणार आणि 'त्याला हांकव' म्हटलं कीं, आधींच अट घालून ठेवणार 'मग चेंडू खेळशील माझ्याबरोबर ? '

त्याचे आईबाप आणि इतर मंडळी त्याला आवरण्यासाठीं माझा उपयोग बुजगावणं म्हणून करीत, त्यामुळं त्याच्या मनांत माझ्याविषयीं मोठी भीति बसली होती. 'बागुलबुवा आला,' 'पोलिसदादा आला' असा धाक घातला तरी मुळींच दाद देत नसे. पण 'बाई आल्या' म्हटलं कीं, एकदम घाबरे. मला पाहिलं कीं धूम ठोके, बोलत असला तर माझी चाहूल लागतांच मान खालीं घालून गप्प बसे. आणि मी एकदम जवळ गेलें कीं, एकदम भोकांड पसरी. पण रडत असला अन् मी जोरांत

म्हटलं ‘ कोण रडतंय् तें ? ’ कीं लगेच रडायचा थांबे, आणि अगदीं चूपचाप बसे.

पण गंमत ही कीं, मला इतका भीत असला तरी हा स्वतः इतरांकडे माझा उपयोग आपल्या फायद्यासाठीं बागुलबुवा म्हणूनच करी. कुणी कांहीं मनासारखं केलं नाहीं, त्याचा चेंडू त्याला चिडवण्याकरितां म्हणून घेतला कीं जोरांत अधिकारयुक्त वाणीनं सांगे, ‘ अछं नतो तलूं, बाई वरडल. ’ बटाटयाची भाजी स्वतःच्या आवडीची, ती करतांना मोठ्या उत्सुकतेनें पहात बसे आणि भीमाबाईंना सांगे, ‘ मावछे, पटाटाला तिथट नतो दालूं, बाई वरडल. ’

रघूचा वडील भाऊ त्याच्याहून तीन वर्षांनीं मोठा, पण तो आपल्या चुलत्याकडेच असे. त्याचा स्वभाव रघूच्या अगदीं उलट. रघू हा साऱ्या मुलुखाचा बोलघेवडा तर हा अगदींच घुमा ! रघू दिवसभर धडपड करणार, पळणार, गप्पा मारणार, ह्याच्या ना त्याच्या अंगावर ओरडणार तर हा एका जागीं थंड बसून रहाणार. रघूनं काढलेले हाल त्याच्या वांट्याला आलेले नव्हते, त्यामुळं हा संथपणा त्याच्या अंगवळणीं पडला. चुलतभावंडं रघूला चिडवायला म्हणत, ‘ हा थोरला अगदीं गृहस्थ कसा ! हा छोटा पक्का मवाली ! ’ रघूला कुठं कळणार ‘ गृहस्थ ’ आणि ‘मवाली’ ह्या शब्दांचा अर्थ वा त्यांतला फरक ? पण बोलणाऱ्याच्या आवाजावरून आणि मुद्रेवरून तो चाणाक्षपणानं ओळखे कीं दादाची स्तुति चालली आहे व आपली नालस्ती होत आहे. मग गाल फुगवून म्हणे, ‘ मी नाय मवाली, दादाच मवाली. मी गिरत्त ! ’ अन् बोलणारं माणूस दूर गेलं कीं, हळूंच म्हणे, ‘ आतां कुठं चालला हा मवाली ? ’

त्याच्या ‘गिरत्ती’ पणाला शोभेल असा खिसा असलेला कोट त्याला बक्षिस मिळाला. मग छोट्या गृहस्थाची ऐट केवढी वाढली ! बाहेरून घरीं

आला कीं मोठ्या माणसांसारखा कोट काढून खिळ्याला लावी आणि म्हणे, ‘ मावछे कोट बघ हां, पैछे हायत त्यांत ! ’ असायचे त्यांत तांब्याचे दोनच पैसे, पण ऐट केवढी ! पैशाचं काय करणार म्हणून विचारलं तर सांगे, ‘ वेणी आणणार, एक बयोला अन् एक मावछीला. ’

पैशाची किंमत कळत नाहीं, आपपर भाव नाहीं, मोठ्या माणसांवर अढळ विश्वास, राग येतो पण टिकत नाहीं, लोभ मात्र भरपूर, एवढ्याशा गोष्टीनं मन आनंदानं फुलून निघतं व दुःखाची विस्मृति पडते, असं तें बाळपण रम्य खरं !

[संगम–जानेवारी–१९५६]

## २० : : : पहिले बोल

चि. मुकुल हा माझ्या मावसबहिणीचा नातू. आज मितीस त्याचें वय बरोबर २ वर्षें, ३ महिने आणि १५ दिवस इतकें आहे. आपल्या आईबापांचें पहिलें अपत्य, आजोबा–आजींचें पहिलें नातवंड, मामाचें पहिलें भांचरूं, असें पहिलेपणाचें स्थान ह्या सर्वांच्या जीवनांत पटकाविल्यानें त्याला ह्या सर्वांकडून अलोट प्रेम आणि कौतुक मिळतें. आम्हां इतर नात्याच्या मंडळीसहि, आमच्या कुटुंबांत सात आठ वर्षांनीं मूल जन्मास आल्यानें, त्याच्याविषयीं एक विशेष कौतुक वाटत असतें. सर्वच दृष्टींनीं 'गुणी' असल्यानें मुकुल ह्या कौतुकास पूर्णपणें पात्र आहे.

अगदीं तो लहान असल्यापासून त्याच्या एकेक बाललीला आम्हां सर्वांच्या कौतुकाचा व कुतूहलाचा विषय होऊन बसल्या आहेत. तो पहिल्यानें हंसला केव्हां, माणसाला केव्हां ओळखूं लागला, मान केव्हां धरूं लागला, उपडी केव्हां प्रथम झाला, पोटावर पुढें कसा सरकूं लागला, वगैरे प्रत्येक बारीक सारीक गोष्टींचें बारकाईनें निरीक्षण करून आम्ही खूप कौतुक केलें.

आम्हां सर्वांना घाई झाली होती मुकुलचे बोबडे बोल ऐकण्याची ! त्यानें निरर्थक आवाज काढण्यास सुरू केल्यावर आम्ही तो बोलायला कधीं लागेल त्याची वाट पहात होतो. कंठ तर फुटला, शब्द कधीं बाहेर फुटणार ? पण एरवीं सर्व बाबतींत अत्यंत चलाख असणारा आणि त्याला अनुलक्षून बोललेलें एकूण एक सर्व कांहीं समजणारा मुकुल ह्या बाबतींत आमची निराशाच करूं लागला. आम्हांला जमणार नाहीं अशा सफाईनें आपली खेळांतली मोटर चालवी आणि आमच्याकडे विजयी मुद्रेनें पाही. पण ' पॉम् पॉम् ' म्हणण्याखेरीज ' मोटर ' हा शब्द कांहीं उच्चारूं शकत नव्हता. पहिल्या वाढदिवशीं २०-२५ लहान लहान शब्द उच्चारण्यापर्यंतच त्याची मजल गेली होती. मुकुलची आई निराशेनें म्हणे, " मावशी, कधीं ग बोलायला लागणार हा ? " मी बालमानसशास्त्राच्या पुस्तकांतलें सारें ज्ञान आठवून तिला धीर देई, " अग, असंच असतं हो कांहीं कांहीं मुलांचं. बोलायला सुरुवात करतात उशिरा पण एकदां बोलणं सुरूं झालं कीं मग अशी झपाट्यानं प्रगति होते !" पण वर्षाचा होऊन आणिक एक महिना उलटला आणि मुकुलची बोलण्याची गाडी फारशी पुढें गेली नाहीं तेव्हां माझाहि धीर खचूं लागला.

आणिक एक महिना गेला. मुकुल आपल्या भोंवतालच्या मंडळींचीं चार पांच अक्षरीं नांवें उच्चारूं लागला होता. पण गडबड करून, दोन जवळ येणाऱ्या स्वरांचा संधि तरी करी किंवा एखादा स्वर वा व्यंजन गाळूनच टाकी–' मोठ्याई, ' दाजीऽजा ' ' छनुमाछी ' वगैरे. पण त्या-नंतर लवकरच विशेषनामांवरून सामान्यनामावर मुकुलच्या बोलांची गाडी येऊन पोंचली, आणि भाषाविकासांतील महत्त्वाचा टप्पा त्यानें गांठला. इथून पुढें भाषाशिक्षणांतील सरळ उताराचा मार्ग लागला, आणि बोल-ण्यांतली प्रगति मोठ्या झपाट्यानें सुरू झाली. आपले नाक, कान वगैरे सर्व अवयव स्पष्ट उच्चार करून दाखवूं लागला. शब्दसंग्रह सारखा वाढत

होता. भोंवतालच्या सर्व वस्तू, चित्रांच्या पुस्तकांतल्या वस्तू, ह्यांचीं नांवें मोठ्या हुरूपानें सांगत सुटे. कधीं कधीं त्यानें वापरलेल्या सामान्यनामांचा त्याच्या डोक्यांतला बरोबर अर्थ लावणें मुष्कीलीचें होऊन बसे. ज्याला आपण इंग्रजीमध्यें Gadget म्हणूं अशा प्रकारच्या, पिचकारी, स्क्रू, अत्तराची बाटली, अशा वस्तु घेऊन येई आणि 'काय हें' असं विचारलं कीं अगदीं गंभीरपणानें सांगे 'गंमत.' गंमत ह्या शब्दाचा त्याच्या मनांतला अचूक अर्थ आम्ही हुडकून काढूं शकलों नाहीं.

एक दिवस मुकुलच्या लक्षांत आलें कीं आपण 'आई' 'आजी' 'बाबा' म्हणतो त्या मंडळीस इतर वेगळ्याच नांवानें संबोधितात. तेव्हां एक दिवस त्यानें वयाचा वा मानाचा भेदभाव न मानतां सर्वांना नांवानें हांका मारण्यास सुरुवात केली. आजीला 'नलिनी', आईला 'सरोज', मामाला 'अशोक' वगैरे. त्याला संभाळणाऱ्या आयाला वाटलें कीं, वडील माणसांचा अपमान होतो हा! तेव्हां ती त्याला सांगूं लागली, "बाळ, 'नलिनी' म्हणूं नये, आपण 'आजी' म्हणावं." तेव्हां मुकुलनें आपला स्वतंत्रच मार्ग काढला; तो म्हणूं लागला 'नलिनी आजी', 'सरोज आई', 'अशोक मामा', 'पमबाबू बाबा' वगैरे. अशीं जोडनांवें बसवून नांवें उच्चारण्याची आपलीहि हुक्की पुरी केली आणि शहाणपण शिकविणाऱ्या आयाचेंहि ऐकलें. मधें सात आठ महिने नांवानें हांका मारण्याचें विसरला, पण अलिकडे त्याच प्रवृत्तीनें पुनः उसळी खाल्ली आहे. आपल्या आजीची आई शोभतील अशा बाईंना खुशाल 'मथू' म्हणतो, आजोबाच्या मित्राला बिनदिक्कत एकेरी नांवानें हांक मारतो. ह्यांत द्वाडपणाचा मुळींच अंश नाहीं, केवळ मूळ नांवें उच्चारण्याबद्दल विशेष गोडी दिसते. माझ्या स्वतःच्याच नांवाची गोष्ट घ्या. आतांशा अगदीं विवक्षित अशी कांहीं कांहीं मंडळी मूळ नांवाचें संक्षिप्त रूप वापरतात, पण ह्या स्वारीनें तेंच रूप वापरण्यास सुरुवात केली आहे. परक्या

मंडळीचा गैरसमज होण्याचा संभव आहे, पण अशीं नांवें उपयोगांत आणतांना मुकुलची निर्व्याज वृत्ति पाहिली कीं, तो गैरसमज तात्काळ दूर होतो. त्याचे आजोबा त्याच्या विशेष मर्जींतले. त्याचे लाडही भरपूर करतात आणि त्याच्याशीं बरोबरीच्या नात्यानें खेळतात. त्यांच्या नांवाचीं मुकुलनें अनेक रूपें बनवलीं आहेत. त्याला एखादें माणूस आवडलें कीं, त्याला 'ताई–मावशी' वा 'मामा–काका' ह्या उपाधि नकोशा वाटतात असें अनुमान काढल्यास चुकीचें होणार नाहीं.

खरें सांगायचें म्हणजे नव्या शब्दांविषयीं त्याच्या मनांत एक विशेष कुतूहल दिसूत येतें. एक दिवस मला 'मावछी' म्हणून सारखा पुनः पुनः खेळकरपणानें हांक मारूं लागला, तेव्हां मीहि गमतीनें दोन तीन वेळ म्हटलें "काय रे मुकुलभाच्या?" 'मुकुलभाचा' हा शब्दप्रयोग त्यानें कधींच ऐकला नव्हता त्यामुळें तो अगदीं बेहद्द खूष झाला. मला पुनः पुनः हांका मारी आणि मी साळसूदपणाचा आव आणून नुसतें 'मुकुल' म्हटलें कीं म्हणे, 'उं हूं, मुकुलभाचा म्हण'. पण 'मुकुलभाचा' मी एकटीनेंच म्हणणें सार्थ आहे, माझ्याच डोक्यांतलें तें कांहींतरी वेड आहे, असा त्याचा रोख दिसे. ह्या लहरींत असतांना कुणी माझा उल्लेख केला कीं 'मुकुलभाचा' म्हणे आणि आपणच खदखदून हसे.

त्यानें वाक्य म्हणावयास सुरुवात केली ती आज्ञार्थी वाक्यावरून. 'दे', 'ने', 'दाखव' 'म्हण' अशीं क्रियापदें योग्य अर्थीं वापरूं लागला. त्यानंतर 'आहे' व 'नाहीं' ह्या दोन क्रियापदांनींच त्याच्या मनाची पकड घेतली. "ते आप्पं (आपलं) नाहीं, छुनुमावछीचं आहे" असें 'आहे' व 'नाहीं' ह्या शब्दावर विशेष जोर देऊन म्हणूं लागला. आणि प्रत्येक वस्तूचा 'आहे' व 'नाहीं' म्हणून कोणाना कोणाशीं संबंध लावूं लागला. त्यावरून मला एक अमेरिकन बाई मराठी भाषणांबद्दल म्हणत

कीं, " मराठी भाषण म्हणजे त्यांतले ५० टक्के शब्द, 'आहे' व 'नाहीं'!" त्याची आठवण झाली.

अद्याप बोलण्यांतले सर्व प्रयोग मुकुलला साधलेले नाहींत, पण झपाट्यानें एकेक नवीन प्रयोग तो शिकत आहे " मला मोटरमध्यें बसावयाचं आहे 'किंवा' बसावयास हवें" हें म्हणण्याऐवजीं 'मोटरमध्यें बसतों' असा शब्दप्रयोग वापरतो. त्यावेळच्या त्याच्या एकंदर आविर्भावावरून आपण ओळखावयाचें कीं हें निव्वळ वस्तुस्थिति दर्शविणारें वाक्य नसून, इच्छादर्शक वाक्य आहे.

नवे शब्द शिकतांना केव्हां केव्हां त्यांच्या अर्थाचा अनर्थ होतो ! त्या दिवशीं मुकुल एक चित्र पहात असतां त्याला कोणीतरी चित्रांतल्या व्यक्ति दाखवून सांगितलें, "ही बाई आणि हा तिचा नवरा." तेव्हांपासून 'नवरा' शब्द आपल्या बोलण्यांत वापरण्याचा त्यानें सपाटा लावला आहे. एक दिवस एका कुमारिकेलाच विचारूं लागला, " तुझा नवरा कुठें ?" खोदून खोदून " माझा नवरा कोण ?" असें तिनें विचारलें, तेव्हां त्यानें तिच्याबरोबर येणाऱ्या गड्याचाच उल्लेख केला. नवरा म्हणजे अगदीं शब्दशः सहचर अशी त्याची कल्पना दिसते. पण आपल्या मावशीच्या बाबतींत त्यानें नवरा ह्या शब्दाचा अगदीं वेगळाच पण अनुरूप असा अर्थ लावलेला दिसतो. ही मावशी एका ऑफिसांत काम करते. मुकुलनें आपल्याशीं खेळण्याचा किंवा आपल्याला बरोबर नेण्याचा हट्ट धरला कीं ती ऑफिसांतील साहेबाची सबब पुढें करते आणि म्हणते " साहेब रागावेल. साहेब काय म्हणेल ?" वगैरे. वास्तविक त्या मावशीच्या नवऱ्याला मुकुल चांगला ओळखतो, पण तिचा 'नवरा' कोण म्हणून विचारलें कीं 'तुझा नवरा हपिसांतला साहेब' म्हणून सांगतो. नवरा म्हणजे हक्क गाजवणारा, भीति उत्पन्न करणारा कोणी अशीहि त्याची कल्पना दिसते.

शब्द व वाक्यें बोलण्याचें जमूं लागल्यावर, आतां बोलण्याची मजल कवितेंतल्या ओळी आणि बालगीतें म्हणण्यापर्यंत येऊन ठेपली आहे. त्या

बाबतींत तो अगदीं एकपाठी आहे. कुणी कांहीं कविता वा गाणें त्याच्या-समोर म्हटलें तर चटकन् ध्यानांत रहातें. त्याची आई त्याला कपडे घालतांना वा त्याला खेळवतांना आपण लहानपणीं शिकलेलीं इंग्रजींतील बालगीतें म्हणून दाखवी. एक दिवस तिनें नेहमींप्रमाणें "This little piggy went to—" असें म्हटलें अन् मुकुल अगदीं मिस्किल तोंड करून टाळ्या वाजवून ओरडला 'मार्किट'. आजीच्या लोकगीतांचीही अशीच समस्यापूर्ति करूं लागला. आजीनें 'झुणझुण पांखरा' इतकें म्हटलें कीं आपणच म्हणे 'जा माझ्या माहेरा' आणि स्वतःवरच खूष होई. अर्थात् त्याचें लक्ष अर्थापेक्षां शब्दध्वनीकडेच असायचें ! त्याला शब्दोच्चारांतच मोठी गंमत वाटते.

पण त्याच्या ह्या एकपाठी प्रवृत्तीचा आम्हीं गैरफायदाच घेतला. त्याला अर्थ कळणें अशक्य अशा गाण्याच्या व अभंगाच्या ओळी त्याच्या-



समोर एकदां दोनदां म्हणून त्याच्याकडून म्हणवून घेऊं लागलों. आणि त्याच्या तोंडांत ह्या ओळी चटकन् विनासायास बसत. परवां त्यानें गंमतच

केली ! बागेंत एक साळुंकी आली आणि आमच्या त्या साळुंकीविषयीं गोष्टी सुरू झाल्या. मधेंच हे बुवा उत्तरले, " छाळुंकी ( साळुंकी ) मंजुल बोलतछे ( से ) वाणी ! " तुकारामबुवांच्या अभंगांतला चरण, त्याच्या तोंडून, अशा अचानक, योग्य प्रसंगीं ऐकून आम्हांला मोठी गंमत वाटली.

आतां मुकुलची बोलण्यांतील प्रगति लहान लहान गोष्टी सांगण्यापर्यंत झाली आहे. त्याच्या गोष्टी म्हणजे बहुधा मोटार–विमान–आगगाडी ह्यासंबंधीं असतात. त्याला गतिमान् अशा वाहनांची मनापासून आवड आहे. चिमणी–कावळे–वाघ–सिंह त्याच्या खिसगणतींतच नाहींत. त्याच्या गोष्टींत एक मोठी मोटार असते वा लॉरी असते, तिच्यांत एकामागून एक कितीतरी माणसें बसतात, मग ती 'पॉम् पॉम्' करून जोरांत जाते, बसच्याहि पुढें जाते, अशी बहुधा गोष्ट असते. 'मोटारगाडी' हा त्याच्या मोठा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्याला गोष्ट लागते मोटार गाडीची, चित्राचें पुस्तक हवें तें मोटारगाड्यांच्या चित्रांचें, चित्रांचे ठोकळे हवें ते मोटारगाडीचें चित्र बनवतां येतील असे !

चित्रांतल्या वेगवेगळ्या प्रकारच्या गाड्या अचूक ओळखून काढतो. 'ही हिलमन—मावशीची गाडी' किंवा 'ही डॉज—मामाची गाडी'— वगैरे असें सात आठ गाड्यांचे प्रकार ओळखूं शकतो. सर्वांच्या गाड्यांचीं चित्रें दाखवून झालीं, त्यांचे रंग कोणते ह्यांचीं पारायणें झालीं कीं तोंड आंबट करून म्हणतो, " मुकुलची गाडी नाहीं. " त्याच्या आजोबांची गाडी होती. तिच्यांतून हिंडायला तर त्याला आवडेच पण नुसतें आंत बसून सगळ्याला हात लावायला मिळाला तरी बिचारा खूष होई. ती गाडी आतां विकली, पण मुकुल अजून तिची आठवण काढतो.

तो अगदीं परवांपर्यंत स्वतःसंबंधीं बोलतांना तृतीय पुरुषी रूपें वापरी पण आतांच आमच्या ध्यानांत आलें कीं, 'मी' शब्दाचा उपयोग तो



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकृत.

शिकला आहे. ' मी पान खातों बघ ', ' मी मोटार चालवतों बघ ' असें सांगून आपल्याकडे लक्ष वेधून घेऊं लागला आहे.

मुकुल अत्यंत बोलघेवडा आहे आणि त्यांतली गंमत हीं कीं बोलतां येऊं लागल्यापासून त्याचा स्वभावच पार बदलला. वर्षाचा असतांना तो कांहींसा बुजरा होता. नव्या माणसाला तो बुजे, त्याच्याजवळ जात नसे आणि कोणी बळजबरीनें त्याला जवळ घेतलेंच तर तोंड वांकडें करून भोकांड पसरी. पण बोलतां येऊं लागल्यापासून हा बुजरटपणा पार गेला. जणुं काय बोलण्याचें साधन हातीं आल्यानें त्याला इतरांविषयीं विश्वास वाटूं लागला आहे, आणि त्याच्या आणि इतरांच्या मध्यें असणारा पडदा दूर झाला आहे. परस्थानें त्याला स्पर्श केला तर अजून त्याला तें फारसें रुचत नाहीं आणि जोंपर्यंत स्पर्शद्वारांच इतरांशीं संबंध येई, तोंपर्यंत त्याला इतर कोणी नकोसें वाटे. पण आतां इतरांशीं संबंध प्रस्थापित करण्यास बोलण्याचें साधन हातीं आल्यापासून त्याला इतर मंडळी हवीशी वाटूं लागली आहे. भाषा हें परस्पर संबंध जोडण्याचें एक साधन आहे ह्याचें प्रत्यंतर त्याच्यांतल्या ह्या स्थित्यंतरांत प्रत्यक्षच मिळालें. भाषेच्या ह्या साधनावर प्रभुत्व आल्यानें मुकुलचा आत्मविश्वास वाढला आणि बोलतां येईपर्यंत सुप्त असलेली सामाजिक प्रवृत्ति खडबडून जागी झाली आहे. आतां सगळीं माणसें आपली 'दोस्त' ह्या बालपणास साजेशा सोज्वळ वृत्तीनें वावरत असतो.

[संगम–नोव्हेंबर १९५६]

# भाग चवथा

## व्यक्तिचित्रें २१ ते २३

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 2365 विभाग
क्रमांक 1235 नों. दि. 30/7/5

## २१ : : : आमचा कॅशिआ

आज २२ जुलै, अगदीं भर पावसाळ्यांतली तारीख ! यंदा पावसाचा जोमहि फार ! तरी मे महिन्यांत फुललेल्या आमच्या कॅशिआच्या झाडावर पांढुरके गुलाबी फुलांचे गेंद अद्याप कायम आहेत. हें कॅशिआचें झाड म्हणजे आमच्या वसतिगृहाच्या बागेचें एक सौभाग्यलेणें आहे. बाग उद्ध्वस्त झालेली असली तरी हें झाड पानां-फुलानीं भरून आलें कीं तिला शोभा चढते. आपल्या जुन्या वळणाच्या बायका म्हणतात कीं अगदीं एखादी लंकेची पार्वती अशी कुणी स्त्री असली, अंगावर दुसरा एकहि दागिना नसला, तरी एका मंगळसूत्रानें तिचा गळा खुलून दिसतो, तसाच प्रकार आहे हा !

साधारणपणें एप्रिल महिन्यापासून या झाडाचें अस्तित्व जाणवूं लागतें. हिंवाळ्यांत निव्वळ काटक्या झाडावर राहतात आणि जाडजूड नळकांड्याच्या आकाराच्या, फूट दीड फूट लांबीच्या, काळसर तपकिरी रंगाच्या शेंगा सरळ काटकोनांत लटकत असतात. ह्या दृश्यांत आकर्षक असें कांहींच नसतें. पण एप्रिल महिन्यांत पालवी फुटूं लागली कीं झाडाचा कायाकल्प होतो. झाडाची उंची बेताचीच, सरासरी सोळा

फूट इतपतच आहे. पण एकदां पानाफुलांचा बहर आला कीं त्याचा वर्तुलाकार घेर चांगला ४०–५० फूट होतो, आणि झाडाच्या डहाळ्या वरून खालीं बाकदार कमान करीत लोंबत असल्यानें झाडाला लता-मंडपाचें स्वरूप येतें. ह्या झाडाची पर्णरचना फार शोभिवंत आहे. झाडावर



आडव्या पसरणाऱ्या फांद्या थोड्याच असतात, पण प्रत्येक फांदीपासून अनेक डहाळ्या फुटलेल्या असतात, आणि एकेक चार-पांच फूट लांबीच्या डहाळीवर सोळा ते वीस अशा दोन्ही बाजूंनीं फूट दीडफूट लांबीच्या समांतर पर्णशाखा असतात. प्रत्येक पर्णशाखेवर लहान लंबवर्तुलाकार पानांच्या चौदा ते आठरा जोड्या असतात. एकेक पर्णशाखा मोठ्या पिसासारखी दिसते; आणि सगळ्या डहाळ्यांवर पानें फुललीं कीं चांगला ४० फूट घेराचा पिसाराच तयार होतो. ह्या चार-पांच फूट लांबीच्या डहाळ्यांचा मधला दांडा अगदीं हलका व नाजूक असल्यानें पावसाळ्यांतला सोसाट्याचा वारा सुटला कीं झाडाचा मोठा रमणीय नाच सुरू होतो. खालच्या

बाजूच्या पांच फूट लांबीच्या पर्णाच्छादित डहाळ्या मंद गतीनें, वर्तुलाकार वर खालीं असा फेर धरतात. वरच्या कमी लांबीच्या डहाळ्या अगदीं बेभान होऊन आपल्या भोंवतींच गिरक्या घेत गरागरा फिरून थैमान घालतात. खालच्या डहाळ्यांची मंद, लयबद्ध गति, आणि वरच्या डहाळ्यांचें जलद गतीनें वरच्यावर स्वैर फिरणें, ह्यांतल्या विरोधानें नाचाला रंग भरतो. कोणी कल्पक नर्तक ह्या झाडाच्या डहाळ्यांच्या नाचावर सुंदर नृत्य बसवील तर निसर्गातल्या अभिजात सौंदर्याचें चित्रण मानवी कलेंत उत्तम प्रकारें साधेल.

कॅशिआच्या पर्णातल्या ह्या सौंदर्यास त्यावर फुलणाऱ्या गुलाबी फुलांची जोड मिळाली कीं विचारूंच नका! एका बाजूला लालसर गुलाबी व वरच्या बाजूस फिकट गुलाबी अशा पाकळ्यांच्या दहा दहा फुलांचे गेंद मधल्या डहाळ्यांवर अगदीं गर्दीनें समांतर फुलतात. हें गेंद झाडावरून लोंबत नाहींत तर आपल्या उठावदार सौंदर्याच्या जाणिवेंत एकेका डहाळी-वर वरच्यावर अलग फुलतात. हिरव्यागार पानांच्या डहाळ्यांत ह्या फुलांच्या डहाळ्या झळकूं लागल्या कीं, मग हें झाड सौंदर्याची परिसीमा गाठतें.

गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यांत आमचा कॅशिआ अतिशय सुंदर फुलला. त्याच्या पानांच्या प्रचंड पिसाऱ्याखालीं कितीक बैठकी झाल्या. पाहुणे म्हणत, 'इथें बसलों कीं आणिक कसली सजावट नको.' गुलाबी फुलांनीं सजवलेलें, हिरव्यागार नाजूक नाजूक पानांचें छत, असल्या सुंदर लतामंडपाहून अधिक काय हवें?' रस्त्यावरून येणारे जाणारे मोठ्या कौतुकानें पानांफुलांनीं बहरलेल्या झाडाकडे पाहात उभे राहात. कोणी झाडाचीं छायाचित्रें काढून घेत.

असें झाडाचें कौतुक चहूंबाजूंनीं झालें, आणि फुलांचा बहर सरतो न सरतो तोंच माळी सांगावयास आला कीं झाडाला कीड लागली!

कीड तरी कसली विचित्र, स्वतः अदृश्य राहून ठराविक पद्धतीनें झाड पोखरून, स्प्रिंगच्या आकाराचा बुंध्याचा गर बाहेर टाकी आणि हां हां म्हणतां बुंध्यापासून तो थेट वरपर्यंत सर्व झाड तिनें एका बाजूनें पोखरून काढलें महिन्याभरांत! ती कीड लागलेली पाहून सर्वजण हळहळले. माळी व शिपाईलोक म्हणूं लागले झाडाला दृष्ट लागली, नाहीं तर तरणें ऐन जवानींतलें झाड कीड कशी धरील? माळ्यानें मांत्रिक बोलावला, झाडाची इडापिडा टाळण्यासाठीं मंत्र-तंत्र केला, कोंबडा बळी दिला, नारळ फोडला, सर्व सोहळा अगदीं पद्धतशीर झाला. हें करण्यास माझी परवानगी मागून मला पेचांत पाडलें नाहीं ही मेहेरबानी झाली. कारण जरी भ्रामक धर्मभोळ्या समजुतीवर विश्वास ठेवावयाचा नाहीं असें सुशिक्षित मन ठामपणें बजावीत असलें तरी पूर्वापार झालेल्या संस्कारापासून आंतलें मन अलिप्त राहूं शकत नाहीं. त्यामुळें माझी परवानगी विचारली असती तर माझ्यापुढें पेंचप्रसंग उपस्थित झाला असता. माळ्यानें शहाणपण वापरून मी घरीं नसतांनाच सारी क्रिया उरकून घेतली. पण परिणाम मात्र कांहींच झाला नाहीं. किडीच्या साम्राज्याचा अखंड विस्तार चालूच होता.

माळी हताश झाला. माझी सद्सद्विवेकबुद्धि जागृत झाली, आणि मन धर्मभोळ्या समजुतींकडून शास्त्राकडे वळलें. मी वनस्पतिशास्त्रांत पारंगत असणाऱ्या एका प्राध्यापकांचा सल्ला घेतला. त्यांनीं एक गैर-समज दूर केला. ते म्हणाले, "कोणी कांहीं म्हणो पण मला कांहीं हें झाड तरणें वाटत नाहीं. चांगलें २०–२५ वर्षांचें असावें. ह्या झाडाचें आयुष्य तितकेंच तेव्हां कीड लागली तर नवल नाहीं." त्यांनीं सुचविलेला डांबर व गेरूचा लेप चढविण्याचा उपाय करून पाहिला, पण त्याचाहि परिणाम कांहीं झाला नाहीं. शास्त्रानेंहि माघार घेतली.

ह्या प्राध्यापकांनीं झाडाच्या वयाचा प्रश्न उपस्थित केल्यावर मी

त्याचें वय अजमावण्याच्या खटपटीस लागलें. कोणी म्हटलें, "अहो १९५० च्या वनमहोत्सवांतलें हें झाड ! काय सांगतात तुमचे प्राध्यापक ? आम्हांला चांगलें स्मरतें आहे ना ? " तेव्हां मी पूर्वीच्या प्रिन्सिपलांना पत्रें लिहिलीं. प्रिन्सिपल हॅम्पटन ह्यांचें इंग्लंडवरून पत्र आलें कीं, "मला व माझ्या पत्नीला स्मरतें कीं, १९३० सालीं आम्ही कॉलेजवर आलों तेव्हां कॅशिआचें हें झाड बागेंत होतें." म्हणजे झाडाचें वय २६ वर्षांहून अधिक तर ठरलें. तरणें झाड ऐन उमेदींत किडीनें धरलें नाहीं हें कळल्यावर एकापक्षी बरें वाटलें, तर दुसऱ्यापक्षीं झाडाचें आयुष्य थोडें राहिलें, आणि त्या थोड्याशा उर्वरित आयुष्यांत अशा व्याधीनें तें पछाडलें जावें याबद्दल वाईट वाटलें.

सर्व उपाय हरले. आतां पूर्णपणें दुर्बल होऊन मेलेलें झाड पाहावें लागणार त्यासाठीं मनाची तयारी करावयास सुरुवात केली. तरीहि झाड वांचविण्यासाठीं काय करावें हे विचार सारखे मनांत डोकावत. एक दिवस पुस्तकाच्या कांहीं कामासंबंधीं एका प्रकाशकांचे प्रतिनिधि म्हणून बरींच वर्षें हिंदुस्थानांत राहिलेले एक इंग्रज गृहस्थ मला भेटण्यासाठीं आले. मुलांमुलींच्या अवांतर वाचनाचीं पुस्तकें कशीं असावीं ह्यावर आमचें बोलणें चालू असतां, आम्हां दोघांचेंहि एकमत झालें, कीं आपल्या इकडील मुलांत निसर्गांतील पशु, पक्षी, झाडें ह्यांविषयीं मुळांतच कुतूहल कमी असतें आणि तें वाढीस लागेल असें बालवाङ्मयहि आपल्याकडे नाहीं. ह्या गोष्टी निघाल्या आणि पाहुण्यांना आपल्या येथील फुलें-झाडें ह्यांबद्दल बरीच माहिती आहे हें ध्यानांत आल्यावर मी सहज ओघाओघानें आमच्या बागेंतील कॅशिआचा व त्याच्या नव्या आजाराचा उल्लेख केला. त्यावर त्यांनीं आपला एक अनुभव सांगितला कीं त्यांच्या बागेंतल्या एका झाडाला अशी कीड लागली, तेव्हां सर्व उपाय हरले म्हणून त्यांनीं किडीनें पोखरलेला भाग सिमेंट घालून बंद केला आणि झाड जगलें. त्यांनीं मला

तोच उपाय करून पाहण्याचें सुचविलें. मी म्हटलें, "पण असं सिमेंट भरल्यानें झाड वठणार नाहीं का ? उगंच उद्याचं मरण आज आणल्यासारखं होईल नाहीं तर ?" तेव्हां ते म्हणाले, "अशी कीड लागल्यावर एरवी तरी किती दिवस तग धरणार आहे झाड ? शेवटचा निर्वाणीचा उपाय म्हणून करून पाहा." त्यांचें म्हणणें मला पटलें आणि हा अघोरी उपाय केला. माळी आणि मी रोज येतां-जातां बारकाईनें झाडाची टेहळणी करीत होतों. लवकरच किडीचें राज्यप्रसाराचें काम बंद पडलेलें दिसलें, आणि महिन्यांतच दिसून आलें कीं कीड आंतल्याआंतच गाडली जाऊन निर्वंश झाली असावी. सिमेंटनें झाड वठलें तर नाहींच पण उलट कीड मेल्यानें तें वांचलें आणि बळकट झालें.

असें जीवदान मिळालें म्हणूनच जणूं काय ह्या वर्षी तें अत्यंत कृतज्ञ बुद्धीनें अगदीं प्रफुल्ल अंतःकरणानें फुललें आहे. असा फुलांचा बहर गतवर्षी आलाहि नाहीं आणि इतके दिवस टिकलाहि नाहीं. जुलैअखेर मुंबईत क्वचितच एखाद्या झाडावर फुलांचा शृंगार दिसतो आणि म्हणूनच एकलेपणानें बहर टिकवून धरलेल्या ह्या झाडाच्या दृश्यानें डोळे व मन सुखावतात.

गुलाबी फुलाच्या कॅशिआचें झाड म्हणजे आपल्या इकडील प्रदेशांत पाहुण्यासारखेंच आहे. हीं झाडें मुळांतलीं ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा ह्या प्रदेशांतील. तेथें असलेल्या कांहीं इंग्रज गृहस्थांनीं हिंदुस्थानांत काम करीत असलेल्या आपल्या इंग्रज स्नेह्यांना त्यांचें बीं धाडलें आणि त्यांनीं तें आपापल्या बागेंत लावून पाहिलें. अशा रीतीनें ह्या शतकाच्या पहिल्या दहा वर्षांत आपल्या येथें ह्या झाडांचा शिरकाव झाला. आपल्या येथल्या फुलणाऱ्या झाडांत आणि ह्यांच्यांत फार फरक आहे. आपल्याकडील झाडांवरच्या फुलांत असा चटकदार गुलाबी रंग आणि फुलांची ही विपुलता सहसा आढळणार नाहीं. आपलीं फुलून नजरेंत भरणारीं झाडें

म्हणजे पांगारा, पळस, गुलमोहोर, सावरी, कर्णा, संकेश्वर वगैरे! त्यांचीं फुलें एक तर गर्द लाल, नाहीं तर शेंदरी, नाहीं तर पिवळीं जर्द! शिरीषाच्या नाज़ूक रेशमासारख्या फुलांत गुलाबी छटा असते, पण तीं फुलें लाजवट, पानांखालीं लपून राहतात. कॅशिआचीं फुलें हीं वेगळींच आणि त्या झाडाचीं नाज़ूक ठेवणहि वेगळी. असें भिन्नत्व त्याच्या स्वरूपांत असलें, तरी आमच्या येथें, कॅशिआंचा आदरसत्कार, आर्य संस्कृतींत मुरलेल्या आतिथ्याच्या कल्पनेनुसार झाला आहे व त्यांचा प्रसार मोठ्या प्रमाणांत झाला आहे. आज मुंबईतल्या अनेक खासगी व सार्वजनिक बागांत हीं गुलाबी कॅशिआचीं झाडें पाहावयास मिळतात. तीं उन्हाळ्यांत फुललीं कीं मुंबईचे शौकिन लोक तीं पाहायला दुरून दुरून येतात आणि त्यांचें तोंडभर कौतुक करतात. हीं झाडें परदेशांतून येथें आणलेलीं, आपल्या येथील झाडांहून अगदीं वेगळीं. त्यांचें परकेपण पाहणाऱ्याला उघड उघड दिसत असलें तरी त्यांची लागवड अगदीं आपुलकीनें आणि विशेष कौतुकानें झाली आहे. आपल्या मूळच्या मायभूमींत हीं झाडें कोरड्या हवेच्या प्रदेशांत आढळतात, पण येथें मुंबईतल्यासारखी दमट हवा व निकस जमीनहि त्यांना चालते. जणूं काय जेथें आपला अतिथि म्हणून योग्य तो अतिथिसत्कार झाला तेथलें सर्वच गोड मानून घेतलें पाहिजे ह्याच भावनेनें तीं रुजतात व फुलतात.

आमच्या वसतिगृहाच्या बागेंतलें कॅशिआचें झाड बहुधा प्रिन्सिपल हॅम्ले ह्यांनीं १९२४-३० ह्या वर्षांच्या आपल्या कारकीर्दींत हौसेनें लावलें असावें. आमच्या या बागेचें भाग्य असें कीं तिला झाडा-फुलांची आवड असणारे एक एक प्रिन्सिपल लाभले. ही बाग तसें म्हटलें तर सरकारी, पण सरकारी वस्तूंवर केव्हां केव्हां चढणारें पोरकेपण तिच्यांत नाहीं. उलट बागेंतला एकेक भाग अन् एकेक झाड एकेका प्रिन्सिपलांच्या बागेवरच्या प्रेमाची साक्ष देतात. पहिले प्रिन्सिपल फ्रेझर ह्यांनीं ४०-४५ वर्षांपूर्वीं

लावलेले दोन चिकू, एक माड व एक ताड अजून शाबूत आहेत. त्यांच्या वेळीं असलेले फाटकाजवळचे पांगारा व गोरखचिंच हे दोन वृक्ष खूप फोफावले आहेत. त्यांच्या भल्या जाड खोडावरूनच कॉलेजाचें वय ओळखावें ! नंतर कोणी गुलमोहोर लावले, कोणी आलमांडाच्या पिवळ्या फुलांच्या आणि माधवी-मालतीच्या वेली चढविल्या, कोणी गवताच्या हिरवळीकडेच विशेष लक्ष पुरवलें. पण ह्या सर्वांत हा कॅशिआ उठून दिसतो. त्याला फुलांचा बहर येईपर्यंत इतरांची शोभा !

हें झाड जातीनेंच अल्पायुषी तेव्हां त्याच्यानंतर त्याचा वंश बागेंत कायम रहावा म्हणून दर वनमहोत्सवाला एकेक कॅशिआचें रोप लावलें. त्यांतलीं कांहीं, चांगली वाढ व्हावयाच्या आंतच किडींनीं खाल्लीं, कांहीं पिवळ्या फुलांचे साधे कॅशिआ निघाले. पण १९५१ च्या वनमहोत्सवांतलें एक ह्या गुलाबी कॅशिआच्या जातीचें रोप जगलें. ह्याच वर्षी तें प्रथम फुललें. हेंहि झाड ह्या बागेचें सौभाग्य अखंड राखण्याचें काम करील काय ?

[सह्याद्रि–नोव्हेंबर १९५६]

## २२ : : : शेवगा

शेवग्याचें झाड आम्हां महाराष्ट्रीय लोकांच्या जीवनाशीं आपुलकीच्या अनेक धाग्यादोऱ्यांनीं निगडित झालें आहे. आमच्या जीवनाचें तें प्रतीक म्हणतां येणार नाहीं; महाराष्ट्रियांच्या वृत्तींतला कणखरपणा त्याच्यांत नाहीं आणि त्याची पराकाष्ठेची परोपकारवृत्ति व त्याचें नाजूक सौंदर्य आमच्या स्वभावांत वा स्वरुपांत नाहीं. पण आमच्या कित्येक नव्याजुन्या आठवणी त्याच्याभोंवतीं घोटाळत असतात आणि त्याच्याविषयीं आम्हांला विशेष जिव्हाळा वाटत असतो. महाराष्ट्रांत कुठेंहि जा, पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरीं जा, कोकणांतल्या खेड्यांत जा, वा देशावरच्या खेड्यांत जा, एखाददुसरें शेवग्याचें झाड आढळणार नाहीं असें कदापि होणार नाहीं आणि शेवग्याच्या शेंगांची लज्जत माहीत नाहीं असा कुणीहि महाराष्ट्रीय माणूस कदापि भेटणार नाहीं. आम्हांला शेवग्याच्या शेंगा जेवणांत तर रुचतातच पण त्यांच्या निव्वळ उल्लेखानें अनेक स्मृतिसंवेदनांच्या लहरी आमच्या मनांत उठतात. त्यामुळें वाङ्मयांतील वा चित्रपटांतील ‘ शेवग्याच्या शेंगां’बद्दलहि आम्हांला एक प्रकारची आपुलकीची अभिरुचि वाटत असते.

शेवग्याचें नांव निघालें कीं प्रथम आमच्यामधला ' भटजी ' जागा होतो, कारण शेवगा नाना तऱ्हांनीं आमच्या जिभेचे चोजले पुरवीत असतो, आणि वेळप्रसंगीं पोटाची भूक सुद्धां शमवितो. गरीब-श्रीमंताचा कल्पतरूच आहे तो ! महिन्याच्या शेवटीं भाजी आणायला पैसा नाहीं असें झालें कीं, शेजारच्या काकू आपल्या मुलांना सांगत, "अरे, जारे, शेवग्याचा पाला ओरबाडून आणा जरा, आज त्याची भाजी करूं या." किंवा शेवग्याचीं पानें जून होऊन झाडाला शेंगा लागलेल्या असल्या कीं त्या म्हणत, "अरे, शेवगा झोडपून चार शेंगा काढा बरं आज ! आमटींत टाकूं म्हणजे मग भाजी नसली तरी चालेल." शेवग्याला ' ओरबाडण्याच्या ' नाहीं तर ' झोडपण्याच्या ' गोष्टी ! अतिपरिचयादवज्ञा होते ती अशी ! शेवग्याच्या शेंगा आमटींत टाका, कढींत टाका, पिठल्यांत टाका, मूळ पदार्थांची खुमास वाढेल आणि दोहोंच्या जागीं एक जिन्नस करून भागेल. उत्तर हिंदुस्थानांत राहणाऱ्यांना शेवग्याच्या शेंगांची चव कळत नाहीं. त्यांना शेंगा खाण्याची पद्धत त्रासाची आणि गांवढळ वाटते आणि आंतल्या बेचव गिरासाठीं एवढी यातायात करायची हेंच त्यांना पटत नाहीं. उत्तर प्रदेशांतील माझ्या एका विद्यार्थ्याला विचारलें, "तुमच्या प्रदेशांत शेवग्याच्या शेंगा खातात का ?' तेव्हां त्यानें सांगितलें, "छे, सुधारलेले शहरी लोक नाहीं खात ह्या शेंगा. खेड्यांतले खेडवळ मात्र खातात." शेवग्याच्या शेंगा, अळवाची पातळ भाजी, पिठलें हे महाराष्ट्रीय पद्धतीच्या रोजच्या जेवणांतील अतिशय चविष्ट समजले जाणारे पदार्थ आहेत, पण त्यांची विशिष्ट चव कळायला ' तेथें पाहिजे जातीचें ' असेंच म्हणावें लागतें. परप्रांतीयाला ते सर्वच बेचव वाटतात.

इंग्लंडला ३।। वर्षें राहून मायदेशीं परत आल्यावर मला वडलांनीं कौतुकानें विचारलें, ' आज जेवायला काय करायचें ? ' तर मीं सांगितलें ' चांगलें खरपूस फोडणीचें शेंगांचें पिठलें ! '

शेवगा गरिबांच्याच उपयोगीं पडतो असें नव्हे, श्रीमंतांचेंहि शेवग्याशिवाय अडतें. त्याच्या फुलांची सर दुसऱ्या कशालाच येणार नाहीं. त्याची मातब्बरी कळायला चोखंदळ जीभच हवी! मरीन ड्राईव्हवर राहणारे श्रीमंत डॉक्टर! काय कमी आहे त्यांना? पण डॉक्टरसाहेबांना शेवग्याच्या फुलांची भजी हवींत किंवा चुलींतल्या राखेंत हळदीच्या पानांत भाजून केलेली फुलांची पुडी हवी किंवा आमटींत फुलें हवींत म्हणून त्यांच्या पत्नीला शेवग्याच्या ताज्या फुलासाठीं कुणाकडे तरी याचना करावी लागतेच. फुलांचे पदार्थ खातांना जिभेचें समाधान हें एक, पण मुख्यत: डॉक्टरसाहेबांना कोंकणांतले आजोळचे दिवस आठवतात आणि मन सुखावतें. त्यांच्या आजोबांचें परसांतल्या शेवग्यावर मोठें प्रेम! ते कुणा तिऱ्हाइताला शेवग्याला हात लावूं देत नसत आणि शेवग्याला ओरबाडण्याची वा झोडपण्याची भाषाच त्यांना सहन होत नसे. पण त्यांना सुद्धां शेवग्याच्या फुलांची फार आवड. मग आजी सकाळीं उठल्या कीं वाऱ्यानें पडलेलीं फुलें अलगद वेचून आणीत आणि आज भाजी तर उद्यां भजीं तर परवां फुलांची वडी वा पुडी, असे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ करीत. शेवगा फुलतो त्या दिवसांत सोसाट्याचा वारा सुटतो. महाशिवरात्रीचे वारे परिचयाचेच आहेत, त्यामुळें त्याचीं फुलें आयतींच गळून पडतात. देशावर शेवग्याचीं फुलें खाण्याचा प्रघात नाहीं, पण कोकणी लोकांच्या आणि 'मुंबईकर' म्हणून ओळखले जाणाऱ्या लोकांच्या पाकशास्त्रांतील कल्पकतेनें शेवग्याच्या फुलांचें मोठें प्रस्थ माजवून ठेवलें आहे. त्यांच्यांत शेवग्याच्या शेंगांच्या सुद्धां किती तऱ्हा!—पातळ भाजी आहे, सुकी भाजी आहे, भजीं आहेत, तळलेल्या काचऱ्या आहेत.

माडीवरच्या आत्याबाईची एक गोष्ट सांगतात. मुंबईजवळच असलेल्या मांडवे ह्या ठिकाणीं त्यांचें एक घर होतें. दर उन्हाळ्यास त्यांच्या घरांतील सर्व मंडळी तिथें राहायला जात असत. त्यांचे यजमान

मात्र येऊन-जाऊन असत. एकदां एका शनिवारीं-रविवारीं आपल्या कोर्टातल्या स्नेह्यांना घेऊन दोन दिवस चैन करण्याकरितां म्हणून ते मांडव्यास गेले. त्यांनीं पाहुण्यांजवळ त्या दिवसांत मांडव्यास मिळणाऱ्या कालवांची तोंडभर स्तुति केली होती, आणि 'मांडव्यास आमच्या उन्हाळी घरांत चला, कालवांचीं भर्जीं खायला घालतों,' असें आश्वासन देऊन अत्याग्रहानें त्यांनीं मंडळीस मांडव्यास आणलें होतें. रविवारच्या जेवणाचा मोठा बेत होता, आणि त्यांतल्या कालवांच्या भज्यांचें नांव ऐकून पाहुणेमंडळीच्या तोंडास पाणी सुटलें होतें. पण नेमकी त्याच दिवशीं पावलू कोळीण 'आज कालवं मिळालीं नाहींत' म्हणून सांगत आली. आत्याबाईचें धाबें दणाणलें, कारण पाहुण्यासमोर फजिती होण्याची पाळी आली. त्यांना यजमानांच्या रागीट स्वभावाची मोठी भीति वाटे! आत्याबाई भांबावलेल्या पाहून शेजारच्या बिऱ्हाडांतल्या आजीबाईंनीं त्यांच्याशीं कानमंत्र केला, अन् शिवा गडी चोरपावलांनीं कौलारू छपरावर चढला आणि फुलांनीं भरलेल्या शेवग्याच्या फांद्या तोडून घेऊन आला.



आत्याबाईंनीं आजीबाईच्या सांगण्यानुसार शेवग्याचीं फुलें आणि फुलांच्या पोऱ्या कळ्या घालून भर्जी केलीं आणि पंक्तीस वाढलीं. पाहुणेच नाहीं

तर यजमान सुद्धां अगदीं बेमालूम फसले ! कालवांची* भजीं म्हणून सगळ्यांनीं आवडीनें खाल्लीं आणि आला दिवस निभावला म्हणून आत्याबाईंनीं कृतज्ञतेनें शेवग्याला नमस्कार केला आणि शेजारच्या आजी-बाईंचे आभार मानले.

अशी आहे शेवग्याची महति. अप्पाशास्त्री साठे आपल्या 'घरगुती औषधें' ह्या पुस्तकांत लिहितात, "शेवग्याच्या शेंगा सर्वांच्या परिचयाच्या आहेत. ह्या अग्निदीपक म्हणजे भूक वाढविणाऱ्या आहेत, भूक लागत नसल्यास ह्यांची भाजी करून खावी, भूक लागते. शेवगा वायूचा नाश करतो. वायूनें पोटांत दुखत असल्यास शेवग्याची भाजी खावी, पोटदुखी थांबते. शेवगा ज्वरघ्न आहे. तापांत शेंगांची भाजी तोंडीं लावण्यास द्यावी, ताप जाण्यास मदत होते. कफ व श्वास ह्यानें कमी होतो."

केवळ शेवग्याच्या शेंगाच नाहींत तर सबंध शेवगाच औषधी आहे. शेवग्याची साल आणि शेवग्याचीं मुळें ह्यांचा काढा अर्धांगवायूवर देतात. शेवग्याचे इतर उपयोगहि आहेत. शेवग्याच्या शेंगांतल्या बियांचें तेल काढतात आणि अत्तरें तयार करतांना त्याचा उपयोग करतात. त्याच्या साली ठेचून त्यांतून दोऱ्या व चटया वळतात. त्याचा कोवळा पाला गुरांना फार आवडतो.

शेवग्याच्या उपयुक्ततेमुळें त्याच्या सौंदर्याची जाणीव मागें पडली आहे. शेवगा सुंदर असें म्हटलें तर ह्या दोन शब्दांचें साहचर्य अपरिचित म्हणून कर्णकटु वाटते आणि मनालासुद्धां तें पटत नाहीं. शेवग्याचें झाड

*शाकाहारी लोकांना 'कालव' हें त्यांच्या Oyster ह्या इंग्रजी नांवानें परिचित असेल. इंग्लंड-अमेरिकेंत मोठमोठ्या भोजनप्रसंगीं दारू-बरोबर कालवें देतात. फार महाग असतात हीं ! मत्स्याहाऱ्यांना त्यांचें विशेष महत्त्व वाटतें.

बागेमध्यें कधीं दिसावयाचें नाहीं. त्याचें स्थान परसांत मागल्या बाजूस कुठें तरी! बाग शोभेसाठीं, सुंदर फुलें आणि फुलझाडें यासाठीं, आणि परस उपयुक्त अशा झाडांसाठीं, तेव्हां शेवगा उपयुक्त म्हणून त्याची स्थापना परसांतच होते. केळीं, अळू ह्यांच्या आसपास कुठें तरी शेवगा असायचा आणि सांडपाणी, स्वयंपाकघरांतला केरकचरा, चुलींतली राख यांवर तो पोसला जायचा! पानवेलीचा प्रदेश असला तर पानवेलीला आधार म्हणून शेवग्याचीं झाडें लावतात. कोंकणी भाषेंत म्हणच आहे 'पानवेलीच्या धर्मान् शेगलाक पाणी!' त्याच्या उपयुक्ततेनें त्याचें सौंदर्य आमच्या जाणिवेंतून दडवून ठेवलेलें आहे. तें प्रतीत व्हायला शेवग्याचें दर्शन नव्यानें होणें अवश्य असतें. परवां तसाच योग आला आणि त्यांतूनच ह्या लेखाची निष्पत्ति होत आहे.

जॅन्युअरीच्या शेवटल्या आठवड्यांत मी पुण्याहून मुंबईस येत होतें. सावरी, पांगारा वा पळस फुलण्यास अवकाश होता. एकंदरींत वनराईंत फुलांचा अभावच जाणवत होता. पावसाळ्यांतलीं पाण्यांतील रंगीबेरंगीं फुलें आणि कमळें ह्यांचा बहर सरला होता आणि वसंत ऋतूंतली वन्य झाडांवरची लाल रंगाची उधळ सुरू झाली नव्हती. पण गांव आलें की एकेक घराच्या पाठीं शेवगा फुललेला दिसे. कल्याणजवळच्या सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें रुक्ष अशा आसमंतांत्, एका परसांत चार-पांच शेवग्याचीं फुललेलीं झाडें पाहून एकदम मन थबकलें. आजवर शेवग्याचा विचार सौंदर्याच्या दृष्टिकोनांतून केव्हांहि केलेला नव्हता, पण आज त्याच्या पानांतलें आणि पिवळट पांढऱ्या फुलांतलें नाजूक सौंदर्य अचानक मनाला जाणवलें, आणि मग जेथें तेथें शेवग्याचीं झाडें हुडकण्यास सुरुवात झाली. सोनापूरच्या हिंदु स्मशानभूमीजवळच्या कबरस्तानाच्या भिंतीवरून दोन शेवग्याचीं झाडें दिसलीं. शेवग्याबद्दल कुतूहल मनांत जागृत झालेलें असल्यानें आंत जाऊन पाहिलें तर मन स्तिमित होण्याची पाळी आली. शेवग्याचें बन वा राई

म्हणतां येईल इतकीं झाडें तिथें दिसलीं. उत्पन्नाची बाब म्हणून कब्रस्तानच्या पहारेकऱ्यानें तीं लावलीं असावीं, पण त्या वातावरणास पूर्णपणें साजेशीं अशीं तीं झाडें वाटलीं. मी गेलें त्या वेळेस सर्व झाडें बहरून आलेलीं होतीं आणि कब्रस्तानाच्या शांत वातावरणांत त्यांची पिवळट पांढरीं फुलें आणि नाजूक पानें शोभून दिसत होतीं. फुललेल्या शेवग्यांत कुठें भडकपणा नाहीं वा वरवरचा दिखाऊपणा नाहीं; कब्रस्तानला अवश्य असणारी नम्रता आणि सौजन्य मात्र ओतप्रोत भरलेलें !

शेवगा दुरून सुंदर तितकाच जवळून ! त्याच्या संयुक्त पानांत सम-प्रमाणता आहे, पण ती गुलमोहोराच्या वा चिंचेच्या पानांसारखी ठराविक स्वरूपाची नाहीं. त्याच्यांत एक प्रकारची स्वैर अनिर्बंधता आहे म्हणून कलात्मकता आहे. दुरून शेवग्याची पालवी सुंदर जाळीदार दिसते. कोवळ्या पानांचा रंग नितळ हिरवा आणि अत्यंत आल्हाददायक, आणि पानें कशीं नाजूक आणि लवलवीत ! जवळून पानें पाहिलीं कीं दिसून येतें कीं शेवग्याचीं पानें दुहेरी, तिहेरी प्रकारांनीं संयुक्त. त्याचीं छोटीं छोटीं नाजूक पानें प्रमाणबद्धतेनें देठाच्या दोन्हीं बाजूंस फुटतात, आणि मोठ्या पानांच्या टोंकास, पान टोंकदार निमुळतें दिसेल अशा प्रकारची पर्णरचना असते. लहान-मोठ्या कोणत्याच पानांत भरगच्चपणा नाहीं. सर्व पानें अंतरा-अंतरावर मोकळेपणानें फुलल्यानें, झाडावर पानांचें नक्षीकाम केल्याचा आभास निर्माण होतो. फुलें आपल्या स्वतंत्र डहाळ्यांवर अशींच जोडी-जोडीनें पण स्वैरतेनें फुलतात, त्यामुळें फुलांच्या घोसांतहि भरगच्चपणा नाहीं. हिरव्या पुष्पकोशांतून बाहेर दिसणाऱ्या मखमलीसारख्या बंद टपोऱ्या कळ्या, आणि फुललेलीं फुलें अशा घोसांनीं बहरलेली डहाळी फार नाजूक व सुंदर दिसते. फुलांचा रंग पिवळट, पांढरा, त्यांचा सुगंध मंद आणि प्रसन्न, आणि आकार मोठा आकर्षक ! कळी उमलली कीं फुलाच्या

नऊ पाकळ्या उलट्या वळतात, आणि दहावी पाकळी विरुद्ध दिशेला कमान करून सामोरी राहते. फुललेलीं फुलें आणि बंद कळ्या एकाच वेळीं डहाळ्यांवर असल्यानें, फुलांची डहाळी जवळून फार आकर्षक दिसते. फुलांच्या घोसांनीं आच्छादित असलेल्या डहाळ्या जाळीदार पानाच्या पर्णशाखांत व फांद्यांत मिसळल्यानें झाडाला शोभा चढते, आणि त्याच वेळीं नाजूक हिरव्यागार पीळदार शेंगा लटकूं लागतात. कोवळ्या शेंगांत नाजुकपणा असल्यानें त्या फुलापानांत शोभून दिसतात.

एवढें मात्र खरें कीं, शेवग्याचें हें सौंदर्य अत्यंत अल्पकाळ टिकतें. फारतर महिनाभर शेवग्याची शोभा ! एकदा वाऱ्यानें पानें गळलीं—आणि बहुधा वरचीं पानें लवकरच गळतात—फुलांचा बहर सरून शेंगा जाड झाल्या कीं गेलें शेवग्याचें सौंदर्य ! मग तो उघडा-बोडका दिसूं लागतो. अशा स्थितींत शेवगा दृष्टीस पडल्यानें कुणीतरी नवशिक्या इंग्रजानें त्यास ड्रम-स्टीक-ट्री (Drumstick Tree) ढोलक्याच्या काठ्यांचें झाड—असें विनोदानें सुचविलें असावें आणि आतां इंग्रजींत तेंच नांव रूढ झालें आहे. जून झालेल्या शेंगा झाडावरून लटकताना दिसल्या तर प्रथमदर्शनीं त्या ढोलक्याच्या काठ्यासारख्या दिसतात खऱ्या, आणि इंग्रजाला शेवग्याच्या शेंगाची चव काय माहीत ?

पण शेवग्याची निगा राखली, दर श्रावणांत त्याच्या फांद्या व्यवस्थित छाटल्या, तर शेवग्याचें आयुष्य व सौंदर्य अधिक टिकतें आणि त्याची उपयुक्तताहि वाढते. छाटलेल्या शेवग्याला सरळ उभ्या अनेक फांद्या फुटतात आणि मग सबंध झाडाचा आकारच अगदीं वेगळा दिसतो. ह्या उभ्या फांद्यांनीं शेवग्याचा विस्तार वाढतो आणि झाड आकर्षक दिसूं लागतें.

कबरस्तानच्या पहारेकऱ्यानें शेवग्याची निगा कशी राखावी ह्या बद्दल अनेक सूचना देऊन ठेवल्या आहेत. कधींकाळीं स्वतःचें घर

बांधलें तर एखादा तरी शेवगा घरापुढच्या बागेंत अवश्य असेल आणि दुसरा एखादा घरापाठच्या परसांत असेल. इतर पुष्कळ म्हणोत कीं शेवग्याला काय एवढें महत्त्व द्यावयाचें, त्याचा बुंधा ठिसूळ, त्याच्या लाकडांत टिकाऊपणा नाहीं कीं मजबूतपणा नाहीं. त्याचें सौंदर्य अगदीं अल्पायुषी, पण त्याची पर्वा नाहीं. त्याच्या अल्पकालीन फुला-पानांच्या बहरानें तेवढ्या वेळांत तरी बागेच्या शोभेंत भर पडेल, आणि दारच्या शेवग्याच्या शेंगा आणि फुलें खायची संधि मिळेल ती वेगळीच ! पण मुख्य म्हणजे शेवग्यासंबंधींच्या अनेक पूर्वापार आठवणी त्या स्वतःच्या मालकीच्या शेवग्यांत विलीन होऊन डोळ्यांना दिसणारें त्याचें सौंदर्य आणि जिभेला पटणारी त्याच्या शेंगाची व फुलांची चविष्ट गोडी ह्यांत आपुलकीच्या नवीन जाणिवेची अधिक भर पडेल.

[ –सह्याद्रि–जून १९५७ ]

## २३ : : : संगमाश्रम

'संगमाश्रम' हें आमचे आजोबा रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांच्या राहत्या घराचें नांव. सेवानिवृत्तीनंतर निवांतपणें राहण्यासाठीं म्हणून १८९२ त त्यांनीं तें बांधलें. वानप्रस्थावस्थेंत अध्ययन व चिंतन ह्या व्यवसायांत मग्न होऊन, आपला मुलांमाणसांचा व पशु-पक्ष्यांचा परिवार घेऊन राहावयाचें म्हणून 'आश्रम' आणि मुळा-मुठा नद्यांच्या संगमाजवळ म्हणून त्यास 'संगमाश्रम' नांव देण्यांत आलें. ह्या घरांत आजोबांच्या अनेक कल्पनांना व आशाआकांक्षांना मूर्त रूप मिळालें असावें.

संगमाश्रमाचें आमच्या दृष्टीनें वैशिष्ट्य हें कीं, त्याच्या बाह्यांगांत त्याचप्रमाणें त्याच्या अंतरंगांत ठिकाठिकाणीं आजोबांच्या व्यक्तित्वाची साक्ष पटते. काळ्या वजनदार चौकोनी दगडांचें, चांगल्या भरभक्कम पायावर उभारलेलें घर तें ! आज साठ-पासष्ट वर्षें झालीं, वाऱ्यापावसाला तोंड देऊन, जसेंच्या तसें, आपल्या साधेपणाच्या तेजस्वी वैभवांत खंबीरपणानें उभें आहे. दगडाचा रंग हलला नाहीं कीं कुठें कपारी उडाली नाहीं. घराच्या दर्शनी भागाला कमानी व वरच्या अंगाला नक्षीदार दोन

9.23 ..... दि. ...१९९

वर्तुळें आणि मधल्या अंगाला छपराजवळची गच्ची, ह्यांपलीकडे कुठें कांहीं विशेष शोभा नाहीं. सताड उभ्या भरीव दगडाच्या भिंती, आणि



त्यांत सरळ चौकोनी खिडक्या. त्या खिडक्या मात्र भरपूर हवा येण्यासाठीं भल्याभक्कम मोठ्या ! घरांतलि खोल्या, सोपे, सगळें अगदीं शिस्तींत ! कुठें कांहीं अघळपघळपणा नाहीं, कोपरे-कोनाडे नाहींत, गुपित-छुपित नाहीं. सगळें सत्य उघड्यावर, सडेतोड आणि निर्भीड, त्यांत कुठें आडवळणें नाहींत.

आज त्या बाजूची वस्ती वाढली, संगमाश्रमाच्या जवळ अनेक घरें बांधून झालीं, अगदीं अद्ययावत् पद्धतीचीं शोभिवंत आणि डौलदार घरें झालीं. पण यामुळें संगमाश्रमाचें वैभव यत्किंचित् सुद्धां कमी झालेलें नाहीं. तो वेगळ्याच कोटींतला ! ह्या नव्या घरांकडे तो कौतुकानें पाहतो पण स्वतःच्या वेगळेपणाची पुरेपूर जाणीव उराशीं बाळगून आहे, असाच भास होतो पाहाणाऱ्याला ! त्याचें वैभव त्याच्या साधेपणांत, त्याच्या भरीवपणांत आणि पूर्णपणें कार्यक्षम असण्यांत. म्हणूनच आम्हांला संग

माश्रम आजोबांच्या मनोधैर्याचें व सात्त्विक ऋजुतेचें आणि त्यांच्या कार्याच्या भरीवपणाचें व दृढतेचें प्रतीक वाटतो.

घर बांधलें तेव्हां आजोबांचा संयुक्त कुटुंबपद्धतीवर अढळ विश्वास होता. त्यांनीं म्हटलें आहे, " माझें ध्येय असें होतें कीं जुनी कुटुंबपद्धति कायम ठेवून तींत आधुनिक दृष्टीनें योग्य त्या सुधारणा करावयाच्या. " तेव्हां त्यांनीं घर बांधलें तें असें कीं आपले तिघे मुलगे आणि दोघी मुली आपापला सर्व परिवार घेऊन आले तरी सर्वांना सोयीनें राहतां यावें. मुख्य दुमजली बंगल्याच्या माडीवर प्रत्येक मुलाच्या व मुलीच्या नांवानें एकेक खोली होती. शिवाय इतर नातेवाईक, स्नेही मंडळी ह्यांच्या-साठीं एक लांबलचक पाहुण्यांची खोली होती. आजोबांच्या नातवंडांचे पंतवंडांचें बाळपणांतले आनंदाचे दिवस संगमाश्रमांतच गेले.

त्यामुळें आमच्या कित्येक जणांच्या कित्येक स्मृति आजवर संगमा-श्रमाभोंवतीं घुमत आहेत. कधीं पुण्या-मुंबईचा प्रवास करीत असलों कीं, शिवाजीनगराजवळ आगगाडीच्या फाटकानजीक आमची दृष्टि भिरभिर फिरते आणि सगळें बाळपण जिथें मोठ्यांच्या संगतींत गेलें, तें घर हुडकून काढते. एकदां तें घर दृष्टीस पडलें कीं, मनांत पूर्वीच्या आठवणी तरंगूं लागतात, आजोबांची मूर्ति डोळ्यासमोर उभी राहते, आणि नकळत " तेथें कर माझे जुळती " अशी मनःस्थिति होते.

घराच्या आठवणी सांगूं म्हटल्या तर किती आहेत ! घराचें चित्र अद्याप डोळ्यांसमोर स्पष्ट उभें राहतें. घरांत एकंदर तीन मोठे दिवाण-खाने होते. संयुक्त कुटुंबासाठीं म्हणून बांधलेल्या घरांत दिवाणखान्याचें स्थान मोठें ! माडीवरच्या दिवाणखान्यांत माझ्या आठवणींत तरी मुलांचाच वावर जास्त. शाळेच्या दिवसांत इथें अभ्यास चाले आणि सुटीच्या दिवसांत अवांतर वाचन—कधीं सामुदायिक, कधीं वैयक्तिक—घरगुती प्रदर्शनाची तयारी, शिवण, गप्पा, चित्रांच्या चिकट-वहीचें काम,

असे उद्योग चालत. खालचा दिवाणखाना फारसा वापरांत नसे. कुणी भेटायला बाहेरची मंडळी आली तरच त्याचा उपयोग होई. तिथें कोच, खुर्च्या वगैरे विलायती पद्धतीचा सरंजाम व्यवस्थित मांडलेला असे. तिसरा दिवाणखाना म्हणजे जेवण-घर. दोन वेळचा चहा आणि दोन वेळचें जेवण ह्या निमित्तानें कुटुंबाच्या सगळ्या बैठकी तिथेंच होत. जेवण व चहा खालीं पाटावर बसूनच होई. जेवणासाठीं खुर्च्या-टेबलें वापरणें आजोबांना पसंत नसे.

हवेच्या दृष्टीनें घर असें बांधलें होतें कीं, पश्चिमेचा आणि दक्षिणेचा पूर्ण फायदा मिळावा. खालच्या मजल्यावर पश्चिमाभिमुख अशी आजोबांची अध्ययनाची आणि वाचनालयाची खोली. खोलीला दोन दालनें असून मध्यभागीं मोठी कमान होती. खोलीच्या तीन बाजूंस वर तक्तपोशीपर्यंत पोंचणाऱ्या पुस्तकांच्या शेल्फा. खोलीच्या पहिल्या दालनांत वाचनाची सोय. टिप्पणें करण्याकरितां एक-दोन लहान टेबलें असत व बैठकीची व्यवस्था असे. चर्चेला वा विचारविनिमयासाठीं आलेली मंडळी इथेंच बसत असे आणि आजोबांचें वाचन ह्याच खोलींत होई. आंतल्या दालनांत लिहिण्याचें मोठें टेबल व लेखनाचें सगळें साहित्य असे. आजोबांचें लेखनाचें काम इथें चालू असे. ह्या खोलीला लागून असलेल्या खोलींत कारकुनाची बसण्याची व्यवस्था असे आणि भिंतींत असलेल्या दोन कपाटांत मुलांसाठीं पुस्तकें असत. तीं आम्हांला पद्धतशीरपणानें आमच्या नांवावर सही करून घ्यावीं लागत. आजोबांच्या वाचनालयाच्या खोलींत यावयाचें म्हणजे आम्हांला आधीं परवानगी काढावी लागत असे. जवळ आलों कीं आपोआपच पावलें हळू पडत, आवाज बारीक होई, आणि कधीं नाहीं तें गांभीर्य आणि शांतता वागण्यांत येई.

ह्या वाचनालयाच्या शेजारींच खालचा दिवाणखाना आणि त्याला-लागून खालच्या अंगाची पूर्वेकडील खोली. ती बाळंतिणीची खोली.

आजोबांच्या नातवंडांपैकीं आम्हां सात जणांचा जन्म त्या खोलींतच झाला. पंतवंडांच्या वेळेस बाळंतपणें बाहेरगांवीं झालीं, हॉस्पिटलमध्यें जाण्याची पद्धतहि निघाली, त्यामुळें पुढें ही खोली रिकामीच पडली.

माडीवर जावयास घरांत दोन जिने होते, पुढचा रंगीत तांबडा जिना आणि मागच्या बाजूचा बिनरंगवलेला साधा लाकडी जिना. पण मी लहान असतांना माझ्या एका मामेबहिणीनें हिरव्या जिन्याची कल्पना माझ्या मनांत भरवली होती. ह्या जिन्यावरून चढून वर गेलें कीं नंदन-वनांतच प्रवेश होई ! त्या जिन्याच्या आणि त्या उपवनाच्या वर्णनांत ती भरपूर काव्य ओतीत असे. मला अगदीं चुटपुट लागून मी तिला म्हणे, ' दाखव ना तो हिरवा जिना आणि मला घेऊन चल ना त्या उपवनांत !' त्यावर ती म्हणे, ' अजून लहान आहेस तूं ! ' पण लहान असतांनाच तो हिरवा जिना आणि तें नंदनवन जवळ होतें, आतां तें सारें दूर गेलें ! माझी ती मामेबहीण मात्र पुढें चांगल्यापैकीं कवयित्री झाली.

मुख्य बंगल्यापासून कांहीं अंतरावर स्वयंपाकघर—जेवणघर—कोठी —ओसरी हें मिळून एक स्वतंत्र बैठें घर होतें. तिथेंहि पश्चिम साधलेली. आचारी असला तरी हाताजवळ घरांतल्या बायकाच करीत आणि त्यांचीच देखरेख असे. त्यांचा वावर दिवसभर ह्याच भागांत, त्यामुळें पश्चिमेची आवश्यकता भासली. सुधारकांच्या घरांत, घरांतील बायकामंडळींच्या सुखसोयींचा विचार पहिल्यानें होत असे.

संडास दूर अंतरावर, तिथें जावयाचें म्हणजे एक वारीच करावी लागे. पण घराची हवा दूषित होऊं नये ह्या हेतूनें मुद्दामच अशी व्यवस्था केली होती. रात्रीं कधीं कुणाला जावें लागलें कीं सोबतीला कुणी तरी, आणि सोबतीच्या सोबतीला कुणी अशी तिघां-चौघांची, दोन कंदिल घेऊन, मिरवणूक निघत असे. पण सर्वांच्या पोटाला शिस्त अशी कीं सहसा रात्रीं कुणाला जावें लागतच नसे.

संडासाच्या पलीकडे नोकरांच्या खोल्या आणि त्याच्या पलीकडे घोडथाचा तबेला आणि गाईचा गोठा.

घरबांधणी सर्वच दृष्टींनीं इतकी योजकतेनें झाली होती कीं अगोदर किती विचार झाला असेल, कुटुंबांतील किती बैठकी झाल्या असतील त्याची कल्पनाच करावी. प्रत्येकाच्या रास्त गरजांचा आणि आरोग्य शास्त्राच्या साऱ्या तत्त्वांचा विचार होऊनच घराचा प्लॅन तयार झाला असावा.

घरासाठीं जागा म्हणजे भांबुडर्यातील ऐसपैस दोन एकर जमीन घेतली होती. त्या वेळीं तिथें वस्ती अगदी तुरळक. एखाद-दुसरा पारशाचा वा सरकारी बंगला. निम्मी जमीन वावर म्हणून रिकामीच ठेवली होती. ह्या वावरांत हंगामाला शाळू पिकत असे. शेतांत राबण्याची आमच्या आजींना मोठी हौस. खुरपणें, निंदणें, कापणी सगळ्या कामांत नातवंडांना घेऊन आजींचा हातभार असे. पावसाळी पीक निघाल्यावर जमीन पडूनच असे. पण त्या काळ्याशार जमिनीची संगमाश्रमाच्या व्यक्तित्वाला साजेशी मोठी शोभा होती; आणि वावरांतल्या ढेकळांतली माती खायला किती चविष्ट लागे. वयाच्या तीन वर्षांवरची हीच एक आठवण जागी आहे. चोरून माती खायची, मग सर्वांचीं बोलणीं ऐकून घ्यायचीं. कुणी तरी म्हणे, 'वावरांतली माती खाते ? ही मुलगी वेडी तर नाहीं निघणार ?' पण त्या मातीची चव कांहीं औरच !

घराच्या पुढें व पाठीमागें भलीथोरली बाग होती—अगदीं विचारपूर्वक आंखलेली. फाटकाच्या दोन बाजूंस, गुलमोहोराचे दोन फोफावलेले वृक्ष द्वारपाल म्हणून खडे ! त्यांची शोभा तिन्ही त्रिकाळ. पावसाळ्यांतला पानांचा पिसारा मोठा डौलदार, मग शरदऋतूंत त्यांच्यावरून तलवारीच्या आकाराच्या लांबलचक हिरव्या जाड शेंगा लटकत. हिवाळ्यां त गळलीं तरी त्या काटक्यांतसुद्धां एक प्रकारची आकर्षक शोभा असे. पुढें

वसंतऋतूंत पालवी फुटे अन् उन्हाळ्यांत तर काय वृक्ष तांबड्या फुलांच्या फुलोऱ्यानें आणि हिरव्या बुंद कळ्यांनीं बहरून येत. फाटकांतून पुढें आल्यावर बंगल्यासमोरच बदामाच्या आकाराची गुलाबांची बाग होती. कुंड्यामध्यें पिवळे, गडद तांबडे तऱ्हेतऱ्हेचे गुलाब होते. त्या बागेंत गावठी गुलाबांचींहि चार-सहा रोपें शिरलीं होतीं. पण त्यांना कुंड्यांचा मान नको होता, तीं आदबीनें कोपऱ्यावर जमिनींतच उभीं असत आणि आपल्या गोड परिमलानें सारी बाग दरवळून टाकीत. बदामी बागेच्या दोन्ही बाजूंस गाडी जाण्यासाठीं रुंद रस्ते होते. ह्या रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस हंगामी फुलांचे ताटवे होते. त्यांच्या पलीकडे दोन कमानी आणि कमानींतून गेल्यावर दोन हौद आणि त्यांच्याभोंवतीं छोटी वर्तुलाकार बाग होती. एकीकडे मधुमालती, निशिगंध, जाईजुई अशीं नाजूक वासाचीं फुलें होतीं तर दुसऱ्या बाजूस हिरवा चाफा, पांढरा चाफा व तऱ्हेतऱ्हेच्या लिली पुष्पांचीं रोपें होतीं. बागेची हौस खरी आजींची, पण आजी गेल्यावर दोन तपें आजींची आठवण म्हणून बागेची देखरेख स्वतः आजोबांनीं केली.

स्वयंपाकघर जेवणघराच्या बैठ्या घरासमोर दोन चिंचेचीं उंच झाडें, जवळ कवठाचें एक झाड, पलीकडे एका बाजूला आंबट आवळ्याचें –हरपररेवडीचें झाड, दोन पेरू, एक डाळिंबी. आम्हा मुलांचा स्वर्ग हा! बेतानें खाल्लें तर चिंचा, आवळे खायची परवानगी होती. पण असला माल परवानगीनें खाल्ला तर गंमत कुठे? मागच्या पोर्चवरून चढायचे, कौलांवरून बैठ्या घराच्या छपरावर चालत जायचें आणि तिथें बसून चिंचा खायच्या ह्यांत खरी गंमत. गाभोळ्या चिंचेची विशेष लज्जत. ओसरीच्या बाजूला पारिजातकाचीं दोन झाडें होतीं. त्या फुलांचा सडाच पडत असे सकाळच्या प्रहरीं!

आम्हां सगळ्या नातवंडांना पंतवंडांना संगमाश्रम म्हणजे आपलें

घर वाटे. सगळी मंडळी सुटीच्या वेळीं जमलीं कीं आजोबांचें अंतःकरण आनंदानें भरून येई.

पण पुढें संयुक्त कुटुंबासाठीं म्हणून बांधलेल्या ह्या एवढ्या मोठ्या घरांत एकट्यानें राहण्याचा प्रसंग आजोबांवर आला. योजलें एक आणि झालें दुसरेंच! कालाचा ओघ चाललाच होता, त्याला कोण अडविणार? आजोबांनीं आपल्या रोजनिशींत लिहिलें, "ह्याच माझ्या घरांत कांहीं वर्षांपूर्वीं मी, माझें कुटुंब, माझे मुलगे व मुली, त्यांचीं मुलें-बाळें अशीं राहत होतों. पण आतां पाहा, माझें कुटुंब गेलें, माझी ज्येष्ठ कन्या निवर्तली, माझा ज्येष्ठ पुत्रहि माझ्यासमोर गेला आणि मी त्या मुलांमाणसांनीं एकदां भरलेल्या घरांत एकटा येऊन राहिलों आहें. हे विचार मनांत आले म्हणजे तें दुःखानें व्याप्त होतें. पण देवाचा विचार मनांत आला, त्याला शरण गेलों, त्याची प्रार्थना केली म्हणजे मनाला शांति प्राप्त होते."

त्या एकटेपणाचा कधीं त्यांना उद्वेग येई. अशाच एका क्षणीं ते आपल्या मुलीला एकदां म्हणाले, "कंटाळलों ह्या एकट्या जिण्याला! सर्वांनीं एकत्र राहावं म्हणून हें एवढं घर बांधलं आणि आतां अगदीं एकटा पडलों. दृष्टि क्षीण झाली आहे, त्यामुळें वाचनहि होत नाहीं. मग जुन्या आठवणींनीं मन भरून येतं आणि डोळ्यांवाटे वाहूं लागतं. वाटतं नको हें असं राहणं! शेवटचे दिवस आपल्या मुलांमाणसांत काढावेत. पाहा मुंबईस तुझ्या ब्लॉकजवळ मला स्वतंत्र एखादा ब्लॉक मिळतो तर. मग तिथेंच येतों मी." एक दिवस अचानक मावशीकडून खरोखरच तार आली, "शेजारचा ब्लॉक रिकामा होत आहे, तुमच्यासाठीं घेऊं कांय?" आजोबांनीं दोन दिवस खूप विचार केला. पण संगमाश्रम सोडून जाण्यास मन तयार होईना. तें घर, ती वाचायची खोली, प्रार्थनेची खोली, ती बाग, त्यांचं तें ठराविक जीवन त्यांच्या व्यक्तित्वाशीं इतकें

एकजीव झालें होतें कीं, तिथून दूर जाणें म्हणजे अंतःकरणाचा लचका तोडण्याजोगें होतें.

घराला अनेक गोड स्मृतींचा वास दरवळून राहिला होता. हें सगळें सोडायचें ? आणि कशासाठीं ? त्यांनीं तारेचें उत्तर पाठवलें, "मला ती जागा नको. मीं इथेंच राहण्याचें ठरविलें आहे." दोन दिवस नोकर माणसांच्या–तींच उरलीं होतीं आतां जवळ–तोंडचें पाणी पळालें होतें, गाईसुद्धां उदास आसुसलेल्या डोळ्यांनीं पाहत होत्या, माळ्याच्या कामांत ढिलाई झाल्यानें बागेवर अवकळा आली होती. पण आजोबांनीं संगमा-श्रमांतच राहण्याचा आपला निश्चय जाहीर केल्यानंतर सर्वांचें मन उल्हसित झालें. गाईंना वैरण मिळाली, बागेला पाणी मिळालें आणि सर्वांवरची उदासपणाची छटा दूर झाली. आजोबांच्या मनांत आलें असावें, "माझीं मुलंबाळंच माझीं ही किती कोती ममत्वाची कल्पना ! इतके दिवसांचे इमानी नोकर माझे नाहींत ? हे घोडे, हीं गुरं, ह्या तीन मांजऱ्या हे मुके प्राणी माझे नाहींत ? सर्वांच्या आठवणींनीं व माझ्या जीवितकार्यानं व्यापलेलं हें घर माझं नाहीं ? तसं म्हटलं तर माझं कांहींच नाहीं. मुलंबाळंहि माझीं नाहींत आणि घरहि माझं नाहीं. आहे सारं त्या परमेश्वराचंच. मग मीं हें सोडून माझं शोधण्यासाठीं दुसरीकडे जाण्याचं कारण काय ?"

पुढें पुनः आजोबांजवळ मंडळीं जमली. त्यांच्या आयुष्यांतल्या शेवटच्या चार वर्षांत त्यांचा मुलगा, सून, नातू, नातसून कुणी ना कुणी जवळ असे. त्यांच्या सगळ्या शक्ति क्षीण झाल्या होत्या, शरीरांत ताकद राहिली नव्हती, स्मृति कमी झाली होती, भोंवतालच्या परिस्थितीची जाणीवहि अस्पष्ट झाली होती. एकंदर सारें जिणें परावलंबी बनलें होतें. पण एकदां अचानक मनानें घेतलें कीं, लोणावळ्यांत उन्हाळ्यासाठीं म्हणून एक घर त्यांनीं बांधलें होतें तिथें जावें. वास्तविक कांहीं वर्षांपूर्वीं त्यांनीं हें घर नात्यांतच विकलें होतें, आणि तें घर पाडून त्यावर दुसरी इमारत

उभारण्यांत आलेली होती. आजोबांना ह्या सगळ्याची विस्मृति पडलेली दिसली. प्रत्यक्ष प्रकार ध्यानांत आल्यावर आपल्या पूर्वीच्या घराची आठवण येऊन त्यांना धक्का बसेल कीं काय, ही एक भीति होती. तसें कांहीं झालेंच तर ऐनवेळीं उपचारासाठीं त्यांच्या प्रकृतीचें मान माहीत असणारा डॉक्टरहि लोणावळ्यास मिळणें शक्य नव्हतें. पण त्यांनीं फारच आग्रह धरल्यानें त्यांच्या नातसुनेनें त्यांना लोणावळ्यास नेण्याचा हिय्या केला. आणि मोठ्या आश्चर्याची गोष्ट ही कीं, तिथें गेल्यावर घरांतला बदल त्यांच्या लक्षांतसुद्धा आला नाहीं! दोन दिवस लोणावळ्यास आल्याचा आनंद होता. पण तिसऱ्या-चौथ्या दिवशीं आपण लोणावळ्यास आहोंत, ह्याची जाणीवसुद्धां राहिली नाहीं. पडल्या पडल्या त्यांना भास होई आपण संगमाश्रमांतच आपल्या वाचनालयाच्या खोलींत आहोंत. एकेका पुस्तकाचें नांव घेत आणि तें आणायला सांगत. ' मिळत नाहीं ' म्हटलें कीं, संगमाश्रमांतील वाचनालयाच्या बारीकसारीक खुणा ते सांगत. संगमाश्रम इतका एकजीव झाला होता त्यांच्या सर्व विचारांशीं आणि जीवनाशीं! तिथून दूर गेले तरी तिथेंच असल्याचा भास होई आणि त्यांतच आनंद वाटे.

पुढें संगमाश्रम त्यांच्या कुटुंबियांत राहिला नाहीं. अपरिहार्य अशा कांहीं कारणामुळें तें घर विकावें लागलें. दुसऱ्या महायुद्धाच्या दिवसांत तें आर्किऑलॉजिकल खात्याचें कार्यालय म्हणून वापरण्यांत आलें. आजोबांनीं ज्या संशोधनकार्यांत अपरंपार यश मिळविलें, त्याच्याशीं संबंधित कार्यासाठींच त्यांच्या घरांचा उपयोग होत आहे, हें पाहून त्यांच्या कुटुंबियांना समाधान वाटलें. पुढें कांहीं वर्षांनीं घराचे मालक घरांत राहण्यास आले. भीति वाटली, संगमाश्रमांत आमूलाग्र बदल होतो कीं काय. पण आनंदाची गोष्ट ही कीं, आजोबांच्या घराविषयींच्या कल्पनांचें चीज होईल, अशाच गृहस्थांच्या हातीं घर पडलें असें दिसून आलें. घरांत थोडा-फार

बदल झाला आहे, आंतून त्यांत अद्ययावत्पणा आला आहे. हल्लींच
काळांत अवश्य असणाऱ्या अनेक सुखसोयींची व्यवस्था झाली आहे
घराची शोभा वाढली आहे. पण संगमाश्रमाचें मुळांतलें रूप बद
नाहीं. संयुक्त कुटुंब-पद्धतीविषयीं आणि शिस्तीविषयीं आस्था असणा
मालक घराला मिळाले, त्यामुळें घराचें ब्रीद पूर्वी होतें तेंच कायम अ.
आज बाग बदलली आहे, फुलझाडांची आणि फळझाडांची खूप
लागवड झाली आहे; पण पूर्वींची ती शिस्त आणि योजकता सर्वांत दि
येते. सध्यांच्या मालकांच्या सौजन्यानें घरांत आणि बागेंत हिंडतां
कधींकाळीं, कीं आजोबांचे अगदीं जवळचें कुणी फारा दिवसां
भेटल्याचा आनंद होऊन कृतकृत्य वाटतें.

कुणीं सांगावें, घर आजोबांच्या कुटुंबांतील आम्हां मंडळी
वापरांत राहिलें असतें तर पूर्वींच्या स्मृतींवर नवीन घटनांच्या जाणिवे
पुटें चढल्यानें त्या बुजल्या असत्या आणि आतां संगमाश्रमाविषयीं
मांगल्याची आणि पावित्र्याची भावना वाटते ती पुसटली असती. जें
कांहीं होतें त्यांत बऱ्याचा अंश असतोच !

[सह्याद्रि–मार्च–१९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम 23673 दि: 6.1.94
क्रमांक 9935 नों. दि. 30.1.95
ग्रंथ संग्रहालय ठाणे
८०६८

REFBK-0009764